UNIVERSAL
LIBRARY
OU_192301
UNIVERSAL
LIBRARY

त-गौरव-ग्रंथमाला-पुष्प-३९

# ज्ञानदीप.



नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

—भगवान् श्रीकृष्ण.

सन १९२५.

( सर्व हक्क स्वाधीन. )

प्रत बारा आणे ] किंमत [ कापडी प्रत एक रुपया.

Printed & Published by
M. N. KULKARNI,
at the
KARNATAK PRESS
318 A. Thakurdwar, Bombay.

# प्रकाशकाची प्रस्तावना.

कौंट टॉलस्टॉय यांच्या जीवनचरित्राचा उपसंहारादाखल लिहिलेला हा अखेरचा भाग आहे. हा लेख सुप्रसिद्ध आंग्ललेखक डब्ल्यू. टी. स्टेड यांनीं लिहिलेला आहे. टॉलस्टॉय यांच्या एकंदर मतांचा थोडक्यांत सारांश यांत आला आहे. स्टेड हे एक नामांकित व सहृदय लेखक होते ही गोष्ट जगप्रसिद्ध आहे. राष्ट्राचीं सूत्रें हातीं वागविणाऱ्या धुरंधर मुत्सद्यांस आणि एकमुखी सत्ता गाजविणाऱ्या तक्ताधिपतींसही स्टेड यांच्या लेखांचा वचक होता. ते गरिबांचे कनवाळू व जुलमी राजसत्तेचे पक्के द्वेष्टे होते. त्यांचीं मतें टॉलस्टॉय यांच्या मताशीं बऱ्याच अंशीं जुळणारीं होतीं. अशा प्रकारच्या समान हृदयत्वामुळें टॉलस्टॉय यांच्या जीवनचरित्राचें व मतांचें रहस्य सांगण्याचा अधिकार त्यांस निसर्गतःच प्राप्त झाला होता असें म्हणणें अतिशयोक्तीचें नाहीं. हा एकच भाग लक्ष्यपूर्वक वाचल्यास टॉलस्टॉय यांच्या सगळ्या चरित्राचें मर्म वाचकांच्या गळीं उतरण्यासारखें आहे.

टॉलस्टॉय यांनीं लहान लहान गोष्टीही बऱ्याच लिहिल्या आहेत. गोष्टी सांगण्याची टॉलस्टॉय यांची कला इतकी अजब आहे कीं लहानापासून मोठ्यापर्यंत, भिकाऱ्यापासून राजापर्यंत आणि ट फ करणाऱ्या अडाण्यापासून महापंडितापर्यंत सर्वांसच त्या सारख्या प्रिय झाल्या आहेत. या सर्वांगसुंदर कथा आमच्या मराठी वाचकवर्गासमोर यथाकाल आणण्याचा आमचा विचार आहे.

कर्नाटक प्रेस,
३१८ ए, ठाकुरद्वार,
मुंबई नं. २.

मंगेश नारायण कुळकर्णी,
मालक व प्रकाशक,
भारत-गौरव-ग्रंथमाला.

# ज्ञानदीप.

( टॉलस्टॉय यांचा निवडक लेखसंग्रह )

## रशियांतील उदार मतवाद्यांस पत्र.

( अर्थशास्त्रासंबंधीं विचार करण्याकरितां रशियांत क्याथेराईन राणीच्या काळापासून एक अर्थशास्त्रमंडळ निर्माण झालें होतें. रशियांतील सांपत्तिक स्थितीचा विचार या मंडळांत चालून कांहीं उपयुक्त पुस्तकें प्रसिद्ध होत असत. इ. स. १८९६ सालीं या मंडळाचे कांहीं विचार झारशाहीस नापसंत होऊन तिनें आपल्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून या मंडळावर गदाघात केला. तेव्हां त्या मंडळाच्या एका स्त्री सभासदानें या बाबींत टॉलस्टॉय यांचें मत विचारलें असतां पुढील पत्र त्यांनीं उत्तरा दाखल लिहिलें. )

तुमच्या मंडळाच्या हातून घडत असलेलें कार्य मला पसंत आहे आणि या मंडळाच्या हक्कावर पडलेल्या घाल्याचें निवारण करण्याच्या कामांत तुमच्या मंडळास मीं मोठ्या आनंदानें मदत केली असती. सामान्य जनाच्या शिक्षणास व्यत्यय आणणाऱ्या लोकांविरुद्ध खटपट करण्यांत आणि त्यांचे हेतू हाणून पाडण्यास तुमच्या मंडळास मीं मदत केली असती; पण ज्या कक्षेंत राहून आपलें कार्य तुम्ही करीत आहां, तींतच तुमचें कार्य पुढें चालावयाचें असेल तर तुमच्या शत्रूंचीं शस्त्रें बोथट करण्याचें कार्य सिद्धीस जाईल असें मला वाटत नाहीं.

अशा स्थितींत माझ्या स्वतःच्या चित्ताला समाधानाची एकच जागा आहे. आणि ती ही कीं, ज्या शत्रूंबरोबर तुम्ही भांडत आहां, त्यांच्याच बरोबर माझेंहि अखंड युद्ध चालू आहे. सामान्य जनतेला ज्ञानप्राप्ति होऊं नये आणि तिचे डोळे उघडूं नयेत यासाठींच या लोकांची ही खटपट असते आणि त्यांच्या विरुद्ध तुमच्याप्रमाणें मींहि शस्त्र उचललें आहे, मात्र माझा मार्ग थोडा भिन्न आहे. पुस्तक प्रसिद्धीचें जें कार्य तुमची कमिटी करीत होती तें तिनें करूं नये, असा सरकारी हुकूम झाला आहे. याला एकच तोड मला सुचते आणि ती ही कीं, सरकारला विचारल्याशिवाय किंवा सरकारी परीक्षकाची परवानगी मागितल्याशिवाय हेंच कार्य करण्यास अनेक मंडळ्या स्थापाव्यात. सरकारची तशी इच्छा असेल, तर या मंडळ्यांच्या सभासदांवर खटले करण्यास अथवा यांना हद्दपार करण्यास तें मोकळें आहेच. असले प्रकार सरकारनें केले तर तुमच्या पुस्तकांकडे लोकांचें लक्ष आपोआपच विशेषपणें ओढेल. पुस्तकालयें अधिक लोकप्रिय होतील आणि ज्ञानार्जनाचे मार्ग अधिक रुंदावत जाऊन सामान्य लोकांना ज्ञानाची गोडीहि अधिक लागेल.

आपणाला जें कांहीं बरोबर वाटतें तें मुकाट्यानें आणि दृढ निश्चयानें करीत रहावयाचें, हाच मार्ग हल्लींच्या काळीं योग्य आहे, असें मला वाटतें. आपल्या कार्यांत सरकारची परवानगी तर विचारूं नयेच तर उलट त्यांत त्याला हात घालता येऊं नये, अशी खबरदारी जाणून बुजून घ्यावी. लोकांचें अज्ञान, हाच सरकारचा मोठा किल्ला आहे आणि ही गोष्ट सरकारालाहि ठाऊक आहे. यासाठींच लोकांत ज्ञानाचा फैलाव करण्याचें ढोंग करून त्यांना अधिकाधिक अज्ञानांधकारांत ढकलण्याचा यत्न सरकार करीत असतें. याकरतां खऱ्या ज्ञानदानाच्या कार्याला नेहमींच विरोध करण्याकडे सरकारची प्रवृत्ति असते, ही गोष्ट आतां आपल्या ध्यानांत आली पाहिजे. सरकारचें हें ढोंगी वर्तन यापुढें चालू देणें, अत्यंत अनिष्ट आहे. आपलें हें ढोंगी कार्य सरकार अनेक प्रकारें सध्यां करीत आहे. शिक्षणसंस्था या नांवाखालीं अज्ञान पसरविण्याचें त्याचें कार्य शाळा, पाठशाळा, विश्वविद्यालयें, अनेक प्रकारच्या कमिट्या अथवा महामंडळें या

नावांखालीं खोटीं सोंगें उभीं करून आणि त्यांचीं सूत्रें आपल्या हातीं बाळगून आपलें कार्य सरकार करीत आहे. चांगलें तें चांगलें आणि ज्ञान तें ज्ञान हें तुमचें म्हणणें मलाहि पसंत आहे; पण चांगलें तें शुद्ध चांगल्याच्या रूपानें आणि ज्ञान शुद्ध ज्ञानाच्याच रूपानें प्रगट झालें पाहिजे. सरकारी वट हुकुमास अनुसरून त्याच्या स्वरूपांत कांहीं अधिक उणेपणा झाला तर चांगलें तें चांगलें नव्हे आणि ज्ञानहि ज्ञान नव्हे. पुष्कळ वेळां निःस्वार्थी आणि सत्पात्र अशा लोकांचे मोठे मोलवान प्रयत्न अगदीं फुकट जातात, हें पाहिलें म्हणजे मला पराकाष्ठेचें दुःख होतें. चांगले शहाणे सुरते लोक सरकाराविरुद्ध भांडण्याकरितां एका बाजूनें कंबर कसून उभे राहतात आणि त्याचवेळीं आपले हे यत्न सरकारनें केवळ स्वतःच्या मर्जीनें केलेल्या कायद्याच्या मर्यादेंत चालले पाहिजेत, असेंही म्हणतात, तेव्हां मला खरोखर मोठें नवल वाटतें.

आपलें सांप्रतचें सरकार वाईट आहे, हें आपल्या निदर्शनास स्पष्ट आलें आहे आणि याकरतांच त्याजविरुद्ध आपले यत्न चालले आहेत. सरकाराविरुद्ध भांडण्याचे दोन मार्ग फार प्राचीन काळापासून चालत आले आहेत. केवळ दंड नीतीनें राजशासन उलथून पाडण्याचा, बंडखोरांचा एक मार्ग अथवा कायद्याच्या मर्यादेंत राहून आणि हळू हळू पुढें पाऊल टाकून अधिक हक्क मिळविणे हा दुसरा मार्ग. तुम्ही या दुसऱ्या मार्गाचे उपासक आहां.

या दोन्ही मार्गांचा उपयोग माझ्या आठवणीप्रमाणें पन्नासाहून अधिक वर्षें अव्याहत चालू आहे. आणि असें असतांहि देशाची स्थिति दिवसें-दिवस अधिकाधिकच बिघडत आहे. तींत सुधारणा झाल्याची एखादी झुळुक कधीं काळीं दिसली, तर ती या दोन मार्गांमुळें उद्भवलेली नसून तिचीं कारणें वेगळींच असतात. या कारणांचा उहापोह मी वेगळा करणार आहेच. तुमच्या या दोन मार्गांचा जो कांहीं परिणाम होतो, त्यामुळें सुधारणेचा गाडा मागें मात्र सरतो. तुमच्या या खटपटी इकडे चालू असतां ज्या सत्तेविरुद्ध तुम्ही झगडूं पाहतां ती दिवसेंदिवस अधिक विस्तृत, अधिक बळवान् आणि अधिक उन्मत्त मात्र होते. शेवटीं म्युनिसीपालट्या, झेम्स्टव्हो कमेट्या,

मुद्रणस्वातंत्र्य इत्यादि प्रकारचें स्वातंत्र्यरवीचें अखेरचें कोंवळें किरणहि अस्तास जाऊं लागतात. वर सांगितलेले दोन्ही मार्ग आज दीर्घ काळ चालू असतांहि त्यांचा उपयोग यत्किंचितहि होत नाहीं, असें मला तरी स्पष्ट दिसतें. असें कां होतें, याचा थोडा विचार मी येथें करणार आहें. आपल्या चालू राजशासनाचा मी कट्टा दुस्मान आहे; तथापि वर सांगितलेल्या दोन मार्गांपैकीं कोणत्याचीहि उपासना मीं केलेली नसल्यामुळें केवळ तिऱ्हाईत या नात्यानें या दोहोंतील उणीवा मला स्पष्ट दिसतात.

पहिली दंडनीतीची पद्धत मला असमाधानकारक वाटते, याचें कारण हेंच कीं, शुद्ध दंडेलीच्या बळावर चालू राज्यशकट उलथून पडला, तर त्याच्या जागीं आलेली नवी पद्धति चिरस्थायी होईल, अशी हमी देतां येणें शक्य नाहीं. कारण या नव्या राजशासनालाहि कोणी तरी शत्रु असणारच आणि योग्य संधी साधून दंडाचा अवलंब तेहि करतील. अशा स्थितींत राज्यक्रांतीची नुसती मालिका लागून राहील. फ्रान्सांत आणि इतर देशांत जेथें अशा क्रांत्या झाल्या, तेथील इतिहास या गोष्टीची स्पष्ट साक्ष देत आहे. दंडनीतीच्या आधारावर उभ्या राहिलेल्या राजशासनाला सांवरण्यास पुन्हां दंडनीतीचेंच पाठबळ पाहिजे. आणि जेथें शुद्ध दंडेली हाच राजशासनाचा पाया आहे, तेथें न्याय आणि नीति यांचा वास असणें शक्य नाहीं. दंडनीति आणि अन्याय हीं सहोदर भावंडें आहेत. मग एका अन्यायाच्या जागीं दुसरा अन्याय आला, यांत अधिक चांगलें तें काय झालें ? दंडनीतीचा मार्ग यशस्वी झाला तरीहि अखेरीस अनर्थच कसा ओढवतो हें यावरून तुमच्या लक्षांत येईल. उलटपक्षीं तें अपेशी झालें तर चालू राजशासनाला त्यामुळें अधिकच स्फुरण चढतें. हा अनुभव आपल्या रशियांत तरी कित्येक वेळां आपणास आला आहे. कारण जे लोक अनिश्चित बुद्धीचे असतात; त्यांचा घोळकाच्या घोळका राजशासनाच्या पक्षास जाऊन मिळतो. आणि यामुळें जुनें राजशासन अधिक बळकट मात्र होतें. यावरून हा दंडनीतीचा मार्ग विवेचक बुद्धीला सोडून आणि कोणताहि सुपरिणाम घडवून आणण्यास असमर्थ आहे, असें निश्चितपणें म्हणण्यास हरकत नाहीं. बुद्धिवाद आणि प्रत्यक्ष अनुभव या

दोहोंचीहि अनुमति या मार्गाला मिळावयाची नाहीं. याखेरीज हा मार्ग शुद्ध अनीतीचा आहे, हें वेगळेंच.

आतां दुसऱ्या मार्गाचा विचार करतां माझ्यामतें तो पहिल्याहूनहि अधिक कमकुवत दिसतो. तोहि विवेकबुद्धीला सोडून असून इष्टकार्य सिद्धीला तो प्रतिकूल आहे. चालू राजशासनाच्या हातांत सर्व सामर्थ्य एकवटलेलें असतें. चतुरंग सैन्य त्याच्या हातीं असतें. राज्याच्या गाड्याची धुरा त्याच्या हातीं असते. धार्मिक बाबी त्याच्याच हातीं असतात, आणि शाळा, वर्तमानपत्रें वगैरे इतर साधनांवरहि अखेरची सत्ता त्याच्याच हातीं असते. आणि गमतीची गोष्ट ही कीं, ज्या कायद्याची मर्यादा राखून त्याच्याशीं तुम्ही दोन हात करूं पहात असतां, ते कायदे घडविण्याचें कामहि त्याच्याच हातीं असतें. अशा प्रकारें राजशासन सर्वाधिकारसंपन्न आणि सर्वसामर्थ्ययुक्त असतें. आपल्या हातीं कोणत्याप्रकारचा बाण आहे, याची जाणीव त्याला पुरी असते. आपणास खाच्या घोंवयाचें स्थळ कोणतें हेंहि तें जाणून असतें. आणि आपल्या अधिकाराला यत्किंचितहि धक्का लागेल, अशी कोणतीहि गोष्ट आपल्या नजरेसमोर तें घडूं द्यावयाचें नाहीं. आपल्या कक्षेंतील लोकांनीं कितीहि चळवळ केली, तरी त्याच्या अधिकाऱ्याला तिचा उपसर्ग ते कधींहि लागूं द्यावयाचें नाहीं. लोकांच्या अज्ञानावरच आपली सारी इमारत उभी आहे, ही गोष्ट रशियन सरकाराला पूर्णपणें अवगत आहे. आणि हें लोकांचें अज्ञान दूर होईल अशी कोणतीहि खटपट तें चालूं द्यावयाचें नाहीं. शाळा, पाठशाळा, विश्वविद्यालयें आणि असलींच दुसरीं साधनें बाह्यतः लोकांच्या तंत्रानें चालत असल्यासारखीं तें दाखवील. त्याचप्रमाणें वर्तमानपत्रेंहि चालविण्याला परवानगी तें देईल. पण हें कोठपर्यंत ? जोंपर्यंत या साऱ्या गोष्टी चालू राजशासनाच्या तंत्रानें चालत आहेत तोंपर्यंत. लोकांची दिशाभूल करण्याचें कार्य जोंपर्यंत या गोष्टी करीत आहेत, तोंपर्यंत सरकार त्या चालू देईल. किमानपक्ष लोकांना योग्य मार्ग दाखविण्याचें कार्य तरी या संस्थांनीं करूं नये, अशी सरकारची अपेक्षा असते. ती अपेक्षा पुरी होत आहे, तोंपर्यंत सरकार त्यांना स्पर्श करणार नाहीं; पण लोकांचा अज्ञानरोग दूर

करण्याचा यत्न यापैकीं कोणी करतात, असें सरकारच्या निदर्शनास आलें, तर त्यावर ताबडतोब गदाघात करून त्याचा निःपात करण्यास तें मागें पुढें पहात नाहीं. बुद्धिवादानें या मार्गाचा निकाल अशा प्रकारें लागतो आणि अनुभव पाहतां तोहि तेंच सांगत आहे. सरकारच्या हातां-तले हक्क हळूहळू आणि क्रमानें आपण या मार्गानें हिरावून घेऊं अशी आशा बाळगणें म्हणजे स्वतःची निव्वळ फसवणूक करून घेणें आहे. तुमचा हा भोळसरपणा सरकारला पूर्णपणें समजतो आणि तो त्याला फार रुचतो. कारण या मार्गानें तुम्ही त्याला उलट मदतच करीत असतां. यासाठीं तुमच्यासारख्या लोकांना अधिक उत्तेजन देण्यास सरकार नेहमींच तयार असतें.

तुमचा हा मार्ग बुद्धीला सोडून आणि निरुपयोगी आहे, एवढेंच नव्हे, तर तो हितविघातकहि आहे. त्यापासून प्रत्यक्ष नुकसान होण्याचा संभव आहे. तुमच्यासारखे ज्ञानी, सुचरित आणि प्रामाणिक लोक सर-कारच्या पुढ्यांत शिरल्यामुळें त्याला एक प्रकारचा नैतिक अधिकार आपोआपच प्राप्त होतो. तुम्हीं तसें केलें नसतें, तर हा अधिकार त्याला कधींच प्राप्त झाला नसता. सरकारच्या पुढ्यांत शिरण्यानें त्याच्या कृतीला लोकांची मूकसंमति मिळाल्यासारखें होतें. केवळ दंडनीतिकुशल, स्वार्थ-साधु आणि शंकीझेले अशाच लोकांचें सारें सरकार बनलें असतें, तर त्याचें अस्तित्व दीर्घकाल कधींच टिकूं शकलें नसतें. केवळ दंडबळावर उभारलेल्या आणि चालणाऱ्या राजशासनांत असल्यास लोकांची बहुधा भरती असते आणि असल्या सरकाच्या कृतीला जें थोडें बहुत नैतिक स्वरूप बाह्यतः दिसत असतें, त्याचें कारण तुम्हासारख्या प्रामाणिक आणि सुज्ञ लोकांचें मिश्रण त्यांत असतें हेंच.

स्वतःस उदारमतवादी म्हणविणारे लोक सरकारच्या कार्यांत भागी-दार होऊन त्याच्याशीं सल्ला करूं लागले म्हणजे अशा कृतीचे जे वाईट परिणाम होतात, त्यांपैकीं हा एक आहे. आतां आणखीहि एका दुष्परि-णामाचा विचार मी येथें सादर करतों. तुमच्या सारखे प्रामाणिक लोक सरकारच्या पुढ्यांत जातात, त्यांत त्यांचा मुख्य हेतु म्हटला तर लोक-

कल्याण करण्याची संधि आपणास मिळावी हाच असतो. हें कार्य साधण्यासाठीं राजशासनाशीं ते तडजोड करतात. अशी तडजोड सुरू होऊन या मार्गाचा पगडा तुमच्या चित्तावर एकदां दृढ झाला म्हणजे आपलें उद्दिष्ट साधण्यासाठीं वचनांत आणि कृतींत सत्याचा अगदीं सरळ मार्ग थोडा बहुत सोडण्यास हरकत नाहीं, असें तुम्हास वाटूं लागतें. किंबहुना अशा धरसोडीनें वागणें हाच सन्मार्ग आणि सद्गुण आहे, असा तुमच्या बुद्धीचा निश्चय होऊं लागतो. उदाहरणार्थ, एकाद्या गोष्टीबद्दल राजशासनाकडे तुम्हास एकादा अर्ज पाठवावयाचा असला, तर त्यांत दुटप्पी अथवा द्व्यर्थी भाषा वापरण्यास तुम्हास संकोच वाटत नाहीं. त्याचप्रमाणें आपल्या माणुसकीच्या योग्य अभिमानाला घातक अशी भाषा वापरण्यासहि तुम्हास संकोच वाटत नाहीं. एकानें दुसऱ्याविरुद्ध हत्यार उठविणें हें पाप आहे, असें तुमचें मन तुम्हास निक्षून सांगत असतांहि राजशासनाच्या सैन्यांत शिरण्यास तुम्ही मागें पुढें पहात नाहीं. सारे अधिकार नष्ट झालेल्या आणि लोकामत म्हणून मिरविणाऱ्या एकाद्या संस्थेंत तुम्ही खुशाल शिरतां. शाळेंत अथवा पाठशाळेंत नौकरी करून ज्या गोष्टी तेथें तुम्ही शिकवितां, त्यांच्या खऱ्या उपयुक्ततेबद्दल तुमचें स्वतःचेंच चित्त तुम्हास ग्वाही देत नसतें. राजशासन सांगेल त्याच गोष्टी तुम्ही खुशाल शिकवीत सुटतां. कित्येक प्रसंगीं स्वतःच्या विवेकबुद्धीला झोंपी घालवून सरकार सांगेल त्या शपथा तुम्ही मुकाट्यानें घेतां. तुम्ही जीं वर्तमानपत्रें चालवितां, त्यांत तिला खऱ्या उपयुक्त गोष्टी वगळून सरकारी परीक्षकाला पसंत पडेल, तोच मजकूर तुम्ही छापतां. अशा रीतीनें तुमच्या शुद्ध बुद्धीच्या घसरणीला एकवेळ सुरवात झाली, म्हणजे अखेरीस ती कोठें जाऊन आदळेल हें कोणीं सांगावें? सामान्य जनतेचे माणुसकीचे हक्क सरकार हिरावून घेत असतां त्याचे हात धरण्याचा हक्क थोडा बहुत तुमचाच असतां, तुम्ही हळुहळु पीछेहाट करतां. स्वतःच्या शुद्ध बुद्धीपासून अधिकाधिक लांब जातां आणि अखेरीस सरकारचे बंदे गुलाम होऊन बसतां. याबद्दल तुम्हास सरकारांतून मोठालीं वेतनें आणि मोठीं बक्षिसेंहि मिळतात. आणि इकडे तुमचा भ्रम कायमच असतो. आपल्या उद्दीष्टा-

कडे एकेक पाऊल आपण पुढें टाकीत आहों, अशा कल्पनेंत तुमचें चित्त दंग झालें असतां जी सोटेशाही उलथून पाडण्यासाठीं हा मार्ग तुम्ही स्वीकारलेला असतो, त्याच सोटेशाहीचे तुम्ही हळूहळू आधारस्तंभ आणि गुलाम होऊन बसतां.

आतां सरकारला लांचलुचपतीनें जिंकतां येत नाहींत, अशाहि सच्चा दिलाचे आणि प्रामाणिक लोक तुमच्यांत आहेत हें खरें आहे. भाराभर पगाराच्या ओझ्याचें दडपण त्यांच्या चित्तावर पडत नाहीं आणि मोठ्या मानपानाला त्यांचें चित्त लालचावत नाहीं; पण राजशासनाचें जाळें इतकें दूरवर पसरलेलें असतें कीं, त्यांत या गगनविहारी गरुडांचेंहि पंख अडकलेले असतात. या जाळ्यांत त्यांनीं कितीहि धडपड केली आणि आपले पंख कितीहि वेगानें फडफडावले, तरी आपल्या जाग्यापासून एक तसूभरहि त्यांस पुढें सरकतां येत नाहीं. आज तुमच्याच कमेटीची दशा अशी झाली आहे कीं नाहीं, याचा विचार आपल्या मनाशीं करून पहा. असें झालें म्हणजे या प्रामाणिक माणसां पैकींच कांहीं माथेफिरू होऊन क्रांतिकारक पक्षास मिळतात. कोणी आत्मघात करतात. कोणी पक्के दारूबाज बनून आपल्याच गुंगींत धुंद रहातात; कोणी लेखणीस शरण जाऊन ग्रंथकार बनतात; पण तेव्हांहि सरकाच्या परीक्षकाच्या मर्यादेंत राहण्याची काळजी घेण्यास ते चुकत नाहींत. लोकांना ज्याचें खरें महत्त्व, अशा एकाद्या विषयाबद्दल ते मूग गिळतात, आणि अशा रीतीनें सरकारच्या कृतीला मूकसंमति देतात. लोकहितैषी या नांवाखालीं आपलें कार्य ते करीत असल्यामुळें त्यांची पोळी पिकते ही गोष्ट खरी. आणि दुसऱ्या पक्षीं आपण लोकहित खरोखरच करीत आहों, याच भ्रमांत ते सदोदित गुरफटलेले असतात; हेंहि खरें.

अशा रीतीनें बुद्धिवाद आणि अनुभव या दोन्ही प्रकारांनीं तुमच्या मार्गाचें परीक्षण केलें असतां तो मार्ग केवळ निरुपयोगी आहे, इतकेंच नव्हे तर उलटपक्षीं राजशासनाच्या बाहूंत अधिक जोम उत्पन्न करण्यास त्याची उलट मदत मात्र होते; हें उघड होय.

आतां पुढें विचार काय ? गेल्या सत्तर वर्षांत ज्या मार्गांनीं आपण

खटखट केली, ते मार्ग नुसते व्यर्थ ठरले, एवढेंच नव्हे तर त्यामुळे आपली स्थिति पूर्वींहूनहि वाईट झाली. मग आतां काय करावें? करावयाचें इतकेंच कीं, ज्यांच्या प्रयत्नानें आज आपलें पाऊल प्रगतीच्या मार्गाकडे थोडें तरी पडलें आणि जगाला त्याची सांप्रतची स्थिति ज्यांनीं प्राप्त करून दिली त्यांच्याच मार्गानें आपणहि जाणें हेंच आपणास श्रेयस्कर आहे. आज कांहीं करावयाचें असलें तर तें हेंच. आतां हा मार्ग कोणता याचा विचार करूं.

हा मार्ग अगदीं साधा आणि सोपा आहे. आपणाला जें जरूरीचें आणि कल्याणप्रद वाटेल तें शांतपणें करीत रहावयाचें. त्यांत सरकारच्या मदतीची अपेक्षा करावयाची नाहीं. त्याला काय वाटेल याचा विचार करावयाचा नाहीं. त्याला तें आवडेल कीं न आवडेल हेंहि पहावयाचें नाहीं. मुद्दा इतकाच कीं, आपलें जन्मसिद्ध हक्क आपण बजावून घ्यावयाचे. अमक्या कमेटीचा सभासद म्हणून अमक्याचा प्रतिनिधी म्हणून, जमीन-दार म्हणून, व्यापारी म्हणून अथवा पार्लमेंटाचा सभासद म्हणून, हें काम न करतां केवळ मनुष्य म्हणून आपले माणुसकीचे जन्मजात हक्क बजावून घ्यावयाचे, इतकेंच आपलें कर्तव्य आहे. या आपल्या हक्कांचें संरक्षण करतांना कोणत्याहि सवलतीचा प्रश्न आपल्या आड येऊं द्यावयाचा नाहीं. तूं अमुक कर म्हणजे मी अमुक करीन असली सवलतीची भाषा, हे हक्क बजावतांना वापरावयाची नाहीं. तर केवळ नीतीला आणि शुद्ध माणुस-कीला शोभेल अशाच रीतीनें आपल्या या हक्कांचें संरक्षण आपण केलें पाहिजे.

एकाद्या किल्ल्याला शत्रूचा वेढा पडला, म्हणजे किल्ला अभेद्य करण्या-करितां, आजूबाजूचीं घरें किल्लेदाराला जाळून टाकावीं लागतात. जें अभेद्य असेल आणि ज्यांचें संरक्षण प्राण देऊनहि करावयाचें असेल, तेवढ्याच वस्तू गडकरी तेथें शिल्लक ठेवतो. तो अशा रीतीनें चालला तरच त्याचा किल्ला अभेद्य होतो, आणि तो शत्रूंच्या हल्ल्याला निकरानें तोंड देऊं शकतो. आपल्या भावी इमारतीचा पाया याच रीतीनें आपण मजबूत केला तर तिची योग्य उभारणी होऊं शकेल. आपलें ठाणें अशा रीतीनें मजबूत

केल्याशिवाय आपल्याला इच्छितांची प्राप्ति होणार नाहीं. सामान्य नागरिकापेक्षां पार्लमेंटच्या अथवा लोकल बोर्डाच्या एकाद्या सभासदाला अधिक हक्क असतात, हें खरें आणि या हक्कांचा उपयोग करून पुष्कळ गोष्टी आपणाला साध्य करून घेतां येतील, असेंहि वर वर दिसतें. पण असें सभासदत्व मिळविण्याकरितां आपल्या माणुसकीच्या हक्कांपैकीं कांहींस आपणास मुकावें लागतें, याची वाट काय ? सर्व घोंटाळा आहे तो येथेंच. आणि मनुष्यानें आपल्या माणुसकीच्या हक्कास एकदां रजा दिली म्हणजे त्याच्या कर्तृत्वशक्तीचा पायाच उखडला जातो. मग पुढच्या इमारतीची उभारणी तो काय करणार ? ज्याला आपल्या खऱ्या हक्कांचेंहि संरक्षण करतां येत नाहीं, तो शत्रूला काय जिंकणार ? ज्या किल्ल्याच्या आश्रयानें शत्रूंवर तो प्रहार करूं पाहणार तो किल्लाच नाहींसा झाल्यावर आमचा हा वीर निराश्रित होऊन उघडा पडणार. मग अशा असहाय्य स्थितींत त्याच्या हातून कोणती कर्तबगारी होणार ? चिखलांत रुतलेल्या एकाद्या मनुष्याला वर काढावयाचें तर तसें करूं पाहणाराच्या पायाखालची जमीन घट्ट असावयास नको काय ? त्याला वर काढण्याच्या चांगल्या उद्देशानें दलदलींत तो स्वतः शिरला तर त्याला वर काढावयाचें बाजूस राहून तो स्वतः मात्र चिखलांत रुतून बसेल.

मजूरवर्गाकरता आठ तासांच्या दिवसाचा कायदा पास करून घेणें इष्ट आणि उपयुक्त असेल, अथवा शाळांच्या पुस्तकालयांतून उदारमतवादी पुस्तकांचा भरणा अधिक करविणें उपयुक्त असेल; पण हें साधण्यासाठीं पार्लमेंटाच्या एकाद्या सभासदाला भर सभेंत खोटें बोलणें भाग पडत असेल, जिच्यावर आपला विश्वास नाहीं, अशी एकादी शपथ घ्यावी लागत असेल, अथवा आपल्या अभिमानाला कमीपणा आणणाऱ्या आणि मिथ्या स्तुतीच्या भाषेंत अर्ज लिहावे लागत असतील, तर या गोष्टी करून होणारा फायदा अगदीं अल्प असून आपलें नुकसान त्याहून निःसंशय अधिक आहे. असें करण्यांत सामान्य माणुसकीचा स्वाभिमान आपणास विसरावा लागतो. एक हेतु साधण्यासाठीं त्याहून उच्चतर असे दहा हेतु बाजूस ठेवावे लागतात आणि इतकें करूनहि अखेरीस जो हेतु आपण साधूं पहात

असतो, तो साधत नाहींच. कोणत्याहि परिस्थितींत आणि कोणत्याहि कारणाकरतां आपला निश्चित मार्ग कधींहि सोडावयाचा नाहीं, इतक्या कणखर वृत्तीचे जे लोक असतील, तेच सरकारला तोंड देऊन त्याच्या दुष्कृतीला थोडा बहुत आळा घालूं शकतील. शत्रूला योग्य प्रकारें तोंड द्यावयाचें तर ती गोष्ट अभेद्य पायावर उभे राहूनच साधण्यासारखी आहे.

ही गोष्ट सरकाराला पक्की ठाऊक आहे, आणि याकरतांच हा माणुसकीचा स्वाभिमान तुमच्यापासून हळूहळू हिरावून घेण्याकरितां सरकार धडपड करीत असतें. इतर गोष्टी साधल्या अथवा न साधल्या तरी त्याची पर्वा न करतां तुमच्या पोटांत शिरून तुमचा स्वाभिमान नष्ट करण्याचा उद्योग ते प्रथम करतात. हा सदभिमान एकवार नष्ट झाला म्हणजे, सरकारला सर्व रान मोकळें सांपडतें. आतां आपणाशीं खरी टक्कर देण्यास कोणीहि उरलेला नाहीं, हें त्याला ठाऊक असल्यामुळें मन मानेल तसें वर्तन तें करूं लागतें. राजनिष्ठेची अथवा दुसरी कसली एकादी माणुसकीला लाज आणणारी शपथ भर चव्हाट्यावर जो घेऊं शकतो अथवा एकाद्या लेव्हीसारख्या दरबाराच्या प्रसंगीं भरजरी पोषाक करून तासांचे तास उभे राहून वाट पाहण्याची दिक्कत ज्याला वाटत नाहीं, अथवा एकाद्या राज्यारोहणसमारंभांत खास पोलिस होण्यांत ज्याला भूषण वाटतें, अथवा एकादा विशिष्ट विचार प्रगट करतांना सरकारी परीक्षकाची अगाऊ परवानगी घेणें, ज्याला इष्ट वाटतें. अशा माणसाची दहशत सरकाराला कधींहि वाटावयाची नाहीं.

दुसऱ्या आलेक्झांडर बादशहानें असें मत स्पष्ट बोलून दाखविलें आहे. पैसा अथवा मानपानाच्या पदव्या यांपैकीं एकाद्या दानानें हे सारे उदार मतवादी आपण विकत घेऊं अशी त्याची पक्की खात्री होती. राजशासनाच्या अंगांत स्वतः शिरून जे लोक सरकारचे भागीदार बनतात, ते कित्येक वेळां सरकाराशीं विरोध करण्याचा आव घालून स्वतःची अथवा आपल्या मित्रमंडळीची फसवणूक करीत असतात. पण त्यांच्या या विरोधांत खरा जोम किती आहे, याचें पाणी सरकारानें आधींच

अजमावलें असल्यामुळें हे लोक वस्तुतः विरोध करीतनसून विरोधाचा आभास मात्र दाखवीत असतात, हें त्याला ठाऊक असतें. आपणाविरुद्ध चळवळीचा भास उत्पन्न करणाऱ्या या लोकांची खरी कसोटी सरकार मधून मधून पहात असतें आणि मग या विरोधांत बावनकशी सोनें कोठेंच नाहीं, अशी खात्री करून घेऊन आपल्या नियोजित मार्गानें खुशाल जात असतें. आपल्या या हिणकस विरोधकांना आपण सुखानें खाकोटीला मारूं अशी त्याची खात्री झालेली असते.

तिसऱ्या आलेक्झांडर बादशहालाहि या गोष्टीची पूर्ण जाणीव होती आणि या राष्ट्रहितचिंतकांचें पाणी त्यानें पुरें जोखलें असल्यामुळेंच कांहीं संस्थांवर जाणून बुजून त्यानें वरवंटा फिरविला. या संस्था म्हणजे आपला एक विजयच आहे, असा भ्रम या उदारमतवाद्यांस झाला होता. वास्तविक त्यांच्या हातून कांहीं खरें कार्य होत होतें असें नाहीं; पण आपल्या निरुपद्रवी संस्थाहि बादशहानें टिकूं दिल्या नाहींत. ज्यूरी पद्धतीचा न्याय, विश्वविद्यालयाचे हक्क, शाळाखात्याचे कांहीं हक्क, इत्यादि गोष्टी त्यानें नष्ट करून टाकल्या, त्यानें फटक्यांच्या अमानुष शिक्षेला कायदेशीर स्वरूप दिलें. स्वायत्ततेचे अल्पस्वल्प हक्क हि त्यानें नष्ट केले. हद्दपाऱ्या, तुरुंगवास आणि फांशीच्या शिक्षा या गोष्टी सर्रास चालू होत्या. एक कीं दोन, किती तरी गोष्टी त्यानें अशा स्वरूपाच्या केल्या कीं, उदारमतवाद्यांच्या अविरत श्रमांचें एकादें अर्धकच्चें फळ देखील त्यानें उरूं दिलें नाहीं. बादशहा अशा रीतीनें वागत असतां हे लोकहितवादी काय करीत होते ? ते सुखानें घोरत पडले होते. बादशहाच्या कृतीविरुद्ध फुकाचा एक शब्दहि उच्चारावयाचें धैर्य त्यांना झालें नाहीं. बादशहाची कानउघाडणी करण्याचें धैर्य सेब्रिकॉफबाईशिवाय दुसऱ्या कोणालाहि झालें नाहीं. फक्त या एकट्या बाईनेंच वस्तुस्थिति ओळखली आणि स्पष्टपणें ती उच्चारूनहि तिनें दाखविली आणि याबद्दल तिला हद्दपारीचें बक्षिस सरकारांतून मिळालें. इकडे आमचे लोकाहितैषि आपसांत एकमेकाशीं कुजबुजत होते आणि आपली नाखुषी एकमेकांच्या कानांत उच्चारून दाखवित होते; पण अशा स्थितींतहि सरकारशीं असलेला आपला संबंध तोडण्याचें धैर्य त्यांना झालें नाहीं. साऱ्या

सरकारी, निमसरकारी आणि सरकारानुवर्ती संस्थांतून ते पूर्वीसारखेच कामें करीत होते. सरकार लिहूं देईल इतक्याच गोष्टी आपल्या पत्रांतून ते छापीत होते आणि अशा रीतीनें वागून ते लोकहितहि साधीत होते; तथापि एकमेकांच्या कानांत ज्या गोष्टी ते हळू हळू कुजबुजत त्या सामान्य जनतेच्या कानीं जाऊं न देण्याची खबरदारी मात्र घेण्यास ते चुकत नसत. सरकारचें एकादें अनान्वित कृत्य छापावें; पण त्यावर टीका करूं नये, आपली नाखुषी दर्शविणारा एक शब्दहि लिहूं नये, असा मार्ग त्यांनीं स्वीकारला होता. इतकेंच नव्हे तर ज्या अंमलदारांनीं तीं अनन्वित कर्में केलीं त्यांचीं स्तोत्रें एकाद्या थुंकीझेल्या भाटाप्रमाणें ते खुशाल गात. अशा रीतीनें राजशासनाला मदत करून ज्या चांगल्या राज्यपद्धतीचीं बीजें अल्पांशानें तरी रुजूं पहात होतीं, ती पद्धति समूळ उलटून टाकून तिचीं बीजेंहि त्यांनीं करपवून टाकलीं. ज्या आलेक्झांडर बादशहानें आपल्या साम्राज्यभर जिकडे तिकडे सूळ उभारण्याचें काम केलें आणि लोकांचा अमानुष छळ केला, त्याच बादशहाची मनमुराद स्तुति हीं लोकहितैषि पत्रेंसुद्धां खुशाल करीत होतीं. आलेक्झांडर बादशहा हा एक नमुनेदार राजा झाला, असें भासविण्यासहि त्यांनीं कमी केलें नाहीं.

आतां नव्या राज्यांतहि हाच प्रकार मागील अंकावरून पुढें चालू आहे. जुन्या बादशहाच्या जागीं जो नवा बादशहा आला, त्याला आपल्या कर्तव्याची कसलीहि जाणीव नव्हती. दहा बारा कोट लोकांवर त्याला राज्य करावयाचें होतें; पण राज्य करणें म्हणजे काय याची ओळखहि त्याला नव्हती. अशा स्थितींत त्याच्या अधिकारी वर्गानें त्याला अगदीं सोपासा कानमंत्र सांगितला. 'तुमच्या वडिलांप्रमाणें तुम्हीहि चाला.' आतां हे वडील कसे चालत होते ? ते कोणाचाहि सल्ला घेत नव्हते. स्वतःच्या डोक्यांत येतील त्या गोष्टी ते खुशाल करीत. अथवा कांहीं प्रसंगीं जो पहिला स्तुतिपाठक भेटे त्याचा सल्ला घेत. आणि हाच कित्ता आतां चिरंजीवहि गिरविणार आहेत. एकमुखी सत्ता ही ईश्वराची पवित्र देणगी आहे, अशा समजुतीनेंच आपल्या राज्याला यांनीं प्रारंभ केला आहे. यांचें सारें शिक्षण एका घोडेस्वाराच्या पलटणींत झालें आहे. राज्यकारभार

म्हणजे काय, हें त्यांना ठाऊक नाहीं आणि ठाऊक असणें शक्यहि नाहीं. रशियन जनतेच्या प्रतिनिधींचा सल्ला ते घ्यावयाचे नाहींत. त्यांचें अभिनंदन करण्याकरतां कांहीं प्रतिनिधी गेले असतां त्यांपैकीं कांहींनीं लोकांच्या आकांक्षा भीत भीत उच्चारून दाखविल्या, आणि बादशहानें हीं सारीं खुळीं स्वप्नें आहेत, असा जबाब त्यांना दिला.

बादशहाच्या या उत्तराचा परिणाम काय झाला? रशियांतील लोकमताला कांहीं धक्का बसला काय? तुमच्यासारख्या शहाण्यासुरत्या प्रामाणिक लोकहितैषींनीं या उत्तरावर कोणता जबाब दिला? आपणास त्याबद्दल क्रोध आल्याचें कोणतें चिन्ह त्यांनीं दाखविलें? पण असल्या राजशासनाची स्तुति तरी न करण्याचें काम त्यांनीं केलें काय? छे छे! उलट ते त्यांत भारवाही झाले आणि अशा रीतीनें त्याला त्यांनीं उत्तेजनच दिलें. या काळापासून तुमच्या मतांचा प्रवाह जणू काय उलटा वाहूं लागला. पूर्वींचे वडील आणि आतांचे चिरंजीव यांत दोहोंचीहि स्तुति अधिक सफाईनें कोण करतो, हीच जणूं काय तुमच्यांत चढाओढ लागली. इतक्या सगळ्या गडबडींत झार बादशहाच्या मताविरुद्ध असें एकच निनांवी पत्र प्रसिद्ध झालें होतें. आणि त्यांतील मजकूरहि मोठ्या सावधगिरीनें लिहिला होता. सरकारचा अवाढव्य खर्च पूर्वींसारखाच चालू राहिला. राज्यारोहणसमारंभ कसा सजरा झाला, हें काय सांगावें? लोकांचा एक विशेष मेळा या प्रसंगाकरतां भरविण्यांत आला होता. त्यावेळीं सरकारच्या केवळ गैरव्यवस्थेमुळें तीन हजार लोक मृत्युमुखीं गेले आणि दुसरे कित्येक जखमी झाले. आणि त्याच रात्रीं मास्कोशहरीं फ्रेंच वकिलातींत झालेल्या खास नाचाच्या समारंभास बादशहा हजर राहिले. राज्यकर्त्यांचा उद्दामपणा आणि आपल्या प्रजाजनाबद्दल त्यांच्यामनांत असलेली तुच्छता यांचें याहून अधिक चांगलें प्रदर्शन तें कोणतें? तीन हजार लोकांचा मृत्यु म्हणजे जणूं काय कांहींच घडलें नाहीं. अशा थाटानें हा सारा समारंभ साजरा करण्यांत आला. प्रदर्शन म्हणून जें सोंग उभें केलें होतें त्याची गरज लोकांना नव्हती. कांहीं सरकारी अधिकाऱ्यांच्या इच्छेमुळेंच तें भरविलें होतें आणि त्यांनाच तें हवें होतें. या अर्थशून्य प्रदर्शनाकरतां लक्षावधि

रुपयांचा चुराडा उडला. लोकांना जणूं काय अधिक आंधळे करण्याकरतांच एक धार्मिक खूळही उभें करण्यांत आलें होतें. लोकांना ठाऊक नसलेल्या अशा एका साधूवर याच वेळीं थडगें उभारण्यांत आलें. यानें महान चमत्कार केल्याच्या हकीकती वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्या आणि त्यांच्या खरेपणाबद्दल नुसती शंकाहि कोणीं घेतली नाहीं. सरकारी परीक्षकाचे हक्क वाढविण्यांत आले. धर्मबंधनें अधिक कडक झालीं. लष्करी कायद्याचा अम्मल चालू राहिला. लष्करी कायद्याचा अम्मल म्हणजे कायदेशीर बेबंद-शाही. ही स्थिति तेव्हांपासून आजपर्यंत अधिकाधिक वाईट मात्र होत जात आहे.

तुमच्यासारख्या शाहण्या सुरत्या आणि प्रामाणिक लोकांनीं सरकारची बगल मारून त्याची सत्ता हळूहळू हिरावण्याचा यत्न केला नसता, तर हे सारे प्रकार कधींच घडून आले नसते, असें मला वाटतें. कायदेशीर चळ-वळीनें नानाप्रकारच्या कमेट्या निर्माण करून आणि सरकारी परीक्षकानें पसंत केलेलें वाङ्मय प्रसिद्ध करून राजशासनाला तुम्ही मदत केली नसती, तर हे प्रकार खचित घडून आले नसते. अशा गोष्टी करून तुम्ही आपली कर्तृत्वशक्ति मात्र क्षीण करून घेतली. असल्या प्रकारच्या अर्थ-शून्य कृतींत आपल्या आयुष्याचे दिवस फुकट घालविण्यास तुमच्या सार-ख्यांनीं सुद्धां तयार व्हावें, हें पाहून मला खरोखर हंसूं लोटतें. तुमच्या या युक्तींनीं राजशासनाचा एकादा तरी अवयव खरोखर तुटेल असें तुम्हास वाटतें काय ? एकाद्या कुत्र्याची तंगडी तोडावयाची आणि हें काम त्या प्राण्याला नकळत करावयाचें अशांतला तुमचा हा उद्योग आहे.

सरकारनें न्यायाधीश नेमले आणि त्यांना फटके मारण्याचा अधिकार त्यानें दिला, तर तें खुशाल देवो. तुम्ही अशा अधिकाराच्या जागा पत्करूं नका आणि अशा न्यायाच्या कचेऱ्यांतहि जाऊं नका. ज्युरीचा फार्स सर-कारला करावयाचा असेल सर तो खुशाल करूं द्या; पण तुम्ही न्याया-धीश होऊं नका, वकील होऊं नका आणि ज्युरींतहि जाऊं नका. एक-मुखी सत्ता सरकारला गाजवावयाची असेल, तर ती खुशाल गाजवूं द्या; पण तुम्ही तींत भागीदार होऊं नका. मोठ्या पाठशाळा काढून त्यांत

मुलांना लष्करी शिक्षण देण्याचा सरकारचा बेत असेल, तर खुशाल असूं द्या; पण अशा शाळांत तुम्ही शिक्षक होऊं नका आणि आपलीं मुलें तेथें न पाठवतां त्यांना योग्य असें शिक्षण तुम्ही स्वतःच द्या. खऱ्या गोष्टी लिहिणे सरकारास न आवडलें, आणि त्याबद्दल मुद्रकाला त्यांनीं शासन केलें, तरी सत्य तें सांगण्याचा आपला क्रम तुम्ही सोडूं नका. तुम्ही सैन्यांत शिरूं नका. एका मनुष्यानें दुसऱ्याला मारणें हा जसा खून आहे, त्याप्रमाणें अनेकांनीं अनेकांना मारणें हाहि खूनच आहे.

तुम्हीं अशा प्रकारें वागूं लागला तर सरकार काय करील ? तें तुम्हांस हद्दपार करील अथवा तुम्हांस तुरुंगांत टकील. पण तुमच्यावर सरकारानें खटला केला, तर तुम्हांबद्दल सर्वत्र सहानुकंपा उत्पन्न होते, तुम्हीं धर्मवीर बनता आणि सरकारच्या या कृतीनें त्याच्या स्वतःच्या सत्तेचा पाया मात्र पोखरला जातो. मनुष्याच्या जन्मसिद्ध हक्कांचें संरक्षण करावें हा राजशासनांचा जन्महेतु आहे. यासाठींच तीं जन्मास येतात आणि जगतात; पण हा हेतु बाजूला ठेवून तीं स्वतःच हे हक्क पायाखालीं तुडवूं लागलीं म्हणजे सृष्टिक्रमानेंच त्यांना मरण येतें.

याकरतां तुमच्यासारख्या सुज्ञ आणि प्रामाणिक माणसांनीं हल्लींप्रमाणें आपल्या कर्तृत्वशक्तीचा अपव्यय करण्याचें सोडून द्यावें. या चळवळींनीं तुमच्या इष्ट कार्याचा घात मात्र होत आहे. या चळवळी सोडून देऊन वर सांगितल्याप्रमाणें तुम्ही वागूं लागा, म्हणजे तुमच्याच विचाराचे दुसरे अनेक लोक तुम्हाला येऊन मिळतील. अशा रीतीनें तुमचा संघ वाढत गेला म्हणजे जे लोक आज मनाच्या अर्धवट स्थितींत आहेत, तेहि तुम्हांस मिळाल्यावांचून राहणार नाहींत. अशा रीतीनें खरे बलवान लोकमत तयार होईल. सरकारला नमविणारी अशी ही एकच शक्ति आहे. अशी शक्ति, निर्माण झाली म्हणजे तुमच्यासारखी वाङ्मयमंडळी दडपून टाकणें सरकारला शक्य होणार नाहीं. इतकेंच नव्हे तर ज्या ज्या सरकारी त्रासदायक संस्था नष्ट करण्याकरतां तुमच्यासारखे उदारमतवादी लोक आणि जहाल क्रांतिकारक लोक आज धडपडत आहेत, त्या साऱ्या संस्था आपल्या मरणानेंच मरतील.

सरकारला विरुद्ध अशा दोन प्रकारच्या चळवळींचा इतिहास येथवर सांगितला आणि हे दोन्हींहि प्रकार निरुपयोगी आहेत, असेंहि दाखविलें आणि आतां सांगितलेला तिसरा प्रकार अद्यापि अस्तित्वांत आलेला नाहीं; पण तुम्हीं तो अस्तित्वांत आणला तर तो यशस्वी होईल, याबद्दल मला तरी शंका नाहीं. तुम्हास वस्तुतः एकच गोष्ट करावयाची आहे. ती ही कीं, कांहीं झालें तरी प्रामाणिकपणा सोडावयाचा नाहीं आणि खोटें बोलावयाचें नाहीं. जें बोलावयाचें तें इतक्या सरळ, सोप्या आणि स्पष्ट भाषेंत बोलावयाचें कीं, तें तुमच्या लाडक्या सात वर्षांच्या मुलालाहि कळावें. वागतांना कृति आणि शब्द यांचा मेळ इतका पूर्ण राखावयाचा कीं, तुमच्या मुलानें तुम्हाला 'बाबा, तुम्ही अमुक कां बोललांत, आणि आतां त्याच्या उलट कां बोलतां आणि वागतां?' असा प्रश्न विचारण्याचा प्रसंग कधींहि येऊं नये. तुम्हांला हा मार्ग अगदीं दुबळेपणाचा दिसेल, हें मला ठाऊक आहे; तथापि मनुष्यजाति निर्माण झाली तेव्हांपासून आजपर्यंत घडून आलेलीं सारीं महत्कार्यें याच मार्गानें घडून आलीं आहेत, अशी माझी पुरी खात्री आहे. सत्यभक्त आणि धैर्यवंत अशा माणसांनीं माणुसकीला न शोभणारीं कृत्यें करण्याचें नाकारलें, म्हणूनच अखिल मानवी समाज आपली रानटी अवस्था सोडून आजच्या स्थितीपर्यंत येऊन पोहोंचला आहे. आणि असें व्हावें हें युक्तच आहे. कारण आपल्या सदसद्विवेक बुद्धीला जें पटतें तेंच खरोखर सत्याचें व्यावहारिक रूप आहे. आणि यामुळेंच मनुष्यजातीला तें आवश्यक असून तेंच तिला कल्याणप्रदहि आहे. जो मनुष्य आपल्या सदसद्विवेक बुद्धीला धरून चालतो, त्याचेंच वजन लोकांवर पडतें आणि त्यानेंच केलेलें कार्य जनसुखाच्या उपयोगी पडतें.

पण माझ्या म्हणण्याचा अर्थ याहूनहि मीं स्पष्ट केला पाहिजे असें मला वाटतें. क्रांतिकारक पक्ष अथवा उदारमतवादी आपल्या चळवळी ज्या हेतूनें करीत आहे, त्याच दिशेनें आपल्या सदसद्विवेक बुद्धीस अनुसरून ही नवी चळवळ सुरू केली पाहिजे असें मीं म्हटलें; पण केवळ हें साधण्यापुरतीच आपली सदसद्विवेक बुद्धि जागृत ठेवावी, असा माझ्या म्हण-

ण्याचा अर्थ नाहीं. केवळ एकादा बाह्य हेतु सिद्ध करण्यापुरतेंच आपल्या विवेकबुद्धीला धरून चालणें कोणालाही शक्य नाहीं.

तसें होण्यास धर्ममतांतच स्पष्ट बदल झाला पाहिजे. अशा रीतीनें सदोदित विवेकबुद्धीला धरून चालणें, यांतच खरा धर्म आहे, असें वाटलें पाहिजे. असा बदल झाला, म्हणजे त्याचा परिणाम आपल्या चालू व्यवहारांतील बाह्य आचारांत आपोआपच दिसूं लागेल. माझ्या म्हणण्याचा एकंदरीनें आशय असा: जे लोक सद्बुद्धीनें आपल्या बांधवांचें कल्याण करण्यास पुढें सरसावतात त्यांनीं बारीक बारीक तपशिलांत सुधारणा करण्यास आपल्या मानसिक आणि आध्यात्मिक शक्तीचा व्यय करूं नये. अशा रीतीनें वागल्यानें खरें कार्य कोणतेंहि होत नाहीं. वेगवेगळ्या पक्षांच्या भांडणांत अधिक सत्ता मिळविण्याकरतां युक्त्या योजण्यांत आपली बुद्धि खर्च करणें अथवा एकादें क्षुद्र कार्य साधण्याकरतां आज या पक्षाला तर उद्यां त्या पक्षाला मिळण्यानें कोणतेंहि सत्कार्य सिद्ध होत नाहीं. मानवी जन्माचा आदिहेतु काय, याची स्पष्ट कल्पना त्यांच्या चित्ताला होईपर्यंत त्यांच्या हातून जी धरसोडीची वागणूक होते, ती कोणालाहि कल्याणप्रद होत नाहीं. याकरतां हा आदिहेतु आपल्या मनाशीं त्यांनीं आधीं स्पष्ट करावा. तुमच्यासारखे जे सद्बुद्धीचे पुरुष लोकसेवा करण्यास पुढें येऊं पाहतात, त्या सर्वांनीं समुच्चयेंकरून या एकाच दिशेनें कार्य करावें, असें मला वाटतें. ही मूळ भूमिका तुम्ही पक्की तयार केली म्हणजे बाकीच्या गोष्टी कांहीं खटपट न करतां अनायासेंच सिद्ध होतील.

एवढें लांबलचक पत्र लिहून मीं तुमचा वेळ घेतला, याबद्दल मला क्षमा करा. कदाचित् या साऱ्या गोष्टी तुम्हास आधींच ठाऊक असतील आणि यामुळें हें सर्व लिहिण्याचें कदाचित् कांहीं कारणहि नसेल; पण या प्रश्नासंबंधीं माझें मत एकवार मला स्पष्ट करून सांगावयाचें होतें. याबद्दल एक लांबलचक लेख लिहिण्यास मीं आरंभहि केला होता; पण माझ्या मृत्यूच्या आधीं तो पुरा करण्यापुरता तरी वेळ मला मिळेल कीं नाहीं, हें सांगवत नाहीं. याकरतां फूल नाहीं फुलाची पाकळी या नात्यानें हें

पत्र मीं लिहिलें आहे. यांत माझ्या हातून कांहीं चुका झाल्या असतील तर त्याबद्दल मला क्षमा करावी.

---

## झार बादशहास लिहिलेल्या पत्रांतील उतारा.

लोक खून करतात, दंगे करतात आणि रस्त्यांत मारामाऱ्या होऊन वित्ताचा नाश होतो. यावर सरकार ज्या उपायांची योजना करतें त्यामुळें हे दंगे पुन्हा पुन्हां उद्भवतात, खुनांच्या आणि फांशीच्या साथी वारंवार सुरू होतात, आणि दहशतीचें साम्राज्य सुरू होतें. खोटे खटले, खोटे पुरावे, इत्यादि प्रकार एका बाजूनें सुरू असतात, त्याला प्रत्युत्तर म्हणून दुसऱ्या-बाजूनें द्वेष आणि सूड यांची लाट उसळते आणि या कुंडांत लोक भडा-भड आत्मसमर्पण करतात. देशांत पुन्हां दुफळी माजते आणि दोन्ही पक्षांचे लोक भयंकर आगळिकी करण्याच्या तयारीस लागतात.

सांप्रत सर्व रशियांत सर्वत्र दंगे सुरू झाले आहेत आणि ते कदा-चित् लवकर बंदहि होतील; पण याच वेळीं दुसरीहि एक गोष्ट घडून येण्याचा संभव आहे. ज्या लष्करावर आणि पोलिसावर सरकारची सारी भिस्त आहे, त्यांतले लोक कदाचित् अधिक शहाणे होऊन सरकार आपल्या हातून बंधुहत्येचा भयंकर गुन्हा करवीत आहे, असें म्हणून हातांतील शस्त्रें कदाचित् खालीं ठेवतील; पण कदाचित् तसें न घडलें आणि त्यांच्या सहाय्यानें सरकारनें हे दंगे तात्पुरते शमविले तरी त्यांचे उच्चाटन समूळ होणार नाहीं. उलटपक्षीं लोकांच्या मनांतील क्रोधाग्नि गुप्त-पणें पण अधिक तीव्रतेनें जळत राहील आणि अखेरीस पूर्वींच्याहून अधिक जोरानें तो अनिवार्यपणें बाहेर पडेल. असें झालें तर भयंकर गुन्हे व अपार दुःखें यांचे कडे राष्ट्रावर कोसळल्यावांचून राहणार नाहींत.

असें कां व्हावें? ज्या गोष्टी सहजासहजीं टाळतां येण्यासारख्या आहेत, त्या कां घडून याव्यात?

खुद बादशहापासून तों खालच्या पायरीच्या सरकारी कामगारापर्यंत साऱ्यांनाच उद्देशून हा अर्ज आम्ही लिहीत आहों. बादशहाचे सर्व आप्तसंबंधी, सर्व काका, मामा आणि त्यांच्या प्रभावळींतील बाकी सारे लहान मोठे अधिकारी, यांस बादशहाचें मन वळविण्यास या अर्जद्वारें आम्ही विनंति करीत आहों. तुम्हाला शत्रु समजून हा अर्ज आम्हीं लिहिलेला नाहीं. कारण तुम्हींहि आमचे बांधवच आहां. आतां तुमची इच्छा असली अथवा नसली तरी तुमचें आमचें नातें कायमचें जखडलेलें आहे. आम्ही जीं दुःखें आज प्रत्यक्ष भोगीत आहों, त्यांची बाधा परंपरेनें तुम्हासहि होत आहे. आणि हीं दुःखें दूर करण्याचा सोपा उपाय आपल्या हातांत असतां आपण तो केला नाहीं, अशी जाणीव तुमच्या विवेकबुद्धीनें तुम्हाला दिली, तर तुमच्या मानसिक यातनांना पारावार उरणार नाहीं. याकरतां ही स्थिति मुळांतूनच पालटावी या हेतूनें हा अर्ज आम्ही तुम्हास पाठवीत आहों.

या दंग्यांची तुमची कारणमीमांसा अशी आहे; कोणी तरी असंतुष्ट माणसें उठून लोकांस बिथरवितात आणि रशियाच्या चालू जीवनक्रमाच्या ओघांत प्रचंड वादळ उठविवात, असा तुम्हांपैकीं बहुतेकांचा समज आहे. तुमच्या दृष्टीनें सारा अपराध या असंतुष्ट चळवळ्यांकडे आहे असें दिसते. यासाठीं असंतुष्ट आणि त्रासदायक लोकांस वठणीवर आणून त्यांना जमीनदोस्त केलें म्हणजे आणीक कांहीं फिरवाफिरव न करतांहि राज्याचा गाडा आपल्या जुन्या मार्गानें पुन्हां सुरळीत चालू राहील असा अजमास तुम्ही बांधतां.

पण हे दंगेधोपे केवळ दुष्ट माणसांच्या चिथावणीनेंच उत्पन्न होत असते, तर अगदीं सोप्या उपायानें ते बंद झाले असते. असलीं माणसें धरून तुरुंगांत डांबून टाकलीं, अथवा त्यांना फांशीं दिलें कीं, साऱ्या दंग्यांचा अखेरचा निकाल लागला; पण वस्तुस्थिति काय आहे ? गेलीं तीस वर्षे अथवा याहूनहि अधिक काळ रशियन सरकार हेंच काम करीत आलें आहे. हजारों चळवळ्यांना धरावें, तुरुंगांत टाकावें, हद्दपार करावें आणि फांशीं द्यावें, हा सरकारचा उद्योग एकसारखा चालू असतांहि या चळवळ्यांची संख्या कमी

न होतां ती अधिकाधिक वाढत आहे. चालू राजशासन पद्धतीबद्दल लोकांचा असंतोष वाढत आहे. आणि आतां तो मजुरवर्गापर्यंत पोहोंचून असंतुष्टांची मोजदाद कोर्टांनीं करावी लागत आहे व सबंध राष्ट्रांतील बहुतेकांची गणना आतां असंतुष्टांच्या वर्गांत होऊं पहात आहे. यावरून हा असंतोष दुष्ट चळवळ्यांनीं उत्पन्न केलेला नाहीं, हें निर्विवाद सिद्ध होतें. तेव्हां याचें कारण दुसऱ्या कोठें तरी शोधलें पाहिजे. हें शोधण्याचें काम तुम्ही सरकारी लोकांनींच केलें पाहिजे. हल्लीं जें द्वंद्व लोकांबरोबर तुम्ही चालविलें आहे, तें बंद करून तुम्ही आपलें लक्ष दुसरीकडे वळविलें तर लोकांतील या असंतोषाचें कारण तुम्हांस स्पष्ट दिसून येईल. जो असंतोष दंग्याधोप्याच्या रूपानें दृक्प्रत्ययास येतो आणि ज्याचीं पाळेंमुळें अधिक खोल जाऊन दूरवर पसरत आहेत, त्याचें कारण तुम्हास उघड दिसून येईल. दंगा झाला असतां लोकसमूहास हांकून द्यावें आणि लोक पळून न जातील, तर त्यांजवर गोळीबार करावा, म्हणजे सर्वत्र शांतता प्रस्थापित होईल असें तुमचे अधिकारी तुम्हास सांगतात; पण या त्यांच्या सांगण्यावर भोळेपणें विश्वास न टाकतां वस्तुस्थितीचें निरीक्षण तुम्ही आपल्या डोळ्यांनीं करा.

सर्फ लोकांना मुक्त करणाऱ्या झारचा वध कांहीं मूर्ख लोकांनीं केला. आपल्या अशा कृतीनीं आपण मोठें राष्ट्रकार्य करीत आहों या चुकीच्या समजुतीनें अशा घोर कर्मास हे लोक प्रवृत्त झाले आहेत. मूठभर मूर्ख लोकांच्या या दुष्कर्माचा फायदा घेऊन सरकारानें दडपशाहीस सुरुवात केली. राजशासनांत दिवसेंदिवस सुधारणा करावयाचें सोडून आमचें सरकार उलट्या मार्गानें चालू लागलें. दिवसेंदिवस उत्क्रांत होत जाणाऱ्या समाजाबरोबर आपलें पाऊल पुढें न टाकतां आपला जुना पुराणा आणि रानटी असा दंडुकेशाहीचा मार्ग सरकारनें पत्करला. अशा रीतीनें लोक आणि राजशासन यांचे मार्ग एकमेकाविरुद्ध झाल्यामुळें गेल्या वीस वर्षांत या दोघांतील अंतर कितीतरी अधिक झालें आहे. लोकांच्या मागण्या आणि सरकारचा अनुदारपणा यांची वाढ सारख्याच प्रमाणानें होत आहे.

यावरून या चळवळीचें कारण दुष्ट लोकांची चिथावणी हें नसून

तुमची स्वतःची म्हणजे राजशासनाची उलटी वागणूक हेंच सध्यांच्या असंतोषाचें कारण होय. तुमची नजर स्वतःच्या कक्षेपलीकडे जात नाहीं. स्वतःच्या स्वस्थतेवांचून दुसऱ्या कशाचाहि विचार तुम्ही करीत नाहीं. आपल्या शत्रूपासून आपला बचाव करण्याचें तुमचें सध्याचें धोरण अगदीं अनाठायीं आहे. कारण तुमचा घातपात करण्याची इच्छा कोणालाहि नाहीं. याकरतां लोकांच्या असंतोषाचें वास्तविक कारण आहे, तें लक्षांत घेऊन त्याचें निराकरण तुम्ही केलें पाहिजे. असंतोष आणि शत्रुभाव यांचा फैलाव व्हावा, असें कोणाहि मानवी समाजाला वाटत नाहीं. उलट सर्वांनीं एकोप्यानें आणि बंधुभावानें एकत्र नांदावें, अशीच प्रत्येक समाजाची इच्छा असते. अशा स्थितींत आज शांति नाहींशी झाली आहे, आणि कांहीं लोक तुमचा दुष्टावा करतात, याचें कारण हेंच कीं, स्वातंत्र्य आणि ज्ञानवृद्धि हा जो मानवी समाजाचा जन्मजात हक्क, त्याच्या आड तुम्ही येत आहां असा त्यांचा समज झाला आहे. केवळ मूठभर लोकांचाच नव्हे तर कोट्यवधि लोकांच्या या हक्कावर तुम्ही गदा घालतां, असें त्यांस वाटतें, आणि यासाठींच ते तुमचा द्वेष करतात.

या मूठभर चळवळ्यांनीं अशा प्रकारें वागण्याचें बंद करण्याचा उपाय अगदीं थोडा आहे. हा उपाय तुमच्या स्वतःच्या शांतीलाही अत्यंत आवश्यक आहे. आणि तो इतका उघडा आहे कीं, तो तुम्ही न केल्यास ती एक मोठ्या आश्चर्याचीच गोष्ट समजली जाईल. यांच्या कलमांची यादी मी पुढें देतों.

१ शेतकऱ्यांनाहि इतरांबरोबरच सारखे हक्क देणें. त्यांच्याविरुद्ध असलेले विशेष कायदे रद्द करणें. मजूर आणि भांडवलवाले यांचा परस्पर संबंध निश्चित करणारे कायदे रद्द करणें. कोठेंहि जावयास लागणारी हल्लींच्या परवान्यांची आवश्यकता नाहींशी करणें. शेतकऱ्यांवरील हल्लींचे कांहीं कायदेशीर बोजे नाहींसे करणें.

२ हल्लीं सरकारी नौकरांच्या हातांत फाजील सत्ता आहे, लोकांवर त्यांची फाजील कदर आहे, यांतील पुष्कळसे अधिकारी अनीतिमान्, मूर्ख आणि दुष्ट आहेत. यांची सत्ता कमी करणें. कायदा गुंडाळून ठेवून

वाटेल तसें वागण्याची मुभा या अधिकाऱ्यांना मिळाल्यामुळें न्यायाचा खुला मार्ग अधिकाधिक मागें पडून चोरट्या रस्त्यांचा सुळसुळाट झाला आहे. यामुळें गुप्त हेरांची संख्या वाढली आहे. भांडवलवाल्यांची दंडेली वाढून मजूरवर्गावर वाटतील तें अत्याचार ते खुशाल करतात. चुगलखोरांच्या सुळसुळाटामुळें मनुष्यवधाची शिक्षा वारंवार अमलांत येऊं लागली. या शिक्षेमुळें मनुष्यसमाज अवनतीस जात आहे. ही शिक्षा ख्रिस्ती धर्मतत्वांविरुद्ध आहे. रशियाच्या प्राचीन राजशासनला ही शिक्षा ठाऊक नव्हती. अशी शिक्षा कोणी फर्मावणें, हाच अत्यंत घोर गुन्हा आहे. या शिक्षेला परमेश्वराची आणि आपल्या सदसद्विवेक बुद्धीची संमति नाहीं.

३ लोकशिक्षणाच्या बाबतींत हल्लीं असलेल्या सर्व अडचणी दूर करणें. देशांतील कोणत्याही वर्गास संधी मिळाली पाहिजे. या बाबतींत सरकारानें जे नियम केले आहेत, ते विशेषतः शेतकरीवर्गाला प्रतिकूल आहेत. वाटेल त्या प्रजाजनाला वाटेल त्या शाळेंत जाण्याची मोकळीक असावी. शिक्षण लोकभाषेंत झालें पाहिजे. मुलांना समजेल अशी घरगुती भाषा वापरण्यास सरकारानें मनाई केली आहे. ही मनाई दूर झाली पाहिजे. प्राथमिक अथवा अधिक उच्च शिक्षणाच्या शाळा काढण्यास कोणालाहि मुभा असावी. शिक्षणाच्या पवित्र कार्यासाठीं आपलें तनमनधन खर्च करण्याची ज्यांची तयारी असेल, त्यांच्या मार्गांत सरकारानें अडचण उभी करूं नये.

लोकशिक्षणाच्या मार्गांत ज्या अडचणी सरकारनें सध्यां उभ्या केल्या आहेत, त्या नाहींशा होणें, ही बाब महत्त्वाची आहे. शेतकरी अडाणी म्हणून त्याजवर अधिक जरब ठेवली पाहिजे असें सरकार म्हणतें. आणि त्यांच्या शिक्षणाच्या मार्गांत आपणच अडचणी उभ्या करून त्यांचें अज्ञान सरकार कायम राखतें हें आश्चर्य नव्हे काय? हल्लीं शेतकऱ्यांना भलभलत्या गोष्टी शिकविण्यांत येत असतात, पण त्यांच्या मार्गांतील अडचणी दूर झाल्या म्हणजे त्यांना खरें उपयुक्त ज्ञान सुलभपणें मिळूं शकेल. हल्लींच्या सरकारी शाळांतील ठराविक क्रम पुष्कळ विद्यार्थ्यांस नापसंत आहे. आणि यामुळेंच हल्लींच्या असंतोषांत भर पडली आहे. खाजगी शाळांस सर्रास

परवानगी दिल्यानें हा असंतोष आपोआपच नाहींसा होईल.

४ सर्वांस धर्मस्वातंत्र्य असणें हेंहि अत्यंत इष्ट आहे. धर्माच्या बाबतींत कोणावरहि सरकारचा जुलूम असू नये. रशियांतील सर्व धर्मपंथांना आपापलीं प्रार्थनागृहें बांधण्याची परवानगी असावी. त्याचप्रमाणें धर्मोपदेशाच्या बाबतींतहि लोकांस उपदेश करण्याची परवानगी सर्व पंथांना असावी.

धर्माच्या बाबतींत या गोष्टी करणें अवश्य आहे. धर्माच्या बाबतींत झालेल्या जुलमाचा परिणाम कधींहि चांगला होत नाहीं, अशीच साक्ष इतिहासानें आजवर दिली आहे. या बाबतींत जुलूम केला गेला तर अपेक्षित परिणामाच्या उलट परिणाम मात्र हटकून घडून येतो. समाजांत असलेला एकोपा अशा जुलमानें हटकून नाहींसा होतो. एकाच पंथांत साऱ्या प्रजेला दावणींतल्या गुराप्रमाणें जुंपल्यानें खरी एकी उत्पन्न होत नसून सत्याचा मार्ग सर्वांस सारखाच मोकळा करून दिल्यानें मात्र ती उत्पन्न होणारी आहे.

वर सांगितल्याप्रमाणें रशियन लोकांच्या इच्छा आहेत. आणि या मागण्या अगदीं अल्प आहेत हें कोणीही कबूल करील. लोकांच्या या मागण्या सरकारास सहजासहजीं पुऱ्या करतां येण्यासारख्या आहेत. त्या सरकारानें पुऱ्या केल्या, तर लोक खरोखरच संतुष्ट होतील; त्यांचे सध्याचे हाल नाहींसे होतील, आणि याहूनहि विशेष महत्त्वाची गोष्ट ही कीं, हल्लीं उभयपक्षीं चालू असलेले गुन्हे बंद पडतील. उलटपक्षीं अस्वस्थतेचीं हीं कारणें अशींच शिल्लक ठेवून दंगे धोपे मोडण्याचा उद्योग मात्र सरकार करीत राहिलें, तर हे गुन्हे कधींहि बंद पडावयाचे नाहींत.

खुद्द झार बादशहापासून तो त्याच्या अखेरच्या सल्लामसलतगारापर्यंत तुम्हां सर्वांना आमची एकत्रच प्रार्थना आहे. राष्ट्राला शांतिलाभ करून देण्याच्या कामांत तुम्हापैकीं प्रत्येकानें मदत करावी. ज्याच्या ज्याच्या हातात थोडी बहूत तरी राजशासनाची सत्ता असेल त्यानें या कार्याला मदत करावी. लोक अनंत दुःखानें व्यग्र झाले आहेत आणि गुन्हे वाढत आहेत. तुम्ही आमचे शत्रु या नात्यानें नव्हे. तर आमचे सहकारी मित्र आणि आमचे बांधव या नात्यानें हा अर्ज तुम्हास सादर केला आहे.

कोणत्याही समाजांत दोन तट पडून त्यांतील एकादा दुसऱ्यास पाण्यांत पाहूं लागला, तर कोणालाही शांतिसुखाचा लाभ होणें शक्य नाहीं. सामान्य बंधनांनीं सर्व समाज बद्ध झाला असल्यामुळें त्यांतलि कोणत्याहि एका भागाचें दुःख दुसऱ्यास जाणवल्यावांचून रहात नाहीं आणि विशेषतः त्याचा बराच मोठा भाग दुःखी असला, तर उरलेला लहानसा भाग सुखी कसा होणार? आपल्या शारीरिक मेहनतीनें जो राष्ट्रदेहाचा भाग साऱ्या देहालाच आधारस्तंभासारखा झालेला असतो, तो सुखी झाला तरच राष्ट्रदेह सुखांत राहील.

याकरतां या मोठ्या भागाची स्थिति सुधारण्याच्या कार्यांत तुम्ही मदत करा. त्याला दुःसह होत असलेलीं बंधनें तुटावींत आणि ज्ञानार्जनाचे त्याचे मार्ग मोकळे व्हावेत, हेंच आजचें निकडीचें कार्य आहे. या कामांत तुम्ही आम्हास मदत केली तरच तुम्हीं स्वतःहि सुस्थितींत रहाल आणि तुमच्या अधिकाराला बळ येईल.

लियो टॉल स्टॉय यानें हा मजकूर लिहिला आहे. यांत त्यानें केवळ आपलेच विचार प्रगट केले आहेत, असें नसून रशियांतील अत्यंत सद्गुणी, दयाशील, स्वार्थबुद्धिरहित आणि शुद्धसमतोल बुद्धीच्या पुरुषांचीं मतेंहि त्यानें व्यक्त केलीं आहेत. यांत सर्वांचीच इच्छा त्यानें नमूद केली आहे.

---

## शिक्षण.

प्रिय--

मुलांच्या शिक्षणासंबंधीं एका मित्राशीं नुकतेंच माझें संभाषण झालें. त्यावेळीं या विषयाचा खल आम्हीं बऱ्याच गंभीरपणानें केला आणि एका बाबतींत आम्हां दोघांची पूर्ण एकवाक्यता झाली. ही बाब विधायक स्वरूपाची नसून ती निषेधक स्वरूपाची आहे, असें म्हटल्यास चालेल. मुलांना होईल तितकें कमी शिकवावें, याबद्दल आम्हां दोघांचींहि

मतें एकसारखींच पडलीं. याचा अर्थ मुलांना मुळींच शिकवावयाचें नाही, असा मात्र धरावयाचा नाहीं. मुलांना दिवसांतून--प्रसंगीं सात आठ तास शिक्षण देण्यासहि हरकत नाहीं; पण जो विषय शिकण्याची त्यांची इच्छा नसेल तो त्यांजवर बळजबरीनें लादूं नये, इतकेंच माझें म्हणणें आहे. आतां अशा रीतीनें चालल्यास मुलांना कांहीं विषय मुळींच येणार नाहींत आणि तीं मोठीं होईपर्यंत त्या विषयांत तीं अगदींच अनभ्यस्त राहतील हें खरें; पण हल्लींच्या पद्धतीनें शिक्षणाचें जें अपचन त्यांना होतें, त्यापेक्षां कांहीं विषय त्यांना न आले तरी पुरवलें. हल्लीं पुष्कळ शिक्षकांना मुलांना शिकविण्याचे विषय स्वतःलाच धडपणें समजलेले नसतात आणि अशा शिक्षकांच्या तालमींत तयार होत असलेल्या मुलांच्या मनांत एकंदर शिक्षणाविषयीं अनादर उत्पन्न होतो. तीं शिकण्याचा द्वेष करूं लागतात. भूक लागली म्हणजे कोणी जसा अन्न मागतो, त्याचप्रमाणें एखादा विषय समजावा अशी तीव्र भूक मनाला लागली म्हणजे लहान मूल अथवा मोठा मनुष्य त्या विषयाचा अभ्यास आपोआपच झटून करूं लागतो. अशी भूक असल्याशिवाय दिलेलें शिक्षण मुलांना लाभदायक न होतां तें हानीकारक मात्र हटकून होतें आणि ही हानीहि अत्यंत भयंकर स्वरूपाची आहे. असल्या शिक्षणानें मुलांची मानसिक शक्ति क्षीण होते आणि पुढें तिला केव्हांहि तरतरीतपणा प्राप्त होत नाहीं. प्रिय मित्रा, देवाशपथ, हा विषय इतक्या अगत्याचा नसता, तर हें पत्र मी तुला खचित लिहिलें नसतें.

यावर एक प्रश्न नेहमीं विचारण्यांत येत असतो. मुलांना शिक्षण द्यावयाचें नाहीं असें म्हटलें तर त्यांचा वेळ तरी कोठें आणि कसा गुतवावा? गांवांतल्या चटोर पोरांबरोबर त्यांनीं गोट्या खेळत बसावें कीं काय? कीं अगदींच उनाड होऊन शुद्ध टवाळक्या करीत फिरावें? मध्यम वर्गांतील गृहस्थांच्या मुलांना शोभण्यासारखी त्यांची वागणूक असणें इष्ट नाहीं काय? यावर मला पुढील उत्तर देतां येईल. श्रीमंतांच्या मुलांनीं श्रीमंतांसारखें वागावें, असा तुमचा म्हणण्याचा आशय दिसतो; पण श्रीमंतासारखी वागणूक म्हणजे काय? हल्लींचे श्रीमंत स्वतःच्या पोटासाठीं कोणताहि

उद्योग स्वहस्तें करीत नाहींत. त्यांच्या सर्व गरजा लोकांच्या श्रमानें भागतात. तुमच्या मुलांच्या मनांत अशाच रीतीनें वागण्याची आवड उत्पन्न करून देणारें शिक्षण खरोखरच जरूरीचें आहे काय? माझ्या मतें चांगल्या शिक्षणाचा उपयोग वेगळा आहे. आपल्या जरूरीला लागणारी प्रत्येक वस्तु आकाशांतून पडत नसून कोणाच्या तरी श्रमानें ती तयार होत असते, हें प्रत्येक सुशिक्षित मुलाला समजावयाला पाहिजे. ज्या शिक्षणानें ही भावना उत्पन्न होत नाहीं, तें शिक्षण नव्हे. आपल्या घरांतील झाडसारव करणारी आपली मोलकरीण असलीं कामें नाखुषीनें करीत असते. त्याचप्रमाणें आपल्या घरांतील इतर नौकरहि आपल्यावरील प्रेमामुळें नव्हे तर केवळ स्वतःच्या गरजेसाठीं हीं हलकीं कामें करीत असतात. ही गोष्ट त्याला समजली पाहिजे, इतकेंच नव्हे, तर हीं कामें त्याजकडून करविण्यांत त्याला खरोखर लाज वाटली पाहिजे. अशी लाज त्याला न वाटेल आणि याच पद्धतीनें तो पुढें चालत राहील तर, तुमच्या शिक्षणाचा प्रारंभ फार वाईट तऱ्हेनें झाला, असें म्हटलें पाहिजे. असल्या शिक्षणाचा परिणाम मुलाच्या साऱ्या जन्मभर त्याला भोवत असतो. हें टाळण्याला अगदीं सोपी युक्ति आहे स्वतःचीं कामें आपलीं आपणच करण्यास मुलांना आपण शिकविलें पाहिजे आपलें वस्त्र पात्र स्वच्छ राखणें, खोली झाडणें, आपल्या वस्तु व्यवस्थितपणें ठेवणें, स्वतःचे जोडे पुसणें, इत्यादि सर्व प्रकारचीं कामें करण्याचें वळण त्यांना आरंभापासून असावें. या गोष्टी दिसतांना अगदीं क्षुल्लक दिसतात, पण मी तुम्हाला बजावून सांगतों कीं, संस्कृत भाषा अथवा इतिहास यांच्या ज्ञानापेक्षां हें क्षुल्लक ज्ञान मुलांना पुढें अधिक सुखदायक होईल. आतां असें वाटण्यांत आणखीही एक अडचण आहे. आईबापांची वर्तणूक पाहून मुलें तदनुरूप वागत असतात. जीं कामें आईबाप करतात तीं करण्यांत मुलांना कमीपणा वाटत नाहीं. याकरतां असल्या प्रकारचीं कामें स्वतःच करण्याचा परिपाठ आईबापांनीं ठेवला पाहिजे. यामुळें मुलांना साधेपणाचे वळण आरंभापासूनच लागतें. त्याचप्रमाणें प्रत्येक कामासाठीं अडून बसण्याची संवय त्यांना जडत नाहीं. आरंभापासूनच तीं स्वावलंबी होतात्. अशा वागणुकीचा परिणाम तुम्हाला

अगदीं आरंभापासून सुद्धां दिसून येईल. यांतच बागेंतल्या कामासारखें एकादें लहानसें लागवडीचें काम मुलांना तुम्ही दिलें, तर तें अधिक चांगलें. यांत मुलांना खेळ आणि काम असे दोन हेतु एकदम साधतात. मुलांना आपापलीं कामें करण्याचें वळण आरंभापासून लावलें पाहिजे ही गोष्ट विचारी शिक्षकांना आतां पटूं लागली आहे आणि कांहीं वसतीगृहाच्या शाळांतून हा प्रकार सुरूहि झाला आहे. अशा प्रकारचें वळण मुलांना आरंभींच न लावलें, तर कोणत्याहि प्रकारचा नीतिबोध त्यांच्या मनावर पुढें ठसविणें शक्य नाहीं. हें तुम्ही पक्कें लक्षांत ठेवा. मी धनी, आणि बाकीचे नौकर या भावनेचा अंकुर ज्या मनांत आरंभींच उगवला तेथें खऱ्या धार्मिक शिक्षणाचें बीजरोपण कधींहि होणार नाहीं. सारीं माणसें एकाच परमेश्वराचीं लेंकरें असून त्यांच्यांत बंधुत्वाचें नातें आहे, ही गोष्ट त्रिकालांतहि त्याला पटावयाची नाहीं. त्याचीं कामें लोकांनीं करण्याची संवय त्याला आरंभापासूनच लागल्यामुळें आपलीं कामें आपण करावीं या भावनेचा उदय तेथें कधीं तरी होईल काय?

अशा प्रकारच्या शिक्षणानें त्याच्या मनांत एक भावना मात्र निःसंशय रूढ होईल ती हीच कीं, एकंदर माणसांत धनी आणि गुलाम असे दोन वर्ग आहेत. ही भावना एक वेळ पक्की झाल्यानंतर समतेच्या आणि बंधु-भावाच्या तत्वाची ओरड कितीहि केली, तरी ती फुकट होय. कारण तो जागा झाल्यापासून पुन्हां झोंपी जाईपर्यंत जो सामान्य आयुष्यक्रम तो पाहतो, त्यांत धनी आणि गुलाम या तत्वाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि तत्वाचा वास सुद्धां त्याला येत नाहीं.

अशा स्थितींत त्याच्या गुरुजनांनीं केलेला सारा उपदेश आणि त्यांची नीतीवरिल सारीं व्याख्यानें मातीमोल होतात. त्यांच्या उपदेशांत कांहीं अर्थ नाहीं, असें त्याला वाटूं लागतें. या साऱ्या नीतिकथा शुद्ध वरकरणीच्या आणि दांभिक आहेत, अशी खात्री त्याच्या अंतरयामीं पटूं लागतें. गुरुजनावरील त्याचा विश्वास नाहींसा होतो. फार काय? पण नीतियुक्त आचरण म्हणजे काय आणि अशा आचरणाची जरूरी काय, हेंही त्याला समजेनासें होतें. आणि आपण जशा रीतीनें वागतो तेंच आचारण युक्त

असा त्याच्या बुद्धीचा ठाम सिद्धांत होतो.

येथवर ज्या गोष्टी सांगितल्या त्या साऱ्याच अमलांत आणणें शक्य नसलें तर निदान एवढें तरी करा कीं, त्यांतील कांहीं गोष्टी मुलांनीं न केल्यास त्यांची अडचण त्यांना नाबडतोब भासावी. उदाहरणार्थ, बाहेर जातांना कपडे स्वच्छ नसले, अथवा जोडे पुसलेले नसले तर मुलांनीं बाहेर जाऊं नये, असा नियम करावा. भांडीकुंडी स्वच्छ नसलीं तर प्रसंगीं त्यांचें जेवणहि बंद करा. तुमच्या या वागणुकीबद्दल तुमच्या दरजाचे इतर लोक आपणास हंसतील या भीतीनें हा मार्ग सोडूं नका. जगांतील नऊदशांश वाईट गोष्टी केवळ लोक हसतील या भीतीनें आपण डोळे मिटून करीत असतो.

---

## एका लष्करी कामगारास पत्र.

युद्धाच्या प्रसंगीं आणि दुसऱ्या कांहीं विशिष्ट वेळीं मनुष्यहत्या करणें योग्य आहे, असें सैनिकास शिकवण्यांत येतें याचें तुम्हांस मोठें नवल वाटतें असें दिसतें. जे लोक असलें शिक्षण देतात ते स्वतः ख्रिस्ताच्या शास्त्राला पवित्र मानतात. त्या शास्त्रांत मनुष्यवधाची तरफदारी कोठेंहि केलेली नाहीं; इतकेंच नव्हे तर उलट या गोष्टीचा निषेध त्यांत केलेला असून कोणाला कसलेंहि दुःख न देण्याची आज्ञा त्यांत आहे. स्वतःशीं लोकांनीं जसें वागावें असें आपणास वाटतें तसेंच आपण लोकांशीं वागावें अशी ख्रिस्ताची आज्ञा आहे. या साऱ्या गोष्टीचा विचार करून सैनिकांस केलेला उपदेश शुद्ध फसवेगिरीचा आहे, असें तुम्ही म्हणतां आणि ही फसवेगिरी कोणाकरतां आणि कां करण्यांत येते असा प्रश्न तुम्ही विचारला आहे.

होय; यांत फसवेगिरी आहे, हें तुमचें म्हणणें बरोबर आहे आणि ही फसवेगिरी कां करण्यांत येते याचें कारणहि उघड आहे. दुसऱ्यांच्या निढ-

ळाच्या घामानें आणि रक्तानें पैदा झालेल्या संपत्तीवर ताव मारण्याची संवय ज्यांना जडली आहे, त्यांच्याचसाठीं ही फसवेगिरी उत्पन्न झाली आहे. केवळ स्वार्थासाठीं या लोकांनीं ख्रिस्ताच्या सिद्धांतास उलटें रूप दिलें, आणि हे सिद्धांत भ्रष्ट करण्याचा त्यांचा क्रम अद्यापीहि चालू आहे. मनुष्य जातीचें बरें व्हावें म्हणून ख्रिस्तानें जे ज्ञान दिलें, त्याचा असा अपभ्रंश झाल्यामुळें मनुष्यजातीचें कल्याण होण्याऐवजीं तेंच ज्ञान आज तिच्या दुःखाचें मुख्य कारण होऊन बसलें आहे. ही गोष्ट कशी घडून आली याचें थोडेंसें सिंहावलोकन करणें जरूर आहे.

राजशासन संस्था आणि तिच्याचप्रमाणें इतरांच्या अंगमेहनतीवर चरणारा तिच्या भोंवतालचा वरचा वर्ग यांना स्वसंरक्षणासाठीं कांहीं तरी उपाययोजनांची जरूर भासली. कामकरी वर्गावर आपला ताबा सदोदीत राहील, असें कांहीं साधन त्यास हवें होतें आणि हें साधन सैन्याच्या हुकमतींत त्यांना सांपडलें. सशस्त्र लष्कर जोंपर्यंत आपल्या हुकमतीत आहे, तोंपर्यंत आपली कामकरी वर्गावरील सत्ता अबाधित चालेल, असें त्यांस आढळून आलें. परचक्रापासून राष्ट्राचें रक्षण करण्यास सशस्त्र सैन्य पाहिजे, अशी सबब हे लोक सांगतात; पण ही सबब अगदीं लंगडी आहे. जर्मन सरकार रशियाची आणि फ्रान्सची भीति आपल्या लोकांस दाखवितें. फ्रेंच सरकार जर्मनांचा बागुलबोवा पुढें करतें आणि ह्याच प्रकार सारीं सरकारें एकमेकांच्या नांवानें करीत असतात पण वास्तविक पाहतां जर्मन, फ्रेंच अथवा रशियन लोकांस एकमेकांशीं अथवा दुसऱ्या कोणाशीहि लढण्याची इच्छा नाहीं. युद्ध म्हटलें कीं साऱ्यांच्याच अंगावर कांटा उभा राहतो. आपले कामधंदे शांतपणे करून आपले आयुष्य सुखानें घालविण्याची इच्छा साऱ्यांनाच असतें; पण हीं सरकारें आणि त्यांच्या भोंवतालचे वरच्या वर्गाचें लोक त्यांना स्वस्थ बसूं देत नाहींत आपल्या शेजारच्या एकाद्या सरकाराची उगीच कुरापत काढावी आणि आपल्याही लोकांस चिथवावें, हा त्यांचा उद्योग नेहमीं चालूं असतो. अशा रीतीनें प्रथम वितुष्ट उभें करावयाचें आणि मग स्वसंरक्षणाचें ढोंग करून नंतर युद्ध पुकारावयाचें असा त्यांचा क्रम असतो. अशा युद्धांत फायदा कोणाचा

होतो ही गोष्ट विचार करण्यासारखी असते. सेनापति आणि इतर लष्करी व मुलकी कामगार, व्यापारी आणि सरकारच्या कक्षेत फिरणारे कांहीं श्रीमंत यांचें उखळ युद्धांत पांढरें होतें आणि इतर सामान्य जनता जागच्या-जागींच राहते अथवा अधिक खालावते. सशस्त्र सैन्य नेहमीं सज्ज ठेवणें हें युद्धाला बोलून चालून आव्हान करण्यासारखें आहे आणि आपल्या देशांतील कामकरी वगैरे वर्गावर आपली सत्ता अबाधित रहावी म्हणून प्रत्येक देशाचें सरकार सशस्त्र सैन्य सज्ज ठेवीत असतें.

हत्या करणें हें बोलून चालून पापकर्म आहे; पण सामान्य जनतेवर आपला ताबा कायम राखण्याकरतां सरकार या गुन्ह्याला ज्या वेळीं धर्माचें आणि पुण्यकर्माचें स्वरूप देतें त्यावेळीं त्यांचें हिडीस स्वरूप अत्यंत भयंकर होतें. मनुष्यवध करूं नये इतकेंच खिस्ताचें सांगणें नसून कोणावर कोणत्याहि प्रकारचा जुलूम करण्याची मनाई त्यांनीं केली आहे. सरकार स्वतःस खिस्तानुयायी म्हणवितें आणि खिस्ताच्या आज्ञेविरुद्ध चालूनहि खिस्ती धर्मावरील आपला हक्क कायम राखण्याकरतां संबंध खिस्तीधर्माचें स्वरूप तें विकृत करून टाकतें. खिस्तानें मनुष्यजातीला दाखविलेला अंतिम कल्याणाचा मार्ग तिजपासून हें राजशासन चोरून ठेवीत असतें. खिस्ताच्या वचनाचा खरा अर्थ लोकांस कळूं न देण्याची खबरदारी तें घेत असतें.

खिस्ती धर्माचें स्वरूप विकृत करण्याचें कार्य बऱ्याच प्राचीन काळीं होऊन गेलें आहे. कान्स्टंटाइन नांवाच्या बादशहाच्या कारकीर्दीत हें कार्य घडून आलें. आणि तें केल्याबद्दल या नराधमाचें नांव संत सत्पुरुषांच्या मालिकेंत गोंवण्यांत आलें. या काळानंतर आजपर्यंत जितकीं सरकारें झालीं, त्या साऱ्यांनीं आणि विशेषतः आमच्या रशियन सरकारानें हें विकृत स्वरूप लोकांच्या नजरेपुढें सदोदित राखण्याची खटपट अविश्रांतपणें चालविली आहे. खिस्तीधर्माचा खरा अर्थ लोकांस कळूं नये यासाठीं तीं नेहमीं धरपडत असतात. कारण या धर्माचें खरें ज्ञान लोकांना झालें तर सैन्य, तुरुंग, फांस, कर, खोटे धर्माधिकारी इत्यादि अनेक अंगांनीं सज्ज झालेलें सरकार धर्मरक्षक नसून धर्मउच्छेदक आहे, ही गोष्ट त्यांच्या ध्यानीं आल्यावांचून राहणार नाहीं.

धर्मतत्वांचें अशा प्रकारचें विकृत स्वरूप लोकांच्या नजरेसमोर एकसारखें राहिले असल्यामुळें अनेक प्रकारच्या पातकांचा जन्म तेथें होतो आणि मग अनेक प्रकारच्या भयंकर आपत्ति मनुष्यजातीवर कोसळतात, यांत नवल काय ? लोकांवर नानाप्रकारचे जुलूम होऊं लागतात. अनेक युक्त्याप्रयुक्त्यांनीं ते नागविले जातात आणि अठराविश्वे दारिद्र्य भोगून अज्ञानतिमिरांत निमिग्न असलेले हजारों लोक भुकेनें मरण पावतात. रशियासारख्या सुपीक आणि समृद्ध देशांत असा प्रकार कां घडावा ? याचें कारण हेंच कीं, जमिनी श्रीमंतांच्या हातांत आहेत. सामान्य जनतेनें गिरण्यांत आणि कारखान्यांत गुलामगिरी करावी, पोटापुरता पैसा मिळवावा, आणि त्यांतूनच सरकारच्या खिशाचीहि भर करावी. त्यांच्या मेहनतीचें मोल एका बाजूनें उतरत असतें व त्यांना जरूर असणाऱ्या वस्तूंचें मोल उलट दिशेनें चढत असतें.

या आपत्तींतून सुटण्याचा मार्ग कोणता ? श्रीमंतांपासून त्यांच्या जमिनी बुचाडून घ्यावयाचें म्हटलें तर एकदम सैन्य जमा होईल आणि या बंडखोरांना मारून टाकील अथवा तुरुंगांत टाकील. गिरण्या आणि कारखाने गरीबांनीं हातीं घ्यावे म्हटलें तर तेथेंहि तीच गत होणार. संप करून कामें बंद पाडावींत, तर तिकडूनहि फारशी आशा दिसत नाहीं. त्यांतहि गरीबांना अपेशच येणार. कारण गरीबांपेक्षां श्रीमंत लोक अधिक मुदतीपर्यंत दम धरूं शकतील आणि त्यांतूनहि सैन्य भांडवलवाल्यांच्या बाजूला नेहमींच असणार. यावरून एकच गोष्ट उघड दिसून येते, ती ही कीं, सत्ताधीशांच्या हातीं जोंपर्यंत सैन्याचा लगाम राहील, तोंपर्यंत गरीबांना या आपत्तींतून सुटण्याचा मार्ग नाहीं.

पण सामान्य जनतेला अशा रीतीनें सदोदित गुलामगिरींत ठेवणाऱ्या या सैन्याचे घटक कोण असतात ? शेतकऱ्यांनीं थोडी बहुत अगळिक केल्याबरोबर त्यांजवर बंदुका झाडणारे हे शिपायी कोठून आलेले असतात ? एकाद्यानें कर देण्याचें नाकारलें, तर त्याला तुरुंगात घालून त्याजवर पाहरा कोण करतात ? जमीनी जाऊन भिकेस लागलेले शेतकरीच सैनिक बनतात. अधिक पगाराकरतां संप करणारे मजूरच सैन्यांत घुसतात. जमिनीवरील

कर देऊं न इच्छिणारे लोकच सैनिकांत येऊन दाखल झालेले असतात.

तर मग हे लोक आपल्याच बांधवांवर बदुका कशा झडतात ? याचें कारण हेंच कीं, असें करणें आपलें कर्तव्य आहे असा त्यांचा समज करून देऊन त्यांजकडून तशी शपथहि घेवविलेली असते. मनुष्यवध करणें हें पातक आहे, असें त्यांना खरें वाटत असलें तरी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या हुकूमावरून कोणाचाहि वध करणें न्याय्य आहे, असा त्यांचा समज करून दिलेला असतो. ही बोलून चालून वक्रनीति आहे, हें उघड आहे; पण येथें आणखीहि एक प्रश्न उपस्थित होतो. शहाणेसुरते आणि सुशिक्षत लोकहि या वक्रनीतिला बळी कसे पडतात, याचें मोठें नवल वाटतें. कोणत्याहि प्रकारच्या मनुष्यवधाला खिस्ताची संमति नाहीं, ही गोष्ट कोणास नव्यानें सांगावयास नको. दया, शालीनता, क्षमा, प्रेम इत्यादि मृदु गुणांचाच उपदेश खिस्तानें केला आहे. आपल्या शत्रूवरहि प्रेम करा, असें खिस्ताचें सांगणें आहे. याकरतां कोणाच्याहि हुकूमावरून कोणाचाहि वध करण्याची आगाऊ शपथ घेण्याचा अधिकार, खिस्तानुयायांना प्राप्त होत नाहीं, हें उघड आहे.

अशा स्थितींत जे शहाणेसुरते लोक सैन्यांत शिरतात, ते या उघड लबाडीवर भरंवसा कसा ठेवतात ? या प्रश्नाचें उत्तर अगदीं थोडक्यांत देतां येण्यासारखें नाहीं. अमुक एका गोष्टीमुळें हे लोक इतके भोळे बनले असें नाहीं. त्यांच्या अगदीं पूर्ववयापासून अनेक प्रकारच्या खोट्या मतांची छाप त्यांजवर पडलेली असते. जो धर्म म्हणून त्यांना शिकविलेला असतो, तोहि बनावट असतो. सांप्रतच्या जुन्या राशियन मताच्या खिस्ती पंथांत अनेक मूर्खपणाच्या गोष्टी अगदीं खचून भरल्या आहेत. त्यांत अर्थशून्यता इतकी भरली आहे कीं, त्याची संगति कोणासहि लावतां येण्यासारखी नाहीं आणि जे लोक हा गाबाळग्रंथी धर्म शिकवितात, त्यांची इच्छा तुम्ही धर्मज्ञ व्हावें अशी नसते. ते सांगतील त्या गोष्टीवर तुम्ही अंधविश्वास ठेवला म्हणजे त्यांचें काम झालें. आणि इतक्या निर्भेळ मूर्खपणावर विश्वास ठेवण्याची ज्यांची तयारी असते ते दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीवर डोळे मिटून विश्वास ठेवतात, यांत नवल नाहीं.

असल्या प्रकारच्या खोट्या खिस्ती पंथांतून मुक्त असलेला मनुष्य असल्या गोष्टीवर कधींहि विश्वास ठेवणार नाहीं. या जुन्या पंथाचा त्याग करून ज्या लोकांनीं खिस्ताच्या मतांचें अवलोकन स्वतः केलें आहे, विशेषतः त्याच्या दहा आज्ञांचा उपदेश ज्यांनीं घेतला आहे, असे लोक या जुन्या पद्धतीच्या धर्मशिक्षणानें फसले जात नाहींत, असा प्रत्यक्ष अनुभवहि आहे. अशांपैकीं पुष्कळ लोक सरकारी हुकूम तोडतात, हवे ते हाल सोसतात, आणि तुरुंगांतहि जातात. असे लोक केवळ रशियांतच आहेत, असें नाहीं, तर आस्ट्रिया, स्वीडन, स्विट्झरलंड, जर्मनी इत्यादि देशांत असे लोक पुष्कळ आहेत. खिस्ताच्या धर्माचा विचार स्वतःच्या दृष्टीनें करणारे लोक कोणत्याहि सरकारास प्रिय नसतात. असे लोक आपली सत्ता डळमळीत करण्यास कारणीभूत होतात, हें त्यांस ठाऊक आहे. याकरतां आपल्या प्रजेला स्वतंत्र विचाराचें वारें लागू नये, अशी व्यवस्था प्रत्येक सरकार आरंभापासूनच करीत असतें. लोकांचे दुसरे कोणतेहि दुर्गुण सरकारला खपतील. लोक कितीहि दारूबाज अथवा बदफैली बनले, तरी सरकारला चालतें; फार काय, पण आमचें सरकार या गोष्टींना उत्तेजनाहि देतें. कारण असल्या व्यसनांनीं बुद्धिमांद्य येत असतें आणि तसें तें येणें सरकारला इष्ट वाटतें, याकरतां राजशासनसंस्था असल्या गोष्टीकडे कानाडोळा करतात; पण त्याच्या जाळ्यांतून सुटण्यासाठीं जो कोणी धडपड करीत असेल अथवा दुसऱ्या कोणास सुटण्यास मदत करीत असेल त्याजवर मात्र सरकारची करडी नजर फिरल्यावांचून रहात नाहीं.

आमचें रशियन सरकार या बाबींत सर्वांच्या पुढें गेलें आहे. या फसवेगिरीच्या विद्येला मोठ्या शिताफीनें दुष्टपणाची जोड त्यानें दिली आहे. जुन्या धर्माचा त्याग कोणीहि करूं नये, किंबहुना त्या विषयाची चर्चा सुद्धां कोणीं करूं नये, अशी सक्त खबरदारी तें घेत असतें. आणि अशी चर्चा कोणी केली तर त्याला तें जबर शिक्षा सुद्धां ठोठावतें. यामुळें रशियन लोक धर्माच्या बाबींत अगदीं आंधळे बनलें आहेत. आपला धर्म कोणता हेंहि त्यांस ठाऊक नसतें.

सरकारच्या हातीं जें सामर्थ्य आणि जी सत्ता आहे, त्याचा असा दुरु-

प्रयोग करून सत्याचा प्रकाश लोकांना ते मिळूं देत नाहीं. याकरतां अनंत ऐहिक यातनांतून लोकांना मुक्त करावयाचें असेल, तर त्यांच्या डोक्यांत सरकारानें भरवून दिलेल्या खोट्या कल्पनांचा समूळ उच्छेद करण्यावांचून गत्यंतर नाहीं. या कल्पनांचा उच्छेद करून त्यांच्या जागीं ख्रिस्ताच्या खऱ्या धर्माचें बीजारोपण करणें अवश्य आहे. ख्रिस्ताचा धर्म अगदीं साधा, स्पष्ट, आणि कोणालाहि तावडतोब पटण्यासारखा आहे. पण हा धर्म पटण्यास पूर्वीच्या खोट्या कल्पनांचा पूर्ण नाश होणें अवश्य आहे.

एकाद्या निरुपयोगी पदार्थानें एकादें भांडें कांठोकांठ भरलें असलें तर तो पदार्थ त्यांतून काढून टाकल्याशिवाय दुसरा उपयुक्त पदार्थ त्यांत घालतां येणार नाहीं. ख्रिस्ताचा खरा धर्म लोकांना शिकवावयाचा असेल, तर त्यांच्या मनांतून पहिल्या खोट्या कल्पनांचा उच्छेद करणें अवश्य आहे. सहा हजार वर्षांपूर्वीची जगाची उत्पत्ति, अॅडामचें पहिलें पातक, येशु ख्रिस्ताचा कुमारीपासून जन्म, अनेक संतांचीं चरित्रें आणि त्यांनीं केलेले चमत्कार या साऱ्या गोष्टी केवळ फसवेगिरीच्या असून त्या निव्वळ दंतकथा आहेत, हें लोकांच्या मनांत ठसविलें पाहिजे. या दंथकथांपासून ज्याचें मन मुक्त झालें असेल, त्याला ख्रिस्ताचा साधा आणि सोपा उपदेश तावडतोब पटेल. हा उपदेश इतका सोपा आहे कीं, त्याजवर कोणी भाष्य लिहिण्याचें कारण नाहीं. कोणाहि सामान्य मनुष्याच्या बुद्धीला तो तावड-तोब पटण्यासारखा आहे. जगाची उत्पत्ति केव्हां झाली आणि तें उत्पन्न करण्यांत परमेश्वराचा हेतु काय होता, असल्या विषयांची चर्चा ख्रिस्तानें केली नाहीं. या गोष्टी जाणणें आमच्या सामान्य बुद्धीच्या आटोक्याबाहेर आहे. आणि त्या जाणल्यावांचून आपलें कांहीं नडतें असेंहि नाहीं. स्वतःच्या पारमार्थीक कल्याणासाठीं मनुष्यानें काय केलें पाहिजे एवढ्याचाच विचार ख्रिस्तानें केला आहे. ज्या जगांत आपण जन्म घेतला आहे, त्यांत आपली वर्तणूक कशी असावी, इतकेंच ख्रिस्तानें सांगितलें आहे. आणि ख्रिस्ताच्या या साऱ्या उपदेशाचें सार एकाच सूत्रांत सांगतां येण्यासारखें आहे. लोकांनीं आपणांशीं जसे वागावें असें आपणांस वाटतें, तसें आपण त्यांच्याशीं वागावें, हें तें सूत्र होय. यांत सर्व नीतिचा आणि धर्माचा अंत-

भाव होतो, असें खिस्ताचें म्हणणें आहे. अशा रीतीनें वागावयाचें म्हटलें, तर त्यांत मूर्तींची, पुराणवस्तूंची, देवळांची, उपाध्यांची, सरकारची अथवा त्याच्या धार्मिक कायद्यांची यत्किंचितहि जरूर नाहीं. किंबहुना या साऱ्या गोष्टी आपणास बंधनकारकच होतात, असा अनुभव आपणास नित्य येत असतो. यांतून मुक्त असलेला मनुष्यच आपल्या मनाला योग्य वाटेल तसें वर्तन करूं शकतो. सरकारच्या अथवा धर्माधिकाऱ्यांच्या वचनांत जो गुंतला, तो मनःपूत वर्तन कसें करूं शकणार? याकरतां हीं बंधनें ज्यांनें तोडलीं असतील, तोच स्वतःचीं, स्वबांधवांची आणि परमेश्वराचीहि खरी सेवा करूं शकेल.

दुसऱ्यावर जुलूम करावा, अथवा स्वबांधवांशीं युद्धें करावींत, अशी परमेश्वराची इच्छा नाहीं. सर्व मनुष्यांनीं परस्परांशीं बंधुभावानें वागावें आणि परस्परांचीं सेवा करावी, अशीच त्याची इच्छा आहे.

---

## कोणाचाहि वध करूं नको.

इंग्लंडचा राजा पहिला जॉर्ज, फ्रान्सचा सोळावा लुई, आणि मेक्सीकोचा प्रावझीमिलियन यांना न्यायासनापुढें उभे करून लोकांनीं त्यांचा वध करविला. तिसरा पीटर पॉल आणि दुसरे कित्येक सुलतान, शाहा आणि खान यांचे खून झाले. फ्रान्सचा चवथा हेनरी, दुसरा आलेक्झांडर, आस्ट्रियाची राणी, इराणचा शहा आणि राजा हम्बर्ट, हे मारेकऱ्यांच्या शस्त्राला बळी पडले. न्यायासनापुढें चवकशी न होतां मारेकऱ्यांच्या हातून राजपुरुषांचे वध झाले म्हणजे लोकांत मोठी खळबळ उडते. दुसऱ्या देशांचे राजे आणि त्यांचे बगलबच्चे यांचीं डोकीं संतापानें भणाणून जातात. मनुष्यवध जणूं काय त्यांच्या गांवींहि नव्हता, असा आव ते आणतात. आपण मनुष्यवधाला स्वतः उत्तेजन दिलें आहे, इतकेंच नव्हे तर त्यापासून आपला स्वतःचा फायदाहि आपण करून घेतला आहे, या गोष्टींची

आठवणहि त्यांस होत नाहीं. जे राजे मारेकऱ्यांच्या शस्त्राला बळी पडलेले असतात, ते स्वतः या पातकापासून मुक्त नसतात, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. स्वतःच्या देशांतील प्रजाजनांपैकीं कित्येकांचा वध त्यांनीं करविलेला असतो आणि परदेशाशीं युद्धें करून असंख्य जीवांचा बळी घेण्याच्या कटांत प्रामुख्यानें ते सामील झालेले असतात. त्यांतला अगदीं निरुपद्रवी राजा पाहिला, तरी त्याच्या खातींहि असले असंख्य वध जमा झालेले आढळतील. मग क्रूर आणि लोभी राजांची गोष्ट तर विचारावयासच नको.

जशासतसें, या जुन्या न्यायाचें उच्चाटण खिस्तानें आपल्या उपदेशांत केलें आहे; पण आमचे राजे आणि राजकारणी पुरुष खिस्ताचा उपदेश मानीत नाहींत; इतकेंच नव्हे तर जितक्यापुरता तितकाच प्रतिकार करून न थांबतां लाखों लोकांचा बळी अकारण घेत असतात. मग त्यांच्या याच न्यायाची अम्मलबजावणी स्वतः त्यांजवर झाली तर त्याबद्दल इतकें रागास येण्याचें कारण त्यांना नाहीं. मारेकरी फार झाल्यास एखाद्या राजाचा अथवा बादशहाचा खून करतो; पण याच राजानें अथवा बादशहानें हजारों लोकांचा वध करविलेला असतो. तेव्हां न्यायाच्या दृष्टीनें पाहतां अशा एखाद्या राजाचा अथवा बादशहाचा वध झाल्यास त्यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं. किंबहुना असे वध अत्यंत अल्प प्रमाणावर होतात, हेंच आश्चर्य आहे. मनुष्याच्या रक्तांच्या नद्या वाहविण्याचा धडा ज्या राजांनीं आपल्या प्रजेला स्वतःच घालून दिला, त्यांची विद्या वारंवार त्यांच्या मानेस बसत नाहीं, हेंच नवल आहे.

सामान्य जनतेचीं मनें इतकीं भारून गेलीं आहेत कीं, त्यांच्या डोळ्यासमोर चाललेल्या गोष्टींचा खरा अर्थहि त्यांस समजत नाहीं. आपलीं सैन्यें उत्तम रीतीनें तयार करून त्यांची निगा राजे, बादशहा आणि लोकसत्ताकांचे अध्यक्ष कशी राखीत असतात, हें प्रत्यक्ष सर्वांना दिसत असतें. सैन्यांच्या कवायती ते नित्य पहात असतात, आणि हा तमाशा पहात असतां त्याचें कौतुक करून लोक बढायाहि मारतात. शिपायांच्या अंगावरील झगझगीत पोषाखांचें कौतुक ते करतात; पण या पोषाखाच्या आंत निवळ मूर्खपणा भरला आहे, हें त्यांस समजत नाहीं. पडघमाच्या आणि

बिगुलाच्या नादाबरोबर यंत्राप्रमाणें हालचाल करणाऱ्या या शिपायांचें कौतुक त्यांना वाटतें. एका मनुष्याच्या हुकुमाच्या शब्दाबरोबर हजारों माणसें, एकाच वेळीं आणि एकच हालचाल करतांना पाहून लोक आश्चर्यचकित होतात. पण या साऱ्या हालचालीचा अर्थ काय, हें त्यांना समजत नाहीं. वस्तुतः या कवाइतीचा अर्थ अगदीं सोपा आणि स्पष्ट आहे. ती माणसें मारण्याची पूर्वतयारी आहे.

मनुष्यांना मारक यंत्रें बनविण्याकरतां त्यांना ही भूल देण्यांत येत असते आणि हे काम करणारे लोक राजे, बादशहा आणि अध्यक्ष हेच होत या गोष्टीचे ते मुख्य सूत्रचालक असून तिचा त्यांना मोठा अभिमान वाटतो. आणि तेच राजे व बादशहा मनुष्यवधाचे कट करण्यांत मुख्यतः गुंतलेले असून तो त्यांचा धंदाच होऊन बसलेला आहे. अंगावर लष्करी पोशाक चढवावे, कमरेला तरवारी लटकावाव्या आणि मनुष्यवधाचे कट करीत असावें, हाच त्यांचा मुख्य धंदा आहे. आणि या विद्येला त्यांच्यांतलाच एकादा बळी पडला म्हणजे ते भयचकित होतात आणि संतापानें त्यांचीं मस्तकें भणाणतात.

राजवध ही गोष्ट केव्हांहि झाली तरी भयंकरच आहे; पण ती दुष्टत्वाची आहे म्हणून भयंकर, असें मात्र नव्हे. वास्तविक पहातां या राजांनीं करविलेले मनुष्यवध काय कमी दुष्टपणाचे असतात? यांच्या हुकुमानें सेंट बार्थोलोम्युसारख्या कत्तली घडतात. बंड बंड म्हणून हजारों प्रजाजन यांच्या हुकुमानें तोफेच्या भक्षस्थानीं पडतात. एकांतवासाच्या शिक्षेंतील कित्येक कैदी फुकट मरून गेलेले असतात. कित्येकांना गळ्याला फांस लटकावून मारण्यांत आलेलें असतें. याशिवाय युद्धांत झालेली भयंकर प्राणहानि यांच्या हिशेबीं जमा असते, ती वेगळीच. अराजकांनीं केलेल्या खुनांहून हे खून खरोखर अधिक भयंकर आहेत. दुसरा आलेक्झांडर अथवा हंम्बर्ट राजा हे मृत्यूच्या शिक्षेला योग्य नव्हते असें मानले. बर प्लेव्हना येथें जे हजारों रशियन मृत्युमुखीं पडले, ते मरणाच्या शिक्षेला खचित कमी पात्र होते. असले खून खरोखरच अधिक भयंकर आहेत. ते केवळ रक्तपात म्हणूनच भयंकर असे नसून ज्यांच्याकडून ते करविले

जातात, त्यांच्या ठिकाणीं झालेल्या बुद्धिभ्रंशामुळें ते घडलेले असतात, हेंच अधिक भयंकर होय.

प्रजाजनांची अनंत दुःखें नित्य नजरेसमोर आल्यामुळें एकादा मनुष्य माथेफिरू बनतो आणि राजाचा वध करतो. आलेक्झांडर, कार्नो, अथवा हम्बर्ट हेंच प्रजेच्या दुःखाचे मूळ आहेत, असें त्याच्या मनानें घेतलेलें असतें. अथवा दुसरा एकादा माथेफिरू केवळ खाजगी द्वेषानें राजवधाचें भयंकर पातक करीत असतो. माथेफिरूचीं हीं कृत्यें नीतीला कितीहि सोडून असलीं तरी त्यांतील बुद्धिवाद अगम्य नाहीं. हीं कृत्यें त्यांनीं कां केलीं, हें प्रत्येकाला सहज समजतें. पण एकादी सबंध टोळीच्या टोळी अशीं कृत्यें करण्यास कशी उद्युक्त होते, याचें मात्र नवल वाटतें. अराजक पंथाचे लोक राजामागून राजांचा बळी घेण्याची तयारी करतात, तेव्हां त्यांचीं डोकीं ठिकाणावर तरी असतात कीं नाहीं, अशी शंका येते. शेकडों डोकीं एकत्र जमलीं असतां मनुष्यजातीच्या हालअपेष्टा टाळ-ण्यासाठीं राजवधावांचून दुसरा उपाय त्यांस सुचत नाहीं, हें मोठें नवल आहे. एका राजाचा वध केला तर त्याच्या जागीं दुसरा येऊन बसतो. गादीवरचें एक डोकें उडविलें तर तेथें दुसरें तावडतोब निर्माण होतें. अशा स्थितींत एकाद्या राजपुरुषाचा वध करण्याचा काय उपयोग ? एका-मागोमाग दुसरा गादीवर यावा अशी व्यवस्था राजघराण्यांनीं फार प्राचीन काळापासून पक्की करून ठेवली आहे. यांत्रिक तोफेंत जशा गोळ्या मागून गोळ्या येतात, त्याप्रमाणें राजामागून राजे गादीवर येत असतात. अशा स्थितींत त्यांपैकीं एकाद्याचा खून करण्यांत काय हंशील आहे ?

अशा खुनांनीं प्रजेचें हित होतें, असें केवळ स्थूल दृष्टीच्या माणसाला मात्र वाटतें. राजशासनाच्या शिरावर कोणी निकोलस, आलेक्झांडर, फ्रेड्रिक, नेपोलियन, ग्लाडस्टन अथवा म्याक्किनले असला, तरी प्रजेवरील जुलूम आणि वारंवार होणाऱ्या लढाया इत्यादि गोष्टींत खळ पडत नाहीं, हें इतिहास वाचणारांच्या ध्यानांत तावडतोब येईल. अशा गोष्टी कोण-त्याहि एकाच व्यक्तीमुळें घडून येत असतात असें नाहीं. कोणत्याहि राष्ट्राच्या आपत्तीचें मूळ कोणाहि एकाच व्यक्तीच्या ठिकाणीं सांपडावयाचें नाहीं.

त्या राष्ट्राच्या आपत्तीचें मूळ त्यांतील समाजघटनेंत असतें. हीं बंधनें अशा तऱ्हेनें जखडलेलीं असतात कीं, साऱ्या समाजाच्या शासनाची सत्ता कांहीं मूठभर व्यक्तींच्या अथवा एकाद्या व्यक्तीच्या हातांत एकवटून राहते. आपल्या हातीं कोट्यवधि लोकांचीं सुखदुःखें खेळत आहेत या अस्वाभाविक कल्पनेनें या सत्ताधीशांचीं मस्तकें कायमचीं विकृत झालेलीं असतात. त्यांच्या ठिकाणीं अहंभाव कमी अधिक प्रमाणानें कायमची वस्ती करून राहिलेला असतो. त्यांचा सारा आयुष्यक्रम सामान्य जनतेच्या नजरेसमोर उघड रीतीनें चालत नसल्यामुळें त्यांचा अहंकार लपून राहिलेला असतो, इतकेंच.

या सत्ताधीशांच्या सभोंवतीं नानाप्रकारच्या चैनींचें कोंडाळें त्यांच्या बाल्यदशेपासूनच पडलेलें असतें. थुंकीझेले लोक त्यांची खोटी नाटी स्तुति त्यांच्या लहानपणापासूनच करीत आलेले असतात, त्यांचें सारें शिक्षण आणि त्यांचा सारा आयुष्यक्रम एकाच हेतूभोंवतीं गोळा झालेला असतो. प्राचीन काळापासून मनुष्यवधाच्या किती पद्धती अस्तित्वांत होत्या, सांप्रत काळीं त्यांत किती वाढ झाली आहे, आणि भविष्यत काळीं त्यांत आणखी सुधारणा किती होतील, ह्याच हिशेब त्यांच्या कानावर सदोदित पडत असतो. अगदीं लहानपणापासून तों मरेंपर्यंत याशिवाय दुसरी गोष्ट त्यांच्या समोर यतच नाहीं. त्याच्या पोषाकांत तरवारी आणि खंजीर या वस्तु अवश्य असावयाच्या. नाना प्रकारच्या लष्करी पोषाकांनीं आपलें शरीर ते नित्य सजवीत असतात. सैन्याच्या पाहण्या, परेडी, आणि खोटीं युद्धें यांत त्यांचा सारा काळ जात असतो. हे राजपुरुष परस्परांच्या भेटीस गेले, म्हणजे परस्परांच्या सैन्यांतील हुद्दे परस्परांस मोठ्या इतमामानें अर्पण करतात. या साऱ्याचा अंतिम परिणाम काय होईल, हें त्यांच्या लक्षांत कोणीहि आणून दिलेलें नसतें. हीं सारीं भावी रक्तपाताची तयारी आहे आणि रक्तपात हें मोठें पातक आहे, असें कोणी त्यांस शिकविलेलें नसतें, इतकेंच नव्हे तर या गोष्टी करण्यांत त्यांची चपळता जितकी अधिक तितकाच त्यांच्या भोंवतालच्या परिवाराचा उत्साहहि अधिक होत असतो. अशा गोष्टी करण्याबद्दल त्यांजवर स्तुतीचा वर्षाव

चोहोंकडून होत असतो. ते कवाइतीच्या मैदानावर जाऊं लागले, म्हणजे हजारों लोकांचा घोळका टाळ्या पिटीत त्यांच्या मागें धांवत सुटतो. अशा स्थितींत आपल्या कृत्याला साऱ्या राष्ट्राची पसंती आहे, असें साहजिकपणें त्यांना वाटूं लागतें. त्यांच्या हातीं जीं वर्तमानपत्रें जातात, त्यांचीहि गत हीच आहे. त्यांनीं एकादें कितीहि मूर्खपणाचें अथवा क्रूरतेचें कृत्य केलें तरी त्यांचीं स्तोत्रें ज्यांत असतील तेवढींच पत्रें त्यांच्या हातीं जातात आणि हींच पत्रें लोकमताचीं खरीं निदर्शक आहेत. असा त्यांचा समज असतो.

त्यांच्या आजूबाजूंचीं माणसें कोणत्याहि दर्जाचीं अथवा कोणताहि धंदा करणारीं असलीं, तरी यजमानाची अवास्तव स्तुति करण्यांत तीं परस्परांशीं स्पर्धा करीत असतात. या माणसांना खऱ्या माणुसकीची चाड फारशी नसून आपली स्तुति यजमानाला अधिक प्रिय कशी होईल, याच गोष्टीचा विचार तीं करीत असतात. सामान्य भटेंभिक्षुकें आणि जाडे शास्त्रीपंडित, सामान्य हुजरे आणि मोठे खानदानीचे सरदार हे सारे या बाबींत एकाच माळेचे मणि असतात. यजमान म्हणेल त्याला होय म्हणावें इतकेंच आपलें काम आहे, असें त्यांस वाटतें. वस्तुस्थिति यजमानापासून लपवून ठेवण्याचा उद्योग हे लोक सदोदित करीत असल्यामुळें मानवी जीवनाची खरी स्थिति या यजमानाला समजणें अशक्य होतें. असा राजपुरुष पूर्ण शंभर वर्षें जगला तरी वस्तुस्थितीची कल्पना त्याला होत नाहीं. त्याला खरा निस्पृह आणि नितांत सत्यवादी मनुष्य बहुधा कधींच भेटत नाहीं. राजे लोकांचे विचार आणि त्यांचीं कृत्यें आपल्या कानावर आलीं म्हणजे आपणांपैकीं पुष्कळांस नवल वाटतें; पण त्यांच्या एकंदर परिस्थितीचा विचार आपण केला म्हणजे असें नवल वाटण्याचें कांहीं कारण नाहीं, असें आपल्या ध्यानीं येईल. यांच्या जागीं दुसरा कोणीहि असता, तरी त्यांच्या हातून तशींच कृत्यें घडलीं असतीं. त्यांच्या जागीं एकाद्या सुबुद्ध मनुष्याची योजना आपण केली, तर स्वतःच्या सुबुद्धीला अनुसरून एकच गोष्ट त्याला करतां येईल. या जागेचा त्याग करणें ही एकच चांगली गोष्ट त्याला करतां येण्यासारखी आहे. तेथें रहावयाचें

म्हटलें, तर त्या जागेची परंपरा मोडणें त्याला शक्य नाहीं.

अहंकारानें पूर्ण भरलेला असा जर्मनीचा एकादा वुइलियम उद्यां कितीहि मूर्खपणाचें बोलला, तरी त्याच्या शब्दाला मान तुकविणारे लोक आणि त्याच्या शब्दाची स्तुति करणारीं वर्तमानपत्रें जोंपर्यंत साऱ्या जगभर आढळून येतात, तोंपर्यंत आपले शब्द वेडगळ होते, ही गोष्ट त्याच्या ध्यानीं कशानें येणार ? असा राजा कितीहि कोत्या बुद्धीचा, अशिक्षित, अहंकारानें भरलेला, मूर्ख अथवा दुष्ट असला, तरी त्याचा शब्द झेलणारे लोक जोंपर्यंत असंख्य आढळत आहेत, तोंपर्यंत त्याचें डोकें मदानें धुंद रहावें, हें अगदीं साहजिक आहे. त्यानें कितीहि मूर्खपणाचें भाषण केलें तरी जणूं काय एकादा अजब शोध लागल्यासारखी स्तुति सारीं वर्तमानपत्रें करीत सुटतात. आपल्या हुकुमाच्या शब्दाबरोबर सैनिकांनीं स्वतःच्या आईबापांवरहि बंदुका झाडाव्या, असें त्यानें म्हटलें कीं, " बादशहाचा त्रिवार जयजयकार " अशा आरोळ्या लोक मारीत सुटतात. ख्रिस्ताच्या शुभवर्तमानाचा प्रसार तरवारीच्या धारेनें केला पाहिजे, असें त्यानें म्हटलें कीं ' बादशहाचा त्रिवार जयजयकार. ' चिनांत लढाई करतांना कोणालाहि कैद न करतां एकदम त्याला यमसदनास पाठवा, असे शब्द त्यानें उच्चारले तरी ' बादशहाचा त्रिवार जयजयकार ' असे शब्द उच्चारणाऱ्या मनुष्याला वास्तविक पाहतां वेड्याच्या दवाखान्यांतच पाठवावयास पाहिजे, पण तें न करतां लोक उलट त्याचा जयजयकार करतात. दुसऱ्या निकोलस बादशहाकडे कांहीं वयोवृद्ध आणि ज्ञानवृद्ध माणसें त्याचें अभिनंदन करण्याकरतां गेलीं. बादशहा गादीवर आले; तेव्हां लोकांनीं कांहीं देणगी म्हणून कांहीं हक्क द्यावेत, अशी मागणी या पूज्य वृद्धांनीं केलीं; आणि बादशहानें ' मूर्खपणाचीं स्वप्नें ' या उत्तरानें त्यांची बोळवण केली. बादशहाच्या या उत्तराची तारीफ साऱ्या पत्रांनीं केली. आणि त्यानंतर त्याच्या दर्शनाला जे जे गेले, ते सारे एकजात स्तुतिपाठक होते. कितीहि मूर्खपणाचें अथवा जगभर शांतता स्थापण्याचें दांभिकपणाचें कार्य त्यांनीं योजिलें तर त्याचे सद्गुण आणि त्याचें शहाणपण यांजबद्दलच्या स्तुतीला पारावार उरत नाहीं. फिनलंडसारख्या एकाद्या सबंध राष्ट्रावर

मन मानेल तसा जुलूम करून तो अदयपणें त्याचा अपमान करीत असतो. आणि असें करण्याचें त्याला कांहीं कारणहि नसतें. तथापि या त्याच्या कृत्याबद्दलहि लोक त्याची स्तुतीच करीत असतात. चिनाशीं युद्ध करून मनुष्यवधाची तयारी तो करीत असतो आणि तोंडानें शांततेच्या गोष्टी बोलत असतो; पण हा विरोध लक्षांत न घेतां एका बाजूनें विजयी वीर म्हणून आणि दुसऱ्या बाजूनें शांतताप्रस्थापक म्हणून लोक त्याची स्तुति करतात. या लोकांच्या डोक्यांत खरोखर काय चाललेलें असतें, हें समजणें दुरापास्त आहे.

मनुष्यहत्येचे जें पातक जगांत चालू आहे, त्याचे पातक वास्तविक पाहतां आलेक्झांडर, हंम्बर्ट, वुइलियम, निकोलस किंवा चेंबरलेन यांच्या पदरीं पडत नसून त्याचा वांटा त्यांच्या भोंवतालच्या मंडळीच्या पदरांत मुख्यत्वानें घातला पाहिजे. कोट्यावधि लोकांच्या शिरावर यांची प्रस्थापना ज्यांनीं केली आणि त्या जागीं ते कायम रहावेत म्हणून त्यांना जे मदत करीत असतात, तेच या दोषाचे खरे अधिकारी होत. याकरतां लोक-कल्याणाचा खरा मार्ग आलेक्झांडर, निकोलस किंवा वुइलियम यांना मारणें हा नव्हे. कार्य साधावयाचें म्हणजे ज्या समाजरचनेंतून हे वुइलियम आणि निकोलस निर्माण होऊं शकतात, ती रचनाच बदलली पाहिजे. ही रचना कायम राखण्याच्या कामीं कोणीहि सहाय्य होऊं नये, हाच खरा मार्ग होय. या समाजरचनेचे मुख्य पुरस्कर्ते म्हटले म्हणजे थोड्याशा ऐहिक लाभा-करतां आपलें स्वातंत्र्य आणि आपली माणुसकी विकणारे लोक हे होत. यांतील बहुतेक लोक शुद्ध स्वार्थसाधू असतात, आणि बाकीचे अज्ञ असतात.

जनसमूहाच्या अगदीं तळाशीं जे लोक असतात, त्यांचीं डोकीं अंशतः खोट्या देशाभिमानानें भारलेलीं असतात. खोट्या धर्माभिमानाच्या शिक्ष-णाचीहि भर त्यांत पडलेली असते. याशिवाय थोड्या बहुत स्वार्थानेंहि ते आंधळे बनलेले असतात. यामुळें आपल्यावरील वरिष्ठ लोकांना आपल्या माणुसकीचा अभिमान ते विकीत असतात. हाच मार्ग त्यांचे वरिष्ठहि पत्करीत असतात. अशा रीतीनें समाजाच्या अगदीं वरच्या शिखरापर्यंत हा

गुलामगिरीचा प्रकार सर्रास चालू असतो. समाजरचनेच्या अगदीं उच्चतम शिखरावर ज्या व्यक्ति असतात, त्यांना दुसऱ्या कोणापासून द्रव्य दृष्ट्या कांहीं स्वार्थ साधावयाचा असतो, असें नाहीं; तथापि मनुष्य स्वभावाला सुलभ अशी अहंमन्यता आणि सत्तेची लालसा यांचा वास त्यांच्या ठिकाणीं पूर्णपणें असतो. आपली वडेजाव व्हावी, आणि सारी सत्ता आपल्या हातीं रहावी, एवढ्याच हेतूनें त्यांचीं कामें चालत असतात. दुसऱ्या लक्षावधि जीवांचें जीवित अथवा मरण यांच्या हातीं असतें, आणि एवढ्या प्रचंड सत्तेमुळें त्यांची बुद्धि विकृत होऊन बरें वाईट जाणण्याची अक्कल त्याच्यापाशीं राहिलेली नसते. आजुबाजूच्या थुंकीझेल्यांच्या खोट्या स्तुतीची यांतच आणखी भर पडते. अशा परिस्थितींत अखेरीस त्यांची बुद्धि इतकी तमोगुणी बनते कीं, त्यांच्या हातून प्रत्यहीं दुष्कृत्यें घडत असतांहि मनुष्यजातीचे आपण कल्याणकर्ते आहों असें त्यांस वाटत असतें.

स्वतःच्या थोडया बहुत स्वार्थाकरतां जे लोक आपली माणुसकीहि विकण्यास तयार होतात, तेच असलीं माणसें निर्माण करण्यास प्रथम कारणीभूत होत असतात. इतक्या तमोगुणी अधिष्ठात्री देवतांचें आद्य जनकत्व या थुंकीझेल्याकडे असतें. याकरतां समाजाच्या शिखरावर अधिष्ठान पावलेल्या व्यक्तीवर रागावण्याचें अथवा त्याजबद्दल द्वेषबुद्धि बाळगण्याचें यत्किंतहि कारण आपणास नाहीं. त्यांच्या दुष्कृत्यांचें मूळ खुद्द त्यांजपाशीं नसतें. जीं मूर्खपणाचीं अथवा दुष्टत्वाचीं कृत्यें ते करतात, तीं करण्यावांचून त्यांस गत्यंतरच उरलेलें नसतें. त्यांजवर हत्यार धरणें म्हणजे फाजील लाडानें आपणच बिघडविलेल्या मुलाला आपणच झोडपीत सुटण्यासारखें आहे.

कोणत्याहि राष्ट्रांत प्रजेवर जुलूम होऊं नये, परस्परांनीं परस्परांशीं निरर्थक युध्दें करूं नयेत आणि सर्वांनींच गुण्यागोविंदानें रहावें, ही गोष्ट सर्वांनाच इष्ट वाटते; पण ती साधण्यास उपाय काय? उपाय अगदीं लहानसा आणि सोपा आहे. तो हाच कीं, चालू परिस्थितीचें वस्तुस्वरूप सर्वांच्या ध्यानीं आलें पाहिजे. लष्कर तयार करणें म्हणजे लक्षावधि खुनी

माणसें निर्माण करणें आहे, हें सर्वांच्या ध्यानीं आलें पाहिजे. राजे; बादशहा अथवा अध्यक्ष हाच उद्योग प्रामुख्यानें करीत असतात. आणि यांत रक्तपाताशिवाय त्यांचा दुसरा कोणताहि हेतु नसतो, हें सर्वांना स्पष्ट समजलें पाहिजे.

सैन्यें तयार करणें आणि तीं सर्वतोपरी आपल्या हातीं ठेवणें ही गोष्ट मोठ्या मानाची नसून ती जरूरीचीहि नाहीं; इतकेंच नव्हे तर ती दुष्टत्वाची आणि निर्लज्जत्वाची आहे, हें राजे लोकांच्या आणि इतर सर्वांच्या ध्यानीं आलें पाहिजे. राजाचा कर भरणाऱ्या प्रत्येक इसमाच्या ध्यानीं ही गोष्ट आली पाहिजे. आपण कराचा जो पैसा देतो त्याचा उपयोग अखेरीस रक्ताच्या नद्या वाहण्यांत होतो, हें प्रत्येकाला समजलें पाहिजे. ही गोष्ट कानाडोळा करण्यासारखी नाहीं, हें प्रत्येकानें जाणलें पाहिजे. सैन्य तयार करण्यासाठीं पैसा देणें आणि सैन्यांत नोकरी करणें हीं कृत्यें उपेक्षणीय नसून तीं अत्यंत दुष्टपणाचीं आहेत, हें प्रत्येकाला कळलें पाहिजे. या गोष्टीची उपेक्षा केल्यानें राजांनीं केलेल्या मनुष्यवधाच्या पातकांत परंपरेनें नव्हे तर आपण प्रत्यक्ष भागीदार होतो, हें प्रत्येकाला समजलें पाहिजे. असें झालें म्हणजे राजे, बादशाहा अथवा अध्यक्ष यांच्या हातीं सत्तेचें जें केंद्रीकरण झालें आहे तिचा प्रवाह उगमाशींच बंद पडेल. मग या राजांचे खून करण्याचें कारणहि समूळ नष्ट होईल.

या कामीं लोकांच्या समजुतीच बदलल्या पाहिजेत. खरे अपराधी हे राजे अथवा अध्यक्ष नसून याचें सारें मूळ आपणापाशींच आहे, हें त्यांच्या लक्षांत आणून दिलें पाहिजे. आपण सरकारला दिलेल्या पैशाचा उपयोग कसा होतो हें पाहण्यास लोकांस शिकविलें पाहिजे, एवढेंच नव्हे, तर सैन्यांत भरती होणारा प्रत्येक इसम मनुष्यवधाचें पातक प्रत्यक्षपणें करतो, हें त्यांच्या लक्षांत आणून दिलें पाहिजे. राजांच्या आणि बादशहांच्या नुसत्या हुकुमाच्या शब्दावरून मनुष्यवधाच्या घोर पातकास प्रवृत्त होण्याचें सर्वांनीं नाकारलें पाहिजे.

ही वस्तुस्थिति पुष्कळांच्या लक्षांत आली असतांहि सामान्य जनता या सुधारणास अनुकूल होत नाहीं, याचें कारण हेंच कीं, तिचीं मनें सर-

कारी मंत्रानें अद्यापि भारलेलीं आहेत. याकरतां प्रत्येक समाजहितेच्छूनें लोकांच्या मनावरील हें दडपण दूर करण्याचा यत्न करणें अवश्य आहे. राजांचा अथवा बादशहांचा खून करण्यास कोणीहि कोणास प्रवृत्त करूं नये. कारण असे खून झाल्यानें काडीचाहि फायदा न होतां लोकांच्या मनावरील सरकारी जादूची छाया अधिक दाट मात्र होते. लोकांत योग्य जागृति उत्पन्न करून त्यांच्या लक्षांत वस्तुस्थिति आणून देणें, हेंच खऱ्या लोकाग्रणींचें कर्तव्य आहे.

---

## अर्वाचीन शास्त्र.

( एडवर्ड कारपेंटर निबंधाच्या रशियन भाषांतरासाठीं लिहिलेली प्रस्तावना. )

अर्वाचीन शास्त्रांवरील कारपेंटरचा हा निबंध आमच्या रशियन समा- जाला तरी माझ्या मतें फारच उपयोगी होण्यासारखा आहे. मानवी कल्याणाला खरा धर्म आणि नीति यांच्या ज्ञानाचा प्रसार फारसा आव- श्यक नाहीं, या मताचा प्रसार रशियांत जितका झाला आहे, तितका युरोपांतील इतर देशांत तो झालेला नाहीं. यापेक्षां अर्वाचीन शास्त्रांचा अभ्यास जितक्या विस्तृत प्रमाणानें होईल, तितका तो अधिक लोक- कल्याणकारी होईल, असें रशियन पंडितांचें ठाम मत बनलेलें आहे. मनुष्याच्या मानसिक गरजा भागविण्याचें सामर्थ्य अर्वाचीन शास्त्रांत जितकें आहे, तितकें धर्मतत्त्वांत अथवा नीतिशास्त्रांत तें नाहीं, असें त्यांना निश्च- यानें वाटतें. प्राचीन काळीं धर्मशास्त्र हें जसें एक प्रकारचें खूळ होऊन बसलें होतें, तसेंच अर्वाचीन शास्त्रें हेंहि रशियन सुशिक्षितांत खूळच होऊन बसलें आहे.

धर्मवेडानें प्राचीन काळीं मनुष्यजातीवर अनेक अनर्थ ओढवले, हें सर्वश्रुतच आहे; पण त्याचप्रमाणें अर्वाचीन शास्त्रें हेंहि जर एक खूळच

होऊन बसलें तर मानवी समाजाच्या नीतिमत्तेवर त्याचा परिणाम पूर्वी-इतकाच वाईट होईल, हें उघड आहे. याकरतां अर्वाचीन शास्त्रांच्या तत्वांची छाननी सूक्ष्मदृष्टीनें ज्यांत केली असेल, असे लेख समाजाला आणि त्यांतून विशेषत: रशियन समाजाला फार उपयुक्त होतील.

रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, जोतिष, समाजशास्त्र, वगैरे अनेक प्रकारच्या अर्वाचीन शास्त्रांच्या अभ्यासानें वस्तुस्थितीचें ज्ञान आपणास होत नाहीं असें कार्पेंटरचें म्हणणें आहे. या शास्त्रांनीं जे सार्वत्रिक नियम म्हणून शोधून काढले आहेत, ते त्या शास्त्रांचे केवळ सामान्य सृष्टिनिरुपण मात्र आहे. हे सारे नियम वास्तविक निश्चित स्वरूपाचे आहेत, असें नसून त्यांचें स्वरूप अर्धबोबडें निश्चित मात्र आहे. त्यांतूनहि या शास्त्रांनीं आपापल्या विषयांचा अभ्यास सामग्रयानें केला आहे, असें नाहीं. या विषयांच्या कांहीं बाजू अशोधित राहिल्या आहेत, हें वेगळेंच. या अशोधित भागांचें यत्किंचितहि ज्ञान आपणास नाहीं. अशा स्थितींत संशोधित भागांतील तत्वांचा निश्चितपणा तरी कितपत खरा मानावा, असा प्रश्न कारपेंटर यास पडला आहे. यांत याशिवाय आणखीहि एक अडचण आहे. यांतील कित्येक शास्त्रें आपल्या मानवी दृष्टीच्या कक्षेबाहेर किती तरी अंतरावर वावरत असतात. यांनीं सांगितलेल्या नियमांची सिद्धि कित्येकवेळां दीर्घकालांतरानें आणि दीर्घ अंतरावर कसोटीसे लागावयाची असते. अशा स्थितींत त्या काळीं आणि त्या अंतरावर हे नियम अबाधित ठरतील असें आपण आजच मानावें कीं नाहीं अशी शंका कारपेंटर यास येते.

मनुष्याच्या चालू जीवितांत ज्या घटना प्रत्यहीं घडत असतात, आणि त्याच्या अनुभवाला पदोपदीं येत असतात, त्यांचें स्पष्टीकरण अधिक दूर अंतरावर आणि कालांतरानें घडणाऱ्या घटनांच्या सहाय्यानें अलीकडचें शास्त्र करूं पहात असतें. ही पद्धत मुळांतच चुकीची असून तीमुळें आपल्या इष्ट फलाची प्राप्ति आपणास होणार नाहीं, असें कारपेंटर यांचें म्हणणें आहे.

अर्वाचीन काळच्या नीतिशास्त्राचा हेतु पहिला तर नीतीची निरपेक्ष श्रेष्ठता ठरविण्याकडे नसून नीतितत्वांचा उपयोग व्यवहारांत किती होईल हें पाहण्याकडे असतो, असें आपणास दिसून येईल. अर्थशास्त्राचीहि

दशा अशीच आहे. मनुष्यामनुष्यांतील परस्पर न्याय, प्रेमबुद्धि, औदार्य, दानशीलता इत्यादि गुणांचा विचार हें शास्त्र करीत नसून मनुष्याच्या शुद्ध स्वार्थबुद्धीचा विचार करून तिला पोषक अशीं तत्वें शोधून काढण्याकडे त्याचा कल आहे. वनस्पतिशास्त्र अथवा प्राणीशास्त्र यांची दिशा पाहिली, तर या प्रत्येकांतील व्यक्तिविशिष्टत्व शोधून काढण्याचा यत्न तीं करीत असून त्यांतील शुद्ध जडभागाचा विचार मात्र तीं करीत असतात, असें आढळून येईल. आणि या सर्व यत्नांची अखेर पदार्थांतील जड परमाणूंचें संघटण कसें होतें इतकेंच दाखविण्यांत होतें. एकंदरींत सृष्टींतील सूक्ष्म तत्वांचा विचार करण्याची इच्छा या शास्त्रशोधकांत दिसत नसून केवळ हिणकस दर्जाची आणि मानवी जीविताला निरुपयोगी अशीं तत्वें शोधून काढण्यांतच ते आपला जन्म घालवितात, असें कारपेंटर म्हणतो.

अशा रीतीनें जडवस्तूंचा शोध करतां करतां मनुष्याच्या आध्यात्म बुद्धीला पोषक अशा तत्वांचा शोध अखेरीस लागण्याचा संभव आहे, असें या शोधकांचें म्हणणें आहे; पण जो मार्ग त्यांनीं आजपर्यंत स्वीकारला आहे, त्यावरून पाहतां या शोधाची अखेर हिणकस व मानवी जीविताला निरुपयोगी अशीं तत्वें सांपडण्यांतच झाला असून अत्यंत महत्वाचे प्रश्न त्यांच्या कक्षेंतून सर्वथैव सुटले आहेत, असें आपणास आढळून येईल. या बाजूकडे हीं शास्त्रें केव्हांहि वळलेलीं नाहींत. मानवी जीविताच्या आध्यात्मिक बाजूशीं आपला संबंध त्यांनीं केव्हांहि येऊं दिला नाहीं.

एकाद्या वस्तूच्या अंतरबाह्य स्वरूपाचें आमूलाग्र निरीक्षण करण्याची कोणाची इच्छा असली, तर तो पदार्थ हातीं घेऊन त्याचा अभ्यास सर्व बाजूंनीं त्यानें केला पाहिजे, हें उघड आहे; पण असें करण्याऐवजीं त्या पासून जर तो अधिकाधिक लांब लांब जाऊं लागला तर काय गत होईल ? शेवटीं तो इतक्या अंतरावर पोहोंचेल कीं, तेथून त्या पदार्थाचा रंग, त्याचें आकारमान, त्याजवरील खांचखळगे इत्यादि विशेष गुणधर्म त्याच्या दृष्टीपथाबाहेर जाऊन त्याच्या सामान्य रूपरेखेची छाया मात्र दृष्टीच्या क्षितीजावर त्याला दिसूं लागेल. येथून त्या पदार्थाचें वर्णन जर तो लिहूं लागला. तर त्याच्या खरेपणावर कितीसा भरंवसा आपणास ठेवतां येईल ? आपलें

वर्णन वस्तुस्थितीला धरून आहे, असा भ्रम त्या निरीक्षकाला होऊन त्याच्या भरांत कितीहि मनःपूर्वकपणें आणि अट्टहासानें आपल्या निरीक्षणाची सत्यता तो निरूपण करूं लागला तरी त्यांत खरोखर सत्याचा कितीसा अंश असेल, याची शंकाच आहे. अर्वाचीन शास्त्र संशोधकाची गत अशीच झाली आहे, असें कारपेंटर याचें म्हणणें आहे. मनुष्याच्या स्वार्थबुद्धीला पोषक असें कांहीं सामान्य नियम त्यांनीं शोधून काढलें असून वस्तुस्थितीचें खरें अविष्करण या शास्त्रांनीं केलेलें नाहीं, असें कारपेंटर म्हणतो. ज्या मार्गाचा अवलंब या शास्त्रशोधकांनीं आजवर केला आहे, त्यानें अधिक उच्च फळाची प्राप्ति मनुष्यजातीस होण्याचा संभव नाहीं, असें कारपेंटर यानें दाखविलें आहे. मनुष्याच्या उच्चतर जीवनाला अत्यंत आवश्यक अशा तत्वांचा शोध अर्वाचीन शास्त्रें आपल्या प्रयोगांनीं लावूं शकतील कीं नाहीं, हा प्रश्न क्षणभर बाजूस ठेवला तरी चालू जिविताशीं निकट संबंध असलेल्या गोष्टींचा उलगडा करण्याकरतां जो मार्ग हीं शास्त्रें स्वीकारतात, त्यांत परस्परविरोधी वस्तूंचा भरणा इतका आहे कीं, त्याबद्दल कोणालाहि आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं.

जगावें हा प्रत्येक मनुष्याचा हेतु असतो. किंबहुना जीवनाशा हाच त्याचा अंतिम हेतु असतो आणि जगावें कसें, या प्रश्नाचें उत्तर शोधण्याकरतां प्रत्येक प्राणि धरपड करीत असतो. हें उत्तर आजपर्यंत कशा तरी रीतीनें तो मिळवीत आला आहे. हें उत्तर चुकीचें असेल अथवा बरोबर असेल; पण त्याच्या आधारानें आजपर्यंत तो जगत आला आहे, आणि सुधारतहि आला आहे, हें खोटें नाहीं. मनुष्यानें कसें जगावें हा प्रश्न अनादि काळापासून शास्त्रीय स्वरूपाचा मानण्यांत आला आहे. किंबहुना साऱ्याशास्त्रांचें साररूपशास्त्र हेंच आहे, असेंहि म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. प्रोझेस, सोलन, कन्फ्युशस, इत्यादि तत्त्ववेत्यांच्या काळापासून तों आजपर्यंतच्या पंडितांपर्यंत या प्रश्नाला अत्यंत महत्त्व मानण्यांत आलें आहे; पण आमच्या भौतिक शास्त्र वेत्त्यांची गोष्टच वेगळी. पूर्वींचे सारे समज त्यांनीं आतां चुकीचे ठरविले आहेत. पूर्वींच्या तत्त्ववेत्यांनीं या प्रश्नाला दिलेलें महत्त्व त्यांच्या दृष्टीनें अस्थानीं दिसूं लागलें आहे. हा प्रश्न त्यांच्या

दृष्टीनें अशास्त्रीय असून गणितशास्त्रापासून तों समाजशास्त्रापर्यंतचीं अर्वाचिन भौतिक शास्त्रें मात्र त्यांना खरीं महत्त्वाचीं वाटतात. अशा स्थितींत प्राचीन आणि अर्वाचीन या दोन पक्षांत विलक्षण गैरसमज माजतात यांत नवल नाहीं.

लोकांच्या मेहनतीच्या पैशावर स्वतःचें उदरंभरण करून शास्त्रीय शोध लावण्यांत हे पंडित आपला काळ कंठित असतात. स्वतःच्या चरितार्थासाठीं हे स्वतः अंगमेहनत करीत नाहींत. त्याअर्थीं ज्या लोकांच्या मदतीनें हे जगतात, त्यांच्या उपयोगी पडतील अशीं कांहीं शास्त्रीय तत्त्वें त्यांनीं शोधून काढणें उचित आहे, असें कोणी म्हटलें, तर तें वावगें होणार नाहीं. मानवी जीविताच्या आत्यंतिक कल्याणाला पोषक असें कांहीं तरी कार्य या लोकांनीं केलें पाहिजे. ज्यावर मनुष्याचें पारमार्थिक जीवन अवलंबून आहे, तें तत्त्व त्यांनीं शोधलें पाहिजे. कोणत्या रीतीनें वागलें असतां मानवी जीवित सुखमय होईल, हें त्यांनीं दाखविलें पाहिजे. मनुष्यानें आपल्या कुटुंबियाशीं, आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं आणि परकियांशीं कसें वागावें, स्वतःच्या नानाविध वृत्तींस आळा कसा घालावा, कोणत्या गोष्टी त्याज्य आणि कोणत्या ग्राह्य आहेत, इत्यादि विषयांची चर्चा या शास्त्रांनीं अधिकारपूर्वक केली पाहिजे, असें कोणी म्हटलें तर तें अयोग्य होणार नाहीं. पण अशा विषयांची चर्चा हीं शास्त्रें कधींतरी करीत असतात काय !

पृथ्वीपासून सूर्य किती कोट मैल दूर आहे, याची मोजदाद हीं शास्त्रें मोठ्या डौलानें सांगतात. प्रकाशकिरणांच्या गतीचा वेग तीं निश्चित करीत असतात. प्रकाशकिरणांचे स्पंद दर पळाला किती होतात, याचा हिशेब तीं सांगतात. आकाशगंगा कशाची बनली आहे आणि तींत रासायनीक पदार्थ कोणते आहेत, याचें पृथ्थकरण तीं सांगतात. आज अमुक नव्या तत्त्वाचा शोध लागला, असा ढोल तीं वाजवितात.

यावर साधाभोळा व्यवहारी मनुष्य म्हणतो; माझ्या चालू व्यवहाराशीं तुमच्या या ज्ञानाचा काय संबंध आहे ? इतक्या माहितींपैकीं एकीचाहि उपयोग मला नाहीं. व्यवहारांत मीं कसें वागावें हें तुम्ही मला सांगा. शास्त्र उत्तर देतें; तुला काय हवें आहे, हें पाहण्याचें आमचें काम नाहीं.

तुझ्या असल्या प्रश्नांचीं उत्तरें समाजशास्त्र तुला सांगेल; पण त्या शास्त्राचा विचार करण्यापूर्वीं प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, इंद्रियविज्ञान इत्यादि शास्त्रांचा विचार आम्हास आधीं करावयाला पाहिजे. आणि यांतील गुंतागुंत सोडविण्याकरितां पदार्थविज्ञानशास्त्र आधीं पूर्णतेस आणलें पाहिजे. मग रसायनशास्त्र हवेंच. त्यांतील सूक्ष्मातिसूक्ष्म परमाणूंचा आकार निश्चित झाला पाहिजे.

ज्या लोकांचा सारा जन्म दुसऱ्यांच्या मेहनतीचीं फळें खाण्यांत जातो त्यांचें समाधान असल्या उत्तरानें ताबडतोब होतें. व्यवहारचक्राच्या तडाक्यांतून हे लोक मुक्त असल्यामुळें स्वस्थ बसण्यांत त्यांचे कांहीं वेंचत नसतें. तेव्हां या शास्त्रांच्या उत्तराची मार्गप्रतिक्षा करीत बसण्यांत सारा जन्म गेला, तरी त्या गोष्टीला त्यांची तयारी असते; पण या फुकटखाऊंचें ओझें ज्यांना वाहवें लागतें, त्यांचें समाधान असल्या उत्तरानें कसें होणार ? आणि हा भारवाहकांचा वर्ग म्हटला, म्हणजे त्यांत बहुधा साऱ्याच मानवजातीचा समावेश होतो. शास्त्रांचे हे शोध संपून इच्छित वस्तु प्राप्त होण्याला जो दीर्घ काळ लागणार, तेथपर्यंत वाट पाहण्याची फुरसत त्यांना नसते. पिढ्यावर पिढ्या लोटल्या तरी शास्त्रांचे हे शोध संपत नाहींत. मानवी जीवित क्षणभंगुर आहे, ही जाणीव आम्हा व्यवहारी माणसांना कधींच सोडीत नाहीं. यमाचें बोलावणें उद्यांसुद्धां येईल, असें आम्हास नित्य वाटत असतें. अशा स्थितींत या क्षणभंगुर आयुष्याचा सद्व्यय आम्हास कसा करता येईल, असा प्रश्न या शास्त्रांना आम्ही विचारतों.

शास्त्रें उत्तर देतात; तुम्ही किती मूर्ख आणि अशिक्षित लोक आहां ! शास्त्रांचा शोध म्हणजे, संसारोपयोगी चीज नव्हे, हें तुम्हास कसें समजत नाहीं ? शास्त्र शास्त्रासाठींच निर्माण झालें आहे. त्याचा आरंभ तत्त्वशोधनांत आणि अंतहि तत्त्वशोधनांतच. त्याजपुढें आलेल्या प्रत्येक वस्तूचा विचार तात्त्विकदृष्टया करावयाचा हेंच त्याचें काम. आपणासमोर आलेल्या वस्तुभांडारांतून तुमच्या उपयोगी पडणारी वस्तु शोधून काढावयाची आणि तिचा विचार करावयाचा, ही त्याची प्रकृतीच नाहीं. अशी निवडानिवड न करणें, हाच शास्त्रांचा जन्मजात स्वभाव आहे.

अर्वाचीन शास्त्रांच्या या जन्मजात प्रकृतीची ओळख अर्वाचीन पंडितांस पूर्ण पटली असावी, असें त्यांच्या वागणुकीवरून दिसतें. मनुष्याच्या उच्च जीवनाशीं अत्यंत संलग्न आणि त्याला अत्यंत महत्त्वाच्या अशा वस्तु बाजूस सारून क्षुल्लक बाबीचा विचार करण्यांत आपलें सारें आयुष्य ते खर्च करीत असतात. यांत कोणाचा दोष असेल, तर तो आपला नसून या शास्त्रांच्या जन्मजात प्रकृतीचा आहे, अशी त्यांच्या चित्ताची बालंबाल खात्री पटली आहे. पण व्यवहारी माणसाच्या दृष्टीनें मात्र ही स्थिति उलट दिसते. हा दोष शास्त्रांचा नसून त्यांना हातीं घेणाऱ्या पंडितांचा आहे, असें आम्हा व्यवहारी माणसांस वाटतें.

शास्त्र प्रत्येक वस्तूचा अभ्यास करतें असें हे पंडित म्हणतात; पण त्यांचा हा प्रयत्न आकाशाला गवसणी घालण्यासारखाच वाटतो. जगांतील अखिल वस्तुजाताचा अभ्यास करणें सर्वथा अशक्य आहे. दिव्याचें तोंड ज्या बाजूला असतें तेवढाच भाग तो प्रकाशित करीत असतो, त्याचप्रमाणें हीं शास्त्रें ज्या ज्या विशिष्ट वस्तूचा विचार करीत असतात, तेवढ्यापुरतेंच त्यांचें लक्ष वेधलेलें असतें. दिव्याच्या अगदीं सान्निध्यांत जो पदार्थ असतो, त्याजवर त्याचा प्रकाश उज्वल पडतो आणि हें अंतर जों जों वाढत जातें, तों तों प्रकशाहि मंद होत जाऊन अखेरीस कांहीं वस्तु अशा उरतात कीं, त्यांवर तो मुळींच पोहोंचूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें आमच्या अर्वाचीन पंडितांना ज्या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या वाटतात, त्यांवर त्यांचें बारीक लक्ष असतें. त्यांच्या दृष्टीनें कमी महत्त्वाच्या वस्तूकडेहि त्यांचें लक्ष अर्धेमुर्धें असतें. आणि यापलीकडे उरलेल्या अनंत वस्तुजाताचा विचार ते मुळींच करीत नाहींत. वास्तविक पाहतां मानवी जीविताचा प्रश्न सगळ्या मानवकुलाला अत्यंत महत्त्वाचा आहे आणि त्याच्या दृष्टीनें बाकीच्या प्रश्नांचें कमी अधिक महत्त्व ठरवावयाचें आहे. मानवी जीवनाचा अंतिम हेतु काय याचा उलगडा होणें आम्हास जितकें अगत्याचें आहे, तितकें अगत्य दुसऱ्या कोणत्याहि ज्ञानाबद्दल आम्हास वाटणें शक्य नाहीं. म्हणजे या प्रश्नाला येथें धार्मिक स्वरूप प्राप्त होतें; पण अर्वाचीन शास्त्रांचे पंडित कोणत्याहि धर्मापासून सर्वथा अलिप्त असतात. यामुळें अत्यंत महत्त्वाचा

प्रश्न कोणता, आणि कमी महत्त्वाचा कोणता, हें ठरविण्याची कांहीं कसोटीच त्यांजजवळ नाहीं. सृष्टि अनंत आहे; तिच्यांतील प्रत्येक घटना आपल्या मनाच्या आटोक्यांत आणणें शक्य नाहीं. मनुष्याची बुद्धि या सृष्टीप्रमाणें अनंतरूपी नाहीं. तिच्या चलनवलनाचें क्षेत्र मर्यादित आहे. यामुळें सष्टींतील कांहीं वस्तुभांडार तरी तिच्या दृष्टिपथांतून कायमचेंच बाहेर राहणार हें उघड आहे. विषयाच्या महत्त्वाचें मापन करण्याची कसोटी अर्वाचीन पंडितांजवळ नसल्यामुळें शास्त्रासाठीं शास्त्र या सूत्राची कांस त्यांनीं धरली आहे. या सूत्राचा सरळ अर्थ हाच कीं, मानवी जीविताला महत्त्वाच्या अशा गोष्टींचा विचार करण्यासाठीं हीं शास्त्रें अवतरलीं नसून साऱ्या सृष्टीमागें धांवत सुटून वाऱ्याची मोट तीं बांधू पहात आहेत.

अर्वाचीन पंडितांनीं कोणताहि पदार्थ अभ्यासासाठीं हातीं घेतला म्हणजे त्यांतील घटकांचा विचार त्यांच्या कमी अधिक महत्त्वाचा मानानें ते करीत नाहींत. सर्वांची एकत्र गोळाबेरीज करून यदृच्छेनें ज्यावर त्यांची दृष्टि जाईल, त्याच घटकामागें ते धांवत सुटतात. कमी अधिक महत्त्वाच्या मानानें चढती उतरती श्रेणी लावण्याचा यत्न ते करीत नाहींत. मनुष्यांना अत्यंत आवश्यक अशा वस्तूंचा विचार आधीं आणि निरुपयोगी वस्तूंचा त्याग अशा प्रकारचा कोणताहि धरबंद ते आपल्या मागें लावून घेत नाहींत. हातीं जें सांपडेल त्यामागें लागावयाचें अशा बेजबाबदार पद्धतीस त्यांनीं स्वतःस वाहून घेतलें आहे. यामुळें अखेरीस परिणाम काय होतो, तो पहा. आखिल वस्तुजाताचा विचार करण्याचा आव घालणारे हे पंडित सर्व सृष्टीचा विचार करीत नाहींतच; पण ज्या विषयांचा विचार स्वतःच्या फायद्याचा असतो. तिकडेच आपलें लक्ष ते लावतात. अर्थात् ज्या लोकांपासून त्यांचा स्वतःचा फायदा होण्यासारखा असतो त्यांच्या सुखसोयींत भर टाकणारे विषय मात्र ते आपल्या विचारांत घेत असतात. धनिक लोकांची चैन कशानें वाढेल इतक्याच गोष्टिचा विचार ते प्रामुख्यानें करीत असतात. यामुळें त्यांचें लक्ष सृष्टीच्या जड स्वरूपाबाहेर कधींहि वावरत नाहीं. त्यांच्या अभ्यासाचीं सारीं साधनें आणि त्यांचे विषय हीं सर्वथा अचेतन असतात. अशा जड स्वरूपाचीं हीं शास्त्रेंच खरें शास्त्र या नांवाला

योग्य आहेत, अशी अर्वाचीन पंडितांची समजूत आहे. पूर्वीच्या कीळा ज्याप्रमाणें बायबल हेंच सत्यशास्त्र मानलें जात असे त्याचप्रमाणें सांप्रत तो मान या अर्वाचीन शास्त्रांना मिळाला आहे. मनुष्याचें जीवित अधिक सुखकर आणि अधिक दयाशील कसें होईल, याचा विचार जणूं काय शास्त्राला करावयाचा नसून नानाप्रकारचे पातळ पदार्थ एकमेकांत मिसळणें, रोगजंतूंची वाढ करणें, बेडूक आणि कुत्रे फाडणें, ताऱ्यांचे रासायनिक पृथक्करण करणें अथवा एक्स किरणांचा शोध लावणें, हेंच काय तें खरें शास्त्र असें अर्वाचीन विद्वानांना वाटतें.

मनुष्याचें जीवित ज्यांच्या अभ्यासानें अधिक सुखकर आणि अधिक कोमल भावनामय होईल, अशीं शास्त्रें अर्वाचीन विद्वानांस अशास्त्रीय दिसतात. धर्मशास्त्र अथवा नीतिशास्त्र हीं शास्त्रेंच नव्हत, असें ते म्हणतात. कल्पनातरंगांत वाहवत जाणाऱ्या तत्ववेत्त्यांनीं, न्यायशास्त्र्यांनीं अथवा इतिहासकारांनीं हा निरर्थक खेळ करीत बसावें, असें त्यांचें म्हणणें आहे; पण अशा दृष्टीनें विचार करणारे तरी काय करीत असतात ? गत इतिहासाचा विचार करून अर्वाचीन इतिहासकार शेवटीं हेंच सांगतो कीं चालू समाजरचनाच सर्वोत्कृष्ट असून तिच्यांत बदल करणें अशक्य आहे. आणि म्हणून शक्य त्या मार्गांनीं तिचें रक्षण केलें पाहिजे.

या बाबींत अर्थशास्त्रानें विलक्षण अघाडी मारलेली आहे. समाजांतील अनेक आपत्तींचा विचार हें शास्त्र करीत असते; पण असें करतांनाहि चालू समाजरचना उत्कृष्ट आहे, हें त्यानें गृहित धरलेलें असतेंच. यांत कांहीं अधिक चांगल्या प्रकारचा फेरबदल करतां येईल, असें त्याला वाटत नाहीं. सामान्य जनतेची चालू, समाजस्थिति कायमची कशी सुधारतां येईल, याचा विचार ते करीत नाहीं, अथवा यावर तें उपायहि सुचवीत नाहीं.

याचा परिणाम अखेरीस काय होतो तो पहा. आधींच अवनत झालेलें मनुष्याचें मन अधिक झपाट्यानें घसरणीस लागतें. या शास्त्रांची उपेक्षाबुद्धि जों जों अधिक तीव्र, तों तों मनुष्याच्या बुद्धीची अवनतीहि अधिक तीव्र होते. अशा रीतीनें समाजाची सामान्यबुद्धि आणि अर्वाचीन शास्त्रें

हीं परस्परांस पोषक होण्याऐवजीं परस्परांपासून अधिक विभक्त मात्र झालीं आहेत. अर्वाचीन विद्वान आणि समाजांतील वरच्या प्रतीचे लोक यांना खऱ्या शास्त्राची चाड नाहीं. त्यांतील रस त्यांच्या गळीं उतरत नाहीं. एवढेंच नव्हे तर हें ज्ञान त्यांना कोणी सांगू लागला तर ते त्याचा छळ करतात, आणि असें व्हावें हें रीतसरच आहे. खरें शास्त्र मनुष्याला त्याच्या चुका दाखवितें. पूर्वीचे जुने मार्ग त्याज्य असून नवे मार्ग मनुष्याला तें दाखवितें. लक्षावधि लोकांवर अखंड सत्ता चालविण्याची जन्मजात संवय ज्यांना लागली आहे, यांना हा उपदेश रुचत नाहीं यांत नवल नाहीं. हा मार्ग सोडा, असें कोणी म्हटल्यास त्याचा छळ करण्यास त्यांनीं उद्युक्त व्हावें, हेंहि ओघालाच येतें. उलटपक्षीं अर्वाचीन शास्त्रें त्यांच्या इच्छेला पोषक अशींच असतात. त्यांच्या कोणत्याहि वर्तणुकीचा निषेध तीं करीत नाहींत, एवढेंच नव्हे तर त्यांच्या इच्छातृप्तीचे नवे नवे मार्ग शोधून काढून त्यांच्या सुखसाधनाची समृद्धि ते करतात. आळशी लोकांच्या आळशी जिज्ञासा तीं तृप्त करतात. सामान्य जनतेचे डोळे तीं भारून टाकतात. त्यांच्या कृतींनीं मनुष्याचें मन आश्चर्यानें थक्क होऊन जातें. खऱ्या शास्त्राच्या आंगीं यांतील कोणताच गुण नसतो. अत्यंत खोल नदीचा प्रवाह जसा स्थिर आणि गंभीर असतो तसेंच खरें शास्त्रहि शांत आणि गंभीर असतें. आपल्या झकाकीनें लोकांचे डोळे तीं दिपवीत नाहींत. स्वतःच्या मोठेपणाचा ढोल वाजवून लोकांचीं चित्तें स्वतःकडे आकर्षण करून घ्यावीत ही विद्या खऱ्या शास्त्रांना अवगत नाहीं. किंबहुना लोकांच्या दृष्टिपथांतून लपून राहण्याचीच त्याची इच्छा असते. उलट पक्षीं अर्वाचीन शास्त्रांच्या आत्मस्तुतीला मर्यादा राहिलेली नसते.

प्राचीन काळच्या सर्व विद्यांबद्दल अर्वाचीन पंडितांच्या मनांत तुच्छतेची भावना आहे. जुन्या साऱ्या विद्या म्हणजे थोतांड असें त्यांना वाटतें. त्यांना आतां मोजदादींत घेण्याइतकी सुद्धां त्यांची किंमत त्यांना दिसत नाहीं. आपलें शास्त्र एवढेंच खरें शास्त्र आणि आपल्या शोधन पद्धती तेवढ्याच खऱ्या असा अभिमान त्यांना असतो. गेल्या हजारों वर्षांत जें कोणाला साध्य झालें नाहीं तें आपण शेंपन्नास वर्षांत करून दाखविलें, असें ते

म्हणतात आणि याच मार्गांनीं पुढें चालून मनुष्यजातीचें अवघें शंकानिरसन आम्ही करूं आणि तिला आम्ही पूर्ण सुखी करूं अशी घमेंड त्यांना वाटते. जगांत जगण्याला कांहीं योग्य असेल तर तें अर्वाचीन शास्त्र आणि अत्यंत महत्त्वाचीं व उपयुक्त माणसें कोणी असतील तर ते अर्वाचीन शास्त्रवेत्ते असा त्यांचा समज आहे.

अर्वाचीन शास्त्रज्ञांच्या या मताला सामान्य सुशिक्षित लोकहि मान डोलावतात; पण खऱ्या दृष्टीनें पाहतां हीं शास्त्रें आज इतक्या अवनतावस्थेला पोहोंचलीं आहेत कीं, इतकी हीन दशा पूर्वीं कधींहि त्यांनीं पाहिली नव्हती. मानवजातिचें मन अधिक कोमल भावनायुक्त करावयाचें ज्या शास्त्रांचें वास्तविक काम तीं शास्त्रें आपला हेतु बाजूस सारून चालू दुष्ट समाजरचना न्याय्य आहे, हेंच सिद्ध करण्याच्या खटाटोपांत पडलीं आहेत. आणि बाकीचीं उरलीं तीं आळशी लोकांच्या आळशी जिज्ञासा तृप्त करण्याच्या फंदांत पडलीं आहेत.

वाफेच्या शक्तीचा शोध लागून यंत्रशास्त्रांत विलक्षण उलथापालथ झाली. त्यांतच विद्युच्छक्तीची भर पडली. ध्वनिवाहक यंत्रें अस्तित्वांत आलीं, आणि याशिवाय किती तरी सुधारणा अर्वाचीन काळीं अस्तित्वांत आल्या. मनुष्यानें सृष्टिवर मात करून तिचें सारें सामर्थ्य आपल्या कह्यांत आणलें. या साऱ्या गोष्टी तुम्ही टाकाऊच म्हणणार काय ? असा प्रश्न मला कोणी करील; पण यावर माझें उत्तर इतकेंच कीं तुमच्या या अभूतपूर्व विजयाचा अखेरीस परिणाम काय झाला आहे, याचा विचार तुम्ही केला आहे काय ? आजपर्यंत जे अनेक शोध तुम्हीं लावले, ते कारखान्यांच्या मदतीस धांवले; सामान्य जनतेच्या आरोग्याची राखरांगोळी त्यांनीं केली; त्यांनीं अनेक प्राणघातक शस्त्रास्त्रें निर्माण केलीं; चैनीची वाढ करून मनुष्यांना त्यांनीं अधोगतीच्या पंथाला लावलें. यामुळें सृष्टीवर मिळविलेल्या तुमच्या विजयानें मनुष्यजातीचें कल्याण होण्याऐवजीं तिची परिस्थिति अधिक बिकटमात्र झाली आहे. माझ्यासारख्या सामान्य बुद्धीच्या मनुष्याच्या विचारसरणीला हें उत्तर योग्य दिसतें.

चालू समाजरचना कशी आहे ती पहा. मूठभर लोकांच्या हातीं सारी

सत्ता एकवटली असून बाकीच्या अवघ्या समाजावर हवा तसा जुलूम चालविण्याचें साधन या मूठभर लोकांच्या हातीं आहे. यामुळें तुमच्या शास्त्रांनीं सृष्टीवर जितके विजय आजपर्यंत मिळविले, त्या सार्‍यांचीं फळें या मूठभर लोकांच्या हातीं जाऊन त्यांच्या शस्त्रागारांत या नव्या शस्त्रांची आणखी भरच पडली आहे. यामुळें लक्षावधि सामान्य लोकांचा आयुष्यक्रम पूर्वींहून अधिक सुखकर होण्याऐवजीं दिवसेंदिवस तो अधिक बिकट होत चालला आहे. माझ्यासारख्या सामान्य मनुष्याचा प्रत्यक्ष अनुभव पाहिला तर तो अशाप्रकारचा आहे.

मनुष्यानें आपला जीवनक्रम कोणत्या रीतीनें आंखावा हा विचार करणें, हें ज्या शास्त्राचें ध्येय नाहीं आणि जें हातीं सांपडेल, त्याचें पृथक्करण करीत सुटावयाचें हाच ज्याचा क्रम त्या शास्त्राची वाढ कितीहि झाली, आणि जड सृष्टीवर आणखी कितीहि विजय त्यांनीं मिळविले, तरी मानवकुलाची स्थिति काडीभरहि सुधारण्याचें काम त्याच्यानें होणार नाहीं. हें कार्य करावयाचें म्हणजे चालू समाजरचनाच आमूलाग्र बदलली पाहिजे.

बरें; पण वैद्यकशास्त्राचें काय? असा प्रश्न कोणी करील. वैद्यकानें सुधारणेच्या बाबींत बरीच आघाडी मारली आहे, रोगजंतूंचे शोध लावले आहेत, शस्त्रक्रिया अस्तित्वांत आणली आहे आणि चिकित्सेच्या नव्या-रीती शोधून काढल्या आहेत, हें विसरूं नका, असेंहि आम्हास कोणी बजाविल. रोगप्रतिबंधक औषधांच्या पिचकार्‍यांनीं रोगाचा प्रतिबंध होतो, भूल आणणार्‍या नव्यानव्या औषधांनीं रोग्याला न समजतां कठीण शस्त्रक्रिया करतां येतात, इत्यादि अनेक सुधारणा अर्वाचीन वैद्यकशास्त्रानें घडवून आणल्याच्या गोष्टी त्या शास्त्राचे अभिमानी आम्हास सांगत असतात.

आमची चालू जीवनपद्धति विलक्षण गुतागुंतीची झाली आहे. जनतेच्या मोठ्या भागाला वाईट अन्नावर दिवस काढणें भाग झालें आहे. मनुष्यप्रकृतीला अपायकारक अशा कामांचा अतिरिक्त बोजा लोकांवर प्रत्यहीं पडत असतो. रहावयाचीं घरें आणि वापरावयाचे कपडे सुद्धां अपायकारक असतात, आणि या वस्तूहि पुरेशा मिळतात असें नाहीं. यामुळे मुलांचे मृत्यूचें प्रमाण भयंकर वाढलें आहे. पुष्कळ मुलें चारसहा

महिन्यांच्या आंतच यमसदनाची वाट बघतात आणि मोठीं माणसेंहिं आपल्या अर्ध्या मुर्ध्या आयुष्यांतच या जगाला रामराम ठोकतात. मुलांच्या अजारांचें मूळ कोठें आहे, याचा शोध कोणी केला आहे काय ? रोगी, विषयासक्त आणि मदिरासक्त आईबापांचीं मुलें घडधाकट कशीं निपजणार ? यामुळें जन्मापासूनच क्षयरोग अथवा उपदंश असल्या प्राणघातक रोगांची छाया त्यांजवर पडलेली असते. याच तरुण माणसांतून पुष्कळांची रवानगी रणभूमीकडे होऊन धारातीर्थावर त्यांना कंठस्नान घडत असतें. दर-दहावीस वर्षांनीं रणदेवतेला दहावीस लाख बळी द्यावे लागतात. या आपत्ति कां ओढवल्या आहेत, हें ध्यानांत आणा. मनुष्याचें जीवन अधिक धार्मिक, अधिक नैतिक आणि अधिक कोमल भावनामय करण्याचा मार्ग दाखविण्याऐवजीं हीं अर्वाचीन शास्त्रें मनुष्य जातीला उलट्या मार्गानें नेत आहेत, त्याचाच हा परिणाम होय. मनुष्याचें जीवन नीतिदृष्ट्या जों जों सुधारेल तों तों वर सांगितलेल्या आपत्ति नष्ट होण्याच्या मार्गाला आपोआप लागतील; पण हें करण्याऐवजीं चालू स्थितीला पाठींबा देऊन ती न्याय्य ठरविण्याची आणि दुसऱ्या पक्षीं लक्ष्मीपुत्रांच्या हातीं नवीं नवीं खेळणीं देण्याची कामगिरी मात्र अर्वाचीन शास्त्रें करीत आहेत. सरळ मार्गानें चालण्यास मनुष्याला रोगांनीं पछाडण्याचेंच कारण नाहीं. पण सांप्रतची समाजघटनाच अशी आहे कीं, तींत सरळ मार्गानें चालण्यास अवकाशच नाहीं. अशा स्थितींत हजारों लोक रोगाच्या तावडींत सांपड-तात, यांत नवल काय आणि अशा हजारों रोग्यांतील एकादा रोगी बरा केल्याची प्रतिष्ठा या वैद्यक शास्त्रानें गावी याचें मला मोठें नवल वाटतें. आपली खरी कामगिरी अर्वाचीन शास्त्रांनीं सोडल्यामुळेंच रोगांचें प्रमाण भयंकर वाढलें आहे. चालू समाजस्थितीची घडी ठाकून ठोकून पक्की करण्यासाठीं जे श्रम अर्वा-चीन शास्त्रें घेतात, त्यांतील थोडासाहि अंश योग्य मार्गाकडे त्यांनीं लावला तर या मनुष्यभक्षक रोगांचा शतांशाहि जगांत उरणार नाहीं मनुष्याला आरोग्यतत्वांचें शिक्षण त्यांनीं अधिक प्रमाणांनीं द्यावें, धर्माचा व नीतीचा मार्ग त्यांनीं अधिक प्रकाशित करावा म्हणजे रुग्णालयें चालू ठेवण्याकरतां जो लक्षावधि रुपयांचा बोजा लोकांच्या माथीं पडत आहे, तो सारा वांचून

हा खर्च सुद्धां आह्मा सामान्य मनुष्यांस आतां असम होऊं लागला आहे. शास्त्रांनीं आपली खरी कामगिरी सांभाळली, तर हा सारा तंटा आपोआप मिटेल आणि मग एकादा रोगी बरा केल्याची प्रौढी गात सुटण्याचें कारणहि अर्वाचीन शास्त्रांस उरणार नाहीं.

शेत धड नांगरूं नये, पेरणी चांगली करूं नये आणि बींहि वाईट असावें, असें झालें म्हणजे चांगलें कणीस न येणें रास्तच आहे. मग या कणसांची कांहीं जोपासना करण्याची खटपट करून थोड्याबहुत कणसांतून कांहीं बरेंसे धान्य काढल्याची प्रौढी शेतकऱ्यानें सांगावी, तशीच स्थिति या अर्वाचीन शास्त्रांची झाली आहे. मनुष्यजातीला शापरूप होण्याऐवजीं तिचें खरें कल्याण करण्याची इच्छा अर्वाचीन शास्त्रांना असेल तर आपल्या चालू पद्धतींत त्यांनीं आतां बदल केला पाहिजे. अखिल वस्तुजातांतलि हातीं लागेल ती वस्तु घेऊन तिजवर प्रयोग करण्याचें त्यांनीं आतां सोडून दिलें पाहिजे. सर्व शास्त्रांचा अंतिम हेतु काय हें लक्षांत आणून त्याला पोषक असा मार्ग त्यांनीं स्वीकारावा. मनुष्यानें आपली जीवनपरिचर्या कशी आंखावी, हें त्यांनीं आम्हास दाखविलें पाहिजे. हा हेतु पुढें ठेवणें यांतच त्यांचें खरें महत्त्व आहे. आणि या दृष्टीनें सृष्टपदार्थांचा अभ्यास मूळ हेतूला पोषकविषय, इतक्या पुरताच त्यांनीं करावा. मूळ हेतूच्या दृष्टीनें पाहतां अर्वाचीन शास्त्रें आज कुचकामी ठरलीं असून त्यांनीं आपला मार्ग आतां बदलला पाहिजे, हेंच मत कारपेंटर यानें या ग्रंथांत सिद्ध केलें आहे.

---

## धर्म व धर्मरहस्य.

खऱ्या धर्माला ग्लानी आल्याचा काळ सर्व देशांतील मानवी समाजांत केव्हां ना केव्हां येतो, असा इतिहासाचा अनुभव आहे. अशा ग्लानीला प्रथम सुरवात झाली म्हणजे तत्वांचा विसर हळू हळू पडत जातो. आपल्या

खऱ्या कार्यापासून आणि मूळ उद्देशापासून धर्म अधिकाधिक पराङ्मुख होत जातो आणि अखेरीस मूळ उद्दिष्टाचा मागमूसहि नाहींसा होतो. बाह्य जड आचार खऱ्या धर्माची जागा घेतात; यामुळें मनुष्याच्या मानसिक संस्कृतीवर जो इष्ट परिणाम घडावयाचा तो घडेनासा होतो.

अशा वेळीं समाजांतील सुशिक्षित वर्ग धर्मविमुख होतो. धर्मावरील त्याची खरी श्रद्धा वस्तुतः नाहींशी झालेली असते. आणि अशा स्थितींतहि बाह्य धर्माचरणाचें नाटक तो कायम ठेवतो. याचें कारण चालू समाजरचनेची घडी विस्कटू देण्याची त्याची इच्छा नसते इतकेंच. अशा धर्माचरणाच्या सोंगानें सामान्य जनतेला त्याला आपल्या पायाखालीं ठेवतां येतें. सामान्य जनतेला धर्मतत्वांचें आकलन आधींच झालेलें नसतें. अशा स्थितींत धर्माचारांचें परिपालन ती करते. याचें कारण धर्मरहस्याचा अभिमान हें नसून या बाबींत हालचाल न करण्याची तिची सामान्य प्रवृत्ति हेंच असतें. सामान्य सामाजिक चालीरीति आणि सरकारी कायदा या दोहोंच्या आधारावर सामान्यलोक आपला आयुष्यक्रम आंखतात.

जगांतील साऱ्या राष्ट्रांचा इतिहास पाहिला तर असा प्रकार पूर्वी वारंवार घडून आला असल्याचें आपणास आढळून येईल; पण या सामान्य स्थित्यंतराहून अगदीं वेगळा असा एक प्रकार ख्रिस्ती समाजांत आज घडून येत आहे. कोणत्याहि समाजांत झालें तरी श्रीमंत, सत्ताधारी, आणि सुशिक्षित अशा मूठभर लोकांचेंच वजन सामान्य जनतेवर पडलेलें असतें. पूर्वींच्या धर्मग्लानीच्या काळीं धर्म ही एक अगदीं निरर्थक वस्तु आहे, असें या मूठभर लोकांस वाटत नसे; पण सांप्रतच्या सुशिक्षित लोकांकडे पाहतां धर्म म्हणजे निव्वळ थोतांड आहे; इतकेंच नव्हे तर मानवी समाजाला तो घातक आहे, अशी त्याची खात्री पटल्यासारखी दिसते. हल्लींच्या धर्माचें स्वरूप ज्यांना फारसें मान्य नाहीं, असें लोक धर्मसंशोधन करण्याच्या भानगडींत पडत नाहींत. सत्यवस्तूंचा शोध ते करीत नाहींत. यामुळें इतर संशयग्रस्तांना त्यांची कांहींच मदत होत नाहीं. धर्मसंशोधन ते करीत नाहींत, याचें कारण हेंच कीं, त्यांच्या दृष्टीनें धर्म हा पदार्थ

विघातक ठरला आहे. धर्माची सत्यता अंतरात्म्याच्या अनुभवानें पटते, असे त्यांना वाटत नसून केवळ बाह्य आकार इतकाच धर्म, असा त्यांचा समज आहे; आणि ह्या बाह्य आकाराचें विकृत स्वरूप पाहून धर्म मरणाच्या पंथाला लागला आहे, आणि मरण्यासच तो योग्य आहे, असें अनुमान ते काढतात. कोणाचीहि प्रवृत्ति धर्माकडे होत असल्याचें त्यांनीं पाहिलें म्हणजे धर्मरोगानें त्याला पछाडलें असें ते म्हणतात.

सृष्ट चमत्कारांपासून धर्मप्रवृत्तीचा उद्भव मानवी मनांत आरंभीं झाला, असें कांहीं अर्वाचीन सुशिक्षितांचें मत आहे. दुसऱ्या कित्येकांच्या मतें धर्माचा जन्म भुताखेतांवरील विश्वासांतून झाला. आपल्या गतपूर्वजांचें दर्शन पुन्हां व्हावें या हेतूनें मनुष्यजाति आरंभीं खटपट करूं लागली. आणि या तिच्या हेतूंतच धर्माचें बीज उद्भवलें असें त्यांचें म्हणणें आहे. सृष्टींतील कराल शक्तीच्या भीतीमुळें मनुष्याचें मन धर्म शोधूं लागलें असेंहि कित्येक म्हणतात; पण धर्मोद्भवाचीं हीं सारीं कारणें आतां लयास गेलीं आहेत, असें अर्वाचीन सृष्टपदार्थशास्त्री सांगतात. काळाच्या उदरांत गडप झालेले पूर्वज जिवंत माणसांशीं सख्य करूं शकत नाहींत आणि झाडें, डोंगर अथवा वीज यांत कांहीं चैतन्य नाहीं, असें ते म्हणतात. आपल्या विवेचक बुद्धीच्या आटोक्याबाहेरच्या घटना घडवून आणण्याचें सामर्थ्य सृष्ट पदार्थांच्या आंगीं नाहीं, असें ते सिद्ध करतात. अशा स्थितींत धर्मासारख्या थोतांडाचें कारणच काय आहे, असा त्यांचा प्रश्न आहे. असल्या थोतांडाची शृंखला मनुष्यसमाजानें आपल्या पायांत अडकवून घेतल्यामुळें त्याची वाढ खुंटली असें या पंडितांचें म्हणणें आहे. लोकांत धार्मिक भावना ज्या काळीं जिवंत होत्या तो काळ या विद्वानांच्या दृष्टीनें अज्ञानयुगाचा काळ दिसतो. आतां या युगाची रात्र त्यांच्या दृष्टीनें संपली आहे. सांप्रत या अज्ञानाचा आंधार थोडा बहुत कोठें दिसत असेल, तर ती रात्रीची अखेरची घटका होय असें ते म्हणतात.

अज्ञानांधकाराच्या या आरंभीच्या काळानंतर एक तत्व चर्चेचा काळ आला. अज्ञानयुगाचा हा उत्तरभाग होता; असें अर्वाचीन सुशिक्षितांचें म्हणणें आहे; पण त्यांच्या दृष्टीनें हा काल्पनिक तत्वज्ञानाचा काळहि

संपला आहे. या अंधारांतून जग सांप्रतच्या उजेडांत आलें आहे. आणि आतां आधिभौतिक शास्त्रांचा स्वच्छ प्रकाश सर्वत्र पडूं लागला आहे. या शास्त्रांनीं जुना धर्म मागें टाकला आहे. धर्माची जागा आतां त्यांनीं घेतली आहे. धर्मानें जो भोळसर मार्ग पूर्वी स्वीकारला होता त्यामुळें मनुष्य जातीची उन्नति वाढत जाण्याचा संभव नव्हता; पण या शास्त्राचें सामर्थ्य असें आहे कीं, मानवजातीला तिच्या भोळसरपणांतून बाहेर काढून तिनें पूर्वी कधींहि न पाहिलेला असा दिव्य काळ हीं शास्त्रें तिला दाखवितील.

इ. स. १९०१ सालाच्या आरभीं बर्थेलो नांवाच्या एका सुप्रसिद्ध पंडितानें एक भाषण केलें होतें. त्यांत त्यानें ही व गोष्ट आपल्या श्रोत्यांच्या मनावर ठसविण्याचा यत्न केला होता. धर्माचे दिवस आतां संपलें असून त्याची जागा आतां अर्वाचीन शास्त्रांनीं घेतली पाहिजे असें प्रतिपादन त्यानें केलें. या भाषणाचा उल्लेख येथें मीं प्रामुख्यानें केला आहे, याचें कारण हेंच कीं, प्रस्तुत वक्ता जगविख्यात आणि सर्वमान्य पंडित असून त्याचें भाषण अर्वाचीन सुशिक्षित जगाच्या राजधानींत ( पारीस ) झालें. वास्तविक पाहतां असें भाषण कोणी करीत नाहीं अथवा हीं मतें फारशीं ऐकूं येत नाहींत, असें मुळींच नाहीं. अशा अर्थाचे लेख आतां सामान्य वर्तमानपत्रेंहि लिहूं लागलीं आहेत.

मनुष्य जातीच्या उद्यमशीलतेचीं कारणें पूर्वी दोन होतीं, असें बर्थेलो म्हणतो. एक दंडनीति आणि दुसरें कारण धर्म. मनुष्यजातीची कर्म-प्रवणता युद्धाच्या आणि धर्माच्या हेतूनें प्राचीन काळीं उद्भवली; पण हीं दोन्ही कारणें आतां शिथील झाली असून त्यांची जागा आतां अर्वाचीन शास्त्रांनीं घेतली पाहिजे, असें त्याचें प्रतिपादन आहे. अर्वाचीन शास्त्रें या शब्दाचा कांहीं विवक्षित अर्थ बर्थेलो यानें केला आहे, असें नाहीं. ज्या अर्थाची चर्चा आपण आधीं केली, तोच अर्थ त्यानेंहि गृहित धरला आहे. आणि अर्वाचीन शास्त्राच्या सर्व उपासकांस हाच अर्थ मान्य झालेला आहे. मनुष्याच्या दृष्टिपथांत येणाऱ्या अवघ्या पदार्थजाताचा अभ्यास म्हणजे शास्त्र, अशी त्यांची व्याख्या आहे. पण वास्तविक पाहतां असें सर्वगामी शास्त्र अद्यापि निर्माण झालेलें नाहीं.

सांप्रतचें शास्त्र म्हणजे अनेक अनियंत्रित वस्तूंची खिचडी आहे. यांतील पुष्कळशा वस्तूंचा परस्पर कांहीं संबंधहि नसतो. यांतील कित्येक शुद्ध निरुपयोगी आहेत आणि नितांत सत्य असें यांत कांहींच नाहीं. यामुळें यांच्या अभ्यासानें संशयनिवृत्ति होण्याऐवजीं संशयाचें रान मात्र माजतें. दृष्टिभ्रम उत्पन्न होतो. काय घ्यावें आणि काय न घ्यावें हें बुद्धीला समजेनासें होतें. या शास्त्रांचें आजचें सत्य उद्यां खोटें ठरतें. अशा अनिश्चित वस्तूला निश्चित शास्त्र अशी संज्ञा तरी कशी लावावी, हें अम्हा सामान्य मनुष्यांस समजत नाहीं. बर्थेलो ज्याला शास्त्र असें म्हणतो, ती वस्तु वास्तविक अस्तित्वांत नाहीं, असें उघड दिसतें. तेव्हां धर्माची जागा या अस्तित्वरहित वस्तूनें घ्यावी असा आग्रह धरणें हा निव्वळ जुलूम होय. यांत शास्त्रोपासकांचा नुसता हट्ट मात्र दिसून येतो. या शास्त्रांच्या सत्यतेबद्दल त्यांची जी श्रद्धा आहे, ती अस्थानीं आणि अन्याय्य आहे, असें स्पष्ट म्हणण्यास हरकत नाहीं. पोप कधीं चूक करीत नाहीं, असा मूर्खपणाचा समज पूर्व काळीं होता, याचें आपणास हंसू येतें. पण त्याच पोपची जागा आज या शास्त्रांनीं घेतली आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

पण अशा स्थितींतहि स्वतःला सुशिक्षित समजणारे लोक अर्वाचीन शास्त्रांना सत्यार्थानें मानतात, आणि धर्माची जागा आतां भौतिक शास्त्रांनीं घेतली पाहिजे, असें म्हणतात हें मोठें नवल आहे. धर्माची जागा भरून काढण्याचें सामर्थ्य आणि योग्यता हीं दोन्हीहि या शास्त्रांत आहेत आणि धर्म हळूहळू नाहींसा होत आहे, असें या सुशिक्षितांस मनापासून वाटतें.

धर्म हें आतां जुनें खोड झालें आहे, असें ते म्हणतात. अर्वाचीन शास्त्रतत्वांवांचून इतर कोणत्याहि तत्त्वांवरील श्रद्धा म्हणजे शुद्ध अज्ञान असें ते समजतात. मनुष्याच्या साऱ्या गरजा भागविण्याचें सामर्थ्य या शास्त्रांच्या ठिकाणीं नसल्यामुळें प्रत्येकानें आपला भावी आयुष्यक्रम या शास्त्रतत्वांना धरून आंखावा असा त्यांचा आग्रह आहे. अर्वाचीन शास्त्रांचे उपासकच या पंथांत आहेत, असें नसून सामान्य जनतेपैकींहि पुष्कळसे लोक त्यांची री ओढीत असतात. आपल्या अयुष्यक्रमांत धर्माला आतां स्थान नसून अर्वाचीन शास्त्रानुरोधानें आपण चालावें असें म्हणणारे सामान्य

लोकहि आतां पुष्कळ झाले आहेत. याचा वास्तविक अर्थ हाच कीं, पुष्कळांना आतां कसलेंच बंधन नकोसें झालें आहे. मनुष्याच्या स्वैर वर्तनाला आळा घालावा हा अर्वाचीन शास्त्रांचा उद्देशच नव्हे. आणि मुळांतच हा उद्देश नसल्यामुळें त्यांची वाढहि त्या दृष्टीनें झालेली नाहीं. अशा स्थितींत या शास्त्रांच्या अनुरोधानें चालणे म्हणजे स्वैर वर्तन करणें होय.

धर्माची जरूर आतां राहिली नसून त्याच्या जागीं शास्त्र आलें पाहिजें असा अखेरचा निकाल आमच्या सुशिक्षित वर्गानें दिला असला, तरी ज्याला थोडीबहुत तरी विवेकबुद्धि असेल अशा मनुष्याला धर्मशून्य जीवन पसंत पडावयाचें नाहीं. फार काय; पण धर्मावांचून कोणीहि विवेकी मनुष्य आजपर्यंत जगला नाहीं, आणि पुढेंहि जगणार नाहीं. या ठिकाणीं विवेकी हें विशेषण मीं सहेतुक योजिलें आहे. कारण विवेकशून्य मनुष्याला धर्मावांचून आपला काळ कंठिता येणें शक्य आहे, हें मला मान्य आहे. पशूंना बुद्धि नसते आणि धर्महि नसतो; तथापि आपलें सारें आयुष्य ते सुखानें काढतात; पण ज्याच्या ठिकाणीं थोडी बहुत तरी विवेकजागृति झाली असेल, त्याला धर्मशून्य जिवित कंठणें अशक्य होईल. आपला आयुष्यक्रम कशा प्रकारचा असावा ही विवंचना त्याच्या चित्तांत केव्हांना केव्हां उद्भवल्यावांचून राहणार नाहीं आणि या विवंचनेची शांति करण्याचें सामर्थ्य एकट्या धर्मात मात्र आहे. विहित काय, आणि अविहित काय, हा विचार विवेकी मनुष्याच्या मनांत नेहमीं जागृत असल्यामुळें आणि ही जागृति स्वभावसिद्ध असल्यामुळें धर्मशून्य जीवित कंठणें त्याला शक्य नाहीं, हें उघड आहे. आपल्या प्रत्येक कृतीचा परिणाम अखेरीस काय होतो, हें पाहून तदनुसार कर्मप्रवृत्त होणें, हा प्रत्येक प्राण्याचा जन्मजात स्वभाव आहे. ईश्वरानें ज्या मानानें त्याला बुद्धि दिली असेल, त्या मानानें प्रत्येक प्राणि परिणामाचा विचार केल्यावांचून रहात नाहीं. हा परिणाम आधीं लक्षांत आणून मग तो कृति करतो. हिंवाळ्यांत अन्नाची जरूर लागेल हें लक्षांत आणून मधमाशी मधाची सांठवण पोळ्यांत करीत असते. एवढी कृति करण्यापलीकडे तिला अधिक ज्ञान नसते. यामुळें चांगली हवा असतां हिंडून मध जमा करावा एवढें एकच कर्म

ती करीत असते. पक्षी घरटीं बांधतात अथवा उत्तरध्रुवाकडून दक्षिणेकडे उडून जातात, तेव्हांहि भावी परिणामाकडे लक्ष देऊनच स्वरक्षणाची अगाऊ तजवीज ते करीत असतात. अशा कृतींत केवळ तात्कालिक परिणामाकडे त्यांचें लक्ष नसून ते भविष्यत् काळाकडे पहात असतात. भविष्य काळीं होणाऱ्या घटना पक्ष्यांना त्यांच्या उपजत बुद्धीनें समजत असतात. ही त्यांची बुद्धि विवक्षित मर्यादेपलीकडे जाऊं शकत नाहीं. मनुष्य आणि इतर प्राणी यांच्यांतील बुद्धीचा फरक येथेंच आहे. मनुष्यप्राण्याची बुद्धि अधिक विवेकशाली आहे आणि इतर प्राण्यांची उपजत बुद्धि अत्यंत मर्यादित आहे. मध जमा करणें बरें कीं वाईट, हा प्रश्न मधमाशीच्या बुद्धीला कधीं शिवतहि नाहीं. तिला ही शंका सुद्धां कधीं येत नाहीं; पण मनुष्यप्राणी धान्य साठवूं लागला म्हणजे पुढील सालचीं पिकें कशीं येतील ? त्यावेळीं पिकांत कमीअधिकपणा येईल कीं काय ? अशा स्थितींत गरीब लोकांना अन्नाची अडचण पडेल कीं काय ? इत्यादि अनेक प्रकारचा विचार तो करतो. फार काय; पण त्याची बुद्धि स्वतःच्या मुलाबाळांची आणि त्यांच्याहि पुढच्या पिढीची तरतूद करण्याचा विचार करीत असते. येथें केवळ शरीररक्षणापुरताच त्याचा हेतु असतो असें नाहीं; त्याची बुद्धि शरीराच्या जोपासनेपलीकडेहि पहात असते. आपली वर्तणूक कशा प्रकारची असावी, याचाहि विचार त्याच्या मनांत आल्यावांचून रहात नाहीं आणि हा विचार एकदां उद्भवला म्हणजे त्याचें उत्तर त्याला एकदम सांपडत नाहीं. कारण हा प्रश्न त्याला इतक्या गुंतागुंतीचा होऊन बसतो कीं, त्याचें सर्व धागे स्वतःच्या दृष्टिपथांत आणणेंहि त्याला अगम्य होऊन बसतें. स्वतःच्या मनाला वाटेल तसें वागावें हा मार्ग खरोखर योग्य नाहीं, हें त्याच्या चित्ताला जाणवत असतें. मन मानेल तसें वागल्याचे परिणाम इष्ट होतीलच अशी ग्वाही त्याचें मन त्याला देत नाहीं. त्याचप्रमाणें केवळ चालू क्षणापुरताच विचार करून कर्म करावें, हेंहि त्याला मान्य होत नाहीं. कारण एकाद्या कर्माचे परिणाम फार दूरवर पोहोंचत असतात, हें त्याला दिसत असतें. मनांत कोणाचेंहि वाईट करण्याचें नसतां एकादी कृति आपण करावी आणि तिची अखेर भलत्याच

कोणाच्या तरी दुःखांत व्हावी, असेंहि घडत असल्याचें तो पाहतो. आपल्या प्रत्येक कृतीच्या केवळ तात्पुरत्या परिणामाकडे पाहून मनुष्यजातीचें चालावयाचें नाहीं. आपली कोणती कृति खरी उपयोगी, कोणती निरुपयोगी आणि कोणती अखेरीस दुःखदायक याचें निश्चित अनुमान केवळ तात्कालिक परिणामाकडे पाहून कोणाहि विवेकी मनुष्याला निश्चितपणें काढतां यावयाचें नाहीं. केवळ चालू परिणामाचा आणि कृतीचा मेळ घालून पशू कर्म करतात; पण अशा पशुबुद्धीनें चालणें कोणाहि विवेकी मनुष्यास पसंत व्हावयाचें नाहीं. ज्याच्या ठिकाणीं विवेकबुद्धि जागृत झाली नसेल अशा मनुष्याची दृष्टि पशूच्या दृष्टीहून अधिक दूरवर पोहोंचणार नाहीं. पशु ज्याप्रमाणें चालू क्षणापुरताच विचार करतो, त्याचप्रमाणें अशा मनुष्याचें कर्महि चालू क्षणापुरतेंच असेल. याहून अधिक जागृतीच्या मनुष्याच्या दृष्टीचें क्षेत्र अधिक विस्तृत होईल. मी अमक्या कुटुंबाचा घटक अथवा अमक्या गांवाचा रहिवासी अथवा अमुक राष्ट्रांत राहणारा, अशा भावना त्याच्या चित्तांत जागृत होतील. अथवा ज्या कोणाची दृष्टि याच्याहि पलीकडे गेली असेल, तो विश्वकुटुंबीहि बनेल. आपल्या कृतीच्या परिणामांचें निरीक्षण साऱ्या विश्वाच्या दृष्टीनें तो करील. आपलें अस्तित्व या एकाच देहापुरतें अथवा चालू क्षणापुरतें नसून तें अनंत विश्वांत आणि अनंत काळांत विस्तार पावलें आहे, असेंहि त्याला वाटेल. बुद्धीची वाढ योग्य तऱ्हेनें झाल्यास तिचा विस्तार येथपर्यंत वाढल्याशिवाय रहावयाचा नाहीं. तिची अखेर याच विचारांत होईल. याकरतां आपल्या जीवितांतील बारीक सारीक कर्मेंहि विवेकी मनुष्यांनीं याच दृष्टीनें केलीं पाहिजेत. आजपर्यंत विवेकी पुरुष याच दृष्टीनें चालत आले आहेत. चालू क्षणाचा विचार प्रत्येक प्राणी करतो; पण त्याबरोबरच अनंत काळाचा आणि अनंत अस्तित्वाचा विचार त्याबरोबर जोडून देणें अवश्य आहे. अनंत अस्तित्व आणि व्यक्तीचें मर्यादित अस्तित्व यांचे परस्पर संबंध ज्या तत्वांनीं ठरविले जातात तीं तत्वें म्हणजे धर्म. या तत्वांच्या अनुरोधानें मनुष्य आपलीं कर्में करीत असतो, यावरून विवेकी मनुष्यप्राण्याला धर्मावांचून गत्यंतर नाहीं, हें उघड दिसून येईल. धर्मावांचून कोणतेंहि कर्म

त्याला करतां यावयाचें नाहीं. धर्मावांचून चालतां येईल अशी कोणतीहि परिस्थिति नाहीं, आणि जो नियम एका व्यक्तीपुरता खरा आहे, तोच व्यक्तिसमुदायाला म्हणजे सर्व मनुष्यजातीला लावण्यास हरकत नाहीं. ज्या समाजांत विवेकजागृति झाली असेल, त्यांत कोणत्याहि काळीं आणि कोणत्याहि परिस्थितींत धर्मशून्य जीवन शक्य नाहीं.

पशूंचा कळप आणि मनुष्यांचा समाज यांतलि फरक येथेंच आहे. आपण एकाकी नसून विस्तृत समूहाचे घटक आहों ही जाणीव मनुष्याच्या ठिकाणीं असते आणि पशूंच्या ठिकाणीं नसते. धर्म या शब्दाच्या व्याख्या निरनिराळ्या विद्वानांनीं निरनिराळ्या काळीं वेगवेगळ्या प्रकारच्या केल्या आहेत. धर्म म्हणजे परमेश्वरभक्ति; धर्म म्हणजे विश्वशक्ति आणि मनुष्य यांस जोडणारें सूत्र; धर्म म्हणजे मनुष्य आणि परमेश्वर यांस जोडणारा दुवा! अशा प्रकारच्या या व्याख्या आहेत. ज्या विश्वशक्तीवर आपलें बरें वाईट अवलंबून आहे, असें मनुष्यांस वाटतें, त्या विश्वशक्तीशीं असलेला आपला संबंध ज्या योगें अनुभवास येतो तो धर्म, अशीहि व्याख्या एका विद्वानानें केली आहे.

यावरून धर्माचें सार काय आहे, याबद्दल कोणालाहि शंका नाहीं, हें उघड दिसून येतें. प्राचीन काळच्या विद्वानांना हें अखेरचें सार समजलेलें होतें, आणि आजहि ज्यांची खरी माणुसकी लोपलेली नाहीं, त्यांच्या लक्षांत तें येतें. आपल्या आंवाक्याबाहेरची अशी विश्वशक्ति आपलें नियमन करीत असते, हा अनुभव प्रत्येक विचारी मनुष्याला आजहि येतो. हा अनुभव व्यक्त करण्याच्या वेगवेगळ्या पद्धति वेगवेगळ्या काळीं अस्तित्वांत असल्या तरी अनुभव तोच. यहुदी, ग्रीक, अथवा ब्राह्मण या सर्वांचें अखेरचें साध्य एकच होतें. बौद्ध धर्माचेंहि अखेरचें साध्य अनंत शक्तीशीं एकरूपता पावणें हेंच आहे. मनुष्याला जगांत जीं दुःखें प्राप्त होतात, त्यांचें मूळ त्याच्या मनोविकारांत असल्यामुळें प्रत्येकानें हे मनोविकार नाहींसे करून निर्वाण पद मिळवावें असें बौद्ध मत आहे. अशा रीतीनें जगांतील प्रत्येक धर्मानें वेगवेगळ्या पद्धतीनें अनंत शक्तीशीं असलेला मनुष्यमात्राचा संबंध व्यक्त केला आहे,

आणि आपल्या चालू वर्तणुकींत कशा तऱ्हेनें वागलें असतां हा संबंध अनुभवास येईल हेंहि दाखविलें आहे. ज्या धर्मांत हा संबंध स्पष्ट केलेला नाहीं तो पंथ वस्तुतः धर्म या नांवालाच योग्य नाहीं. मानवी प्रकृतिचें तें एक विकृत रूप आहे, असें म्हणावें लागेल. त्याचप्रमाणें अनंत शक्ति आणि मनुष्य यांच्यांतील सूत्र दाखवूनहि त्याच्या अनुभवाचें मार्ग एकादा धर्म बुद्धिबाह्य मार्गानें आंखूं लागला तर तोहि खरा धर्म नसून तें धर्माचें एक सोंग आहे, असें म्हणावें लागेल. मनुष्यानें आजपर्यंत मिळविलेल्या ज्ञानाशीं आणि त्याच्या विवेचक बुद्धीशीं धर्माचे मार्ग विसंगत असतां उपयोगी नाहीं. त्याचप्रमाणें अनंताशीं एकरूपता पावण्याचें मार्ग जो धर्म दाखवीत नाहीं, तोहि धर्म नव्हे. त्याचप्रमाणें कांहीं कोरडे सिद्धांत सांगून त्यावर अंध-विश्वास ठेवा, असें सांगणारा धर्महि खरा धर्म नव्हे. अनांताशीं असलेला मनुष्याचा संबंध दाखवून त्याशीं एकरूपता पावण्याचा बुद्धिगम्य मार्ग दाखाविणें हें धर्माचें खरें काम आहे. मनुष्याच्या बुद्धीशीं त्याचीं तत्वें विसंगत असूं नयेत आणि त्याच्या चालू ज्ञानाशींहि तीं मिळतीं असलीं पाहिजेत.

अगदीं धर्मशून्य अशा प्रकारचें जीवित कंठणारा असा एकहि मानवी समाज पूर्वकाळीं केव्हांहि अस्तित्वांत नव्हता आणि आजहि तसा समाज अस्तित्वांत नाहीं. तथापि अर्वाचीन शास्त्रांचे उपासक धर्म ही निरर्थक चीज आहे, असे कंठरवानें पुनःपुन्हां सांगत आहेतच. मोलीयर यानें मारून मुटकून वैद्यबोवा या नांवाचें एक प्रहसन लिहिलें आहे. त्यांतले सोंगाडे वैद्यबोवा मनुष्याचे यकृत डाव्या बाजूला असतें असें ठासून सांगतात, पण त्यामुळें उजव्या बाजूचा अवयव डाव्या बाजूला जातो, असें मात्र नाहीं. त्याचप्रमाणें धर्म नको नको अशी कितीहि ओरड अर्वाचिन शास्त्रोपासकांनीं केली तरी तो अद्यापीहि पूर्वींइतकाच जिवंत आहे. आणि आपलें पूर्वींचेंच काम पूर्वींच्याच जोमानें आजहि तो करीत आहे. मनुष्यजातीच्या अंतःकरणाचा गाभा आजहि त्याच्याच हातीं असून मुख्य कर्मप्रवर्तकहि तोच आहे. हृदयाच्या क्रियेवांचून जगणें मनुष्याला जसें शक्य नाहीं, त्याचप्रमाणें धर्मावांचून जगणें मनुष्यसमाजाला शक्य नाहीं. धर्माची

नांवें वेगवेगळीं असतील. त्यांच्या विवेचनपद्धति वेगवेगळ्या असतील. त्याचप्रमाणें काल स्थलादिक प्रसंगानें त्यांचें तत्वविवेचनहि वेगवेगळ्या स्वरूपाचें असूं शकेल, पण धर्माला मुळींच अस्तित्व नव्हतें असा काळ बुद्धियुक्त मनुष्यजातीच्या आस्तित्वांत आजपर्यंत केव्हांहि आला नव्हता.

धर्मग्लानीचा काळ प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासांत केव्हांना केव्हां येऊन गेला आहे, हें खरें आहे. ही ग्लानि कित्येक वळां इतक्या थराला पोहोंचलेली असते कीं, समाजनियमनाचें आपलें कार्य करण्याचें सामर्थ्य धर्माच्या आंगीं राहिलेलें नसतें आणि कित्येक वेळां तर त्याचें स्वरूप अगदींच विकृत झालेलें असतें. या सर्व गोष्टी खऱ्या असल्या तथापि अशी स्थिति केवळ तात्पुरती असते. अशा स्थितीचा काळ नियमादाखल नसून तो अपवादात्मक आहे. उपजणें, वाढणें, वृद्धत्व पावणें आणि मरणें या स्थिति सृष्टींतील प्रत्येक वस्तूला लागू आहेत, आणि त्या धर्मालाहि लागू असल्या तर त्यांत नवल नाहीं; तथापि कांहीं काळ लोपलेला धर्म पुनः नवा जन्म घेत असतो, आणि या नव्या जन्मांत त्याचें स्वरूप पूर्वींच्याहून अधिक विशद आणि अधिक पूर्ण असतें. भरभराटीचा काळ संपल्यानंतर वृद्धत्वाचा आणि निर्जीवपणाचा काळ प्रत्येक धर्माला प्राप्त होत असतो; पण यानंतर लवकरच तो धर्म पुन्हा अधिक स्पष्ट रूपानें जन्मास येतो. अशी स्थिति प्रत्येक धर्माची झालेली आहे. ब्राम्हणधर्माचा इतिहास पाहिला तरी तेथेंहि हाच प्रकार आढळून येतो. एका बाजूनें तो वृद्धत्व पावून मृत्युपंथाला लागला असतां दुसऱ्या बाजूनें अधिक पूर्ण स्वरूपांत बौध धर्म अवतरूं लागला होता. बौद्ध धर्माचें स्वरूप पूर्वींच्याहून अधिक स्पष्ट आणि सामान्य मनुष्यजातीस समजेल असें होतें. ग्रीक आणि रोमन धर्मांतहि असाच अवनतीचा काळ आला आणि त्याच्या पाठोपाठ खिस्तीधर्माचा उदय झाला. पुढें पोपगुरूंच्या भर अमदानींत मध्ययुगीन खिस्तीधर्म अवनतीस लागला तेव्हां धर्म सुधारणेची लाट जन्मास आली. यावरून धर्मग्लानीच्या पाठोपाठ धर्माच्या अधिक स्पष्टोन्नतीचा काळ येतो, हें उघड दिसतें. किंबहुना धर्मज्ञानाची वाढ, अवनति आणि उन्नति अशा आळीपाळीच्या परंपरेनेंच व्हावी, असा नियम

दिसतो. मनुष्यसमाजाची स्थिति आणि मानवी मनोभूमिकेची रचना पाहतां अशी चढती उतरती व्हावी हें निसर्गास सोडून नाहीं, असें आपल्या लक्षांत येईल. अगदीं रानटी अवस्थेंतील धर्म पाहिला तरी परमेश्वरासमोर सर्व मनुष्यें सारखींच आहेत, हें तत्व तो शिकवीत असतो. आणि स्वतःचे मार्ग आंखतांना मोठ्या माणसांसाठीं अमुक धर्म आणि इतरे जनासाठीं अमुक असा भेदभाव तत्वदृष्ट्या तो कधींच करीत नाहीं. परमेश्वरापुढें सर्व माणसें सारखींच क्षुद्र आहेत, असें तो सांगतो. यामुळें सर्वत्र समतेचें नातें आरंभापासूनच त्यानें गृहित केलेलें असतें. अगदीं रानटी जातींच्या क्षुद्र धर्मापासून तों उच्चतम धर्मापर्यंत सर्वत्र हीच स्थिति आढळून येईल; पण विचारसृष्टींत हें समतेचें नातें कितीहि मान्य होण्यासारखें असलें, तरी आचारसृष्टींत त्याला अस्तित्व नाहीं, हें कबूल केलें पाहिजे. सर्व मनुष्यें परस्परांस सारखींच समजतात, अशी स्थिति व्यवहारांत आढळून येत नाहीं. अशा स्थितीला पूर्वकाळीं अस्तित्व नव्हतें आणि सांप्रतहि तें नाहीं. समाजांत कांहीं माणसांना मोठेपणा अथवा विशिष्ट हक्क यांची प्राप्ति झालेली असते आणि समाजाचा बराचसा भाग त्याच्या तळाशीं खडत असतो. अशा स्थितींत समाजाच्या शिरोभागीं असणारे लोक आपले हक्क कायम रहावेत, म्हणून धर्मतत्त्वांची मांडणी आपल्याला सोईस्कर अशा रीतीनें करीत असतात. समाजांतील असमतेमुळें ज्यांचा फायदा झालेला असतो आणि ही असमता ज्यांच्या पथ्यावर पडलेली असते, असे लोक समतेचें तत्त्व लपवून ठेवण्याची धडपड करीत असतात आणि तत्त्वांचें स्वरूपहि विकृत करून टाकतात. प्रत्येक धर्माच्या अभ्युदयाच्या काळीं हा प्रकार घडून आला आहे. समाजांतील अधिकारी वर्ग धर्मग्लानीचें कार्य बुद्धिपूर्वक करतो असें नाहीं, तर समाजांतील श्रीमंत आणि सत्ताधीश यांच्या हातांतील सत्ता जाऊं नये म्हणून असमतेच्या स्वरूपाला धर्माचाहि पाठिंबा आहे, असें भासविण्याचा यत्न कांहीं लोक करूं लागतात. अशा रीतीनें समाजाचें नेतृत्व ज्याच्या हातीं असतें तोच धर्माचें विकृत स्वरूप इतरेजनापुढें मांडीत असतो. असें करण्यांत आपण कांहीं पाप करीत आहों, हें त्याच्या स्वप्नींहि नसतें. असें करणें न्याय्य

आहे, असेंहि त्याला वाटत असतें. अशा रीतीनें या विकृत तत्वांचा प्रचार सामान्य जनतेंत झाला, म्हणजे वरच्या वर्गाला नमून राहणें हाच आपला खरा धर्म आहे, असें बाळकडू आरंभापासूनच त्याला मिळते.

मनुष्याच्या कर्मशीलतेचीं तीन कारणें आहेत. भावना, विवेचक बुद्धि आणि अंतःसूचना. यांपैकीं कोणत्याना कोणत्या कारणानें कर्म करण्याकडे मनुष्याची प्रवृत्ति होत असते. एकादी इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न झाली म्हणजे तिची तृप्ति व्हावी तितक्याच हेतूनें कर्म करण्यास तो प्रवृत्त होतो. दुसऱ्या कितीएक प्रसंगीं विवेचकबुद्धीनें कर्माच्या बऱ्या वाईट परिणामाची निवड करून तो कर्म करीत असतो. कोणतें कर्म कार्य आणि कोणतें त्याज्य याची निवड तो अगाऊ करतो. नुसत्या भावनेनें तो कर्म करतो, तेव्हां तें कार्य कीं अकार्य याचा विचार तो करीत नाहीं. याशिवाय कित्येक प्रसंगीं दुसऱ्यांच्या अथवा स्वतःच्या अंतःसूचनेवरून तो कर्म करूं लागतो. येथें त्याला स्वतःला कांहीं इच्छा असते असें नाहीं, अथवा त्या कार्याच्या बऱ्या वाईटाचाहि विचार तो करीत नाहीं. मनुष्याच्या सामान्य जीवनक्रमांत अशा तीन प्रकारच्या कर्मप्रेरक शक्ति त्याच्या मनांत कार्य करीत असतात. भावनेनें त्याची प्रवृत्ति कर्माकडे होते. विवेचक बुद्धीनें आजुबाजूंच्या परिस्थितीचें परीक्षण करून आणि पूर्वानुभव आणि पुढील आशा हीं लक्षांत घेऊन तें कर्म करावें कीं नाहीं याचा निश्चय तो करतो. मनुष्य भावनाशून्य झाला तर कोणतेंच कर्म तो करणार नाहीं. विवेचक बुद्धीचे अस्तित्व त्याच्या ठिकाणीं नसतें तर अविचारपणें भलभलतीं कर्में करून स्वतःस आणि लोकांस तो शुद्ध उपद्रवरूप झाला असता. लोकांच्या अथवा स्वतःच्या चित्ताच्या अंतःसूचनांचा पूर्ण अभाव त्याच्या ठिकाणीं असता तर प्रत्येक वेळीं बारीक सारीक कर्मांतहि विवेचक बुद्धीची सल्ला घेणें त्याला भाग पडलें असतें. आणि अशा रीतीनें कोणतेंच कर्म लवकर आणि सरळपणें त्याच्या हातून पार पडलें नसतें. यावरून आपल्या सामान्य जीवनांतहि या तीन कर्मप्रेरक शक्तींची जरूर केवढी आहे, हें लक्षांत येईल. एकादा मनुष्य एका जागेहून दुसऱ्या जागीं जातो तेव्हां

दुसऱ्या जागीं जावें, ही भावना प्रथम उत्पन्न झालेली असते. या त्याच्या विचाराला विवेचक बुद्धीचा पाठिंबा, मदत आणि कर्मसाधनें हीं मिळतात. अमक्या रस्त्यानें जावें हें तारतम्य विवेचक बुद्धि त्याला शिकविते. या दोन शक्तींची घटना पूर्ण झाली म्हणजे त्याच्या शरीराचे स्नायू हालचाल करूं लागतात आणि अगाऊ दर्शविलेल्या मार्गानें तो चालूं लागतो. अशा रीतीनें चालण्याची क्रिया सुरू झाली म्हणजे तिजबरोबर तिसऱ्या कर्मप्रेरक शक्तीचें कार्य सुरू होतें. यावेळीं भावना आणि विवेचक बुद्धि या दोन शक्ति झोंपीं जातात आणि अंतःसूचनेस अनुसरून तो झपाझप पावलें टाकीत असतो. ही तिसरी प्रेरक शक्ति येथें जागृत नसती तर पुढें पाऊल टाकूं कीं नको, याचा विचार प्रत्येक पावलाला त्याला करावा लागला असता. मनुष्याच्या सर्व कर्मांत या तिन्ही शक्तींचें कार्य दृग्गोचर होत असतें. आणि सामान्य कार्याचा हा नियम धर्मकार्यालाहि तितकाच लागू आहे. अनंत वस्तूंशीं अथवा परमेश्वराशीं आपला सूत्र संबंध जोडावा ही भावना प्रथम उत्पन्न होते. या भावनेला मूर्त रूप कसें द्यावें हा विचार विवेचक बुद्धि निश्चित करते. आणि नंतर अंतःसूचनेप्रमाणें मनुष्य कर्मप्रवृत्त होतो. जोंपर्यंत धर्मतत्त्वांचें स्वरूप विकृत झालेलें नसतें तोंपर्यंत या तीन प्रेरक शक्तींचें कार्यहि सुरळीतपणें चालतें. पण या तत्त्वांना विकृत स्वरूप प्राप्त झालें म्हणजे या कार्यांत अडथळा उत्पन्न होऊं लागतो. भावना आणि विवेचक बुद्धि या दोन शक्ति निर्बळ होत जाऊन अंतः-प्रेरणा शक्ति अधिक जोरावते. येथें दुसऱ्यांच्या प्रेरणेनेंहि मनुष्य कर्मप्रवण होऊं लागतो. त्याचें मन दुबळें झालें असल्यामुळें परक्यांच्या प्रेरणा तें सहजपणें ग्रहण करूं लागतें. अशा स्थितींत आपमतलबी कर्मसाधक लोक आपला फायदा करून घेतात. नानाप्रकारांनीं त्याच्या मनाच्या प्रवाहावर आपल्या सूचनांचा परिणाम ते घडवून आणतात. त्याला नानाप्रकारच्या दंतकथा आणि भाकड गोष्टी सांगाव्या, नानाप्रकारचीं चित्रें त्याला दाखवावीं, आपल्या इच्छेनुरूप रचलेलीं गाणीं त्याजकडून ऐकवावीं आणि स्वतःच्या फायद्याला अनुकूल अशीं दृष्यें त्याला दाखवावीं, अशा प्रकारांनीं त्याचें मन हें कार्यसाधक लोक वश करतात. मोहिनी विद्येचाच हा

एक प्रकार आहे. त्याचें मन दुबळें झालें असल्यामुळें दुसऱ्यांच्या प्रेरणांचें ग्रहण सौकर्यानें करण्याजोगी अनुकूल परिस्थिति तेथें आधींच उत्पन्न झालेली असते.

प्राचीन काळच्या सर्व धर्मांत असा प्रकार घडून आला आहे. उच्च तत्त्वमय ब्राह्मणधर्म अशाच तऱ्हेनें अवनत होत गेला. शेंकडों प्रतिमांचें जड पूजन त्यांत शिरलें. धूपदीपादि कोरडे बाह्योपचार देवळांतून होऊं लागले आणि विश्वव्यापी उच्च तत्त्वांची ओळख लोक विसरले. प्राचीन हिब्रू धर्माचीहि गत अशीच झाली. मूळच्या उच्च तत्त्वांचा लोप होऊन बाह्य विधि मात्र लोक आचरूं लागले. बुद्धानें शिकविलेलीं तत्त्वें कालांतरानें नाहींशीं होऊन बौद्ध विहारांत बुद्धाच्या प्रतिमांची स्थापना झाली. दिखाऊ आचारांची सुरुवात झाली आणि उच्च बौद्ध धर्माचें रूपांतर लामा धर्मांत झालें.

प्राचीन काळचे धर्म ज्यांच्या हातीं होते त्यांनीं सामान्य जनतेचीं मनें प्रथम इतकीं दुबळीं केलीं कीं, हे धर्मोपाध्याय सांगतील तें खरें असें तिला वाटूं लागलें. मनाच्या दुर्बळतेमुळें विवेचक बुद्धि अर्धीमुर्धी झोंपीं गेली. अशा स्थितींत या धर्मोपाध्यायांनीं आपल्या फायद्याचीं मतें सुलभपणें सामान्य जनतेच्या गळीं उतरविलीं. परमेश्वर आणि मनुष्य यांत कोणी तरी मध्यस्थ असाल्याशिवाय मनुष्याला मुक्तिमार्ग दिसणार नाहीं, हें या उपाध्याय जातींचें पहिलें तत्व होतें. ही मध्यस्थाची कामगिरी स्वतः त्याजकडेच होती, हें सांगावयास नकोच. ही कामगिरी करणारे लोक अलौकिक पुरुष असून नानाप्रकारचे चमत्कार त्यांनीं घडवून आणले; हें त्यांचें दुसरें मत. तसेंच आपल्या कांहीं विशिष्ट मंत्रांच्या बडबडीनें अथवा लेखानें परमेश्वरास आपण वश करूं शकतो, आणि हे मंत्र कधींच फुकट जात नाहींत हें या वर्गाचें तिसरें मत. साऱ्या जुन्या धर्मांतील उपाध्याय वर्ग पाहिला तर हीं तीन मतें त्या सर्वांनाच सारखीं पटल्यासारखीं दिसतात. या मतांचा हळूहळू प्रचार करून सामान्य जनतेचीं मनें त्यांनीं भारून टाकलीं. एवढी परिस्थिति सिद्ध झाली म्हणजे धर्माचें रूप विकृत व्हावयास आपोआपच सुरुवात होते. मनुष्यांतील समतेचें नातें दडी मारून बसूं लागतें. अखेरीस

या मूळ तत्त्वांचें रूपांतर इतकें होतें कीं, असमता हाच निसर्गसिद्ध कायदा हें मत त्याच्या जागीं येतें. या मताचा जम पक्का बसला कीं, जातीभेदास सुरुवात होते. मी श्रेष्ठ, तूं कनिष्ठ; मी पुण्यवान् तूं पापी; मी धर्मवान् तूं धर्मभ्रष्ट; मी आचारभीरु तूं आचारहीन; असल्या भेदांचा सुकाळ जनतेंत होतो. खिस्ती धर्मात असेच भेद शिरले आणि अजूनाहि शिरत आहेत. समतेच्या तत्त्वाला खिस्ती धर्मात आज अखेरची मूठमाती मिळाली आहे. धर्मोपाध्याय आणि इतर लोक एवढा एकच भेद तेथें नसून दुसरे अनेक सामाजिक भेद तेथें आतां घर करून राहिले आहेत. सत्ताधाऱ्यांचा वेगळा स्वतंत्र वर्ग बनला असून सामान्य जनतेनें या वर्गाच्या ताब्यांत राहिलें पाहिजे, असें झालें आहे. सत्ताधारी वर्ग आणि इतर लोक हा भेद परमेश्वरनिर्मित आहे, असें लोक मानूं लागले आहेत.

खिस्ती धर्मोपाध्यायांनीं खिस्ती धर्माचें स्वरूप आज पूर्ण विकृत करून टाकलें आहे. धर्मोपाध्याय आणि इतर लोक एवढा एकच भेद आज खिस्ती धर्मात नसून श्रीमंत आणि गरीब, धनी आणि गुलाम असल्या प्रकारचे भेदहि खिस्ती भिक्षुकांनीं पक्के करून ठेवले आहेत. इतर जुन्या धर्मात पूर्वीं जसा प्रकार घडला तोच प्रकार खिस्ती धर्मात आज घडला आहे. खिस्ती धर्माचीं मूळ तत्वें आणि त्यांचा आचार यासंबंधीं प्राचीन धर्मग्रंथांत जें विवरण केलें आहे, त्यांत धर्माची ही भावी अवनति थोडीशीं सूचित झाली होती. ही अवनति कशी घडेल याबद्दल अगाऊ सूचना आणि या अवनतीच्या परिहाराचे उपाय या ग्रंथांत आधींच नमूद करून ठेविलेले आहेत. कोणीहि कोणाला गुरुस्थानीं मानूं नये अशी एक सूचना या ग्रंथांत आढळते. त्याचप्रमाणें धर्मग्रंथ वाचतांना त्यांतील नुसत्या शब्दार्थाकडे लक्ष न देतां त्यांतले सार घ्यावें, अशी दुसरी सूचना आहे. त्याचप्रमाणें नुसत्या गतानुगतिकतेनें जुन्या दंतकथावर आणि आचारनियमावर कोणीहि अंधविश्वास ठेवूं नये अशी तिसरी सूचना या ग्रंथांत नमूद केली आहे. आतां येशू खिस्तानें केलेल्या चमत्कारांचें वर्णन पवित्र शास्त्रांनीं केलें आहे. आणि हे चमत्कार खिस्तानें केले नाहींत, असें त्यांनीं स्पष्ट म्हटलेलें नाहीं हें खरें; तथापि त्या शास्त्रांचें एकंदर स्वरूप

आणि त्यांनीं केलेल्या तत्वांची मांडणी ही लक्षांत घेतां आपल्या तत्वसिद्धींची भिस्त चमत्कारावर न ठेवतां खिस्तानें ती अंतरगत पुराव्यावरच ठेवली होती, असें स्पष्ट दिसून येतें; त्याचप्रमाणें सर्व मनुष्यें समान असून सर्वांत बंधुत्वाचें नातें आहे, आणि तीं सारीं एकाच परमेश्वराचीं लेंकरें आहेत, हें आद्य तत्व खिस्तानें कंठरवानें सांगितलें आहे.

याप्रमाणें खिस्तप्रणीत धर्माची अवनति भविष्यत् काळीं होऊं नये म्हणून अगाऊ तजवीज त्यानें करून ठेवली होती. पण मनुष्याचें मन अत्यंत तरल आहे. स्वार्थाच्या युक्त्या कसल्याहि अडचणींत त्याला नेहमीं सुचत असतात. पवित्र शास्त्रानें दिलेल्या आज्ञांना बगल मारून पलीकडे जाण्याची युक्ति, या मानवी मनाला सुचली. पवित्र शास्त्रानें सांगितलेलें समानतेचें तत्व त्यानें निर्माल्यवत् करून टाकलें. पवित्र शास्त्रांतील तत्वें मागें पडून धर्मगुरु पुढें सरले. हे धर्मगुरु कधीं चुका करीत नाहींत अशा मतांचा प्रचार सुरू झाला. या धर्मगुरूनीं एक नवा पंथ उभारला आणि आपणास उपयोगी पडतील अशा दुसऱ्या कांहीं माणसांना आपल्या पंखाखाली घेऊन या नव्या मतांचा प्रचार त्यांनीं जोरानें सुरू केला.

मूळच्या पवित्र शास्त्रांत नवा नवा क्षेपक मजकूर घुसूं लागला. आकाशगमन करतेवेळीं खिस्तानें कांहीं लोकांच्या मस्तकीं आपला वरदहस्त ठेवून त्यांना त्यानें गुरुपणाचें दान केलें अशा गप्पा पसरूं लागल्या. परमेश्वरी ज्ञानाचा सारा गड्डा अशा रीतीनें या गुरूंनीं एका सपाट्यास प्राप्त करून घेतला. कोण पुण्यवान् आणि कोण पापी हें ठरविण्याचा मक्ता त्यांजकडे आला. त्याचप्रमाणें आपल्या अंगीं असलेलें सामर्थ्य आपल्या पट्ट शिष्यास आपण देऊं शकतों, असेंहि त्यांनीं जनतेंत पसरविलें. या साऱ्या कारवाईचा परिणाम व्हावयाचा तसाच झाला. खिस्तानें अगाऊ देऊन ठेवलेल्या सूचना मागें पडल्या. आपलीं तत्वें विकृत होऊं नयेत म्हणून त्यानें अगाऊ घेतलेली खबरदारी फुकट गेली. सर्व धर्म या उपाध्याय वर्गाच्या हातीं गेला. ते म्हणतील तें प्रमाण होऊं लागलें. त्यांच्या वचनावर कोणी आक्षेप घेऊं नयेत आणि त्यांचें वचन विवेचक बुद्धीला न पटलें तरी सर्वांनीं तें मानलें पाहिजे अशी स्थिति प्राप्त झाली. मनुष्याची बुद्धि कोती

आणि भ्रष्ट ठरली. पवित्र शास्त्रांच्या वचनांचा अर्थ सारासार विचार-शक्तीला पटण्यासारखा करण्याऐवजीं स्वतःस पथ्यकर अशा टीका या धर्म-गुरूंनीं निर्माण केल्या.

अशा रीतीनें धर्माचें रूप विकृत करण्याचा प्रयत्न पूर्वींच्या तिन्ही पद्धतींनीं खिस्ती धर्माच्या बाबींतहि करण्यांत आला. धर्माधिकारी असा एक स्वतंत्र वर्ग निर्माण झाला. चमत्कार करण्याचें सामर्थ्य या वर्गाच्या अंगीं आहे, असा समज लोकांत पसरला, आणि तो सांगेल तो शास्त्रार्थ असें लोक मानूं लागले. परमेश्वर आणि मनुष्य यांच्यांत कोणी तरी योग्य मध्यस्थ असल्याशिवाय कोणास मुक्ति मिळणार नाहीं, हें धर्माध्यक्षाचें वचन सिद्धांतरूप होऊन बसलें. फार काय पण पवित्र शास्त्रांचा पवित्रपणाहि या भिक्षुकवर्गाच्या मतानेंच सिद्ध होऊं लागला.

अशा रीतीनें बाकीच्या सर्व धर्मांप्रमाणें खिस्ती धर्महि विकृत झाला. त्यांत विशेष हें कीं, इतर धर्मांहूनहि खिस्ती धर्माची विकृति अधिक जोरदार झाली आहे. कारण मनुष्यांतील समानतेचें नातें खिस्तानें जितकें ठासून प्रतिपादिलें आहे, तितक्या स्पष्टपणें तें दुसऱ्या धर्मानें सांगितलें नव्हतं. यामुळें हें तत्व मागें टाकण्याचे प्रयत्नहि तितक्याच जोराचे हवे होते आणि खिस्ती उपाध्याय वर्गानें ते तसे केलेहि. खिस्ताचा विशाल धर्म त्यांनीं पंथरूपी सूत्रानें घट्ट जखडून टाकला. आणि हें जखडण्याचें काम पूर्वींच्या इतर धर्मांतील भिक्षुक वर्गाहूनहि अधिक पक्केपणें त्यानें केलें. यामुळें आज आपल्या कानीं पडणारीं खिस्ती धर्माचीं तत्त्वें विवेचक बुद्धीला, आपल्या चालू ज्ञानाला आणि नीतीला इतकीं सोडून आहेत कीं, असला प्रकार जगांतील इतर कोणत्याहि धर्मांत आढळून यावयाचा नाहीं. धर्म म्हणून ज्या कांहीं गोष्टी आजचा खिस्ती उपाध्याय वर्ग शिकावितो, त्यांत किती मूर्खपणा भरला आहे, याचें विवेचन सुद्धां करण्याचें कारण नाहीं. जुन्या करारांत तर असला मूर्खपणा जिकडे तिकडे भरला आहे. सूर्याच्या उत्पत्तीच्या अगोदर प्रकाशाची उत्पत्ती, जगाच्या उत्पत्तीबद्दलच्या भलभलत्या दंतकथा, परमेश्वराच्या हुकुमा-वरून मुलाबाळांची आणि सामान्य जनतेची झालेली कत्तल; असल्या

गोष्टींचा मूर्खपणा सिद्ध करण्याचें कांहीं कारण आहे काय ? भाकरीचा तुकडा म्हणजे खिस्त देवाचें मांस आणि दारू हें त्याचें रक्त, असें मानून हा पुरोडाश भक्षण करणें म्हणजे स्वतःच्या परमेश्वराला स्वतःच खाऊन स्वतःच्या आंगीं पावित्र्य आलें असें मानणें, याच्याइतका शुद्ध मूर्खपणा जगांत दुसरा कोणताहि नाहीं. असें व्हालटेअर म्हणत असे, तें किती खरें आहे बरें ? पण याहूनहि अधिक मूर्खपणाच्या गोष्टी नव्या कराराच्या द्वारें हल्लींचा खिस्ती उपाध्याय वर्ग लोकांस शिकवीत असतो. परमेश्वराची आई कौमार्यांतच मातृपद पावली, आकाश उघडलें आणि त्यांतून शब्द झाला, खिस्त आकाशांत उडाला आणि तेथेंच कोठें तरी आपल्या बापाच्या उजव्या हाताकडे बसला आहे. परमेश्वर एक आहे आणि तीनहि आहे, ब्रह्मा, विष्णु आणि शिव अशा स्वरूपाची ही त्रयी नसून एकाच वेळीं एक आणि तीन अशा मूर्खपणाच्या स्वरूपाची आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आडामनें केलेल्या पातकाचा सूड उगविण्यासाठीं परमेश्वर सर्व माणसांना शिक्षा करतो आणि मग या पापनिवृत्तीसाठीं आपला एकुलता एक पुत्र जगांत पाठवितो. या आपल्या पुत्राचा वध करून माणसें अधिक पापी बनतील हें त्याला आगाऊच ठाऊक असतें. अशा रीतीनें केलेल्या पापाचें क्षालन बापतिस्म्यानें होईल, असें खिस्ती उपाध्यायवर्ग सांगतो. बापतिस्मा म्हणजे काय, तर या मूर्खपणाच्या दंतकथांवर विश्वास ठेवणें आणि हा गाळीव मूर्खपणा जो मानणार नाहीं, तो कायमच्या शिक्षेला पात्र होईल, असें या भिक्षुक वर्गाचें सांगणें आहे.

या गोष्टी बाजूला ठेवल्या तरी प्रत्यक्ष धर्माचारांच्या बाबतींत इतक्या मूर्खपणाच्या गोष्टी शिरल्या आहेत कीं, त्यांजवर कोणाचाहि विश्वास बसणें शक्य नाहीं. पूजनासाठीं संतांचे अवशेष, देवांच्या आईच्या प्रतिमा, संतांच्या प्रतिमा, त्यांच्या विशेष प्रकारच्या प्रार्थना, इत्यादि अनेक गोष्टी खिस्ताच्या मूळ तत्त्वाशीं इतक्या विसंगत आणि नीतितत्वांना सोडून आहेत कीं, त्याजवर कोणाहि सरळ बुद्धीच्या माणसाचा विश्वास बसणें शक्य नाहीं. कांहीं तरी शब्द मनुष्य तोंडानें बडबडेल; पण असल्या अर्थशून्य बडबडिवर त्याचा विश्वास बसणें शक्य आहे काय ? ' जग निर्माण होऊन

सहा वर्षें झालीं, खिस्त आकाशांत उडाला, परमेश्वर एक आणि तीन आहे, यांवर मी विश्वास ठेवतों ' असें कोणी तोंडानें म्हटलें तरी या अर्थशून्य शब्दावर कोणाचा खरा विश्वास बसेल काय ? उपाध्यायप्रणीत सांप्रतचा खिस्ती धर्म आणि मनुष्याची विवेकबुद्धि यांत अशा रीतीनें पूर्ण फारकत झाली असल्यामुळें स्वतःस खिस्ती म्हणविणारे पुष्कळसे लोक कशावरच विश्वास ठेवीनातसे झाले आहेत. तोंडानें त्यांनीं कांहीं सांगितलें, तरी आपण बोलतों त्यावर आपली खरी श्रद्धा आहे, अशी ग्वाही त्यांचें मन त्यांना देत नाहीं. चालू खिस्ती धर्माचें हेंच विशेष स्वरूप आहे.

अशा रीतीनें वस्तुतः कशावरच विश्वास नसतांहि तो आहे, असें भासविण्याचा यत्न पुष्कळ लोक करीत असतात. केवळ लोकांपुरताच नव्हे तर स्वतःलाहि फसविण्याचा यत्न ते करतात. आणि अशी आपल्या मनाची समजूत करण्याकरितां पॉल या संताच्या नांवावर दडपून दिलेल्या एका वचनाचा आधारहि ते दाखवितात. पण वास्तविक हें वचनहि पॉलचें नव्हे आणि त्याच्या मूळ संहितेचा अर्थहि चुकीचा केलेला आहे.

श्रद्धा म्हणजे आशा अथवा अज्ञानजन्य विश्वास असा पॉलच्या वचनाचा उपाध्याय वर्गानें अर्थ केला आहे; पण श्रद्धा म्हणजे अंधविश्वास नव्हे. श्रद्धा ही जीवात्म्याची एक विशिष्ट अवस्था आहे. जगांत अमुक प्रकारें वागणें हें माझें आद्य कर्तव्य आहे अशी अचल जाणीव उत्पन्न होणें, याचें नांव श्रद्धा. अमुक एक प्रकारें वागलें असतां पुढें कांहीं तरी प्राप्ति मला होईल, असल्या अंध अनुमानावर कांहीं गोष्टी डोळे मिटून करणे, ही श्रद्धा नव्हे. धर्मावर ज्याची खरी श्रद्धा आहे, तो पुढच्या बक्षिसाच्या आशेनें कोणतीहि गोष्ट करीत नसतो, तर जगांत कोणती कामगिरी आपणाकडे आली आहे, याचा विचार करून तो पार पाडण्यासाठीं कर्तव्य म्हणून तो वागत असतो. सामान्य लौकिकांत एकादा शुद्ध मजूर असतो, दुसरा एकादा कलाकौशल्याचा धंदा करींत असतो, तिसरा व्यापारी असतो आणि चौथा सरकारी कामगार असतो. अशा रीतीनें समाजांतील आपआपल्या कामगिरीचें निश्चित स्वरूप त्यांना कळलें म्हणजे त्यांना अनुरूप अशा रीतीनें ते आपोआपच वागत असतात. अशाच रीतीनें

सामान्यतः जगांतील आपली पायरी ज्यांनीं निश्चित केली असेल, ते लोक तदनुरूप आपली वागणूक ठेवतात. माझें राष्ट्र परमेश्वराचें लाडकें आहे आणि त्या दृष्टीनें मजकडे कांहीं विशेष कामगिरी आली आहे, असें ज्याला मनापासून वाटत असेल तो त्या रीतीला अनुसरून आपली वागणूक ठेवील. एकाद्याचा विश्वास जन्मांतरावर असेल तर आपला पुढील जन्म अधिक सुखाचा जावा, या आशेनें चालू जन्मीं तो वागेल. या एकाच जन्मांत मिळेल तें सुख भोगून घ्यावें, कारण मानवी जीवित यदृच्छेनें एकत्र झालेल्या परमाणूंचें बनलें आहे असा ज्याचा समज असेल, त्याची वागणूक पाहिल्या दोघांहूनहि भिन्न राहील हें उघड आहे.

अशा रीतीनें निरनिराळ्या लोकांची वागणूक भिन्न भिन्न प्रकारची होते, त्याचें कारण हेंच कीं, त्यांची श्रद्धा परस्परांहून भिन्न असते आणि त्या श्रद्धेप्रमाणें त्यांची प्रत्यक्ष वागणूक असते. या विवेचनावरून श्रद्धा या शब्दाचा अर्थ समजून येईल. श्रद्धा आणि धर्म यांत मूळतः कांहींच फरक नाहीं. श्रद्धेचें रूपांतर प्रत्यक्ष आचारांत झालें म्हणजे त्याला आपण धर्म म्हणतो. यावरून श्रद्धा म्हणजे अंतर्गत भावना आणि धर्म म्हणजे तिचें बाह्य स्वरूप. ज्या अंतरगत सूत्रानें मनुष्य विश्वशक्तीशीं बांधला जातो, तें सूत्र म्हणजे श्रद्धा आणि या श्रद्धेला अनुसरूनच त्यांचें प्रत्येक कर्म होत असतें. हीच श्रद्धा त्याला कर्मप्रवृत्त करते. यामुळें खरी श्रद्धा मनुष्याच्या सामान्य विवेचक बुद्धीला सोडून असत नाहीं अथवा चालू ज्ञानाशींहि ती विसंगत असत नाहीं. सामान्य मानवी ज्ञानाच्या आटोक्याबाहेर असेल तें खरोखर धर्मज्ञान होऊं शकत नाहीं. उलटपक्षीं श्रद्धेचें स्वरूप वादविवादानें सिद्ध करतां न आलें, तरी विवेचक बुद्धीला ती सोडून असणें शक्य नाहीं. अशा प्रकारच्या श्रद्धेला अनुसरून जो जीवनक्रम आखलेला नसतो तो सामान्य बुद्धीशीं आणि चालू ज्ञानाशीं विसंगत होतो.

कोणत्याहि प्राचीन धर्माच्या प्रवर्तकांचें सांगणें असेंच होतें. बुद्धीला सोडून कोणतेंहि तत्त्व त्यांनीं सांगितलें नाहीं. सामान्य मनुष्याच्या विवेचक बुद्धीला पटेल अशाच रीतीनें धर्मतत्वांचें कथन त्यांनीं केलें आहे.

मनुष्याला मनुष्यत्व प्राप्त होईपर्यंत अनेक खालच्या योनींतून यावें

लागलें आहे, असें हिंदुधर्माचें मत आहे आणि या तत्वाची मांडणी बुद्धिगम्य मार्गानें त्यानें केली आहे. या मूळ श्रद्धेच्या अनुरोधानेंच विश्वांतलि पुष्कळ कोड्यांचा उलगडा त्यानें केला आहे.

त्याचप्रमाणें जन्मास येणें, हेंच मूळ पातक आहे, याकरतां निर्वाणांत लीन होणें हेंच आपलें अखेरचें कर्तव्य आहे, असें समजणारा बौद्ध धर्महि बुद्धीच्या पलीकडील गोष्टीवर अंध विश्वास टाकीत नाहीं. आपल्या श्रद्धेला अनुसरून बुद्धिगम्य मार्गानें आपल्या तत्वांची मांडणी तो करतो.

अशाच रीतीनें जो ख्रिस्ताचा भक्त आहे, तो समानतेच्या तत्वावर खरी श्रद्धा ठेवतो. सर्व मनुष्यांचा परमेश्वर हाच पिता आहे आणि सर्व मनुष्यें त्याचीच लेंकरें असून त्या सर्वांत पूर्ण बंधुत्वाचें नातें आहे, या श्रद्धेनें चालणारांचेंच जीवन मंगलमय होईल, अशी ज्याची खरी श्रद्धा असेल, तोच खरा ख्रिस्तानुयायी होऊं शकेल. अशा रीतीनें हे सारे धर्म बुद्धिवादानें सिद्ध होऊं शकत नसले, तरी ते बुद्धीशीं विसंगत नाहींत. उलटपक्षीं मानवी जीवनांतील कोडीं ते सुसंगतपणें उलगडून दाखवितात. त्यांच्या अभावीं पुष्कळशा घटना आपणास परस्परविरोधी आणि विवेचक बुद्धीशीं विसंगत अशा वाटल्या असत्या. विश्वशक्तीशीं मनुष्याचा नित्य संबंध काय आहे, हें प्रत्येक धर्मानें आपापल्यापरी निश्चित केलें आहे. आणि या संबंधाला अनुरूप अशी प्रत्यक्ष वागणूक ठेवण्याचा उपदेशाहि प्रत्येक धर्मानें केला आहे. याकरतां विवेचक बुद्धीला सोडून कोणी कांहीं सांगितलें अथवा अर्थशून्य बडबड केली, तर ती श्रद्धा या नांवाला पात्र होत नाहीं. तो प्रकार श्रद्धेच्या अगदीं उलट होईल. कांहीं तरी अर्थशून्य बडबड करून परमेश्वराला आपल्या इच्छातृप्तीला अनुकुल करुन घेऊं पाहणे, ही श्रद्धा नव्हे. श्रद्धा उलटी झाली म्हणजे तिच्या ठिकाणीं लोभाचें स्वरुप उघड दिसूं लागतें. परमेश्वरानें आपलें नौकर बनावें, ही भावना तेथें उत्पन्न होते. अशी उलटी श्रद्धा परमेश्वराला आपला हस्तक करूं पाहते; पण खरी श्रद्धा मनुष्याला परमेश्वराचा हस्तक बनविते. परमेश्वराच्या इच्छेला अनुसरून वागणें हें माझें आद्यकर्तव्य आहे, ही भावना खरी श्रद्धा मनुष्याच्या ठिकाणीं उत्पन्न करते.

मनुष्याला ती परमेश्वराचा चाकर बनविते. ज्या श्रद्धेनें मनुष्य परमेश्वराचा चाकर बनतो ती श्रद्धा आजच्या माणसाच्या आंगीं नाहीं, येवढेंच नव्हे तर तिच्या स्वरूपाची नुसती कल्पनाहि त्यांच्या बुद्धीला होत नाहीं. उपाध्यायानें सांगितलेलीं स्तोत्रें तोंडानें बडबडणें आणि अशा बडबडण्यानें आपल्या साऱ्या इच्छा परमेश्वर तृप्त करील असें मानणें, हीच श्रद्धा असें त्यांना वाटतें.

साऱ्या जगभर आज हीच वस्तुस्थिति आढळून येत आहे. मानव प्राणी श्रद्धाहीन बनला आहे. उपाध्यायप्रणीत धर्मानें घातलेल्या भुरळींतून जो श्रीमंत अथवा सुशिक्षित वर्ग मुक्त झाला आहे, त्याची श्रद्धा कशावरच नाहीं. श्रद्धा म्हणजे मूर्खपणा अशी श्रद्धेची व्याख्या तो करतो. सामान्य मनुष्यवर्गाला उच्च वर्गीयांच्या पायाखालीं ठेवण्याचें साधन श्रद्धा हें एक आहे, असें त्याला वाटतें. या मूठभर वर्गाला वगळलें असतां जो लक्षावधि लोकांचा मोठा वर्ग शिल्लक उरतो तो बहुशः दरिद्री आणि अक्षरशत्रु आहे. हा वर्ग खरोखर मनापासून श्रद्धावान् आहे. पण त्याच्या डोळ्यावरील उपाध्याय धर्माचें पटल अद्यापि गळून पडलेलें नाहीं. उपाध्याय वर्ग म्हणेल तो धर्म, असें त्यांना अद्यापि मनापासून वाटतें. वास्तविक ही श्रद्धा नव्हे. कारण खऱ्या श्रद्धेची अखेर ज्ञानाच्या प्रकाशांत होते. पण येथें तसा प्रकार न घडतां दिवसेंदिवस हा वर्ग अधिकाधिक निबिड अंधकारांत मात्र बुडत जात आहे.

अशा रीतीनें एका बाजूला अश्रद्ध मूठभर लोक आणि दुसऱ्या बाजूनें डोळ्यांवर झांपड असलेली लक्षावधि सामान्य जनता, असा आजच्या समाजाचा प्रकार झाला आहे. या रचनेच्या अनुरोधानें समाजाचा जीवनक्रम आज चालू आहे. अशा स्थितींत मूठभर सत्ताधारी आणि लक्षावधि सामान्य जनता या दोघांचेंहि भयंकर नुकसान होत आहे. सामान्य जनतेला मोह पाडण्याचीं साधनें मूठभर लोकांच्या हातांत आहेत. त्यांचा मन मानेल तसा उपयोग ते करतात. हा मूठभर लोकांचा वर्ग स्वभावानें बहुशः दुष्ट आणि सामान्यतः अनीतिमान् आहे. यांच्या हाताखालीं सामान्य जनता

सांपडल्यामुळें ती भरडून जाऊन निःसत्व झाली आहे; तथापि तिच्यावरचें मोहपटल अद्यापि दूर होत नाहीं. पूर्वींच्या अनेक धर्मांची चढती पडती आजपर्यंत अनेक वेळां झालेली आपण पाहिलेली आहे. पण ख्रिस्तीधर्माच्या आजच्या पडत्या काळांत समानतेच्या तत्वाची जितकी पायमल्ली झालेली आहे, तितकी ती पूर्वीं कधींहि झालेली नव्हती. आज मनुष्यजाती स्वभावानें दुष्ट बनून गेली आहे. फावेल तेव्हां कोणीहि कोणावर जुलूम करावा, अशी स्थिति आज प्राप्त झाली आहे. यांतच धर्मभ्रष्टतेची अधिक भर पडली आहे. या स्थितीचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे आजच्या जीवनक्रमाची विलक्षण गुंतागुंती हेंच होय. पूर्वींच्या साधेपणाचा अंशहि त्यांत उरलेला नाहीं. त्यांतून या गुंतागुंतीचें स्वरूप अशा प्रकारचें आहे कीं, मनुष्याच्या दुष्टपणाचे परिणाम त्याच्या नजरेसमोर ढळढळीतपणें दिसून येत नाहींत. जुन्या काळचे चंगीसखान आणि त्याचे दुसरे भाऊबंद कितीहि दुष्ट असले आणि त्यांचीं कृत्यें केवढींहि घोर असलीं तरी त्यांचें परिणाम जगाच्या चवाट्यावर मांडले जात होते. त्यांचीं कृत्यें दुष्टपणाचीं आहेत, अशी जाणीव तरी प्रत्येकाला होत होती. यामुळें हा दुष्टपणा हळूहळू कमी होत जाईल अशी सबळ आशा वाटत होती. पण आमच्या आजच्या दुष्टपणाचा प्रकार तसा नाहीं. आजच्या दुष्कृत्यांचीं फळें आज इतक्या शिताफीनें दडविलीं जातात कीं, अमुक दुष्कृत्याचा हा परिणाम, असा कार्यकारणभाव कोणाच्याहि लक्षांत येत नाहीं. यामुळें हा दुष्टपणा नाहींसा झाला पाहिजे अशी वृत्तीच कोठें उत्पन्न होत नाहीं. यामुळें तो कमी होण्याच्या ऐवजीं वाढत वाढत आज एवढें भीषणस्वरूप पावला आहे कीं, असा प्रकार जगानें पूर्वीं कधींहि पाहिला नव्हता.

एकादा कोट्याधीश अजारी पडला आहे, अशी आपण कल्पना करूं आणि मनुष्याच्या रक्ताच्या तळ्यांत स्नान केल्यास त्याचा आजार जाईल, असें त्याच्या वैद्यानें सांगितलें आहे, अशीहि कल्पना आपण करूं. अशा स्थितींत हें तळेंभर रक्त जमा करण्याची खटपट करण्यास आजच्या स्थितींत त्याला कसलीहि आडकाठी व्हावयाची नाहीं. इतकें मात्र खरें कीं, असें करण्यास आज शहाजोग म्हटल्या जाणाऱ्या मार्गानें त्यानें गेलें पाहिजे.

प्रत्यक्ष तरवार हातीं घेऊन लोकांच्या माना चंगीझखानप्रमाणें त्याला आज कांपतां येत नाहींत हें खरें, पण ज्या परिस्थितींत लोकांना आपलें रक्त त्याच्या इच्छेप्रमाणें सांडणें भाग पडतें, अशी परिस्थिति उत्पन्न करण्यास मात्र त्याला मनाई नाहीं. या कार्यांत अर्वाचीन काळचा भौतिक शास्त्री आणि धर्माध्यक्ष या दोघांचेंहि सहाय्य त्याला घेतां येण्यासारखें आहे. तळें रक्तानें भरलें ह्मणजे त्यावर प्रोक्षण करून त्याला पावित्र्य आणण्याचें काम धर्माध्यक्ष करतो आणि असें तळें निर्माण करणें आवश्यक आहे, असा सिद्धांत अर्वाचीन भौतिक शास्त्री सिद्ध करतो. नवी प्रचंड तोफ बनविली, एकादें नवें लढाऊ गलबत बांधलें, एकादा तुरूंग निर्माण केला, अथवा एकादा वधस्तंभ उभा केला, तर त्यावर प्रोक्षण करण्याचें काम आजचा धर्माधिकारी करतो, हें सर्वांस ठाऊक आहेच. त्याचप्रमाणें युद्धें आवश्यक आहेत आणि कुंटणखानेहि आवश्यक आहेत, असें अजचा अर्वाचीन शास्त्री भर चवाठ्यावर सांगतो हेंहि सर्वांस ठाऊक आहे.

अशा रीतीनें सर्व धर्मांचें सार जें समतेचें तत्व, तें आज दृष्टिआड झालें आहे, त्याची पूर्ण हेळसांड आज होत आहे, आणि हटवादी भिक्षुकवर्गानें आपल्या मतांचीं पक्कीं पुटें त्याजवर आज चढविलीं आहेत. आज ज्याला आपण धर्म म्हणून म्हणतों त्याची स्थिति अशा प्रकारची आहे. अर्वाचीन शास्त्रेंहि या विषमावस्थेंत अधिक भर घालीत आहेत. उत्क्रांति शास्त्रानें जीवनकलहाचें तत्व शोधून काढलें आणि जगण्यास योग्य असेल तोच जगतो, असा सिद्धांत सांगितला. यामुळें या विषमतेंत अधिकच भर पडली. या शास्त्राचे सिद्धांत सध्या इतके सर्वमान्य होऊन बसले आहेत कीं, मनुष्यजातीचें अस्तित्व त्याजवर अवलंबून आहे, हा समज सर्वत्र पसरला आहे. याचा फायदा मूठभर सत्ताधिकाऱ्यांना कसा होतो तो पहा. जगण्याला योग्य असेल तो जगतो, या सिद्धांताला अनुसरून आपली जगण्याची पात्रता सिद्ध केली पाहिजे, असें तो लोकांस शिकवूं लागतो, आणि जगण्याची पात्रता म्हणजे दुसऱ्याला मारून आपण जगणें हीच. अर्थात् युद्ध करणें, हें ओघालाच आलें. मूठभर सत्ताधिकाऱ्यांच्या सोयीसाठीं होणारा कोट्यावधि मनुष्यांचा संहार सृष्टिक्रमप्राप्त आणि आवश्यक आहे,

असें ते सिद्ध करतात. असा संहार आज तागायत सर्रास चालू आहे.

अर्वाचीन शास्त्रांच्या कर्तृत्वाच्या बाह्य झगझगाटानें लोकांचे डोळे इतके दिपून गेले आहेत कीं, या शास्त्रांनीं मिळविलेल्या न भूतो न भविष्यति अशा स्वरूपाच्या विजयाचें वर्णन कोणत्या शब्दांनीं करावें, हें त्यांस समजेनासें झालें आहे. केवळ जड दृष्टीनें पाहणारास अर्वाचीन शास्त्रांचा हा विजय प्रचंड स्वरूपाचा दिसेल हें खरें. जड सृष्टीवर यापूर्वीं केव्हांहि एवढी सत्ता शास्त्रानें चालविली नव्हती. आज सृष्टीच्या शक्ती मनुष्याच्या हातीं आल्या आहेत, ही गोष्ट खरी आहे. जड सुधारणेंत जुन्या काळाला आज आपण पुष्कळ मागें टाकलें आहे, हेंहि खरें; पण जुना आयुष्यक्रम सांप्रतच्या इतका अनीतिमय नव्हता, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. मनुष्यांतील पशुवृत्तीवरचा सर्व दाब आज निघून गेला असल्यामुळें सांप्रत जसा धिंगाणा ती घालीत आहे तसा तिनें पूर्वीं कधींहि घातला नव्हता. आणि दिवसेंदिवस ही पशुवृत्ति अधिकाधिक बेफाम मात्र होत आहे. एकोणीसाव्या शतकांत अर्वाचीन जड शास्त्रांनीं मोठी सुधारणा केली, हें खरें; पण दुसऱ्या पक्षीं माणुसकी, नीति, दयार्द्र बुद्धि इत्यादि सौम्यगुणांचा अभाव सध्यां इतका झाला आहे कीं, अशी स्थिति चंगीसखान, अटिल्ला किंवा नेरो, यांच्या काळींहि नव्हती.

प्रचंड गलबतें, आगगाड्या, छापखाने, लांब लांब बोगदे, फोनोग्राफ वगैरे गोष्टी फार चांगल्या आहेत, हें खरें आहे; पण याबरोबरच रस्कीननें सांगितलेलें एक तत्वहि लक्षांत ठेवलें पाहिजे. हे अर्वाचीन शोध जितक्या मोलाचे आहेत, तितक्याच मोलाचें मानवी जीवितहि आहे, हें विसरून चालावयाचें नाहीं. आगगाड्या, बोगदे, आणि इतर अर्वाचीन वस्तु संपादण्याकरतां हल्लीं इतक्या मनुष्यांचा बळी द्यावा लागतो कीं, त्यामुळें मानवी जिविताची शोभा या वस्तूंनीं वाढण्याऐवजीं त्या त्याला कलंक मात्र लावतात. यावर आमचे अर्वाचीन पंडित असा जबाब देतात कीं, हा संहार कमी करण्याकरतां नवे नवे शोध आम्ही करीत आहोंतच आणि कालांतरानें हा संहार आम्ही पुष्कळ कमी करूं शकूं; पण त्यांच्या या उत्तरांत कांहीं तथ्य नाहीं. सर्व मनुष्यें आपल्या बंधुवर्गापैकीं आहेत

आणि कोणत्याही कारणास्तव त्यांच्या जीविताला धक्का पोहोंचूं द्यावयाचा नाहीं. अशी भावना सर्वत्र उत्पन्न होईपर्यंत हा संहार थांबावयाचा नाहीं. माझ्या बांधवांपैकीं कोणालाहि उपसर्ग लागूं न देणें हें माझें पवित्र आणि धार्मिक कर्तव्य आहे हा निश्चय मनुष्याच्या मनांत जोंपर्यंत उत्पन्न झालेला नाहीं, तोंपर्यंत स्वार्थाला दुसऱ्याचा बळी देण्यास तो कमी करणार नाहीं. एकादें कार्य सिद्ध करणें असल्यास कांहीं थोडें द्रव्य आणि कांहीं माणसांचे बळी देऊन तें सिद्ध होणार असेल, तर माणसांचे बळी वजा करून त्या ऐवजीं लक्षावधि रुपये खर्चून तें सिद्ध करण्यास तयार होण्याइतका मूर्ख आजच्या जगांत कोणी नाहीं. शिकागोच्या आगगाडीच्या रस्त्यावर दरवर्षीं कांहीं माणसें चिरडून मरत असतात. ही मृत्युसंख्या आज कित्येक वर्षें जितकीच्या तितकचि आहे; पण ती कमी करण्याकरतां कांहीं योजना करावी, असें रेलवे मालकांच्या मनांत येत नाहीं, आणि हें स्वाभाविकच आहे. कारण या माणसांबद्दल द्याव्या लागणाऱ्या नुकसानभरपाईपेक्षां हीं नवीं साधनें तयार करण्यास लागणाऱ्या द्रव्याचें व्याज अधिक होतें.

रेलवे–मालकांच्या या वागीपणाबद्दल त्यांना लाजविण्याचें काम सामान्य जनता करूं शकेल किंवा याची तजवीज कायद्यानेंहि करतां येणें शक्य आहे; पण आपलीं सर्व कृत्यें परमेश्वर पहात आहे, अशी धार्मिक भावना जोंपर्यंत सर्वत्र उत्पन्न झाली नाहीं, आणि मानवी जीविताचें संरक्षण हें प्रत्येकाचें पवित्र धार्मिक कर्तव्य आहे असें जोंपर्यंत सर्वत्र वाटूं लागलें आहे, तोंपर्यंत लोकमत आणि कायदा या दोहोंतूनहि पळवाट काढून आपला नफा वाढविण्यासाठीं माणसें माणसांचा बळी देण्यास कमी करणार नाहींत.

सृष्ट शक्तीवर जय मिळवून आगगाड्या, बोगदे, इत्यादि जिनसा निर्माण करणें सोपें आहे. मात्र असें करतांना मनुष्याच्या जीवाची फारशी क्षिति वाळगूं नये म्हणजे झालें. इजिप्तमधील प्रचंड पिरामिड बघून आपणास मोठा आनंद होतो आणि त्या बांधणाराला तर गर्वानें अस्मान ठेंगणें झालें असेल. पण त्या बांधण्याकरतां लक्षावधि गुलामांचें रक्त तेथें सांडलें आहे,

ही गोष्ट आपण विसरतों. त्याचप्रमाणें जगड्व्याळ प्रदर्शनांत मांडलेलीं नानाविध यंत्रें आणि उपकरणें पाहून आपण हर्षनिर्भर होतों; पण या वस्तु निर्माण करण्यास कसली किंमत द्यावी लागली आहे, हें आपण विसरतों. या वस्तु निर्माण करण्यास कोट्यावधि मनुष्यांना शुद्ध गुलामाप्रमाणें राबावें लागलें आहे, हें आपल्या लक्षांत येत नाहीं. खऱ्या स्वतंत्र बुद्धीनें आणि केवळ आपखुषीनें अशीं कामें, माणसें जोंपर्यंत उठवूं लागलीं नाहींत तोंपर्यंत या महत्कृत्याबद्दल मोठासा गर्व बाळगण्याचें कारण आपणास नाहीं. आफ्रिकन, हिंदु, अमेरिकेंतील इंडियन लोक वगैरे राष्ट्रांस खिस्ती राष्ट्रांनीं जिंकलें आहे आणि आतां चिनाकडे आपला मो<sup></sup>र्चा तीं वळवीत आहेत. आपल्या या विजयाबद्दल खिस्ती राष्ट्रांना मोठा अभिमान वाटतो. खिस्ती राष्ट्रें अधिक सदाचारसंपन्न अथवा अधिक धर्मपरायण म्हणून त्यांना हे विजय मिळाले आहेत, असें नाहीं. वस्तुस्थिति याच्या अगदीं उलट आहे. ज्या राष्ट्रांना त्यांनीं जिंकलें आहे, त्याहून खिस्ती राष्ट्रें धर्मज्ञानांत किती तरी कनिष्ट प्रतीचीं आहेत. हिंद आणि चीन या दोन वृद्ध राष्ट्रांची गोष्ट तर बाजूलाच राहूं द्या; पण झुलू लोक सुद्धां कांहीं बाबींत युरोपीय खिस्त्याहून श्रेष्ठ आहेत. कांहीं धार्मिक नियम म्हणून ते अद्यापीहि पाळीत असतात. धर्मानें बाह्य ठरविलेलीं कृत्यें ते करावयाचे नाहींत; पण आमच्या खिस्ती धर्मानुयायांना मात्र कसलेंहि बंधन नाहीं. प्राचीन रोमन राष्ट्रांत धर्माचा पूर्ण ऱ्हास झाला तेव्हांच रोमची तरवार प्रबळ होऊन तिनें जग जिंकलें, आणि हाच प्रकार खिस्ती राष्ट्रांत आज चालू आहे. फरक इतकाच कीं, रोमन तरवारीपेक्षां खिस्ती तरवारीची धार अधिक तिखट आणि तिचा पल्ला अधिक लांब आहे. हा फरक वगळला म्हणजे तेव्हांचें रोमन राष्ट्र आणि आजचीं खिस्तीं राष्ट्रें यांत कांहीं फरक उरत नाहीं. आजच्या खिस्ती राष्ट्रांनीहि तेव्हांप्रमाणेंच धर्माचा पूर्ण त्याग केला आहे. हीं राष्ट्रें आपसांत कितीहि भांडलीं तरी एका बाबतींत त्यांचा एकोपा आहे. लुटारूपणाच्या बाबतींत सर्वांचें एकमत होतें. दरवडेखोरांची ही एक प्रचंड टोळी बनली असून चोऱ्या, दरोडे, लुटालुट, खून, बदफैलीपणा इत्यादि अनीतीचीं कृत्यें व्यक्तीशः अथवा समूहशः कोणीं केलीं तर त्यां-

पैकीं कोणाच्याहि अंगावर शहारे येत नाहींत अथवा कोणाचें चित्त यत्किंचितहि कंपायमान होत नाहीं. यांपैकीं कांहीं राष्ट्रें कशावरच श्रद्धा बाळगीत नाहींत. आणि या अश्रद्धपणाचाच त्यांना मोठा अभिमान आहे. यांहून कांहीं अधिक ढोंगी आहेत. तीं धर्मभक्तीचा आव घालतात. लोकांनीं ज्या गोष्टीवर विश्वास ठेवला असतां त्यांचें स्वस्तःचें हित होतें, त्या गोष्टीवर आपलाहि विश्वास असल्याचा बाहाणा तीं करतात. या राष्ट्रांतील सामान्य जनता शुद्ध आंधळी झाली आहे. तिच्या बुद्धीच्या डोळ्यावर झांपड पडली आहे. वरिष्ठ वर्ग शुद्ध ढोंगानें ज्या गोष्टी त्यांना सांगत असतो, त्यां ती खऱ्या मानते आणि या वर्गाच्या हुकुमापुढें बिनतक्रार आपली मान वांकवीत असते.

लोकांना भूल घालून या जादुगारांना त्यांजपासून काय मिळवावयाचें असतें? या प्रश्नाचें उत्तर प्राचीन काळापासून एकच आहे. नेरोच्या काळीं जें घडलें, तेंच आतांहि घडत आहे. हा जादुगारांचा वर्ग बहुधा चैनखोर असतो. त्याला कर्तव्य म्हणून कांहीं नसतें. यामुळें त्याचें मन सदोदित रिकामें असतें. मनाची ही पोकळी नानाप्रकारच्या अतिरिक्त चैनीच्या कल्पनांनीं त्याला भरून काढावयाची असते आणि ती भरून काढण्याचें काम सामान्य जनतेकडून तो चोपून करून घेतो. दुसऱ्यांना गुलाम बनविल्याशिवाय आपली चैन चालविण्यास मनुष्याला दुसरा मार्ग नाहीं. गुलामांची संख्या वाढविणें हा एकच मार्ग रिकामटेकड्या चैनी लोकांना मोकळा आहे. याकरितां गुलामांची संख्या ते वाढवितात. गुलामांची संख्या वाढली म्हणजे चैनबाजीलाहि फांटे फुटून तिचा विस्तार अधिक वाढत जातो आणि या विस्ताराबरोबर गुलामांची संख्या अधिक वाढते. बुभुक्षितांची संख्या जगांत जोंपर्यंत पुष्कळ आहे, तोंपर्यंत चैन आणि गुलामगिरी यांनीं निर्माण केलेलें हें दुष्ट चक्र अखंड मंडलाकार नित्य परिभ्रमण करीत आहे. आपल्या कृत्याच्या इष्टानिष्टपणाचा विचार करणें गरजू लोकांना शक्य नसतें. आपणास काय हवें तें कार्य ते करीत नसून आपणापासून दुसऱ्याला ज्या कार्याची अपेक्षा असेल तें कार्य ते करीत असतात. कारण तसें करण्या-

वांचून त्यांस गत्यंतरच नसतें. स्वतःच्या धन्याला खुष करण्याकरतांच ते कर्मप्रवृत्त होत असतात. मनुष्य आणि विश्वशक्ति यांतील नित्य संबंध निश्चित करणारी मानवी शक्ति म्हटली म्हणजे मनुष्याची विवेचक बुद्धि हीच होय. आखिल मानव जातीचें विश्वशक्तीशीं असलेलें नातें, एकाच स्वरूपाचें आहे. विश्वशक्तीच्या दृष्टींत हा मोठा, तो लहान, हा गरीब, तो श्रीमंत, असे भेद असणें शक्य नाहीं. या दृष्टीनें विचार केला म्हणजे सर्व धर्मांचा अंतिम हेतु एकच असला पाहिजे, हें उघड होतें. कारण मानव-जाति आणि विश्वशक्ति यांतील नित्यसंबंध निश्चित करून त्याचा अनुभव मनुष्यजातीस आणून देणें, हें धर्माचें एकच कार्य आहे. धर्माचा अंतिम हेतु आखिल मानव कुलाचें ऐक्य करणें हा आहे. आणि असें ऐक्य होणें यांतच मानव कुलाचा ऐहिक अभ्युदय आणि परमार्थ या दोहोंची सांगड पडते.

विश्वबुद्धीशीं तादात्म्य पावणें आणि अशा रीतीनें आपलें परम कल्याण करून घेणें हें मानव कुलाचें अखेरचें ध्येय आहे. आणि यासाठींच त्याची सारी धडपड सुरू आहे. जगांत कितीहि धर्म निर्माण झाले, तरी त्या सर्वांचा अंतिम हेतु मानव कुलाचें ऐक्य हाच आहे. मानव कुलाच्या अखेरच्या प्रश्नाला सर्व धर्म एकच उत्तर देतात, आणि अशा रीतीनें सर्व कुलाच्या संघटनेचें कार्य ते करीत असतात. मनुष्याच्या विवेचक बुद्धीचें खरें कार्य हें आहे. विश्वशक्तीशीं असलेला आपला नित्यसंबंध जाणणें आणि त्याच्या अनुभवाचे मार्ग शोधून काढणें हें तिचें कर्तव्य आहे; पण या कर्तव्यांतून भ्रष्ट होऊन ती इंद्रियजन्य सुखाच्या लालसेची दासी बनली कीं, पुढील अनर्थाचें बीज पेरलें जातें. आपल्या बांधवांशीं तंटे उभे करावेत या इच्छेचा प्रादुर्भाव होतो. या इच्छेनें दुष्ट झालेला जिवितक्रम न्याय आहे, असें ती सिद्ध करूं लागते. अशा रीतीनें अखेरीस मूळ हेतूचा पूर्ण विपर्यास होऊन जगांत विषमता नांदूं लागते. लक्षावधि लोक गुलाम आणि दुसऱ्या बाजूस मूठभर धनी अशा दोन मनुष्यजाती निर्माण होऊन अनर्थाचें साम्राज्य इतकें पसरतें कीं, त्यांतून सन्मार्ग शोधून काढणें जवळ जवळ अशक्य होऊन बसतें.

इतर धर्मीयांना ख्रिस्ती लोक मूर्तिपूजक म्हणून हंसत असतात; पण या

मूर्तिपूजकांपैकीं अत्यंत गांवढळ धर्माचें सांप्रतचे अनुयायी पाहिले तर त्यांना सत्य वस्तूची जितकी ओळख आहे, तितकी हल्लींच्या खिस्ती राष्ट्रांस नाहीं. कारण त्यांना धर्म असा कांहींच उरलेला नाहीं. या राष्ट्रांतील अगदीं वरिष्ठ दर्जाचे लोक पाहिले तर तेहि अगदीं धर्मशून्य असतात. धर्म ही एक अनवश्यक वस्तु आहे, अशी त्यांची स्वतःची खात्री झाली असून धर्मशून्य जीवित अधिक श्रेयस्कर आहे, असें सामान्य वर्गाला सुचविण्यास ते कमी करीत नाहींत.

कित्येक मूर्तिपूजक लोक आतां नव्या नव्या धर्माकडे वळूं लागले आहेत. त्यांच्या ज्ञानांत झालेली वाढ आणि त्यांच्या जुन्या धर्माचीं तत्वें यांचा मेळ पडत नाहीं, असें दिसूं लागतांच अर्वाचीन ज्ञानाशीं अधिक सुसंगत असें धर्माचें नवें स्वरूप ते निर्माण करूं लागले आहेत. आणि आमच्या खिस्ती राष्ट्रांत याच्या उलट प्रकार चालला आहे. सामान्य लोकांस आपल्या कह्यांत ठेवण्यास धर्म हें एक खूळ उपयोगी पडतें, एवढ्याच पुरता धर्माचा आश्रय कांहीं खिस्ती लोक करतात. दुसऱ्या कित्येकांना धर्म मुळींच नकोसा झाला आहे. याशिवाय जे कित्येक उरले, ते खुळसट आचारांना आणि बाह्य आचारांना पाटाशीं धरीत असून खरा धर्म त्यांतच सांठविला आहे, असें समजतात. या आचारप्रचुर धर्माची झांपड त्यांच्या डोळ्यावर इतकी पक्की पडली आहे कीं, खऱ्या धर्मतत्वांचें नुसतें दर्शनाहि त्यांस होत नाहीं. या लोकांत कोणतीहि धर्मसुधारणा होणें अशक्य झालें असल्यामुळें सत्यवस्तूशीं त्यांची गांठ कधीं काळीं तरी पडेल कीं नाहीं, याची शंकाच आहे.

जड सुधारणेंत खिस्ती राष्ट्रांनीं आज अघाडी मारली आहे. देहसुखाची साधनें त्यांनीं आज कळसास पोहोंचविलीं आहेत, आणि याच गोष्टींचा त्यांना मोठा गर्व वाटतो. आपल्या सर्व कृति न्याय आहेत, असें मोठ्या अट्टाहासानें तीं प्रतिपादन करतात. एवढेंच नव्हे तर गत काळाच्या कोणत्याहि राष्ट्रापेक्षां आजच्या स्थितींत आपण श्रेष्ठ आहों, असें सिद्ध करण्याकडे आपल्या रिकाम्या वेळेचा आणि बुद्धीचा उपयोग तीं करीत आहेत. अज्ञानकूपांत आणि अनीतिगर्तेत वास्तविक लोळत असतांहि सुधा-

रणेच्या अत्युच्च शिखरावर आपण आरूढ झालों आहों अशी खात्री त्यांच्या चित्ताला वाटत आहे. आज अज्ञान-मार्गाकडे आणि अनीतिकडे झपाट्यानें पावलें टाकीत असतां ज्ञान आणि उत्क्रांति यांच्या परिपूर्णावस्थेकडे आपण झपाट्यानें जात आहों असें त्यांना निश्चयानें वाटतें.

देहद्वारां घडणारें जड कर्म आणि बुद्धिद्वारां घडणारें विचारकार्य या दोहोंचा मेळ असावा, असें मनुष्यमात्रांना स्वाभाविकपणें वाटत असतें. या दोहोंत मेळ नसेल, तर त्याचें चित्त अस्वस्थ होतें आणि हा मेळ पडेपर्यंत त्याला शांति प्राप्त होत नाहीं. हा मेळ पाडण्याचें कार्य तो दोन प्रकारें करीत असतो. कोणतेंहि कर्म करण्याची आवश्यकता अथवा तें सत्कार्य आहे, अशी विवेचक बुद्धीची खात्री प्रथम करून घेऊन नंतर तो कार्यप्रवृत्त होतो. येथें विचार आणि आचार यांची संगति प्रथमपासूनच असते. दुसऱ्या प्रकारचीं माणसें एकाद्या मनःप्रवृत्तीच्या लाटेंत सांपडून प्रथम कर्म करून जातात, आणि नंतर त्या कर्माच्या पात्रापात्रतेचा विचार पाठीमागून करतात. अखेरीस आपलें कर्म योग्य होतें असा पुरावा तीं बुद्धिपूर्वक शोधूं लागतात. येथें आचार आणि विचार यांची संगति प्रथम नसून ती मागून ओढून ताणून जुळविलेली असते.

कोणत्याहि कर्माच्या कार्याकार्यतेचा विचार करून नंतर कर्मप्रवृत्त व्हावें इतकी कर्तव्यपरायणता ज्यांच्या बुद्धीला प्राप्त झालेली असते असे लोक नेहमीं पहिल्या मार्गाचाच अवलंब करतात. त्याचप्रमाणें धर्माज्ञा शिरसावंद्य मानण्याची संवय ज्यांच्या चित्ताला झालेली असते, तेहि कार्याकार्यतेचा प्रश्न धर्माज्ञेला अनुलक्षून प्रथम सोडवीत असतात; पण ज्यांना धर्म म्हणून कांहींच उरलेला नसतो अथवा कार्याकार्यतेची कसोटी लावण्याचें कांहीं मापहि ज्यांच्याजवळ नसतें, असे लोक बहुधा दुसऱ्या वर्गांत येतात. विवेकबुद्धीला अनुसरून आपल्या कर्माची योग्यता ते ठरवीत नसून आपण जें केलें तें योग्यच होतें, असें सिद्ध करण्याकडे आपल्या बुद्धीचा उपयोग ते करीत असतात.

धर्माच्या आज्ञांना अनुसरून कोणतें कर्म सत्कर्म आहे आणि कोणतें अकर्म आहे, हें ज्यांनीं अगोदरच ठरविलें असेल, अशा माणसांना एकादें

ेसंगत कर्म करण्याचा प्रसंग प्राप्त झाला, तर त्यांच्या बुद्धीची मोठी ारांबळ उडते. अशा स्थितींत आपलें सारें बुद्धिबळ खर्चून धर्मतत्त्वें आणि ाचार यांत दिसून येणारा विसंगतपणा नाहींसा करण्याकडे आपली शक्ति ीं खर्च करतात. धर्माज्ञा आणि प्रत्यक्ष क्रिया यांत अंतर पडूं नये असें यांना मनःपूर्वक वाटत असतें आणि या दोहोंची संगति लागेपर्यंत तीं वस्थ बसावयाचीं नाहींत; पण धर्मभ्रष्टाची गोष्ट याहून अगदीं वेगळी सते. आपला देह सुखांत ठेवणें हा एकच धर्म तो जाणत असतो. ाणि कर्माचा बरावाईटपणा ठरविण्याची त्याची कसोटीहि हीच असते. ेनाची लहर येईल त्याप्रमाणें तो कर्में करीत असतो. या लहरींना कांहीं ाळतंत्र असतें असेंहि नाहीं. आजची लहर उद्यां असेल, असा नियम ाहीं. यामुळें पुष्कळ वेळां त्याचीं कर्में परस्परविरोधीहि होतात. हा ेरोध लोकांना ढळढळीत दिसूं लागला म्हणजे तो लपविण्याचा अथवा याला उत्तर देण्याचा यत्न तो करूं लागतो. विस्तारपूर्वक आपल्या ृत्यांचें विवेचन तो करतो, त्याचें सारें बुद्धिवैभव त्यांत चमकत असतें, ाणि अशा रीतीनें लोकांना चकवून त्यानें त्यांना क्षणभर भुरळ पाडली ी वस्तुतः त्याचें बोलणें अगदीं फोलकट असतें. सत्याचा अंशहि त्यांत सतो. धार्मिक मनुष्य आणि धर्मभ्रष्ट यांच्या वादपद्धतींतहि हा फरक स्ट दिसण्यासारखा असतो. धार्मिक मनुष्याचीं उत्तरें साधीं, सरळ, ष्ट आणि उचित अशीं असतात. उलटपक्षीं धर्मभ्रष्टाच्या उत्तरांत पंडाव आणि गुंतागुंत हीं अवश्य सापडतात. मनःपूर्वकतेचा पूर्ण अभाव याच्या उत्तरांत दिसून येण्यासारखा असतो.

वरील विचारसरणी स्पष्ट करण्याकरतां रोजच्या अनुभवांतलें एक ामान्य उदाहरण मी देतों. एका मनुष्याला बाहेरख्यालीचें व्यसन लागलें ाहे. असें समजा. या मनुष्याची धर्मप्रवृत्ति जागृत असेल तर आपण रतों ती गोष्ट वाईट आहे, अशी टोंचणी त्याच्या चित्ताला सदोदित ाहिल. आणि व्यसनमुक्त होण्यासाठीं तो मनापासून यत्न करील. विश्व- ोषितांची संगति टाळण्यासाठीं तो धडपडेल. आपलें चित्त तो अनेक ार्यांत गुंतवील. आपली सारी दिनचर्या चांगल्या रीतीनें आंखून स्वतःचें

मन कोणत्या तरी सत्कार्यांत गुंतविण्याचा यत्न तो करील. या गोष्टी फारशा अवघड आहेत असें नाहीं; पण हाच मनुष्य धर्मभ्रष्ट असेल, तर आपण करता त्यांत कांहीं चूक नाहीं, असें लोकांना सिद्ध करून दाखविण्याकरतां नानाप्रकारच्या गोष्टी तो सांगूं लागेल. अलौकिक स्वर्गीय प्रेमाच्या कहाण्या तो कथन करील. आपली बाजू लोकांपुढें मांडतांना अनेक कुटिल कोट्यांची आणि लपंडावाची भाषणें तो करील. तो सृष्टिसौंदर्याचीं स्तोत्रें गाईल. प्रेमस्वातंत्र्याचें आणि व्यक्तिस्वातंत्र्याचें मनोरम कथानक तो रचील प्रेम हें दोन जीवात्म्यांचे एकीकरण आहे, असा सिद्धांत मोठ्या गौरवाच्या भाषेनें तो वर्णन करील. अशा रीतीनें हें भाषाअवडंबर जों जों वाढत जातें तों तों मूळ प्रश्न अधिक मागें पडत जातो, आणि नितांत सत्य असतें तें या भाषेच्या अंधकारांत पुरें लोपून जातें.

ज्याला धर्म म्हणून कांहीं नाहीं, त्याच्या मनाची ही स्थिति सर्व कर्मांत अशाच प्रकारची प्रत्यास येते. लपंडावाची संवय त्याच्या चित्ताला इतकी पक्की जखडलेली असते कीं, सामान्य गोष्टहि त्याला सरळपणें सांगतां येत नाहीं. त्याच्या विचारसरणाचा झरा मूळांतच दूषित झालेला असतो. आपल्या वर्तणुकांत आणि विचारसरणींत पुष्कळ वेळां विरोध असतो ही जाणीव त्याच्या चित्तांत सदोदित असते. आणि हा विरोध कसा झांकतां येईल या एकाच विचाराकडे त्याचें चित्त सदोदित गुंतलेलें असतें. नाना प्रकारच्या कुटिल भाषासरणीची रचना करण्यास त्याचें चित्त गुंतलेलें असतें. या भाषेच्या रानानें त्याचें चित्त पूर्ण व्यापलेलें असतें. यामुळें युक्तायुक्ततेचा विचारच त्याला सुचत नाहीं. मुख्य मुद्दा लोकांच्या दृष्टीआड कसा करावा या विचाराशिवाय दुसरा विचार तेथें जन्म पावूं शकत नाहीं. आपली फसवेगिरी लोकांवर शिताफीनें कशी लादतां येईल, एवढेंच तो पहात असतो.

पवित्र शास्त्रांत पुढील वाक्य आढळतें. 'मनुष्यांना प्रकाशापेक्षां अंधकाराचें प्रेम अधिक आहे; कारण त्यांचीं कर्में अकर्में असतात. जो अकर्म करतो तो प्रकाशाचा द्वेष्टा असतो, आणि आपलीं कर्में दोषार्ह ठरतील या भीतीनें प्रकाशाकडे तो येत नाहीं.'

सामान्यतः चालू जगांत धर्मप्रवृत्तीचा बहुतांशीं ऱ्हास झाला असल्या-

मुळें मनुष्याची पशुवृत्ति निरंकुशपणें वावरूं लागली आहे. त्याच्या मनांतील दुष्टपणा आणि अनीतिमार्गाकडील त्याचा ओढा, यांना कांहीं सध्यां शृंखलाच उरली नाहीं, आणि ही वस्तुस्थिति लपविण्याकरतां नाना प्रकारच्या युक्त्या प्रयुक्त्या मनुष्यप्राणी योजूं लागला आहे आणि आपल्य साऱ्या बुद्धिवैभवाची मदत तो या कामीं घेऊं लागला आहे. चालू समाजरचनेंत जी अनीतिमत्ता भरून राहिली आहे, ती दृष्टिआड करण्याकडेच तो आपली सारी विचारशक्ति खर्च करूं लागला आहे, आणि हें भरकटलेल्या विचारांचें रान सध्यां इतक्या अतिरेकाच्या थराला पोंचलें आहे कीं, सत् आणि असत् यांतिल अंतर जाणण्यापुरतेंहि भान बहुतेकांच्या बुद्धीला राहिलेलें नाहीं. खरें काय आणि खोटें काय हें नुसतें समजण्याचीच जेथें मारामार तेथें प्रत्यक्ष कृतीबद्दल बोलावयासच नको.

कोणत्याहि समाजिक प्रश्नाचा विचार सरळपणानें आणि साध्या रीतीनें करण्याची जणूं काय पात्रताच सध्यां कोणाच्या आंगीं राहिलेली दिसत नाहीं. अर्थशास्त्रविषयक, राष्ट्रीय, राजकीय इत्यादि विषयांपैकीं कोणताहि विषय घ्या, त्याचा विचार सरळपणानें कोणी करतो, असें आपणास आढळावयाचें नाहीं. धर्म आणि तत्त्वज्ञान हे गहन विषय तर सध्यां लुप्तप्रायच झाले आहेत. पण चालू व्यावहारिक विषयांची मांडणी सुद्धां इतक्या कृत्रिमपणें गुंतागुंतीच्या पद्धतीनें, हटवादानें, शुद्ध शब्दछळानें आणि दांभिकपणें केलेली असते कीं, या सर्व भाराभर ग्रंथांचा निष्कर्ष काढला तर प्रत्यक्ष विषयाशीं त्या निष्कर्षाचा कोणताहि संबंध नाहीं, असें आपणास आढळून येईल, आणि इतका सारा अट्टाहास कशाकरतां, तर जीं दुष्कृत्यें आपण करीत आहों, तीं लोकांपासून आणि स्वतःच्या चित्तापासून लपविण्याकरतां.

सध्यां ज्यांना आपण शास्त्रीय विषय असें म्हणतों त्यांतील कोणत्याही एकाद्या विषयाची विवेचनपद्धति पहा; तींत एक विशेष सर्वत्र आढळून येणार आहे, तो हा कीं कोणत्याहि विषयाचा विचार सरळ आणि साध्या मार्गानें करण्याचा रस्ता कोणासहि कोठें आढळावयाचा नाहीं. मनुष्याच्या जीविताशीं अत्यंत संलग्न असे प्रश्न सदोदित बाजूला टाकून आजूबाजूच्या

किरकोळ प्रश्नांवर मोठालीं रणें माजविण्याचा यत्न होत असलेला सर्वत्र आढळून येतो. यामुळें खरी फलप्राप्ति मात्र कोणासहि होत नसून जों जों ही चर्चा वाढत जाते तों तों मूळ मुद्याचा अधिकाधिक घोटाळा मात्र होत जातो, आणि असें व्हावें हें स्वाभाविकहि आहे. कारण मानवी जीवितांचा अंतिम हेतु काय आणि तो सफळ करण्याचे मार्ग कोणते, ही मुख्य दृष्टि बाजूला ठेवून समोर दिसत असलेल्या पदार्थांचा विचार करण्याकडे जें शास्त्र प्रवृत्त होतें, त्यांत धरबंद म्हणून कांहीं राहूं नये, हें स्वाभाविक आहे. कोणत्याहि विषयाचा अभ्यास कां करणें अवश्य आहे, अधिक आगत्याचा विषय कोणता आणि केवळ आगंतुक विषय कोणता याचा विचार करण्याची दृष्टीच जेथें नाहीं, तेथें विचारसरणींतहि घोटाळा होतो, यांत नवल काय ?

उदाहरणादाखल सध्यांची 'फ्याशनेबल' बनलेलीं समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र हींच घेऊं. या दोन्ही शास्त्रांचा तात्पर्यार्थ पाहतां तो एकच आहे. मुख्य प्रश्न आहे तो असा कीं, कांहीं लोक निरुद्योगीपणें कां हिंडतात आणि बाकीचे सारे त्यांच्यासाठीं जन्मभर कायाक्लेश कां करतात? यांत एक पोटप्रश्नहि कदाचित् उपस्थित होईल. तो हा कीं, वेगवेगळे लोक एकत्र होऊन एकजुटीनें काम न करतां आपापल्यापरीनें वेगवेगळया मार्गानें कां जातात? वास्तविक पाहतां प्रथम सांगितलेल्या मुख्य प्रश्नांतच याचा अंतरभाव होतो. सध्यांची विषमता जगांत नसती तर भांडणें मुळांतच उत्पन्न झालीं नसतीं. पण वर सांगितलेलीं शास्त्रें या सरळ दृष्टीनें या प्रश्नाचा विचारच करीत नाहींत. किंबहुना असा एकादा प्रश्न उपस्थित होतो, इतकी सुद्धां जाणीव त्यांच्या ठिकाणीं दिसत नाहीं. यामुळें हा मुख्य प्रश्न अगदीं बाजूला ठेवून बाकीच्या भाराभर आगंतुक गोष्टींची चर्चा तीं करतात आणि या चर्चेच्या शेवटीं असा एक निष्कर्ष काढतात कीं, मुख्य प्रश्नाची वासलत लावण्यास त्याचा उपयोग काडीभरहि होत नाहीं. पूर्वीची समाजस्थिति कशी होती, आणि सांप्रतची कशी आहे, येथपासून त्यांच्या चर्चेला आरंभ होत असतो. आणि या दोन्ही स्थिति म्हणूं काय अनिवार्य वस्तूंपैकीं आहेत असें गृहित धरून तीं चालत अस-

तात. अंतरिक्षांतील ताऱ्यांच्या गतींत ज्याप्रमाणें कधीं फेर पडत नाहीं, त्याचप्रमाणें समाजस्थितींतहि कधीं पडावयाचा नाहीं, असेंच जणूं काय त्यांस वाटत असतें आणि चालू परिस्थितीचा अनिवार्यपणा प्रथम जमेस धरून त्यांच्या विचारास सुरुवात होते. नंतर भांडवल, नफा, व्याज, इत्यादि केवलरूपी प्रश्नांची चर्चा तीं करीत सुटतात. आणि मग त्यांच्या बुद्धीचे जे फवारे उडत असतात, ते खरोखरच मोठे चमत्कृतिजनक असतात. बुद्धीच्या भुईनळ्यांचा हा देखावा गेल्या शतकभर सर्व जग पहात आहे. मुख्य मुद्दा वास्तविक इतका अवघड नाहीं. त्याची चर्चा सरळ दृष्टीनें झाल्यास तो लवकरच निकालांत येण्यासारखा आहे.

या प्रश्नाला पवित्र शास्त्रानें एक अगदीं सरळ आणि व्यावहारिक उत्तर दिलें आहे. 'दुसऱ्यांनीं आपल्याशीं जसें वागावें असें आपणास वाटतें, तसें आपण सर्वांशीं वागावें ' हें तें उत्तर होय. वस्तुतः सर्व मनुष्यांत ज्या अर्थीं बंधुभावाचें नातें आहे, त्या अर्थीं हा नियम पाळण्यास फारसा अवघड असूं नये. पण सांप्रतची विषमता जेथें कायद्यानेंच उत्पन्न होते, तेथें या सिद्धांताच्या आचाराला जागाच उरत नाहीं. हल्लींचे सरकारी धर्मखातें आणि त्याचे नियमहि स्वतःच हा मूळ सिद्धांत मोडीत असतात. सांप्रतची ख्रिस्ती म्हणविणारीं सारीं राष्ट्रें पाहिलीं तरी वरील आज्ञेचा अंगिकार तीं करीत नाहींत एवढेंच नव्हे तर ती आज्ञा मनुष्यांच्या दृष्टिआड करून तिला जणूं काय अस्तित्वच नव्हतें, असें दाखविण्याचा यत्न तीं करीत असतात. आणि हा लपंडावाचा खेळ यशस्वी करण्याकरतां आपलें सारें बुद्धिवैभव खर्चून अर्वाचीन 'शास्त्रें' त्यांनीं निर्माण केलीं आहेत.

सामान्य न्यायशास्त्राची तऱ्हाहि अशीच झाली आहे. मूठभर लोकांनीं दुसऱ्या लाखों मनुष्यांवर दंडुकेशाही चालवावी, तीं निःसत्व होईपर्यंत त्यांच्या रक्ताचें शोषण करावें अथवा युद्धावर पाठवून त्यांचा संहार करावा इतकी सत्ता त्यांच्या हातीं कां आली, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. याचें उत्तर धर्माच्या दृष्टीनें पाहिलें, तर तें अगदीं सोपें आणि साधें आहे. कोणीहि कोणावर जुलूम करूं नये हा धर्म आहे. याकरतां जेथें असा जुलूम होत असेल, तेथें तो समूळ नाहींसा करून टाकणें हें न्याय्य आणि

धर्मकार्य आहे. हें साधण्याकरतां धर्मभोळेपणाच्या गोष्टी नाहींशा करणें अवश्य आहे. धर्माचीं दांभिक सोंगें उध्वस्त करून धर्माच्या खऱ्या तत्त्वांचें ज्ञान सामान्य जनतेपर्यंत पोहोंचविलें पाहिजे. ही गोष्ट साध्य झाली, तर जुलुमाचीं कारणें मुळांतूनच नाहींशीं होतील.

पण आजचे आमचे पुढारी काय करीत असतात पहा! हा खरा आणि सोपा मार्ग लोकांपासून लपवून ठेवण्याची त्यांची धडपड एकसारखी सुरू असते. कायद्याचे ग्रंथ लिहून लिहून त्यांचे डोंगर ते रचत त. मुल्की कायदा, फौजदारी, पोलीस, व्यापारी कायदा आणि याशिवाय कितीतरी विषयांचे कायदे हे लोक निर्माण करतात. बारीक सारीक मुद्यांचें अवडंबर माजवून भाराभर ग्रंथरचना ते करतात. आणि आपण करतों तें काम केवळ उपयुक्तच आहे, असें नसून तें अत्यंत आवश्यक आणि महत्त्वाचें आहे, अशी खात्री त्यांच्या जीवाला वाटत असते. सर्व माणसें एकाच देवाचीं लेंकरें असतात. एकानें वरिष्ठपणाचा आंव आणून दुसऱ्यावर जुलूम कां करावा, अथवा त्याचें सर्वस्व लुबाडून प्रसंगीं त्याचा वध सुद्धां कां करावा, या प्रश्नाला ते उत्तर देत नाहींत; इतकेंच नव्हे तर असा प्रश्न अस्तित्वांत असूं शकतो हेंहि त्यांना कबूल नाहीं. त्यांच्या मताप्रमाणें कोणतीहि व्यक्ति कोणत्याहि व्यक्तीवर अथवा समुदायावर कधींच जुलूम करीत नसून जेथें असा जुलमाचा प्रकार दिसतो, तेथें तो जुलूम सरकाराकडून होत असतो असें ते म्हणतात आणि सरकार म्हणजे काय ? असा आणखी प्रश्न त्याना केल्यास सरकार केवलरूप आहे, असा ते जबाब देतात. हल्लीं ज्ञानाच्या ज्या अनंत शाखा अस्तित्वांत आल्या आहेत, त्या साऱ्यांची हीच गत आहे. कोणत्याहि सरळ प्रश्नाचें उत्तर हीं शास्त्रें देत नसून त्यांच्यांतलि परस्पर विरोध लपविण्याचा यत्न तीं करीत असतात.

इतिहास हेंहि सध्यां एक मोठें शास्त्र होऊन बसलें आहे. जुन्या काळीं सामान्य मनुष्याची दिनचर्या कशी होती, हें सांगणें हें या शास्त्राचें वास्तविक काम आहे; पण सारे इतिहासग्रंथ धुंडाळुनहि या प्रश्नाचें उत्तर आपणास सांपडावयाचें नाहीं. कारण इतिहासपंडितांच्या दृष्टीनें हा प्रश्न मुळीं अस्तित्वांतच नाहीं. अकराव्या लुईची पोटदुखी कशी होती, इंग्लंडच्या इलिझाबेथ

राणीनें भयंकर कृत्यें किती केली, अथवा रशियाच्या ऐव्हॉन नांवाच्या भीमकर्म्यानें रक्ताच्या नद्या कशा वाहविल्या, अथवा या राजांच्या पदरीं असलेल्या विदूषकांनीं बाष्कळ कोट्या किती केल्या, अथवा त्यांच्या रखेल्या किती होत्या, इत्यादि गोष्टींचीं वर्णनें भारेच्या भारे ग्रंथ लिहून ते करतात. दुसऱ्या प्रकारचे कांहीं इतिहासकार आहेत, ते कांहीं जुन्यापान्या गोष्टी अशा प्रकारच्या उकरून काढतात कीं, आमच्या चालू जिवितार्शी त्यांचा यत्किंचितहि संबंध नसतो. एकाद्या देशाच्या संस्कृतीची वाढ कशी झाली, याची चर्चा करतांना त्यांच्या धार्मिक जीवनाचें अक्षरहि न काढतां ते अन्न काय खात होते, आणि कपडे कोणत्या तऱ्हेचे वापरीत होते, असल्या शुष्क आणि अनुपयुक्त गोष्टींचीं वर्णनें ते करीत असतात.

जुन्या काळीं सामान्य लोकांची रीतभात कशी होती, या प्रश्नाचें उत्तर सांप्रतच्या इतिहासशास्त्रांत आढळावयाचें नाहीं. यामुळें निरनिराळ्या राष्ट्रांची मानसिक उत्क्रांति आणि उन्नति कशी झाली आणि आजची स्थिति त्यांना कशी प्राप्त झाली, याचा मागमूसहि त्यांत तुम्हांस आढळावयाचा नाहीं. त्या काळच्या लोकांच्या धर्मसमजुती काय होत्या हें प्रथम हिशेबांत घेतल्याशिवाय या प्रश्नांचीं उत्तरें मिळावयाचीं नाहींत. आणि अशा प्रकारच्या प्रश्नाकडे अर्वाचीन इतिहासकार कधीं वळावयाचे नाहींत.

सृष्टींतील सचेतन पदार्थांच्या शास्त्रांत तरी असल्या प्रकारच्या गडबडगुंड्याला अवकाश असूं नये असें कोणालाहि वाटेल. वास्तविक अशा विषयांत लपंडावाचें कांहींच प्रयोजन नाहीं; पण आमच्या अर्वाचीन पंडितांची सारी दृष्टीच वांकडी झाली असल्यामुळें तिची वक्रगति येथेंहि अनुभवास येते. झाडें आणि प्राणि यांच्यांतील जीवाचें स्वरूप काय, त्यांची वाढ कशी होते आणि हे दोन वर्ग कसे उत्पन्न होतात, या साध्या प्रश्नांना सरळ आणि सोपीं उत्तरें आपणास मिळावयाचीं नाहींत. हें शास्त्र वाचून डोक्यांत गोंधळ मात्र उत्पन्न होतो. यांत पंडितगिरीचा पुष्कळसा प्रकाश असेल; पण त्याचा परिणाम असा होतो कीं, वाचकांचे डोळे दिपून जाऊन त्यांना धड कांहींच दिसेनासें होतें. जुन्या करारांत सृष्टीच्या उत्पत्तीची जी भाकड-

कथा आहे, तीवरच एकादा पंडित तोंडसुख घेत सुटतो. दुसरा एकादा उठतो, तो या साऱ्याचें मूळ शोधण्याच्या व्यर्थ खटाटोपाला लागून साखरेची साल काढीत सुटतो. वास्तविक पाहतां आम्हां सामान्य माणसांना इतक्या खोल पाण्यांत शिरण्याची कांहींच जरूरी नाहीं. आणि दुसरें असें कीं, इतकी खोल बुडी मारल्यावरहि कांहीं खरा लाभ होईल कीं नाहीं याची शंकाच आहे. सृष्टीचें मूळ कारण अमुक असें सिद्ध करण्याचा जीवापाड यत्न कोणीं केला, तरी देश आणि काल यांच्या विपुलत्वांत या कारणांचा खरा पत्ता लागणें अशक्य आहे. ही मूळ वस्तु मानवी मनापासून निरंतरची लपून राहणारी आहे. पण या एकाच मुद्यावर इतक्या प्रकारच्या उपपत्ति चालतात, आणि त्यांतून पुन्हां इतक्या पोटउपपत्ति निघतात कीं, अखेरीस यावर अनेक महाभारतें निर्माण होतात आणि अखेरीस आपल्या ध्यानीं मनींहि नसलेल्या एका सिद्धांताचा उंदीर या प्रचंड पर्वताच्या बिळांतून बाहेर उडी मारतो. एवढे पर्वतप्राय ग्रंथ एकच गोष्ट आम्हांला बजावून सांगतात कीं, अहमहमिका हा सृष्टीचा मूळ कायदा आहे. तुम्हांला जगावयाचें असेल तर कोणाला तरी पायाखालीं दडपल्याशिवाय तुम्ही स्वतः जगणें शक्य नाहीं; हा अनपेक्षित सिद्धांत हीं शास्त्रें आमच्या गळ्यांत बांधतात.

यंत्रशास्त्र आणि वैद्यक हीं तरी या रोगापासून मुक्त असावींत; पण तींहि तशीं नाहींत. त्यांनींहि खरा मार्ग सोडून वांकड्या रस्त्याचा अंगिकार केला आहे. माणसांचे श्रम हलके कसे करावेत हा मुख्य मुद्दा विसरून श्रीमंतांच्या गरजा भागविण्याचा मार्ग यंत्रशास्त्रानें स्वीकारला आहे. गरीब आणि श्रीमंत यांत आधींच असलेला भेद हें यंत्रशास्त्र अधिक अधिक तीव्र करीत आहे. गरीब आणि श्रीमंत अथवा धनी आणि चाकर हा भेद कमी होण्याऐवजीं दिवसेंदिवस अधिक बळावत मात्र आहे. यंत्रशास्त्राच्या शोधांच्या फायद्याचे कांहीं कण कामकरी वर्गाच्या लकतऱ्यांत पडले, तर त्याचें कारण ते त्यांच्या पदरीं पडावेत, असा या शास्त्रांचा हेतु होता हें नसून ते त्यांना मिळूं न देण्याचें सामर्थ्य या शास्त्रांत नसतें हें होय.

ही हकीकत वैद्यकालाहि लागू आहे. आरंभांतच चुकलेल्या मार्गानें पुढें जातां जातां हें शास्त्र सध्या अशा स्थितीला पोहोंचलें आहे कीं, त्याचा उपयोग फक्त श्रीमंतांसच होतो. गरीब समाजाची रहाणी आणि त्याचें आरोग्य या मुख्य मुद्यांचा विचार या शास्त्रानें कधींच केला नाहीं. लक्षावधी जनतेचें जीवित अधिक निरामय कसें करतां येईल, या प्रश्नाची हेळसांड आरंभापासूनच या शास्त्रानें केली आहे. रोगमुक्तीचे जे अनेक मार्ग या शास्त्रानें आज मितीपर्यंत शोधून काढले आहेत, त्यांचा उपयोग गरीबांना कितपतसा होतो, याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला म्हणजे या विवेचनाची सत्यता कोणाच्याहि ध्यानांत येईल.

मुख्य जिव्हाळ्याचा प्रश्न सदोदित बाजूला ठेवण्याची किंवा त्याचें स्वरूप अगदीं विकृत करून टाकण्याची जी दुष्ट खोड अर्वाचीन शास्त्रांस लागली आहे, तिचें अगदीं परिणत रूप तत्वज्ञानशास्त्रांत अनुभवास येतें. साऱ्या तत्वज्ञानाचा अंतिम हेतु पाहिला तर त्याचा अंतर्भाव 'माझें कर्तव्य काय ?' या एका प्रश्नांत व्हावा. ख्रिस्ती तत्वज्ञानानें या प्रश्नाचें बऱ्याच अंशीं सरळ उत्तर दिलें आहे. त्याचप्रमाणें स्पायनोझा, कँट, शॉपेनहार आणि विशेषतः रूसो यांनीं बरेंच विषयांतर केलें असलें तरी हा मुख्य मुद्दा बऱ्याच अंशीं सोडविला आहे; पण हेजेलच्या अवतारापासून हा मनु बदलला. माझें कर्तव्य काय, हा प्रश्न हळू हळू मागें पडूं लागला. सृष्ट पदार्थांची चर्चा सुरू झाली, आणि आपल्या स्वतःच्या उपपत्तीला बरोबर जुळेल अशा पद्धतीनें तत्वज्ञानाच्या मांडणीस सुरुवात झाली. येथून तत्वज्ञान पदभ्रष्ट होऊं लागलें आणि अखेरीस जीवनकलह हा सृष्टीचा आदि हेतु आहे, असें मानण्यांत हें शास्त्र रसातळास पोहोंचलें. चतुष्पाद प्राणी वनस्पति यांत जीवनार्थ कलह दिसतो आणि तेवढ्या अर्ध्या निरीक्षणावरच हें तत्व जन्मास आलें आणि मनुष्य जातींतहि त्यानें प्रवेश केला. निर्बळाचा निःपात अपरिहार्य आहे, एवढेंच नव्हे तर हा निःपात थांबविण्याचा यत्न करणें सृष्टिनियमास सोडून आहे, या मताचा प्रसार झपाट्यानें होऊं लागला. यानंतर नीचे या नांवाचा एक अर्धशहाणा गृहस्थ जन्मास आला. या गृहस्थानें तत्वज्ञानांत नवें मन्वंतर घडवून

आणण्याचा वृथा खटाटोप केला आहे. संपूर्ण अथवा सुसंगत असें कोणतेंहि विवरण त्यानें केलें नाहीं. ज्यांना शेंडा ना बुडखा असे अनेक विचार जसजसे त्याच्या चित्तांत जन्मास येत गेले, तसतसे तो ते टांचून ठेवीत गेला. हे विचार नीतीला तरी धरून आहेत कीं नाहींत, इतकं सुद्धां त्यानें पाहिलें नाहीं, आणि शाहण्यासुरत्या लोकांनीं सुद्धां तत्वज्ञानाचा कळस या नात्यानें या अर्धभ्रमिष्ट विचारांचें ग्रहण केलें. ' माझें कर्तव्य काय? ' या प्रश्नाचें नीचेनें दिलेलें उत्तर थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ' वाटेल तसा वाग. दुसऱ्याच्या बऱ्यावाईटाकडे ढुंकून सुद्धां पाहूं नको ' असें देतां येईल.

स्वतःस खिस्ती म्हणविणारी सांप्रतची सामान्य जनता पशुत्वाच्या कोणत्या थराला पोहोंचली आहे आणि अधर्माचें आवरण तिजवर किती दाट पडलें आहे, याचा पक्का आजमास अद्यापि कोणाला लागला नसेल तर तो लागण्याकरतां एक दोन उदाहरणें येथें देतों. चिनांत आणि दक्षिण-आफ्रिकेंत जे अत्याचार नुकतेच घडले, त्याजवर पवित्रपणाचा शिक्का धर्माधिकाऱ्यांनीं मारला आणि युरोपांतील मोठमोठ्या धुरंधर पुरुषांनीं ही एक अद्वितीय कामगिरी झाली असें म्हटलें. आतां हे अत्याचार क्षणभर बाजूला ठेविले तरी नीचेच्या आसुरी मतांचा जो विलक्षण प्रसार सर्वत्र झाला आहे तो कशाचा द्योतक आहे याचा क्षणभर विचार करा. असल्या राक्षसी मतांचें ग्रहण खिस्ती लोक इतक्या उत्कंठेनें करतात, यावरूनच तिची मनोभूमिका पशुत्वाच्या अत्यंत हीन कोटीला पोहोंचली आहे हें निःसंशय सिद्ध होतें. आपण कोणी अवतारी पुरुष आहों, या भ्रमानें पछाडलेल्या एका धीट पण अर्धवट बुद्धीच्या एका जर्मनाचे फाटके तुटके आणि विस्कळित विचार खिस्ती जनतेवर इतकी छाप बसवितात, हें कशाचें द्योतक आहे बरें ? बुद्धिप्रागल्भ्याच्या दृष्टीनें अथवा सत्य वस्तूच्या दृष्टीनें पाहतां असल्या विचारांकडे कोणीं ढुंकूनहि पाहूं नये इतकी त्यांची योग्यता आहे. क्यांट, लिब्निट्झ् अथवा ह्यूम, यांच्या काळाबद्दल तर बोलावयासच नको, पण पन्नास वर्षांपूर्वीं सुद्धां असल्या लेखांकडे कोणीं लक्ष दिलें नसतें. फार काय, पण तें सूर्यप्रकाशांतहि आलें नसतें. पण सध्यांच्या आमच्या काळाची गोष्टच वेगळी. स्वतः सुशिक्षित म्हणविणारे लोक नीचेचें हें बरळणें ऐकून आनं-

दानें अगदीं बेहोष होऊन गेले आहेत. कोणी त्याजवर मोठे वादविवाद करतो तर दुसरा कोणी, विस्तृत टीकाग्रंथ लिहितो. साऱ्या भाषांत या बरळण्याचीं भाषांतरें होतात आणि त्याच्या असंख्य प्रति विकल्या जातात.

कांहीं लोकांच्या विलक्षण मनोभूमिकेचें मोठें मौजेचें वर्णन टरजिनेफ यानें केलें आहे. या लोकांना मोठेपणाची तर हांव, पण बुद्धिवैभवाची उणीव. अशा स्थितींत लोकांचें लक्ष वेधण्यासाठीं हे लोक उलटी भाषा बोलूं लागतात. पाणी पातळ आहे, हें साऱ्या जगाला ठाऊक आहे; पण तें कोरडें ठणठणीत आहे–बर्फ नव्हे पाणी–कोरडे आहे, असें प्रतिपादन मोठ्या अट्टहासानें हे लोक करूं लागतात. स्वमतप्रतिपादनाच्या आततांईत्वामुळेंच लोकांचें लक्ष त्यांजकडे वेधतें.

नीचेचीहि गोष्ट अशीच झाली आहे. स्वतःच्या मनोविकारावर जय मिळविणें आणि स्वार्थत्याग करणें हा सद्‌गुण आहे, हें साऱ्या जगाला ठाऊक आहे. केवळ ख्रिस्ती लोकांनाच नव्हे तर ब्राह्मण, बौद्ध, इराणी आणि दुसऱ्या साऱ्या धर्मांचें अनुयायी यांनासुद्धां हें तत्व मान्य झालेलें आहे. इतक्यांत एक उपटसुंभ उठतो आणि म्हणतो 'लोकहो, स्वार्थत्याग, प्रेम, मार्दव, इत्यादि मनोभावना हे सद्गुण नसून दुर्गुण आहेत, आणि ते मनुष्यजातीला रसातळास नेत आहेत. नीचेचा मुख्य हल्ला ख्रिस्तप्रणीत धर्मावर असला, तरी इतर धर्महि या तत्वांना मान्यता देतात, ही गोष्ट त्याच्या लक्षांत राहिली नाहीं. मोठ्या अट्टहासानें प्रतिपादिलेलें हें मत ऐकून क्षणभर लोकांची दिशाभूल होणें रास्त आहे; पण ज्याला कांहींहि आधार नाहीं असलीं हीं मतें विचाराअंतींसुद्धां कोणाला त्याज्य वाटत नाहींत, हेंच नवल. वास्तविक पाहतां कोणाहि सुबुद्ध मनुष्यानें तीं ताबडतोब हातावेगळीं केलीं पाहिजेत. असल्या घडघडीस बरळण्याला सध्यांच्या काळीं प्रकाशक तरी कसा मिळतो, याचेंच नवल प्रत्येकाला वाटलें पाहिजे; पण नीचेच्या ठिकाणीं असा प्रकार घडला नाहीं. त्याचें मानव्यातील मनुष्याचें मत ऐकून सध्यांचे सोतये पंडित आनंदानें बेहोष झाले. या मताची चर्चा सर्वत्र होऊं लागली. आणि अखेरीस देकार्त, लिब्निट्स आणि क्यान्ट यांची गादी चाल-

विष्यास योग्य पुरुष जन्मास आला, असा नगारा या तोतया शाहण्यांनीं वाजविला.

सद्‌गुणांची ओळखसुद्धां अलीकडचे तोतये विद्वान विसरले आहेत. अमुक सदगुण आहेत इतकी आठवण कोणीं दिली, तर तेवढीसुद्धां त्यांना खपेनाशी झाली आहे. त्यांचा स्वार्थ, त्यांचा अहंकार आणि त्यांचा निर्दयपणा हीं सध्यां इतक्या पल्ल्याला पोहोंचलीं आहेत कीं, प्रेम आणि स्वार्थत्याग या कोमल भावनांचीं फुकाची शाद्बिक आठवणहि त्यांना खपत नाहीं. त्यांची जीवितक्रमणाची पद्धत आज पशूंच्या वळणावर गेली आहे. या वळणांत बदल व्हावा अशी इच्छा त्यांना नाहीं आणि असल्या जीवितांचा उपहास ज्या कारणांनीं होण्याचा संभव आहे, त्या कारणांचा उद्गम सद्गुणांतून होत असला तरी तीं त्यांना द्वेष्य वाटतात. यामुळेंच त्यांच्या अहंकाराचा आणि पशुबुद्धीचा परिपोष जीं मतें करतात, तीं त्यांना प्रिय वाटावींत यांत नवल नाहीं. या मतांची मांडणी अर्धीकच्ची, घरसोडीची आणि तुटपुंजी आहे, या गोष्टीकडे त्यांचें लक्षच जात नाहीं. दुसऱ्यांचे जीव घेऊनसुद्धां स्वतःच्या इंद्रियांचे कोड पुरवावेत, या त्यांच्या जीवितक्रमाची न्याय्यता जें मत सिद्ध करील तें त्यांना प्रिय होतें.

भिक्षुकवर्ग आणि लोभी लोक यांचा तिरस्कार ख्रिस्तानें केला. स्वर्गद्वाराच्या किल्ल्या हे लोक लपवितात आणि तें द्वार ते स्वतःसाठीं उघडीत नाहींत आणि दुसऱ्यांसहि उघडूं देत नाहींत, असें ख्रिस्तानें त्यांजविषयीं म्हटलें. सांप्रतचा पंडितवर्गहि याच सदरांत येतो. त्यांनीं स्वर्गकपाटाच्या किल्ल्या लपविल्या नाहींत हें खरें; पण ज्ञानवापीच्या किल्ल्या मात्र त्यांनीं हस्तगत केल्या असून तिचें पाणी ते स्वतः पीत नाहींत आणि दुसऱ्यांसहि पिऊं देत नाहींत. अर्वाचीन काळांतला धर्माधिकारीवर्गहि असाच कर्तव्यविमुख झाला आहे. ख्रिस्ताच्या मताचा पूर्ण विपर्यास करून जनतेला भुरळ घालण्याचा यत्न तो सदोदित करतो. सर्व मनुष्यें एकाच ईश्वराचीं लेंकरें आहेत, असें जणूं काय ख्रिस्तानें सांगितलेंच नाहीं, असें लोकांस तो भासवितो. कारण ख्रिस्ताचें हें मत कबूल केलें तर त्याच्या विरुद्ध असलेली सांप्रतची समाजरचना उध्वस्त केली पाहिजे

हें मत ग्राह्य करणें त्याला भाग पडेल, आणि तें तर त्याला करावयाचें नाहीं. यामुळें ख्रिस्ताच्या उलट उपदेश हा वर्ग अर्थांतच करीत सुटतो. चालू विषम समाजरचना उत्कृष्ट आहे, आणि सांप्रतची कसलीहि शासन-पद्धति ईश्वरनिर्मित आहे असा उपदेश लोकांना तो करतो. जुलुमाखालीं चेंगरलेल्यांना हा वर्ग म्हणतो, 'बाबांनो तुम्ही चेंगरलें जावें, ही परमेश्वराचीच इच्छा आहे. जुलमी लोकांच्या जोखडाखालीं निमुटपणें तुम्ही मान वांकवावी, असा ईश्वरी संकेत आहे. महाराजे, राजे, पोप, बिशप, आणि दुसरे सारे अधिकारी कितीहि उद्धटपणें वागले, तरी यत्किंचितहि हालचाल तुम्ही करूं नये. दया, प्रेम, मार्दव इत्यादि कोमल गुण परमेश्वरानें अधिकारीवर्गासाठीं निर्माणच केले नाहींत. सांप्रतचा धर्माधिकारी वर्ग लोकांना सद्गुण शिकविण्यांत पूर्ण चतुर बनला आहे. ते शिकविण्यासाठीं सामान्य लोकांना हव्या त्या शिक्षाहि तो करतो, आणि याच सामान्य जनतेच्या निढळाच्या घामांतून उत्पन्न झालेल्या चैनींत आणि ऐश्वर्यांत तो स्वतः लोळत असतो. राजशासनाकडे पाहिलें तर त्यांतील अधिकारीवर्गहि या भिक्षुकांचाच साथीदार बनला आहे, असें दिसून येईल. लोकांत अधर्म पसरविण्याबद्दल राज्यकर्ते धर्माधिकाऱ्यांची पाठ थोपटतात, आणि असें व्हावें हें रास्तहि आहे. कारण राज्यकर्त्यांचा आळशीपणा, त्यांची चैन आणि त्यांचे दुर्गुण यांची चलती धर्माधिकाऱ्यांच्या मदतीवरच अवलंबून आहे. वास्तविक पाहतां अशा स्थितींत या आंधेरनगरींतून स्वतः बाहेर पडून लोकांना प्रकाशाचा मार्ग दाखविण्याचें काम अर्वाचीन विद्वानांचें आहे. धर्माधिकाऱ्यांनीं निर्माण केलेलें मायाजाळ त्यांनीं तोडून टाकलें, तेव्हां त्यांतून लोकांना मुक्त करण्याचें काम त्यांचें आहे, हें उघड आहे. हें काम करण्याची आपली इच्छा आहे, असें हा वर्ग तोंडानें मात्र म्हणतो; पण त्याची कृति मात्र अगदीं उलटी होते. आणि अशी उलटी कृति करीत असतांहि आपण लोकांची मुक्तताच साधीत आहों, या भ्रमांत अर्वाचीन विद्वान् वर्ग गुरफटून गेला आहे.

सामान्य जनतेचें कल्याण करावें, एवढीच आपली इच्छा आहे असें

हे लोक वारंवार म्हणत असतात. वास्तविक पाहतां लक्षावधी लोकांना मूठभर लोक जे पायाखालीं दडपतात, त्यांचें भीतिस्थान कोठें आहे, कोणत्या बळावर ते इतके जुलमी बनले आहेत, सामान्य जनतेला डोकें वर काढूं न देणारी अशी कोणती शक्ति त्यांच्या हातांत आहे आणि मनुष्यमात्राला कर्मप्रवृत्त करणारी शक्ति कोणती या मूलभूत गोष्टींचा विचार अर्वाचीन विद्वानांनीं आधीं करावयास पाहिजे, असें कोणालाहि साहजिकपणेंच वाटेल. आणि या मूळ शक्तीवर कुऱ्हाड घालण्याकडे आपलें सर्व बळ हा वर्ग खर्च करील. अशी कोणाची अपेक्षा असेल; पण हें आपलें उघड कर्तव्य अर्वाचीन विद्वान कधींच करीत नाहींत. उलटपक्षीं अशा दिशेनें उद्योग करणें हा व्यर्थ काळक्षेप आहे, असेंहि ते म्हणतात.

अर्वाचीन सुशिक्षितांनीं जणूं काय जाणून बुजून डोळ्यांवर कातडें ओढलें आहे. वस्तुस्थिती काय आहे, हें जाणण्याची इच्छाच त्यांना नाहीं. सामान्य जनतेच्या कल्याणाच्या म्हणून अनेक गोष्टी मोठ्या काळजीनें आणि मनःपूर्वक ते करीत असतात; पण जी खरोखरच जरूरीची आहे तेवढी एकच गोष्ट मात्र ते करीत नाहींत. आगगाडी चालू करावयाची झाली, तर इंजिनावर चढून कळ दाबावयाची ही एकच जरूरीची गोष्ट आहे; पण तसें न करतां एकादा मनुष्य हातानें गाडी ढकलण्याचा यत्न करूं लागला, तर आपण त्याला काय म्हणूं बरें? आमचे अर्वाचीन विद्वान सध्यां हाच प्रकार करीत आहेत. धर्म ही मानवी मनाची प्रेरक शक्ति आहे आणि इंजिनांतील वाफेप्रमाणें तिचा उपयोग करावयाचा याची ओळख सुद्धां अर्वाचीन सुशिक्षितांना नाहीं. राजशासनाची सारी सत्ता मूठभर लोकांच्या हातीं कशी सांपडली आणि सत्तेचें तें एकच अंग सर्वस्वी आपल्या हातीं ठेवण्यासाठीं राज्यकर्ता वर्ग किती आणि कशी धडपड करीत असतो याकडे सुशिक्षित वर्गानें आधीं लक्ष द्यावें. राज्यकर्त्या वर्गाच्या सामर्थ्याचें हें मूळस्थान सुशिक्षित वर्गानें आपल्या हातीं घेण्याचा यत्न केला पाहिजे. हें त्यांना साधलें तर लोकांना मुक्त करण्याचा मार्ग त्यांना आपोआप दिसेल.

रशियाचा बादशहा एकाद्या शहरांत गेला म्हणजे तेथलें जुनेंपानें देऊळ आधीं शोधून एकाद्या संताच्या अवशेषाचें अथवा प्रतिमेचें चुंबन तो आधीं करतो. तुर्की सुलतानाच्या सर्वगामी सत्तेचें आधिष्ठान कोठें आहे, हें लक्ष्यांत आणा. सांप्रतचा जर्मन बादशहा स्वतःच्या सुशिक्षितपणाची मोठी घमेंड मारतो; पण वेळीं अवेळीं परमेश्वराच्या नांवाचा उच्चार करण्यास तो चुकत नाहीं. योग्य अयोग्य वेळीं खिस्ताचें नांव उच्चारून धर्माच्या पावित्र्याचें वर्णन तो करीत सुटतो. या साऱ्या लोकांना एक गोष्ट पक्की ठाऊक आहे ती ही कीं, आपली शक्ति आपल्या लष्करावर अवलंबून आहे, आणि आपल्या लष्कराचें अस्तित्व धर्माच्या खऱ्याखोट्या स्तुतीवर अवलंबून आहे. धर्माचार पाळण्यांत श्रीमंत लोकांइतका कडकपणा तुम्हास कोठेंहि आढळावयाचा नाहीं. दर रविवारी देवळांत जाण्यास ते चुकावयाचे नाहींत. आपला धार्मिकपणा सामान्य जनतेच्या डोळ्यांत ठसठशीतपणें भरेल, अशा युक्त्या ते योजीत असतात. या साऱ्या गोष्टी स्वसंरक्षणाच्या उपजत बुद्धीनेंच ते बिनचूक करीत असतात पाणी हें आपलें जीवन आहें हें उपजत बुद्धीनें जाणून बदकाचें पोर जसें पाण्याकडे धांव घेतें, तद्वतच श्रीमंतांच्या या क्रिया साहाजीकपणेंच घडत असतात. सांप्रतच्या सामाजिक रचनेंत जें महत्त्वाचें स्थान आपणास प्राप्त झालें आहे, त्याचें मूळ कोठें आहे, आणि आपल्या हातीं तें निरंतरचें कसें राहील याचें ज्ञान या वर्गाला जन्माबरोबरच प्राप्त झालेलें असतें.

सामान्य जनतेच्या धार्मिक भावना आणि या विशिष्ट वर्गाचे विशिष्ट हक्क यांचे परस्परसंबंध कशा रीतीनें परिणत होत आले आहेत, याचा इतिहास या श्रीमंत वर्गाला ठाऊक नसला तरी व्यवहारांत वागावें कसें याची योग्य सूचना त्यांच्या उपजत बुद्धीकडून त्यांना मिळत असते. आपल्या कोणत्या मर्मस्थानाचें रक्षण करणें अवश्य आहे, याचें ज्ञान जन्मादारभ्याच त्यांना असतें आणि या मर्मस्थानाचें रक्षण करण्यास ते सदोदित दक्ष असतात. लोकसत्ता पाहिजे, असें म्हणणारा एकादा वर्ग उपस्थित झाला आणि कांहीं क्रांतिकारक चळवळ तो करूं लागला तर त्या चळवळीचें स्वरूप शुद्ध राजकारणी असेपर्यंत श्रीमंत वर्गाचें लक्ष तिकडे जावयाचें

नाहीं. असली राजकारणी चळवळ शांत चित्तानें ते पहात बसतील; पण लोकांच्या धर्म भावनेला कोणी हात घातलासें दिसलें, तर त्याजवर तात्काळ प्रहार करण्यास ते चुकावयाचे नाहींत.

प्राचीन काळापासूनचा इतिहास आणि मानवी मनोभूमिकेची रचना यांचा अभ्यास जो कोणी करील, त्याला एक गोष्ट प्रामुख्यानें आढळून येईल. ती ही कीं, मनुष्याची कर्मप्रवणता ऐहिक परिस्थितीवर अवलंबून नसून त्याची धर्मप्रवृत्तीच त्याला कर्म करावयास लावीत असते. अर्वाचीन काळचे सुशिक्षित, उदारविचारवादी, सोशियालिस्ट, क्रांतिवादी, वगैरे पुढाऱ्यांनीं हा मुद्दा मुख्यतः लक्षांत बाळगण्यासारखा आहे. मानवी धर्म-प्रवृत्तीची ही शक्ति प्रत्यक्ष सृष्टींत दिसत नसली तरी खरी कार्यकारी शक्ति तीच आहे, हें विसरून चालावयाचें नाहीं.

पण अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही कीं, सांप्रतचे सर्व प्रकारचे पुढारी हा मुख्य मुद्दा विसरले आहेत. जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या परिस्थितीचा अभ्यास फार कसोशीनें आणि बारकाईनें ते करीत असतात, आणि इतक्या उपरहि हा उघड उघड दिसणारा मुद्दा त्यांच्या लक्षांत येत नाहीं, हें मोठें नवल आहे. आतां स्वतःचे पुढारीपण सांभाळण्यासाठीं अथवा आपली फायद्याची जागा कायम राखण्यासाठीं जर हे लोक जाणून बुजून विसरत असतील तर त्यांची ही फसवेगिरी अत्यंत भयंकर आणि माणुसकीला लाज आणणारी आहे, असें म्हटलें पाहिजे. दांभिक म्हणून ज्यांची धिंड येशूख्रिस्तानें काढली, ते लोक याच वर्गांतील होत. येशू-ख्रिस्ताचा खरा कटाक्ष कशावर असेल तर तो दंभावरच आहे. आणि याचें कारण हेंच कीं, मानवी जीवनचरित्रांत या लोकांनीं जितका दुष्ट-पणा उत्पन्न केला आहे, तितका दुसऱ्या कोणत्याहि कारणानें तो उत्पन्न झालेला नाहीं.

ही पुढारी मंडळी दांभिक नाहीं अशी कल्पना केली तर त्यांच्या बुद्धीला हें ग्रहण कोठून लागलें याचा विचार करणें अवश्य आहे. इश्लींच्या खोट्या धर्मरूढींनीं आणि जुन्या भोळवट कल्पनांनीं अशिक्षित जनतेचीं मनें ज्याप्रमाणें भारून गेलीं आहेत, त्याचप्रमाणें अर्वाचीन

तोतया सुशिक्षित वर्गाचीं मनें खोट्या शास्त्रसिद्धांतांनीं भारून गेलीं असल्याचा संभव आहे. धर्म ही निरुपयोगी वस्तु आहे, असा सिद्धांत अर्वाचीन भौतिक शास्त्रें मोठ्या कंठरवानें सांगत असतात आणि या सिद्धांताची छाप हल्लींच्या अर्ध्या कच्च्या सुशिक्षित वर्गावर पडली असावी.

आमच्या सांप्रतच्या काळाचा कांहीं विशेष म्हणून म्हटला, तर तो हाच भ्रम होय. आमचा सुशिक्षितवर्ग एक तर या अर्वाचीन शास्त्रांच्या मायाजाळांत गुरफटला असावा, अथवा तो जाणून बुजून डांबीस बनला असावा. सांप्रतच्या खिस्ती जनतेला योग्य मार्गदर्शकच कोणी उरला नसल्यामुळें याही स्थितीला ती पोंहोंचली आहे. पशुवृत्तींत तिचा प्रवेश अधिकाअधिक प्रमाणांत होत असून अधोगतीच्या मार्गावर तिचें पाऊल अधिकाधिक झपाट्यानें पडत आहे.

खरा धर्म म्हणजे काय, याचे भान सामान्य वर्गाला नाहीं, याची कांहींच खंत सांप्रतच्या सुशिक्षित आणि पुढारी मंडळींना वाटत नाहीं. ऐहिक परिस्थितीशीं या खोट्या धर्मभावनांचा संबंध कांहींच नाहीं असें म्हणण्याची रूढीच पडून गेली आहे. ह्यूम, व्हालटेअर, रूसो, वगैरे खऱ्या विद्वज्जनांनीं सामान्य जनतेला अज्ञानांधकारांतून बाहेर आणण्यासाठीं जी अविश्रांत खटपट केली, तशी खटपट करण्याचें कांहींच कारण आतांच्या काळीं नाहीं, असें प्रतिपादन अर्वाचीन सुशिक्षित वर्ग बिनदिक्कत करीत असतो. मनुष्याला योग्य मार्गाला लावण्याचें काम अर्वाचीन शास्त्रेंच बिनचूक करतील असें त्याला वाटतें. पृथ्वीपासून सूर्य किती कोटी मैल लांब आहे, अथवा ताऱ्यांत किती धातूंचें मिश्रण आहे, हें समजलें म्हणजे हल्लींच्या खोट्या धर्ममतांचा त्याग माणसें आपोआपच करूं लागतील, असें या वर्गाला वाटतें.

अर्वाचीन सुशिक्षित वर्गाची वागणूक गैरसमजुतीपासून उत्पन्न झाली असो अथवा जाणून बुजून दांभिकपणानें केलेली असो, तिच्यामागें विलक्षण भ्रम किंवा भयंकर फसवेगिरी यांपैकीं कोणत्या तरी एकाचें अस्तित्व आहे यांत संशय नाहीं. मुलांच्या मनावर अगदीं लहानपणापासूनच हल्लींच्या तोतया खिस्तीधर्माचे संस्कार घडत असतात. बाल-

वयांत त्यांचीं मनें कसलेहि संस्कार त्वरेनें ग्रहण करण्यासारखीं असतात. अशा स्थितींत त्यांना कसलें शिक्षण मिळतें हें पाहण्याचें काम त्यांच्या वडील मंडळीचें आहे. या बाबींत झालेली यत्किंचित कसूरहि मुलांना पुढें जन्मभर नडत असते आणि त्यांच्या अशा स्थितींतच अनीतिप्रचुर आणि विवेचक बुद्धीला सोडून असलेल्या धर्मतत्वांचें बीजारोपण त्यांच्या ठिकाणीं केलें जातें. परमेश्वर एक आहे, आणि तीनहि आहे, असल्या विचित्र आणि परस्पर विरोधी मतांची सांगड कोणत्या बुद्धीला घालतां येईल? या तीन परमेश्वरांतला एक मनुष्याच्या उद्धारासाठीं पृथ्वीवर अवतरतो आणि मरून थडग्यांत गेल्यानंतर तेथून उठून पुन्हां स्वर्गांत जातो. आतां स्वर्गांतून फिरून परत येऊन पाप्यांना निरंतरचें शासन करणार आहे, असलीं खुळें मुलांच्या मनांत भरविण्यांत येतात. आपणास हवें असेल तें मिळविण्यासाठीं परमेश्वराची प्रार्थना करावयाची, असेंहि त्यांना शिकविण्यांत येतें. आतां असल्या खुळचट गोष्टींची खिचडी धर्म म्हणून कोण ग्रहण करील, याचा विचार वाचकांनींच करावा. हीं मतें विवेचक बुद्धीला सोडून आहेत. चालू ज्ञानाशीं त्यांचा मेळ नाहीं, आणि सदसद्विवेक बुद्धीला तीं पटत नाहींत हें कोणासहि उघड समजण्यासारखें आहे. मुलांच्या कोंवळ्या मनांत हीं खुळें एकदां भरवून दिलीं कीं, पुढें त्यांची वास्तपुस्त कोणीहि करीत नाहीं. कालांतरानें त्यांची बुद्धि जास्त झाली म्हणजे चित्तांत सत्य म्हणून लहानपणीं शिकलेल्या, या गोष्टींतील परस्पर विरोध त्यांच्या चित्तांत उभा राहतो. त्यांची सांगड त्यांना घालतां येत नाहीं, आणि त्यांच्या बुद्धीचा अगदीं गोंधळ उडून जातो. अशा स्थितींत कोणी मार्गदर्शकहि त्यांना भेटत नाहीं. स्वतःस नीतिशास्त्रज्ञ पंडीत म्हणविणारा एखादा प्राणि त्यांना भेटलाच तर त्याच्या उपपत्ति ऐकून त्यांचा अधिक बुद्धिभेद मात्र होतो. जुन्या विरोधांत या नव्या विरोधाची आणखी भरच पडते. अशा स्थितींत आपली विवेचक बुद्धि तरी धड आहे कीं नाहीं, ही शंका बळावत जाऊन पापपुण्याची निवड करण्याचें कोणतेंहि निश्चित साधन मनुष्यास उपलब्ध नाहीं, असें त्यांच्या मनावर पक्कें ठसवें. अशा स्थितींत परावलंबित्व आपोआपच तेथें उत्पन्न होवें ' मीं

वागावें कसें ?' या प्रश्नाचें उत्तर 'लोक सांगतील तसें' असें त्यांची बुद्धि त्याला देऊं लागते. इतकी गुलामगिरीची अवस्था प्राप्त झाली म्हणजे त्यांच्या आध्यात्मीक स्थितींत केवढें अवस्थांतर होत असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. बुद्धीचा पुरा विपर्यास होऊन खोटें तें खरें आणि अधर्म तोच धर्म असें त्यांना वाटूं लागतें. हल्लीं मोठ्या वयाच्या माणसांच्या कानावरहि जीं मतें वारंवार पडत असतात तीं पाहिलीं म्हणजे जन्मापासून मरेपर्यंत हल्लीं मिळत असलेल्या शिक्षणाचा परिणाम किती भयंकर होत असेल हें सांगतां सुद्धां यावयाचें नाहीं.

अर्वाचीन धार्मिक शिक्षणानें पेरलेल्या या विषापासून स्वतःची सुटका करून घेण्याइतकी दृढ बुद्धि एकाद्याला राहिली असली, तरी दुसऱ्या एका बाजूनें त्याची फसगत होत असते. मनुष्याच्या पोटांत एकादें जहाल विष गेलें म्हणजे औषधांनी तें काढून टाकले, तरी त्याचें शेपूट अंशतः तरी मागें उरत असतें. आणि त्याचे परिणाम अल्पस्वल्प प्रमाणानें तरी त्या मनुष्याला जन्मभर भोगावे लागतात. हाच नियम या विषारी शिक्षणालाहि लागू पडतो. स्वतःच्या बुद्धीवर पडलेली झांपड, महत्प्रयासानें एकाद्यानें दूर केली तर पुष्कळ वेळां चुलींतून निघून वैलांत पडल्यासारखी त्यांची स्थिति होते. धर्म हा मनुष्याच्या उत्क्रांतिपंथांतील एक मोठा अडथळा आहे. या अर्वाचीन सुशिक्षितांच्या मताला हा गृहस्थ बळी पडतो. आणि हें मत त्याच्या चित्तांत पक्कें भिनलें म्हणजे स्वतःच्या गुरुप्रमाणें तो पुरा धर्मभ्रष्ट बनतो. त्याला कसलेंहि बंधन उरत नाहीं. त्याची सद्सद्विवेक बुद्धि झोंपी जाते. आणि अखेरीस तो इंद्रियजन्य वासनांचा गुलाम होऊन राहतो. इंद्रियांच्या वासना पुरविणें या एकाच तत्वावर त्यांच्या जीवन-चरित्राची उभारणी होते. याबद्दल त्याला कधीं पश्चात्ताप होत नाहीं, एवढेंच नव्हे, तर मनुष्याला शक्य तितक्या उच्च मानसिक अवस्थेवर आपण आरूढ झालों आहों, असें त्याला वाटूं लागतें.

खंबीर मनाच्या मनुष्यांची अवस्था पुष्कळ वेळां अशा प्रकारची झाल्याचें अनुभवास येतें. याहून दुबळ्या मनाचे जे कोणी असतात, त्यांच्या मनांत कितीहि शंका उठत असल्या, तरी लहानपणीं मिळालेल्या खोट्या धर्मतत्वाच्या

शिक्षणापासून स्वतःची सुटका त्याच्यानें करून घेववत नाहीं. मग या परस्पर-विरोधी वस्तूंचा मेळ घालण्याची धडपड हे लोक सुरू करतात, आणि विचित्र शब्दजाल निर्माण करून त्यांत स्वतःस आणि लोकांस गुरफटवीत असतात. त्यांचें स्वतःचें शंकानिरसन झालेलें नसतें, त्यांचे धार्मिक आचार निव्वळ दांभिक असतात, आणि आपण मोठे धार्मिक आहों, अशी स्वतःची फसवणूक ते करून घेत असतात. आणि या मायाजाळांतून स्वतःस सोडविण्याचें सामर्थ्य त्यांच्या आंगीं नसल्यामुळें इतरांची फसगत करण्याचें पाप त्यांना न कळत त्यांच्या हातून घडत असतें. सामान्य जनतेला प्रकाशांत आणण्याचा उद्योग कोणी करूं लागला, तर केवळ स्वतःची अब्रू बचावण्याकरतां, हे दांभिक लोक त्याच्या आड येऊं लागतात.

अशा स्थितींत सामान्य जनतेबद्दल तर विचारच करावयास नको. पुढाऱ्यांनीं निर्माण केलेल्या या भ्रमांतून सुटण्याचें सामर्थ्य तिला नसतें आणि तसें करण्याची संधीहि तिला मिळत नाहीं. यामुळें पिढ्यांमागें पिढ्या तिचें गाडें जुन्या चाकोरींतून चालत असतें. मनुष्याचें परम कल्याण कशांत आहे, या गोष्टीची नुसती वार्ताहि सामान्य जनतेच्या कानीं जात नाहीं, आणि स्वतःवर करडा अंमल गाजविणाऱ्या पुढारी वर्गाच्या हातांतील बाहुलें होऊन राहण्यापेक्षां अधिक कांहीं तिला करवत नाहीं.

सांप्रतच्या शिक्षणानें उत्पन्न केलेल्या या भुलीचें स्वरूप इतकें भयंकर असतां अर्वाचीन सुशिक्षितांच्या मनांत तें येत नाहीं, आणि त्याचा उच्छेद करावा असेंहि त्यांना वाटत नाहीं. याचें कारण हेंच कीं, अर्वाचीन सुशिक्षित वर्ग स्वतःच या भुलींत पक्का गुरफटला गेला आहे. अर्वाचीन खोट्या शास्त्रांनीं त्याच्या बुद्धीचे डोळे मिटले आहेत. या सुशिक्षितांत जे कोणी लफंगे आहेत, त्यांना ही वस्तुस्थिति समजते. पण लोकांची ही निद्रा घालविणें, त्यांच्या स्वतःच्या फायद्याचें नसल्यामुळें हा उद्योग ते कधींच करीत नाहींत. एकंदरींत पाहतां कोणत्याहि रस्त्यानें गेलें, तरी हल्लीं हिशेब सारखाच. हल्लींच्या खोट्या धर्मानें फार भयंकर परिस्थिति उत्पन्न केली आहे यांत संशय नाहीं. आणि प्रथम या खोट्या धर्माचा उच्छेद केल्याशिवाय सामान्य जनतेला आपण प्रकाशांत आणूं

शकूं, असें कोणी म्हणत असेल, तर त्याचें तें म्हणणेंहि अगदीं चुकीचें आहे.

सध्यांचे धर्माधिकारी आणि त्याजबरोबरच अर्वाचीन सुशिक्षित यांनीं जी भुरळ सामान्य जनतेला घातली आहे, तींतून ती मुक्त झाली तरच तिचा तरणोपाय आहे. भरलेलें भांडें प्रथम रिकामें केल्याशिवाय त्यांत दुसरा जिन्नस जसा ठेवतां येत नाहीं, त्याचप्रमाणें ही भुरळ प्रथम दूर झाल्याशिवाय, तेथें दुसरी कोणतीहि नवी योजना आणणें शक्य नाहीं. खोट्या धर्मविचारांचें पूर्ण उच्चाटण झाल्याशिवाय खऱ्या तत्त्वांचा उमज लोकांना पडावयाचा नाहीं. जीवात्मा आणि परमात्मा यांचे नित्य संबंध काय आहेत, याची गंधवार्तासुद्धां लोक विसरले आहेत. या मूलभूत तत्त्वाची ओळख लोकांना पूर्णपणें पटली तर त्यांच्या आचारांत योग्य बदल आपोआपच होईल.

जगांतील अनेक धर्म वर वर पाहून पुष्कळ लोक गांगरून गेलेले असतात. एखाद्या रोगाची साथ आली म्हणजे तिला बळी पडलेल्या लोकांकडे पाहून सदृढ माणसेंहि जशीं गांगरून जातात त्याचप्रमाणें नानाविध धर्म आणि नानाविध धर्माचार पाहून पुष्कळ लोक गोंधळून गेलेले असतात. जगांत खरा धर्म म्हणून कांहीं आहे कीं नाहीं, याचीच शंका त्यांना येते. अमुक एकच धर्म खरा आणि बाकीचे खोटे, असें तरी कां म्हणावें, असा प्रश्न ते करूं लागतात. त्यांनीं कोणत्याहि धर्माचा अभ्यास केलेला नसल्यामुळेंच ही चूक त्यांच्या हातून घडते. निरनिराळ्या धर्मांत भेद दिसतात, ते केवळ बाह्याचारापुरतेच आहेत आणि मूलतत्त्वांत कोणत्याहि धर्माचें दुसऱ्याशीं भांडण नाहीं, ही मुख्य गोष्ट अशा माणसांच्या लक्षांत आलेली नसते. जगांतील नानाविध धर्मांत जीं मूलभूत तत्वें आहेत तींच खरी धर्म होत. आणि सध्यांच्या काळीं त्यांचा अभ्यास करणें हेंच आपणा सर्वांस श्रेयस्कर आहे. या सामान्य तत्वांची ओळख सर्वांना होणें इष्ट आहे आणि ती झाली तरच सामान्य जनतेची मुक्तता होईल. आज अनेक यंत्रें आणि उपकरणें आपण पाहतों; पण या सर्वांची वाढ गांवढळ हत्यारांतून क्रमशः झालेली आहे, हें

लक्षांत ठेवलें पाहिजे. मूळच्या सामान्य उपकरणांची सुधारणा पिढ्यान् पिढ्या होत जाऊन हल्लीचें सर्वमान्य यंत्र बनलें आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्याप्रमाणें या सामान्य तत्वांचें बीजारोपण आज आपण सर्वत्र करून दिलें तर त्यांतून सदाचाराची उत्पत्ति कालेंकरून आपोआपच होईल. मनुष्याच्या नीतियुक्त जीविताला आधारभूत असलेल्या तत्वाची ओळख त्याला करून देणें इतकेंच आपलें पहिलें कार्य आहे. हीं मूलभूत तत्वें म्हणजे खरा धर्म आजहि अस्तित्वांत आहे. आंधळ्यांना तो दिसत नसला तर तो नाहीं, असें सिद्ध होत नाहीं.

सर्व मनुष्य जातीला सामान्य असा सनातन स्वरूपाचा धर्म आजहि अस्तित्वांत आहे. एकादा विशिष्ट पंथ अशा स्वरूपानें तो अस्तित्वांत नाहीं, अथवा कांहीं विशेष नांवानेंहि तो ओळखला जात नाहीं. विशिष्ट पंथांतील विशेष आणि त्यांतील तत्वपरिवर्तन या गोष्टीहि या धर्मात नाहींत; तथापि मनुष्यजातीपैकीं नऊदशांश भाग तरी या धर्माचा भक्त आहे. यांतील तत्वें कोणालाहि अमान्य होण्यासारखीं नाहींत. आणि विस्तीर्ण स्वरूपाचे जे धर्म आज जगांत अस्तित्वांत आहेत, त्यांतील सारीं तत्वें या विश्वव्यापी धर्मात अंतरभूत झालेलीं आहेत. जगांतील सारींच माणसें आज पशूंच्या कोटीला पोहोंचलेलीं नाहींत, याचें कारण हेंच कीं, प्रत्येक देशांत या विश्वव्यापी धर्माचे अनुयायी मूठभर तरी असून आपला धर्म स्पष्टपणें ते बोलून दाखवितात. सामान्य जनतेला त्यांचा उपदेश पटतो, आणि अजाणपणें कां होईना या श्रेष्ठ पुरुषांच्या मागें ती जात असते. या विश्वव्यापी धर्माचा स्वीकार आज उघड्या मानानें करण्यास सामान्य लोकसमूह धजत नाहीं, याचें कारण इतकेंच कीं, जुने पुराणे धर्माधिकारी आणि अर्वाचीन भौतिक शास्त्रवादी पंडित यांनीं घातलेल्या भुरळींतून त्यांची मुक्तता अद्यापि झालेली नाहीं.

या सत्य धर्माचीं तत्वें इतकीं स्वभावसिद्ध आहेत कीं, कोणालाहि तीं सांगितल्याबरोबर पटतात. या तत्वांत कांहीं नवीनपणा अथवा परकेपणा नसून जन्मापासून तीं आपल्या ओळखीचीं आहेत असें प्रत्येक श्रोत्याला वाटतें. त्यांची सत्यता इतकी उघडी आहे कीं, लांबलचक वाद-

विवादानें ती सिद्ध करण्याचें कारणच नाहीं. ख्रिस्ती धर्मांतील बाह्य आचार वगळून जीं शुद्ध स्वरूपाचीं तत्वें उरतात तो ख्रिस्ती लोकांचा सनातन धर्म आहे. ब्राह्मण धर्म, कन्फ्युशसचा धर्म, हिब्रू धर्म, बौद्ध धर्म आणि महंमदी धर्म यांतील मूळ तत्वांशीं सनातन ख्रिस्ती धर्मतत्वांचा मुळींच वाद नाहीं. या धर्मांत विरोध उत्पन्न होतो. तो तत्वमूलक नसून बाह्य आचारापुरता असतो. याचप्रमाणें हिंदु, चिनी, जपानी अथवा महंमदी लोकांचा खरा सनातन धर्म त्यांच्या तत्वांत आहे. या साऱ्या धर्मांचीं तत्वें, साधीं, सोपीं आणि स्पष्ट आहेत.

हीं मूलभूत तत्वें अशीं सर्वव्यापी आणि सर्वभूतांतरात्मा अशा परमेश्वराचें अस्तित्व. प्रत्येक मनुष्यांत परमेश्वर अंशरूपानें वास करतो. या अंशाची वाढ अथवा त्याचा विनाश स्वतःच्या कृतीनें मनुष्याला करतां येतो. या अंशाची वाढ करण्याकरतां सर्व विकारांचें निर्मूलन आणि प्रेमाची वाढ या गोष्टी अत्यावश्यक आहेत. लोकांनीं आपल्याशीं जसें वागावें असें आपणांस वाटतें तसें आपण लोकांशीं वागावें, हा या धर्माचा राजमार्ग आहे. हीं तत्वें सर्व धर्मांत सारखींच आहेत. कोणीहि हीं नाकबूल केलेलीं नाहींत. परमेश्वर अशा प्रत्यक्ष शब्दानें परमात्मरूपाची स्पष्ट व्याख्या बौद्ध धर्मानें केलेली नसली तरी सर्वव्यापी निर्वाण या शब्दानें तोच अर्थ या धर्मानें सूचित केला आहे. ज्याच्याशीं मुक्तात्मा एकरूप पावतो, तें निर्वाण, असें बौद्ध धर्मानें म्हटलें आहे. याच स्वरूपाला हिब्रू, ख्रिस्ती आणि महंमदी धर्मांनीं परमेश्वर असें नांव दिलें आहे.

आजकालच्या माणसांना अशा सनातन धर्माची ओळख पटत नाहीं. धर्माची ही व्याख्या त्यांच्यापुढें ठेवली म्हणजे धर्म नव्हे असें तीं म्हणतात. धर्म म्हणजे अगम्य, आणि गूढमत गोष्टींचें गाठोडें, असें त्यांच्या मनानें घेतलें आहे. आपण केलेल्या या व्याख्येला तीं तत्वज्ञान, नीतिशास्त्र, अशीं नांवें देतील; पण त्याला तीं धर्म समजणार नाहींत. धर्म म्हणजे ज्यांत कांहीं उमज पडत नाहीं तो, अथवा ज्यांत उघड उघड मूर्खपणा आणि विरोध आहे तो! अशी त्यांची धर्माची व्याख्या आहे. पण प्रत्येक धर्माला जें हल्लीचें विरोधात्मक आणि मूर्खपणाचें स्वरूप प्राप्त झालें आहे,

त्याचा जन्महि याच तत्वांतून झाला आहे. दीर्घकाळाचें कीट त्या तत्वावर चढून त्यांचें मूळचें उज्वल रूप लुप्त झालें आणि ज्यांच्या हातीं तीं प्रथम सांपडलीं, त्यांनीं हळूहळू त्यांचें परिवर्तन करून त्यांनां सांप्रतच्या गलिच्छ स्वरूपाला आणून पोहोंचविलें आहे. एकादें सडकें नारिंग पाहून नारिंग म्हणजे सडकें आणि घाणेरडें फळ, अशी व्याख्या कोणी केली, तर ती नारिंगाची योग्य व्याख्या होईल काय ? त्याचप्रमाणें हल्लींचें दुष्ट स्वरूप पाहून धर्म म्हणजे दुष्ट स्वरूपाचाच असला पाहिजे असें समजणें शुद्ध वेडेपणाचें होईल.

खरा सनातन धर्म आणि बाह्य धार्मिक आचार यांचा परस्परांशीं कांहीं संबंध नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. जीवात्मा आणि परमात्मा अथवा व्यक्तिगत चैतन्य आणि विश्वचैतन्य यांतील परस्परसंबंध या नित्य संबंधांतूनच मनुष्याच्या जीवितांचें साफल्य कशांत आहे. हें निश्चित होत असतें, आणि हें साफल्य जशा प्रकारच्या वर्तणुकीनें सिद्ध करितां येईल त्या वर्तणुकीचे नियम या नित्यसंबंधांतूनच उत्पन्न होतात. धर्माची ही व्याख्या नीट लक्षांत आली म्हणजे जगांतील सारे चालू धर्म मूलतत्वांच्या दृष्टीनें या व्याख्येशीं विसंगत नाहींत, हें आपल्या लक्षांत येईल. प्रत्येक मनुष्यांत असलेला परमात्म्याचा अंश वाढीला लावणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे. हें साधण्यासाठीं कांहीं गोष्टींचा आचार प्रत्यक्षपणें करणें तितकेंच अवश्य आहे, आणि या आचाराचें सार एकाच सूत्रांत सांगावयाचें म्हणजे, लोकांनीं आपल्याशीं जसें वागावें असें आपणांस वाटतें, तसें आपण लोकांशीं वागावें, या सूत्रानें सांगतां येईल. या नियमाप्रमाणें वागणें सर्व स्थितींत आणि सर्व काळीं अत्यावश्यक आहे कीं काय अशी शंका पुष्कळ लोकांना येते. अशी शंका पूर्वीं एकाकाळीं मला स्वतःलाहि येत होती. उपासतापास, प्रार्थना, दानधर्म, तीर्थप्रसाद, इत्यादि बाह्य गोष्टी ज्याप्रमाणें सर्व काळीं आवश्यक आहेत, त्याचप्रमाणें हा नियम पाळणेंहि तितकेंच अत्यावश्यक आहे कीं काय, अशी शंका पुष्कळांना येते. वास्तविक खऱ्या धर्मप्रवृत्तीच्या मनुष्याला अशी शंका येण्याचें कारण नाहीं. बाह्योपचार तोच धर्म असल्या वेड्या समजुतींत जो गुरफटला असेल

त्यालाच ही शंका येईल. तोंडांत असलेला तीर्थप्रसाद उकिरड्यावर थुंकून टाक, असें एकाद्या अडाणी रशियन शेतकऱ्याला कोणीं सांगितलें तर ती गोष्ट प्राणांतींहि तो करणार नाहीं. पण दुसऱ्या एका विशिष्ट मनुष्याच्या हुकुमाबरोबर हाच शेतकरी प्रत्यक्ष आपल्या भावाच्याहि मानेवर सुरी ठेवण्यास तयार होतो, हें आपण नित्य पाहतों. वरील शंकेचें समाधान शेतकऱ्याच्या या वागणुकींत सांपडल्यासारखें आहे. तीर्थप्रसाद घेणें आणि उपासतापास करणें या गोष्टी खरें धर्मप्रेम दाखवितात, अशी सामान्य लोकांची समजूत करून दिलेली असते. पण खिस्ताच्या साऱ्याच आज्ञा अनुल्लंघ्य आहेत, असें कोणीं कधीं त्यांना शिकवितें काय? कोणावरहि हत्यार धरूं नको, कोणाची निंदा करूं नको, परद्वार करूं नको, दुसऱ्यावर सूड घेऊं नको, स्वतःच्या फायद्यासाठीं दुसऱ्याच्या अडचणींत त्याला छळूं नको या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या आज्ञा कोणत्याहि काळीं आणि कोणत्याहि परिस्थितींत उल्लंघन करतां येत नाहींत, अशी शिकवणूक सामान्य लोकांना कधींच दिलेली नसते. ज्या लोकांच्या धर्मसमजुती केवळ भोळ्या विश्वासावर अवलंबून असतात आणि त्यांचे धार्मिक आचार स्वतःच्या पूर्ण विचाराअंतीं ठरलेले नसतात, अशा लोकांना खरें धर्मशिक्षण हल्लीं कोठेंच मिळत नाहीं. शुष्क धार्मिक आचार जितक्या बळजबरीनें त्यांजवर लादण्यांत येतात तितक्याच जबरदस्तीनें खऱ्या सनातन धर्मतत्वांचें शिक्षण त्यांना कां देण्यांत येऊं नये?

खऱ्या धर्माचें शिक्षण देणें ही गोष्ट अशक्य नाहीं, एवढेंच नव्हे तर ही गोष्ट अत्यंत सोपी आहे. विशिष्ट पंथांचीं विशिष्ट गांवढळ मतें आणि सारासार विचारशक्तीला विरुद्ध असलेले आचार लोकांच्या मनांत भरविणें हें जितकें कठिण आहे, तितकें खरें धर्मशिक्षण देणें कठीण नाहीं. या खऱ्या धर्माचें शिक्षण लहानपणापासून मिळत गेलें तर मानवजातीच्या जीवनक्रमाचा ओघ मुळांतूनच बदलून जाईल. कोणत्या दिवशीं, कोठें आणि केव्हां प्रार्थना करावी, देवळांत कोणत्या वस्तू अर्पण कराव्यात, कोणतें अन्न केव्हां खाऊं नये, इत्यादि शुष्क गोष्टींचा काथ्याकूट हल्लीं जितका होतो, त्याच्या शतांशानेंहि खरी धर्मचर्चा कोठें ऐकूं येत नाहीं.

आपणामध्यें असलेला परमेश्वराचा अंश, आपल्या वर्तणुकीनें वाढीस लावला पाहिजे, ही गोष्ट कोणी कोठें बोलून दाखवीत नाहीं. चमत्कारांच्या भाकडकथा आणि कधीं न घडलेल्या गोष्टी यांचें चर्वित चर्वण करण्यापेक्षां हें साधें आणि सोपें तत्व मुलांच्या मनांत लहानपणापासून भरविण्यांत येईल, तर हल्लीं जे अनेक निष्कारण तंटे बखेडे माजतात, त्यांचें मूळच नष्ट होईल. हें तत्व सर्व मनुष्यजातीच्या हृदयावर पक्कें बिंबलें तर हल्लींचे राजकारणी पुरुष, त्यांच्या गुप्त वाटाघाटी, राष्ट्रांराष्ट्रांतील कायदे, शांततापरिषदा इत्यादि सारीं ढोंगें बाळगण्याचें कारण जगाला उरणार नाहीं. अशा स्थितींत सोशियालिस्टासारखे अराजक पंथहि मुळांतून उपटले जाऊन अवघी मनुष्यजाति, पूर्ण शांततेनें आणि एकाच कुटुंबांतील लेंकरांप्रमाणें कालक्रमण करून आपलें जीवित सुखानें काढील.

पण असें घडून येत नाहीं. हल्लीं प्रसार पावलेल्या खोट्या धर्मांचा उच्छेद करून सनातन तत्वांचा उपदेश कोणी करीत नाहीं, इतकेंच नव्हे तर दिवसेंदिवस जगाची सत्याशीं अधिकाधिकच फारकत होत आहे.

आज दीर्घ काळ मनुष्यें धर्मशून्य जीवित ढकलीत आलीं आहेत. स्वतःचें संरक्षण गोळ्यांनीं, तुरुंगांनीं आणि वधस्तंभांनीं करण्याची संवय त्यांच्या आंगीं आतां इतकी मुरून गेली आहे कीं, या गोष्टी अगदीं स्वाभाविक आणि नित्य परिपाठांतील आहेत, असें त्याला वाटतें, इतकेंच नव्हे तर आपला जीवनक्रम याहून कांहीं वेगळ्या तऱ्हेनें आंखणें शक्य आहे, इतकेंसुद्धां त्याच्या चित्तांत येत नाहीं. यामुळें स्वभावसिद्ध, शक्य आणि अत्यावश्यक धर्माला ते आज पारखे होऊन बसले आहेत. चालू समाजरचनेंत ज्यांची पोळी पिकते, त्यांना ती पसंत पडते यांत नवल नाहीं. पण या रंगाच्याखालीं ज्यांचें पीठ होत आहे, अशी सामान्य जनताहि वरिष्ठ वर्गानें घातलेल्या भुलीमुळें पुरी आंधळी बनून तिलाहि सारासार विचार उरलेला नाहीं. समाजाची घडी विस्कळीत होऊं न देण्यासाठीं दंडनीति हें एकच साधन आहे, असें सामान्य माणसांनाहि वाटतें. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, दंडनीतीनें समाजाचें कल्याण साधण्याचा चालू मार्गच सामान्य जनतेला रसातळास नेत आहे. आपल्या दुःखाचें मूळ

आहे कोठें, याची जाणीव सामान्य जनतेला या दंडनीतीमुळेंच होत नाहीं आणि यामुळेंच सत्य मार्ग तिला दिसत नाहीं आणि त्याची स्थापना करण्याची बुद्धि होत नाहीं.

एकादा अडाणी वैद्य आपल्या रोग्याला असें औषध देतो कीं, त्यामुळें रोगाचें स्वरूप बाहेर दिसून न येतां त्याची पाळेंमुळें अधिक खोल जात असतात. कांहीं काळ आपण रोगमुक्त होत आहों, असा भ्रमहि रोग्याला होत असतो; पण अखेरीस तो भ्रमच ठरतो. तो रोग गुप्त रीतीनें शेवटीं इतका वाढतो कीं, तो बरा करणें पुढें अगदीं अशक्य होतें. सांप्रतची मानवी समाजाची स्थिति अशाच प्रकारची झाली आहे.

शासनाधिकारी वर्ग ' आप मेला जग बुडाला ' अशा निरर्गल वृत्तीचा झाला आहे. सैन्यें, त्यांच्याच ताब्यांतील धर्माधिकारी वर्ग, पोलीस, तुरुंग इत्यादि अनेकांगी यंत्रांच्या बळावर निरर्गल बनणें त्याला सोपें झालें आहे. लक्षावधी जनतेला गुलाम बनवून तिला पिळून काढावें आणि स्वतःची चैन चालवावी, हें कार्य त्याला फार सोपें झालें आहे, आणि तें करीत असतां कायद्याचें रक्षण करून सुव्यवस्थेची स्थापना आपण करतों, असें हा वर्ग भासवीत असतो. पण त्यांच्या या कृतीमुळेंच मानवी समाज सुरचनेला पारखा झाला आहे. सुव्यवस्था आणि चांगली समाजरचना यांची स्थापना करण्याऐवजीं सांप्रतचा राजशासनवर्ग अव्यवस्थेची घडी मात्र ठाकून ठोकून बसवीत आहे.

अर्वाचीन काळच्या ख्रिस्ती राष्ट्रांतून धर्माचें उच्चाटण बहुतांशीं झालें आहे; तथापि त्यांतला जो थोडा बहुत अंश अद्यापि जीव धरून राहिला आहे, तेवढ्यानेंहि धर्मकार्य बरेंच साधलें असतें; पण सामान्य जनतेच्या नजरे-समोर जें प्रत्यक्ष उदाहरण रोज दिसतें त्यामुळें तिची दानत अगदीं बिघडून जाऊन उरल्या सुरल्या धर्मतत्वांचा त्याग करण्याच्या मार्गास ती लागली आहे. सामान्य जनतेचे धुरीण असें जे स्वतःस म्हणवितात, समाजांत उत्तम शिस्त राखून त्यांची नीतिमत्ता वाढवावी, हें ज्याचें खरें कार्य, तो सत्ताधीश वर्ग कसा वागत असतो पहा! युद्धें, मनुष्यवधाच्या शिक्षा, तुरुंग आणि त्यांतील अत्याचार, सामान्य समाजाला पिळून टाकणारे कर,

अफू, दारू इत्यादि मादक पदार्थांची विक्री, असल्या नीतिबाह्य गोष्टी हा वर्ग उघड्या डोळ्यानें करीत असतो. यांत धर्मतत्त्वांचें आणि नीतिचें कांहीं उल्लंघन होत आहे असें त्याच्या मनांतहि येत नाहीं. या साऱ्या गोष्टी अवश्यक आहेत, असें उच्च घोषानें तो प्रतिपादीत असतो. असल्या वर्तणुकीचें उदाहरण नमुन्यादाखल पुढें ठेवून सामान्य जनतेनें व्यक्तिशः तोच कित्ता गिरविण्यास सुरुवात केली, तर त्यांत तिची काय चूक आहे? अशा स्थितींत फसवेगिऱ्या, विश्वासघात, दंडादंडी आणि खून हे प्रकार रोज घडावेत, यांत नवल नाहीं. उच्च वर्गाचें उदाहरण सामान्य जनसमुहाच्या नजरेसमोर नसतें, तर हल्लींच्या अत्याचारांचा शतांशहि पाहण्यांत आला नसता. स्वतः अधिकारी वर्ग ज्या गोष्टी करतो, त्या नीतीला धरून आणि आवश्यकच असल्या पाहिजेत, असा भ्रम सामान्य लोकांना पडणें स्वाभाविक आहे.

व्यक्तीची अथवा जनसमूहाची सुधारणा व्हावयाची असेल तर ती एकाच मार्गानें साधण्यासारखी आहे. बाह्य आचरणाची सुधारणा नीतितत्त्वांच्या अंतर्गत वाढीवर अवलंबून आहे. जी व्यक्ति पूर्णत्वाच्या मार्गाला लागली असेल, तिचें बाह्य आचरणहि शुद्ध आणि समाजसुधारणेला पोषक असें आपोआपच घडत असतें. व्यक्तीची ही गोष्ट साऱ्या समाजालाहि तितकीच लागू आहे. समाजाची अंतर्गत नीतिमत्ता सुधारल्यावांचून नुसत्या बाहेरच्या दडपणानें त्याची व्यवस्थित वाढ कधींहि व्हावयाची नाहीं. दंडनीतीनें सामान्य जनसमूहाला शिस्त लावूं गेल्यानें दुष्टत्वाचें प्रत्यक्ष उदाहरण त्याच्या डोळ्यासमोर ठेवल्यासारखें होतें. अशा स्थितींत त्याच्या जीवनक्रमांत कांहीं सुधारणा तर होत नाहींच; पण सत्यमार्गापासून तो दिवसें दिवस अधिकाधिक भ्रष्ट होत जाऊन अखेरीस सुधारणेची शक्यताहि त्यांतून नाहींशी होते.

कायदा आणि सुव्यवस्था या भ्रामक नांवाखालीं सत्ताधीश वर्गाचें बाऊल दंडनीतीच्या मार्गानें जों जों अधिक पुढें पडून त्याच्या हातून प्रत्यक्ष गुन्हेहि अधिकाधिक होऊं लागतात, तसतसा या दंडनीतीवरील सामान्य जनाचा विश्वासहि वाढत जातो. आपली वर्तणूक सदाचारशुद्ध आहे

असें भासविण्याचा यत्न अधिकारी वर्ग अधिकाधिक प्रमाणावर करूं लागतो. आणि सामान्य जनताहि गुरुसे चेला सवाई या नात्यानें अधिकारीवर्गाचेंच अनुकरण करूं लागतो. प्रेम आणि लोकसेवा हा मानवी जीविताचा आधार-स्तंभ नसून परस्परभक्षण हाच त्याचा प्रकृतिसिद्ध कायदा आहे, असें त्याला पक्केंपणीं वाटूं लागतें. मग एकमेकांना भक्षण करण्यांतच त्यांची अहमहमिका सुरू होते. आपल्या बुद्धीचें आणि देहाचें सारें सामर्थ्य दुसऱ्यांना भक्षण करण्यांत तो खर्चूं लागतो.

पशुवृत्तीच्या मार्गाला लागण्याचा हा आरंभ होय. या विचारांचा पगडा सामान्य जनतेच्या चित्तावर जों जों अधिक बसतो तों तों त्याची मिठीहि अधिकाधिक पक्की होत जाऊन अखेरीस या घट्ट गळफांसांतून तिची सुटका करणें दुष्कर होऊन बसतें. अशा रीतीनें वागणें हाच आपला धर्म आहे, हा समज दृढ झाला म्हणजे खऱ्या धर्मतत्वांची ओळख तिला पटविणें कठीण होतें.

हल्लींच्या परिस्थितीनें एक दुष्ट अखंड मंडळ निर्माण केलें आहे. धर्म नाहींसा झाल्यामुळें दंडनीतिचें प्राबल्य वाढून पशुत्वाकडे जाण्याचा रस्ता अवघ्या मानव सृष्टीला मोकळा झाला आहे. या पशुवृत्तीचा संचार समाजाच्या तळापर्यंत झाला असल्यामुळें खऱ्या धर्माची ओळख करून देणें अवश्य झालें आहे, आणि अशी ओळख न झाल्यामुळें मनुष्यजातीची पशुवृत्तींतून सुटका करणें अशक्य होऊन बसलें आहे. यामुळेंच समाजाच्या सुधारणेला आणि वाढीला आवश्यक अशा गोष्टी, समाज करीनासा झाला आहे. खोटया धर्माचें उच्चाटण तो करीत नाहीं आणि खऱ्याचा स्वीकार करण्याला लागणारी अनुकूल मनोवृत्ति त्याजपाशीं नाहीं.

अशा रीतीनें जें हें दुष्ट अखंड मंडळ निर्माण झालें आहे त्याचा कोट फोडण्यास कांहीं साधन नाहीं काय?

साऱ्या प्रजेला सुमार्गाला लावण्याचें काम आपलें आहे असें सरकार नित्य म्हणत असतें, याकरतां हा कोट फोडण्याचें काम वास्तविक त्याचें आहे, असें पुष्कळांस वाटण्याचा संभव आहे. केवळ दंडुक्याच्या जोरावर समाज व्यवस्थित राखण्याची जी पद्धति आज सर्वत्र चालूं आहे, तिजवर

ज्यांचा विश्वास आहे आणि हल्लींच्या समाजरचनेचें स्वरूप बदलून तिच्यांत नवीं तत्वें आणावयाचीं म्हणून जे खटपट करतात, त्यांचाहि विश्वास अशाच प्रकारचा होता. याच दृष्टीनें यूरोपांतील सोशियालिस्ट मंडळें खटपट करतात. त्याचप्रमाणें शाळेंत लष्करी शास्त्राचें शिक्षण मिळूं नये, मुलांना कवायती शिकवूं नयेत आणि मोठ्या माणसांना कांहीं लष्करी कर्तबगारीबद्दल इनामें आणि उत्तेजन मिळूं नये अशीहि खटपट कोणी करीत असतात. अशा रीतीनें सरकारांत वजन पाडून आणि त्याच्याद्वारें नवे कायदे तयार करून समाजाची घडी नव्या तत्वावर बसवितां येईल, अशी आशा पुष्कळांना आहे.

केवळ लोककल्याण व्हावें हाच कोणत्याहि राजशासनाचा हेतु आहे, असें सर्व मानतात आणि या हेतूच्या सिद्धीसाठीं जीं जीं उपकरणें राजतंत्र योजतें त्यांत लोकांचें अकल्याण होईल, असें कांहीं असणें शक्य नसून त्यांचा परिणाम केव्हांना केव्हां चांगलाच झाला पाहिजे, असें पुष्कळांना वाटत असतें; पण लोककल्याण साधण्याची जबाबदारी कोणच्याहि सरकारानें आजपर्यंत आपल्या शिरावर केव्हांहि घेतली नाहीं. हा मुद्दा हे लोक विसरतात. अशा जबाबदारीला उघडपणें त्यानें केव्हांहि कबुली दिली नाहीं, इतकेंच नव्हे तर याच्या अगदीं उलट जाऊन त्या त्या काळीं प्रचलित असलेल्या खोट्या धर्माचें रक्षण करण्याची ईर्षा मात्र त्यानें दाखविली आहे. या तत्वांचें उच्चाटण करण्याचा यत्न कोणीं केला तर त्याच्या मागें हात धुवून लागण्याची तत्परता मात्र सरकार नेहमीं दाखवीत आलें आहे. वास्तविक पाहतां असें होणें अगदीं स्वाभाविक आहे. कारण खोटया तत्वांचें उच्चाटण आणि खऱ्यांचा प्रसार म्हणजे सांप्रतच्या सर्व राजतंत्राचें मरणच होय. आपण जीवर बसलों आहों ती झाडाची फांदी आपल्याच हातानें तोडण्याचा मूर्खपणा कोण करील ?

हें काम करण्यास सरकार तयार होणार नाहीं हें उघड आहे, तेव्हां हा उद्योग सुशिक्षितांनीं केला पाहिजे, असे म्हणणें वावगें होणार नाहीं. गरीब लोकांच्या श्रमावरच विद्या प्राप्त होऊन सुशिक्षितांचा चरितार्थ चालत असतो. खोटया धर्माच्या जाळयांतून ते मुक्त झालेले असतात आणि

लोकसेवा हेंच आपलें ब्रीद आहे असें ते नेहमीं म्हणत असतात. अशा स्थितींत हा कार्यभाग त्यांनींच करावा असें म्हणणें ओघानेंच प्राप्त होतें. पण हा वर्ग या बाबतींत सरकारचा अनुयायी बनला आहे. अशा प्रकारें अगदीं नवा मार्ग चोखाळणें या वर्गाला भयावह वाटतें. राज्यकर्त्यांकडून आपला छळ होईल या भीतीनें हा वर्ग गांगरून गेलेला असतो. जी फसवेगिरी सरकारच्या पंखाखालीं सुरक्षित नांदत असते, तिला तेथून बाहेर ओढून भर चव्हाटयावर तिची धिंड काढण्याचा उद्योग कोणीं केला तर सरकाराला अर्थातच राग येणार. दुसरें असें कीं, अनुभव येऊन कालांतरानें लोक स्वतःच शाहणे होतील, असाहि कांहीं भोळसर सुशिक्षितांचा समज असतो. आणि तिसरें कारण असें कीं, अर्वाचीन सुशिक्षितांचा स्वतःचाच धर्मावर विश्वास नसतो. धर्म ही जुनी पुराणी चुकीची गोष्ट घडली होती आणि ती चूक आतां दुरुस्त झाली आहे असें सुशिक्षितांना वाटतें. ते स्वतः धर्मभ्रष्ट झालेले असतात आणि धर्माच्या जागीं बसविण्यास योग्य असें दुसरें कोणतेंहि तत्व त्याना उपलब्ध झालेलें नसतें. मग प्रचलित आचारावरील लोकांची श्रद्धा नष्ट करून तिच्या जागीं लोकांना द्यावयाचें काय, हा मोठा प्रश्न या वर्गाच्या लोकांना येऊन पडलेला असतो.

राहतां राहिला लक्षावधि सामान्य लोकांचा वर्ग. या वर्गाला शिक्षण मिळालेलें नसतें. बुद्धीची जागृति त्यांच्या ठिकाणीं नसते. स्वयंप्रेरित विचारांचा उदय या वर्गाच्या ठिकाणीं होणें शक्य नसतें. अशा स्थितींत मागून लोटींत येणाऱ्या लोंढ्याबरोबर असहायपणें हा वर्ग वहात असतो, यांत नवल नाहीं. सरकार आणि त्याच्याच रक्षणाखालचा धर्माधिकारीवर्ग जें सांगेल तेंच खरें आणि तोच आपला धर्म असें त्याला वाटतें. या समाजाची भूल या वर्गावर अत्यंत बळकट पडलेली असून तिचें दडपण एकसारखें वाढतच असतें. जन्मावें, जगावें आणि मरावें आणि माणुसकीला शोभण्यासारखें कांहींच करूं नये ही या वर्गाची स्थिति आज पिढ्यामागें पिढ्या एकसारखीच चालत आली आहे, आणि सांप्रत अशी स्थिति निर्माण झाली आहे कीं, भोळया धर्म समजुतींतून हा वर्ग कदाचित् बाहेर पडलाच तर अर्वाचीन धर्मभ्रष्टांच्या हातांत तो सांपडेल असा संभव आहे. अर्वाचीन

भौतिकशास्त्रभक्त स्वतः पूर्ण धर्मभ्रष्ट बनलेले आहेत, आणि या वर्गाच्या हातीं सामान्य जनता गेली, तर ही गोष्ट तिला कल्याणप्रद होणार नाहीं. अशा रीतीनें सामान्यजनता आज दोहींकडून नागावली आहे. स्वतःचें नुकसान या दृष्टीनें सरकार कांहीं करणार नाहीं आणि शास्त्रोपासकांच्या हातीं ती पडणें तिला इष्ट नाहीं.

अशा स्थितींत सर्वत्र काळोख होऊन कोठेंहि रस्ता दिसेनासा होतो, आणि असें व्हावें हें रास्तच आहे. ज्यांना धर्म म्हणून कांहीं उरलेला नाहीं, त्यांना डोळे असून दिसूं नये हेंच योग्य, जे राजशासकाच्या वर्गांत मोडतात त्यांनीं लोककल्याणाच्या गप्पा कितीहि ठोकल्या तरी मनोभावें कोणतेंहि काम ते करणार नाहींत. कारण तसें करण्यांत त्यांचाच स्वार्थ बुडण्याचा संभव असतो, सामान्य जनता अंधारांत राहिल्यामुळेंच त्यांची पोळी चपचपीत झालेली असते. सामान्य जनतेपैकीं ज्यांच्या डोक्यांत थोडाबहुत प्रकाश पडलेला असतो त्यांनीं या लढाईला तोंड लावलें, तर आधींच कष्टमय असलेलें त्यांचें जीवित अधिक कष्टप्रद होण्याचा संभव असतो. यामुळें या कष्टांत तूं पडूं नको, अशी सल्ला त्यांची बुद्धि त्यांना देते.

पण ज्यांच्या ठिकाणीं खरी धर्मप्रवृत्ति जागृत असते, त्यांची गोष्ट या साऱ्यांहून वेगळी आहे. आजूबाजूचा समाज धर्मभ्रष्ट होऊन उलटा चालत असतांहि धर्माची ज्योती तेवत ठेवण्याचें काम अशीं माणसें मनापासून करीत असतात. स्वतःचा जीव गमाविण्याची पाळी आली तरी हीं माणसें धर्मतत्त्वांपासून पराङ्मुख व्हावयाचीं नाहींत. धर्माच्या साहाय्यावांचून मानवी जीवित अशक्य आहे, ही गोष्ट त्यांना पटलेली असते. अशीं माणसें बहुधा कोठें तरी कोनाकोपऱ्यांत पडून असतात. समाज त्यांजकडे ढुंकू-नहि पहात नसतो. किमानपक्ष सांप्रतचा काळ तरी असाच आला आहे. अशा माणसांकडे तुच्छतादृष्टीनें पाहून समाज त्यांची थट्टा करीत असतो. त्यांचा जीवनक्रम कसा चालला आहे, याचा विचार कोणी करीत नाहीं. आमच्या रशियांत तर सांप्रत काळीं अशीं माणसें हद्दपार झालेलीं, तुरुंगांत खितपत पडलेलीं आणि काळ्या पाण्याच्या कैद्यांच्या तांड्यांत जुंपलेलीं आढळतात. पण अशा स्थितींतहि अशीं माणसें अद्यापि जीव धरून

आहेत आणि मानव जातींचा सुचरितमय जीवनक्रम त्यांच्यावरच अवलंबून आहे. अशीं माणसें मूठभर असलीं तरी त्यांचें सामर्थ्य अचिंत्य असतें. सामान्य जनतेवर जी झांपड सध्यां पडली आहे, तींतून मुक्त करण्याचें सामर्थ्य या मूठभर माणसांना असतें आणि त्याचा उपयोग योग्य काळीं तीं अवश्य करतील. हें सामर्थ्य त्यांच्या अंगीं कोठून येतें ? त्यांच्या अंगीं जी पूर्ण निस्पृहता असते तीच त्यांच्या सामर्थ्याची गुरुकिल्ली. आपल्या स्वार्थाला थोडासा चट्टा बसतो, असें दिसतांच संसारांत मुरलेले लोक सत्कार्यापासूनहि ताबडतोब परावृत्त होतात. भयाचें थोडेसें चिन्ह दिसतांच हे लोक एकदम कच खातात पण धर्मपरायणाला असलीं भयें भिववूं शकत नाहींत. अशा स्थितींत त्यांचा उत्साह उलटा दुणावतो. जग जों जों त्यांच्या विरुद्ध अधिक जातें, तों तों आपल्या सत्य तत्वांना हीं माणसें अधिक चिकटतात. या तत्वांचा उच्चार तीं अधिक उच्च घोषानें करतात आणि त्यांचें व्यावहारिक स्वरूप स्वतःच्या आचरणांत ते स्पष्ट करतात. अशापैकीं एकादा गृहस्थ राज्यकर्त्यांच्या वर्गांत मोडत असला तरी स्वार्थाला बळी पडून धर्मतत्वें लपवून ठेवण्याचें काम तो करीत नाहीं. उलट स्वतःभोंवतीं असलेल्या जाळ्याचा उच्छेद करून त्यांतून बाहेर पडण्यासाठीं तो धडपडतो. धर्मग्लानीपासून मिळत असलेला स्वार्थ त्याला विषतुल्य वाटतो. अशा स्वार्थाला झुगारून देऊन धर्मतत्वांचें कथन तो उघड्या मानानें करूं लागतो. परमात्मसेवा आणि मानवसेवा याशिवाय दुसरा कोणताहि हेतु त्याच्या चित्तांत उरलेला नसतो. असा मनुष्य खालच्या वर्गापैकीं असला तथापि स्वार्थाला बळी पडून आपल्या इतर बांधवांना लुबाडण्याचें काम तो करीत नाहीं. वास्तविक पाहतां दारिद्र्यानें पछाडलेल्या मनुष्याला एनकेन प्रकारेण श्रीमंत होण्याची इच्छा असते. पण धर्मपरायणाला स्वतःच्या कसल्याहि स्थितीचा वीट येत नाहीं. आपल्या सामान्य बांधवांची स्थिति सुधारावी, खोट्या धर्माचा उच्छेद करावा आणि खरीं तत्वें लोकांस सांगून त्यांनाहि धर्मपरायण बनवावें, या हेतूनें आपलें कार्य तो निर्भयपणें करतो. या मार्गांत कितीहि कष्ट भोगावे लागले तरी तो ते भोगतो. कसलींहि भयावह स्थानें त्याच्या आंगिकृत कार्या-

पासून त्याला परावृत्त करूं शकत नाहींत. प्रपंचांत बुडलेला मनुष्य पैसा मिळविण्यासाठीं जितक्या मनोभावानें अट्टाहास करीत असतो तितक्याच मनोभावानें धर्मपरायण माणसें आपलीं कार्यें अट्टाहासानें करीत असतात. धर्माचा प्रकाश एकदां चित्तांत पडला म्हणजे प्रपंचाची चाड तेथें राहूं शकत नाहीं. जगाच्या मार्गानें असा मनुष्य चालूं शकत नाहीं. जगाच्या वर्तुळानें त्याचा आयुष्यक्रम बांधला जात नाहीं. हें वर्तुळ फोडून तो सर्वव्यापी होऊं पहात असतो. अशा स्थितींत चालू जीवितांतील संकटें आणि मृत्यु हीं त्याला तुच्छ वाटत असतात. शेतकऱ्यानें एकवार नांगर हातीं धरला म्हणजे हातावर असलेल्या एकाद्या फोडाची किंमत जशी त्याला वाटत नाहीं, त्याप्रमाणें धर्मपरायण माणसांना मोठ्या संकटाचीहि किंमत वाटत नाहीं.

सध्या खोट्या धर्मानें घातलेल्या भुरळींतून सामान्य जनतेची मुक्तता कधीं काळीं होणें असेल, तर ती अशाच माणसांच्यामुळें होईल. अशीं माणसें संख्येनें कितीहि थोडीं असलीं, अर्वाचीन 'सुशिक्षणाचा' लाभ त्यांना कितीहि थोडा झाला असला, समाजांत त्यांची पायरी कितीहि खालच्या प्रकारची असली, अथवा लोकशिक्षणाचें कार्य करण्यास लागणारें बुद्धिबळ आणि वाग्बळ त्यांजपाशीं कितीहि कमी असलें, तरी सर्व जगाला प्रकाश पुरविण्याचें काम अशींच माणसें करूं शकतात. वाळलेल्या गवताच्या ढिगावर पडलेली लहानशी ठिणगीहि ज्याप्रमाणें सारा ढीग पेटवूं शकते त्याचप्रमाणें अशा माणसांच्या एकाद्या शब्दानेंहि लक्षावधी माणसांचीं अंतःकरणें प्रज्वलीत होतात. दीर्घ काळपर्यंत धर्माच्या झऱ्याशीं सामान्य जनतेची गांठ पडली नसल्यामुळें ताहनेनें तळमळणारीं त्यांचीं अंतःकरणें अशा माणसांकडून प्राप्त होणाऱ्या एकाद्या कणानेंहि तृप्त होतात. मानवी जीविताची मालवत आलेली ज्योत हींच धर्मपरायण माणसें पुन्हां प्रज्वालित करूं शकतात.

धर्म म्हणजे अंधविश्वास नव्हे, धर्म म्हणजे कांहीं वाक्यांवर कायमचा शिक्का मारून ठेवलेली वस्तु नव्हे. कांहीं ठराविक प्रार्थना तोंडानें बडबडणें आणि हातानें कांहीं ठराविक कृति करणें म्हणजेहि धर्म नव्हे.

त्याचप्रमाणें अर्वाचीनही शास्त्रभक्त समजतात तशी, धर्म ही जुनीपुराणी भोळसट समजुतहि नव्हे. जीवात्मा आणि परमात्मा यांचा जो नित्य संबंध तो धर्म. हा धर्म विवेकबुद्धीशीं विसंगत नाहीं. आपल्या चालू ज्ञानाशींहि तो विसंगत नाहीं. आणि मनुष्यमात्राला त्याच्या अंतिम हेतू-कडे पोहोंचविण्याचें सामर्थ्य केवळ धर्मांतच आहे.

'जीवात्मा म्हणजे परमेश्वराचा दिवा' अशी एक हिब्रू भाषेंतील म्हण आहे. या म्हणींत नितांत सत्य भरलें आहे. या दिव्याचा प्रकाश अंधुक असला म्हणजे, मानवी प्राणी दुबळा आणि दुःखी बनतो, आणि हा दिवा प्रकाशमान झाला म्हणजे तोच मनुष्यप्राणी जगांत सर्वशक्तिमान बनतो. हा दिवा पूर्ण प्रकाशमान करण्याचें सामर्थ्य एकट्या धर्मांत मात्र आहे. असा मनुष्य सर्वशक्तिमान व्हावा, ही कांहीं नवलाची गोष्ट नव्हे. कारण अशा स्थितींत जी शक्ति त्याच्या द्वारें कार्य करीत असते, ती त्याची पूर्वींची मानवी शक्ति नसून ती सर्वव्यापी ईश्वरी शक्ति आहे. हाच खरा धर्म आणि हें धर्माचें सार.

# उपसंहार.

# उपसंहार

[ सुप्रसिद्ध रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यू मासिकाचे संस्थापक व जनक ख्रिस्तवासी डब्ल्यू. टी. स्टेड यांच्या सारख्या विद्वान, निस्पृह, बाणेदारवृत्तीच्या, समदर्शी, आणि मार्मिक लेखकांनीं कौंट लियो टॉलस्टॉय यांच्याविषयीं जें कांहीं स्वतः लिहून ठेवलें आहे, तें त्यांच्याच शब्दांत येथें दिल्यास हा उपसंहार किती यथायोग्य होईल, हें विस्तारानें सांगण्याचें कारण नाहीं. कौंट लियो टॉलस्टॉय यांजविषयीं हें जें शब्दचित्र स्टेड यांनीं रेखाटलें आहे, तें केवळ टॉलस्टॉय यांचे ग्रंथ किंवा ऐकिव माहितीवरून रेखाटलें नसून त्यांनीं टॉलस्टॉय यांच्या ग्रंथांचें अगोदर चांगलें अध्ययन करून मग मुद्दाम रशियांत जाऊन त्यांची मुलाखत घेतली आणि नंतर त्यांनीं आपले विचार प्रकाशित केले आहेत. ते त्यांचे विचार पुढें शब्दशः दिले आहेत. ]

## कौंट लियो टॉलटॉय यांच्याविषयीं डब्ल्यु. टी. स्टेड यांचे विचार.

[ १ ]

जगद्वंद्य काउंट लियो टॉलस्टॉय यांजसंबधीं सर्व प्रकारची माहिती मिळविण्यास सारा जनसमूह जितका उत्सुक आहे, तितका दुसऱ्या कोणत्याहि व्यक्तीसंबंधीं तो नाहीं; ही गोष्ट केवळ रशियासच लागू आहे असें नाहीं, तर इतर देशांतहि हाच प्रकार मला आढळून आला. सध्याच्या काळीं रशियांत अव्वल दर्जाचा पुरुष कोण असा प्रश्न निघाला, तर त्याचें उत्तर 'टॉलस्टॉय' हेंच द्यावें लागेल. टॉलस्टॉय हे एक उत्तम दर्जाचे लेखक आहेत हें खरें, पण त्यांची कीर्ति आज जी सर्वतोमुखीं झाली आहे, तिचें कारण केवळ ग्रंथकर्तृत्व हें नसून त्यांची दानत हेंच मुख्य कारण आहे. टॉलस्टॉय हे उसन्या बुद्धीचे पुरुष नव्हत. त्यांच्या विचारांत परक्याचें असें कांहीं तुम्हांस आढळून यावयाचें नाहीं. टॉलस्टॉय यांनीं धार्मिक विषयांचा विचारहि पुष्कळ केला आहे. एकादा विशिष्ट धर्म मात्र त्यांनीं काढला नाहीं हें खरें; तथापि नांवानें नसला तरी कृतीनें 'टॉलस्टॉय' धर्म अस्तित्वांत आला असून त्याचे भक्त अनेक देशांत हजारोंनीं आहेत. कोणत्याहि विषयावर सामान्य विचारसरणीकडे पाहण्याचें सामर्थ्य ज्यांना नाहीं, त्यांना टॉलस्टॉय यांचीं मतें विक्षिप्तपणाचीं वाटतात यांत नवल नाहीं. हीं विक्षिप्त मतें ते अगदीं सडेतोडपणें बोलत असतात, इतकेंच नव्हे तर पुष्कळ वेळां त्यांचें आचरणहि विक्षिप्तपणाचें असतें. आणि याहूनही विशेष नवलाची गोष्ट ही कीं, इतरांसहि विक्षिप्त बनविण्याचें सामर्थ्य त्यांस आहे. टॉलस्टॉय यांची बुद्धि पाहिली तर ती खरोखरच अपूर्व, आणि असा लोकोत्तर बुद्धिमान् पुरुष बटाटे लावतो आणि जोडे शिवतो! हा पहिल्या प्रतीचा ग्रंथकार चालू ख्रिस्ती धर्म उलथून पाडण्यासाठीं खटपट करतो! हा मोठा सरदार घराण्यांतला गृहस्थ शेतकऱ्यासारखा नांगर धरतो आणि गवतहि कापतो! असा चित्रविचित्र संयोग जेथें घडतो, तेथें त्याबद्दल अत्यंत कुतूहल आणि विलक्षण जिज्ञासा हीं उत्पन्न व्हावींत, यांत नवल नाहीं. टॉलस्टॉय यांजबद्दलची जिज्ञासा इतक्या दूरवर आढळते कीं, पिटर्सबर्ग आणि मास्को येथल्यापेक्षांहि बोस्टन आणि सॅन्फ्रॅन्सिस्को येथें अधिक जिज्ञासू आढळतात.

यासनाया पालियाना येथें मी गेलों, तेव्हां मे महिना संपण्याचा सुमार होता. यंदा हिवाळा अधिक लांबला होता; तथापि त्याचा सारा अम्मल या वेळीं पूर्ण नाहींसा होऊन वसंत ऋतूस आरंभ झाला होता. पण पीटर्सबर्ग येथें अद्यापिहि मधूनमधून हिमपात होतच होता. पीटर्सबर्ग येथून संध्याकाळच्या गाडीनें मी निघालों आणि केवळ बारा तासांच्या अवधींत केवढा फरक पडला म्हणून सांगावा!

उत्तरध्रुवाजवळील हिममय प्रदेशांतून जणूं काय मी उष्ण कटिबंधांतच येऊन पोहोंचलों. मीं गाडीच्या बाहेर पाहिलें तेव्हां अरुणोदय होऊन सूर्याचे आरक्त किरण हिरण्यागार पालवीवर विराजमान झाले होते. बाराच तासांच्या आधीं खरडून गेलेल्या झाडांवर हिमकण लोंबत असतांना मीं पाहिलें होतें; तेव्हां एवढ्या अवधींत झालेला हा एवढा मोठा फरक पाहून मला किती नवल वाटलें असेल, हें कल्पनेनेंच जाणलें पाहिजे. हिरण्यागार वनराजीचा हा अद्भुत देखावा पाहून जो आनंद चित्तांत उसळला, त्याचा अनुभव प्रवासांत यापूर्वी मला केव्हांच आला नव्हता. एक दिवस मॉस्को येथें घालवून मी टूला येथें येण्याकरितां पुन्हां गाडींत बसलों. मास्कोंतून बाहेर पडल्यानंतर मीं सहज मागें पाहिलें तेव्हां शहराचा बाकीचा सारा भाग अदृश्य झाला असून नेपोलियनच्या पराभवाचें स्मारक म्हणून उभारलेल्या इमारतीचे दोन प्रचंड घुमट मात्र दृग्गोचर होत होते. निघाल्यापासून पांच सहा तासांच्या अवधींत मी टूला येथें पोहोंचलों. टूला येथून यासनाया अगदीं जवळ आहे असें नाहीं, पण गाड्या वगैरे वाहनें मिळण्याची सोय येथें चांगली असल्यामुळें इतर जवळच्या स्टेशनांपेक्षां टूला अधिक सोयीचें आहे. युरोपांतील इतर देशांपेक्षां रशियांतील प्रवास अधिक स्वस्ताईचा आहे. येथील वाहनें युरोपांतील वाहनासारखीं भपकेबाज नाहींत हें खरें, तथापि सुखसोयीच्या दृष्टीनें तीं वाईट नसतात. टूला हें गांव इंग्लंडांतील शेफिल्डच होय; तथापि शेफिल्ड जितकें गलिच्छ तितकेंच हें स्वच्छ आहे. इंग्लंडांतील गांवांत घरें बहुधा दाट असतात; पण रशियांत तशी स्थिति नाहीं. तेथील बहुतेक गांवांची रचना विलक्षण विस्कळीत असते. जमिनीला तोटा नसल्यामुळें कोणीं कोठेंहि घर बांधावें, अशी चालच तिकडे पडून गेली आहे. रशियांत जमिनीला तोटा नाहीं, ही गोष्ट पदोपदीं आपल्या प्रत्ययास येते. मुख्य रस्ता सोडून आडमार्गाकडे आपण वळलों म्हणजे टेंकाडें आणि खडे यांची रेलचल या मार्गावर आढळून येते; पण असल्या रस्त्यावरहि रशियन तट्टें न अडखळतां चालत असतात. अशा एका रस्त्याला लागल्यावर एका ठिकाणीं मुलें खेळतांना मीं पाहिलीं. मॉस्को अथवा पिटर्सबर्ग येथें अशा रस्त्यावर मुलें बागडतांना बहुधा आढळत नाहींत. बालस्वभावास अनुरूप असे धुळींतले खेळ खेळून आपलें सारें आंग त्यांनीं मळवून घेतलें होतें.

आतां गांव बराच मागें राहिला. यापुढें एक मोठें सपाट मैदान लागलें. मैदानावर लष्करी कवाईत सुरू होती. आकाश अगदीं निरभ्र असून ऊन चांगलें पडलें

होतें. रानांतील पांखरें आनंदानें लकेऱ्या मारीत होतीं. रस्त्याच्या बाजूला असलेल्या कुरणांत हिरवेंचार गवत उगवलें होतें. हा सारा देखावा पाहून पिटर्सबगची आठवण मला झाल्यावांचून राहिली नाहीं. तेथें नीवा नदी अद्यापिहि थिजलेलीच होती आणि कडक हिंवाळ्याची रुक्षता अद्यापि चोहोंकडे भासत होती. आमचा रस्ता पक्का बांधलेला होता. आजूबाजूस शेतकी पुष्कळ दिसत होती. मधून मधून एकाद्या दाट जंगलाचेंहि दर्शन मला होत होतें. तथापि मनुष्याच्या दाट वस्तीचा भाग एकहि मला कोठें आढळला नाहीं. मधून मधून गवत अथवा धान्य भरलेल्या गांवठी खटाऱ्यांचा एकादा तांडाहि भेटे. हे खटारे वजनानें अतिशय जड व ओढण्यासहि कठिण अशा पद्धतीनें बांधलेले असतात. या खटाऱ्यांना तशींच गांवठीं घोडीं जुंपलेलीं होतीं. अशा रीतीनें प्रवास करीत करीत यासनायापासून एक मैलावर मी आलों; आणि रस्त्याच्या बाजूला असलेल्या एका शेताकडे सहज नजर फेंकली तों तेथें कांहीं माणसें उभीं असल्याचें मला दिसलें. ही मंडळी कुतूहलपूर्वक माझ्याकडे पहात होती. गाडींतून उतरून मी त्यांजजवळ गेलों तेव्हां कौंट टॉलस्टॉय, त्यांच्या दोन मुली आणि कांहीं शिष्यमंडळी मला आढळली.

टॉलस्टॉय यांचें चित्र पूर्वीं अनेकवार मीं पाहिलें होतें, यामुळें त्यांस ओळखण्यास मला पंचाईत पडली नाहीं. कौंटचें वय अदमासें साठ वर्षांचें असून त्यांचे केस करडे होत चालल्याचें मला आढळलें. नेहमीं उन्हातान्हांत काम करीत असल्यामुळें त्यांचा चेहरा थोडा काळवंडला होता. त्यांचा भालप्रदेश विस्तृत असून निरंतर चाललेल्या चिंतनामुळें त्याजवर सुरकुत्या पडलेल्या होत्या. त्यांचे डोळे बारीक, पण फार तीव्र आहेत. त्यांचें नाक मोठें आणि तरतरीत आहे. कौंटची मुद्रा अशी रेंखीव आहे कीं त्यांना कोणीहि एकवार पाहिलें तर त्याच्या ध्यानांतून त्यांची मूर्ति केव्हांहि जावयाची नाहीं. त्यांची अत्यंत मननशीलता त्यांच्या चेहऱ्यावरहि पूर्ण उमटली होती. त्यांचा चेहरा विलक्षण गंभीर आहे; तथापि उदासीनतेची जी थोडी बहुत छटा तेथें दिसते, तीवरून त्यांच्या चित्तांत कांहीं दुःखद विचारहि घोळत असावेत, तसें अनुमान सहज करतां येतें. कौंट साहेबांची शरीरयष्टि सामान्य माणसांपेक्षां अधिक उंच आहे, तथापि वयोमानानें येणारी वक्रता, तींत मुळींच नाहीं. त्यांचें शरीर पूर्वींसारखें आतां मजबूत राहिलेलें नाहीं. बुद्धीचें प्रखर तेज त्यांच्या शरीराला हळूहळू पोखरीत होतें.

कौंट साहेबांची पोषाकाची पद्धत सरदारी थाटाची नसून ती एकाद्या सभ्य शेतकऱ्यास शोभण्यासारखी आहे. गळपट्टया, हातपट्टया, असलीं दिखाऊ सोंगें

यांचें नांवहि कोठें आढळावयाचें नाहीं. कोठें लांब फिरावयास जावयाचें असलें, म्हणजे एक उंच काठी ते बरोबर घेत असतात. पोषाकाचा अत्यंत साधेपणा ही टॉलस्टॉय पंथाची एक मोठी खूणच आहे. कौंटच्या शेजारीं त्यांचा एक शिष्य उभा होता. हा तरुण मनुष्य घरचा सुखी असून विश्वविद्यालयाचा पदवीधरहि होता; तथापि त्याच्या पोषाकांतहि अर्वाचीनपणा मला आढळला नाहीं. हा तरुण गृहस्थ पीटर्सबर्ग येथें रहात असून टॉलस्टॉय पंथाचा प्रसार अनेक प्रकारें तो करीत असे.

हिंवाळ्यांत कौंट साहेबांची स्वारी मॉस्को येथेंच राहिली होती. आणि आतां थोड्याच दिवसांपूर्वी कौंट यासनायाला आले होते. हा सुमारें दोनतीनशें मैलांचा प्रवास त्यांनीं पायींच केला होता. दिवसा चालत रहावें आणि रात्र कोठें तरी एखाद्या शेतकऱ्याच्या झोंपड्यांत काढावी अशा रीतीनें हा सारा प्रवास त्यांनीं केला. त्यांनीं अशा रीतीनें यासनायाला जाऊं नये म्हणून घरच्या साऱ्या मंडळीनें परोपरीनें त्यांस विनवून पाहिलें; पण कौंट यांचा स्वभाव थोडाबहुत आग्रही असल्यामुळें कोणाचेंहि न ऐकतां अखेरीस आपला हट्ट त्यांनीं तडीस नेला. मी यासनाया येथें पोहोंचलों, तेव्हां कौंटेसबाई इतर साऱ्या मुलांमाणसांसह एक दोन दिवसांपूर्वींच येथें येऊन पोहोंचल्या होत्या.

कौंट साहेबांच्या कुटुंबांत सध्यां नऊ माणसें आहेत. यांपैकीं दुसऱ्या मुलाचें लग्न होऊन तो वेगळा राहूं लागला आहे. एक मुलगा अभ्यासाकरतां मॉस्को येथें राहतो. या सर्व मंडळीस इंग्रजी भाषा चांगली बोलतां येते. याशिवाय घरांत एक इंग्रजबाई शिक्षकीण असून फ्रेंच भाषा शिकविण्याकरतां एक स्वीस् शिक्षकहि ठेवला आहे. अशा रीतीनें टॉलस्टॉय यांच्या घरांत अनेक भाषांचें संम्मेलन या वेळीं झालें होतें.

मला पाहिल्याबरोबर कौंट मजबरोबर येण्यास निघाले. कांहीं विषयांवर आमचें संभाषण सुरू झालें. कौंटसाहेबांस इंग्रजी भाषा चांगली बोलतां येते. आतां कित्येक वेळां तींत सफाई नसते हें खरें. त्यांच्या मुली इंग्रजी भाषा आपल्या जन्मभाषेहूनहि अधिक सफाईनें बोलतात. कौंट साहेबांच्या भाषेंत सफाई नसली तरी आपला आशय ते चांगल्या तऱ्हेनें कळवूं शकतात; तथापि कित्येक वेळां भाषण ऐन भरांत आलें असतां एखादा योग्य शब्द त्यांस आठवेनासा होतो. मनाची सारी शक्ति चालू विचारसरणीकडे योजली गेली असल्यामुळें परकी भाषेवरचा त्यांचा ताबा ढिला पडलेला असतो. आपला आशय श्रोत्याला उत्तम रीतीनें

कळावा ही इच्छा एकीकडे प्रबळ झाली असतां एकादा शब्द वेळींच आठवेनासा होतो. अशा वेळीं मध्येंच ते रशियन भाषेंत बोलूं लागतात आणि मग त्यांच्या दुभाष्याचें काम त्यांच्या मुलीला करावें लागतें; पण अशा मध्यस्थाच्या पद्धतीमुळें श्रोत्याशीं वक्त्याचा असलेला संबंध तुटतो आणि त्यामुळें त्यांच्या विचार-सरणीचा परिणाम श्रोत्यांवर व्हावा तसा होत नाहीं. ही गोष्ट कौंटच्या लक्षांत आली, म्हणजे ही पद्धत सोडून देऊन ते पुन्हां इंग्रजींत बोलूं लागतात.

कुंपणावरून उभ्या मारीत आणि खांच खळगे ओलांडीत घराच्या आवारांत आम्ही येऊन पोहोंचलों. हें आवार बरेंच विस्तृत आहे; पण इंग्रजी बगीचांचा रेखीवपणा येथें मुळींच दिसत नाहीं. साऱ्या आवारभर नानाप्रकारच्या वनस्पती उगवल्या होत्या. एकाद्या इंग्रजी बगीच्यांत असलीं झुडपें उगवलीं तर तीं काढून टाकल्याशिवाय इंग्रजी माळ्यास चैनच पडावयाचें नाहीं; पण येथें या वनस्पती इतक्या दाट उगवल्या होत्या कीं त्यांच्या अनेक वर्णांच्या पल्लवांनीं बगीच्याची शोभा कमी होण्याऐवजीं ती अधिकच खुलून दिसत होती. बागेंत कांहीं तरुण मुली झाडलोट करीत होत्या. कोठें कोठें कांहीं जंगली वनस्पती उपटून काढण्याचें काम चाललें होतें; तथापि एकंदरीनें या प्रचंड आवाराला बाग म्हणण्यापेक्षां लहानसें रान म्हणणेंच अधिक शोभलें असतें.

अशा प्रकारच्या यथेच्छ वाढलेल्या हिरण्यागार वनराजीच्या मध्यभागीं टॉलस्टॉय यांचें घर बांधलेलें होतें. वसंत ऋतूचा अम्मल असल्यामुळें नानाप्रकारचीं फुलझाडें फुलून त्यांचा वास चोहोंकडे दरवळला होता.

राजरस्त्यापासून टॉलस्टॉय यांचें घर सुमारें मैलभर अंतरावर असून सर्व बाजूंनीं झाडींनीं तें वेष्टिलें असल्यामुळें जवळ येईपर्यंत त्याचें अस्तित्वच कळून येत नाहीं. घराच्या एका बाजूकडे मोठाले वृक्ष वाढलेले असल्यामुळें त्यांची छाया घरावर सदोदीत असते. मागच्या बाजूस एक लहानशी फुलबाग असून तिच्या शेजारीं बरेंच विस्तृत आंगणहि आहे. हीच घरांतील मुलांची खेळण्याची जागा आहे. या अंगणांत मुलांबरोबर मीहि एकदां क्रिकेटचा खेळ खेळलों. घरीं तासलेली वेडी वांकडी लांकडाची फळी आणि लहानसा नरम चेंडू हींच आमच्या खेळाचीं आयुधें होतीं. या फळीनें जोरानें तडाखा मारतां येत नसे; तथापि कौंटच्या आचाऱ्यानें यांतहि चांगली कामगिरी करून दाखविली. क्रिकेटच्या शास्त्राच्या दृष्टीनें त्याची खेळण्याची पद्धत चुकीची असली, तथापि एकादा वांकडा तिकडा टोला तो खूप जोरानें मारी. या आंगणाच्या एका टोंकाला एक

फार जुनाट आणि प्रचंड असा वृक्ष होता. याच्या कांहीं फांद्या आतां मोडून गेल्या आहेत. यात्रेकरूंनीं उभें राहण्याची ही जागा होती. या ठिकाणीं उभें राहून टॉलस्टॉय रोज थोडा फार दान धर्म करतात. ' कोणालाहि विन्मुख जाऊं देऊं नको ' ही बायबलाची आज्ञा टॉलस्टॉय अक्षरशः पाळतात. कौंटची स्वारी आल्याबरोबर सर्व याचक मंडळी त्यांस नमन करते आणि कौंटहि मोठ्या लीनतेनें सर्वांस नमन करतात. मग धार्मिक विषयांच्या संभाषणास सुरुवात होते. अशा रीतीनें नानाप्रकारच्या पंथवाल्यांशीं भाषणें करून त्यांच्या पंथांचीं तत्वें टॉलस्टॉय यांनीं समजावून घेतलीं आहेत. भाषण संपलें म्हणजे प्रत्येकाच्या हातावर आणा दोन आणे ठेवून टॉलस्टॉय त्यांची रजा घेतात आणि ती मंडळीही संतुष्ट होत्साती आपल्या मर्गानें पुढें चालू लागते.

घराच्या आवाराच्या मागच्या बाजूस एक मोठी फळबागहि लावलेली आहे, या बागेच्या पलीकडे एक गोठ्याची इमारत असून त्यांत गाई, घोडीं आणि इतर जनावरें बांधलेलीं असतात. आवाराच्या पुढच्या बाजूस तीन तळीं आहेत यांपैकीं एक बरेंच मोठें असून येथेंच गांवकरी स्नान करतात आणि धुणींहि धुतात. दुसऱ्या दोन धाकट्या तळयांत पुष्कळ बेडूक असून त्यांचें डरांव डरांव गाणें एकसारखें सुरू असतें. रशियन बेडकाच्या कंठांत किती सामर्थ्य आहे, याची कल्पना वर्णनानें होण्याजोगी नाहीं. कित्येक वेळां हा गृहस्थ अहोरात्र चोवीस तास एकसारखा ओरडत राहातो आणि तें ओरडणेंहि केवळ एकसुरी नसून अनेक लकेऱ्यांचें मिश्रण त्यांत असतें. घराच्या आवाराच्या आजूबाजूस जिकडे तिकडे रान पसरलेलें आहे. यांत पायवाटांचे चक्रव्यूह इतके आहेत कीं नवखा मनुष्य यांत एकटा सांपडल्यास त्याचा गोंधळ झाल्यावांचून रहावयाचा नाहीं. एका वेळीं अशा एका चक्रव्यूहांत मी स्वतःच सांपडून गुरफटलों होतों. केवळ एकच वळण चुकल्यामुळें त्या झाडींत मला एक तास भटकावें लागलें. तरुणपणीं टॉलस्टॉय यांस एका काळीं झाडें लावण्याचा विलक्षण शोक लागला होता. घराच्या आजूबाजूला पसरलेल्या अनेक वृक्षांत त्यांच्या हातचीं कोणतीं नव्हत हें ठरविणें मोठें कठीण आहे. हीं सारीं झाडें आतां नव्या पालवींनीं लगडलीं होतीं, आणि पालवीहि दाट असल्यामुळें भर मध्यान्हाचे वेळींसुद्धां कोठेंहि उन्हाचा त्रास होण्याचा संभव नव्हता.

गांवापासून दोन तीन मैलांवर चर्च आहे. याचे घुमट फार लांबून दिसतात ाच्या पलीकडे आणखी दोन तीन मैलांवर आणखी एक लहानसें खेडें आहे.

अशा प्रकारच्या खेडवळांच्या संगतींत कौंट टॉलस्टॉय हे आपलें आयुष्य घालवीत असतात. आपणहि यांच्यासारखेंच व्हावें, हीच टॉलस्टॉय यांची मोठी इच्छा आहे. आपण शेतकरीवर्गांत इतकें मिसळून जावें कीं हा सरदार घराण्यांतला, अशी ओळखहि कोणास पटूं नये, अशा रीतीनें वागण्याचा यत्न ते करीत असतात; पण किती झालें, तरी सरदार तो सरदारच. नुसता शेतकऱ्यासारखा पोषाक करून सरदाराचा शेतकरी कसा होणार ? या दोघांच्यामध्यें जो प्रचंड खाडा आहे, तो पोषाकानें भरून येण्यासारखा नाहीं. आजूबाजूच्या शेतकरी मंडळीचें प्रेम टॉलस्टॉय यांजवर फार आहे. कसलीहि अडचण पडली, तरी त्यांची सल्ला घेण्याकरितां आजूबाजूच्या कित्येक कोसांवरून शेतकरी लोक त्यांजकडे धांव घेतात. एखाद्या गांवांत कांहीं तंटा भांडणें उपस्थित झालीं तर त्यांचा निकाल लावण्याचें कामहि त्यांजकडे असतें. गांवांत अथवा आजूबाजूच्या खेड्यांत कांहींहि घडो, त्याची बातमी अगोदर टॉलस्टॉय यांजकडे जावयाची. त्याचप्रमाणें देशांत कांहीं कमी अधिक घडत असलें, तरी त्यांसंबंधीचें टॉलस्टॉय यांचेंच मत या मंडळींत प्रमाण म्हणून मानलें जातें. मॉस्को येथें असतांनाहि आजूबाजूच्या खेड्यांत टॉलस्टॉय हिंडत असत, आणि आजूबाजूला काय चाललें आहे, देशाची काय स्थिति आहे, शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यासाठीं काय केलें पाहिजे, वगैरे अनेक लहान मोठ्या विषयांवर शेतकऱ्यांशीं ते ऊहापोह करीत. या वेळींहि टॉलस्टॉय शेतकऱ्यांशीं शिष्यवृत्तीनें बोलत. या शेतकरी मंडळीजवळ शिकण्यासारखें काय आहे, हें पाहण्याकडेच त्यांची दृष्टि असे. अशा प्रकारच्या संभाषणापासून टॉलस्टॉय यांस पुष्कळ लाभ होई.

घरीं आल्याबरोबर दाराच्या आंतल्या बाजूच्या उजव्या हातास एक खोली होती, ती टॉलस्टॉय यांनीं मला दिली. याच्या पलीकडे असलेल्या खोलींत टॉलस्टीय स्वतः बसत असत. वाचन, लेखन, इतर काम आणि पोषाक करणें वगैरे सारीं कामें या एकाच खोलींत ते करीत. एका खिडकीच्या खालीं बूट शिवण्याचीं हत्यारें पडलीं होतीं आणि या हत्यारांचा उपयोगहि कौंट पुष्कळ वेळां करीत असतात.

बाजूची एक फडताळासारखी लहानशी खोली उघडून काट म्हणाले, ' येथें हात वगैरे धुण्याची सोय आहे; या जागेंत एक स्थ्यांड उभा असून त्यावर पाणी भरलेलीं दोन तीन भांडीं होतीं. त्यांतील एका भांड्यांतलें पाणी खराब झालें होतें तें उचलून कौंट यांनीं त्यांतील पाणी खिडकीच्या बाहेर बागेंत झोकून

दिलें. हा एक नामांकित, श्रीमंत आणि सरदार घराण्यांतला गृहस्थ पहिल्या प्रतीचा ग्रंथकार आणि तत्त्ववेत्ता, माझ्या सारख्या सामान्य मनुष्याच्या सोयीसाठीं घाणेरडें भांडें स्वतःच धुतो हें पाहून माझ्या मनाला थोडेंसें चमत्कारिक वाटल्यावांचून राहिलें नाहीं. टॉलस्टॉय हे पहिल्या प्रतीचे ढोंगी आहेत, असें पुष्कळांनीं मला सांगितलें होतें. बाहेरून शेतकऱ्याचा पोषाख त्यांनीं केला तरी घरीं केस विंचरावयास त्यांना चांदीची फणी लागते, असल्या प्रकारच्या अनेक गोष्टी माझ्या कानावर यापूर्वी आल्या होत्या. पण चांदीचें एकहि भांडें त्यांच्या जाग्यांत मला आढळून आलें नाहीं. फार काय, पण चैनीची अशी एकहि वस्तु त्यांच्या खोलींत मला दिसली नाहीं; आणि जरूरीच्या वस्तूहि अगदीं सामान्य प्रतीच्या होत्या. टॉलस्टॉय तोंडानें जें काय बोलत त्याशीं विसंगतपणा येईल, असें मला तेथें कांहींच आढळलें नाहीं.

तथापि या घराण्याची एकंदर राहणी शेतकरी पद्धतीची नव्हती हेंहि येथें सांगणें अवश्य आहे. टॉलस्टॉय यांचे विचार कितीहि काव्यमय असले, तरी प्रत्यक्ष सृष्टींत ते सारे जसेच्या तसेच दिसूं लागणें शक्य नाहीं. विशेषतः टॉलस्टॉय यांजसारख्या श्रीमंत, घरंदाज आणि कुटुंबवत्सल गृहस्थाच्या ठिकाणीं तरी, असें होणें फारसें संभवनीय नसतें. यजमानानें कितीहि धडपड केली, तरी त्याचे पाय मागें ओढण्यासाठीं कुटुंबांतील मंडळीची खटपट सुरू असतेच; आणि एका अर्थी हेंहि बरेंच आहे. कारण चालू जीवनक्रमांत एकाएकीं आकाश पाताळाइतका फरक पडला तर त्याचे परिणाम चांगले होतीलच असा भरंवसा नाहीं. टॉलस्टॉय यांनीं लग्न केलें नसतें, मुलाबाळांचा मोठा परिवार त्यांच्या गळयांत नसता, आणि स्वमतांस अनुसरून ते सर्वसंगपरित्यागी बनले असते, तर आजचे टॉलस्टॉय आपणास दिसलेच नसते. आजच त्यांच्या राहणींत झालेल्या फरकामुळें त्यांच्या शरीरप्रकृतीस अपाय झाला आहे. पुष्कळ वर्षेंपर्यंत सुखासमाधानांत वाढलेल्या शरीराला शेतकऱ्याच्या राहणींत एकदम नेऊन ढकललें तर तें कितपत टिकाव धरील बरें? याकरतां त्यांच्या कुटुंबांतील मंडळीनें त्यांचे पाय मागें ओढण्याची खटपट केली, हे त्यांचे आपणावर मोठे उपकारच झाले आहेत, असें म्हटलें पाहिजे.

कौंटेसबाई ही मॉस्को येथील एका वैद्याची कन्या होय. टॉलस्टॉय यांशीं त्यांचा विवाह होऊन आज सुमारें तीस वर्षें झालीं. यांना एकंदर तेरा मुलें झालीं. सध्यां कुटुंबाचा सर्व प्रकारचा भार कौंटेसबाईच्याच डोक्यावर आहे. घरांतला

संसार जसा त्यांना पहावा लागतो, त्याच प्रमाणें मॉस्को येथील व इतर ठिकाणची सारी इष्टेटहि त्यांच्याच देखरेखीखालीं आहे. टॉलस्टॉय हे स्वतः विलक्षण त्यागी बनले असल्यामुळें कशाकडेहि ते ढुंकून पहात नाहींत. शेतकऱ्यापेक्षां अधिक चांगल्या तऱ्हेच्या घरांत राहणें त्यांस पापात्मक वाटतें. त्यांच्या दृष्टीनें त्यांच्या साऱ्याच कुटुंबाची राहणी गर्हणीय आहे. घरांत आचारी अथवा गडी असणें, हेंहि टॉलस्टॉय यांस नको. स्वतःच्या घरीं जणूं काय एकाद्या पाहुण्यासारखे ते राहिले आहेत. त्यांची संसारी राहणी इतकी अलिप्त आहे. टॉलस्टॉय यांच्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी करण्यासाठीं त्यांची पत्नी अनेक प्रकारें यत्न करीत असते. साऱ्या कुटुंबानें आपली राहणी शक्य तितकी साधी ठेवली आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत कांहीं शहरवासी चैनी मंडळी पूर्वी यासनाया येथें येत असे आणि गाणें बजावणें व पार्टर्या यांची रेलचेल तेथें उडत असे. पण हाहि प्रकार अलीकडे अगदीं बंद झाला आहे. टॉलस्टॉय यांच्या पत्नीचा व त्यांच्या मुलीचा पोषाकहि सामान्य गांवकऱ्यासारखा साधाच असतो. मादक पेयास बहुधा पूर्ण बहिष्कार पडला आहे. भपक्याचा अंश जितका कमी होईल तितका तो करण्यांत या मंडळीनें आपणाकडून कसूर केलेली नाहीं, हें कोणासहि उघड दिसण्यासारखें आहे.तथापि तेवढ्यानेंहि टॉलस्टॉय यांचें समाधान होईना. घरदार, जमीन जुमला वगैरे सर्व इस्टेट कृष्णार्पण करून खाण्यापुरतें धान्य जातीनें पिकवावयाचें असें म्हणण्यापर्यंत काट यांची मजल जेव्हां गेली, तेव्हां या पतिपत्नींत बेबनावाचें मूळ उद्भवलें. कौंट यांचें म्हणणें केवळ तत्त्वदृष्टीनें तिला अमान्य नव्हतें; पण मुलांकडे पाहून तिचें हृदय कळवळलें. श्रीमतींत जन्मलेल्या आणि वाढलेल्या आपल्या साऱ्या मुलांस अठरा विश्वे दारिद्र्यांत लोटण्यास कोणत्या आईचा हात धजावेल बरें? मुलेंबाळें नसतीं तर टॉलस्टॉय यांजबरोबर तीहि कदाचित् जोगीण बनली असती; पण आपल्या मुलांना अशा रीतीनें वाऱ्यावर सोडणें तिला शक्य नव्हतें. टॉलस्टॉय यांच्या कार्यात मदत व्हावी म्हणून जीवापाड मेहनत ती करीत असे. घरचा प्रपंच संभाळून जमीनजुमल्याची व्यवस्था ती पाही. इतकेंच नव्हे तर टॉलस्टॉय यांचे हस्तलेख सुवाच्य भाषेंत लिहून छापखान्याकरतां त्यांची 'कापी' तयार करण्याचेंहि काम ती करते. याशिवाय टॉलस्टॉय यांच्या लेखांचें भाषांतरहि तिला करावें लागतें. टॉलस्टॉय यांचें हस्ताक्षर असलें विचित्र आहे कीं त्यांचा लेख उकलण्याचें सामर्थ्य सामान्य मर्त्यांपैकीं फारच थोड्यांच्या आंगीं असेल. याशिवाय टॉलस्टॉय यांना आणखीहि कांहीं विलक्षण खोडी आहेत.

एकच लेख पांच सहा वेळां ते शुद्ध करीत असतात. आणि तितक्या साऱ्या खोडा-खोडी त्या एका कागदावरच करतात. यांत प्रत तयार करणाराचा एखाद वेळ समजुतीचा घोटाळा झाला, म्हणजे पुष्कळ वेळां तो लेख अथपासून इतीपर्यंत पुन्हां लिहावा लागतो. हा अखेरचा लेख टॉलस्टॉय यांच्या नजरेखालून जाऊन तो पास झाला म्हणजे ती प्रत छापखान्याकडे रवाना व्हावयाची. 'युद्ध आणि शांति' हा सुमारें १०००।१२०० पानांचा ग्रंथ कौंटेस बाईस एकंदर सहा वेळां सबंध लिहून काढावा लागला. यावरून आपल्या विक्षिप्त यजमानांची मनधरणी करण्यास बिचाऱ्या कौंटेसबाईस किती यातायात पडत असे याची कल्पना वाचकांनींच करावी. 'जीवितयात्रा' या नांवाचा एक लहानसा ग्रंथ टॉलस्टॉय यांनीं अगदीं अखेरीस लिहिला आहे. हा ग्रंथ शुद्ध तत्वज्ञानप्रधान आहे. कौंटेस बाईस तो सोळा वेळां सबंध लिहून काढावा लागला. याशिवाय फ्रेंच भाषेंत त्याचें भाषांतरहि त्यांनाच करावें लागलें. या वेळीं मुलांना इंग्रजी भाषा शिकविण्याचें काम त्यांजकडे होतें. या खेरीज टॉलस्टॉय यांच्या पुस्तकांचें प्रकाशन, त्यांची विक्री आणि त्यांचा हिशेब या सर्व गोष्टी त्यांसच पहाव्या लागत होत्या.

स्वतःच्या घरीं टॉलस्टॉय हे एकाद्या पाहुण्यासारखे रहात असतात. जणूं काय एकट्या कौंटेसबाईचेंच तें घर असून तिजकडे टॉलस्टॉय अतिथि म्हणूनच उतरेले आहेत! घरच्या खर्चावेचाकडे ते मुळींच पहात नाहींत; इतकेंच नव्हे तर कसल्याहि प्रकारची सल्ला मसलतसुद्धां ते देत नाहींत. चित्तास वाटेल तोंपर्यंत घरीं रहावें व मर्जीस वाटल्यास बाहेर निघून जावें, असा त्यांचा क्रम आहे. त्यांचें जेवणखाण कुटुंबांतील इतर मंडळीबरोबरच होतें; पण तयार केलेल्या पदार्थां-पैकीं अगदीं साधे असतील तेवढेच ते खातात. कुटुंबांतील सर्व मंडळीचें त्यांज-वर मोठें प्रेम आहे. फार काय पण त्यांना ते देवासारखेच पूज्य वाटतात. तथापि त्यांचें स्वतःचें मन मात्र असावें तसें मोकळें नाहीं. बाहेर लक्षावधी लोक कंगाल स्थितींत असतां आपण मोठ्या घरांत रहावें, हेंसुद्धां त्यांना पाप वाटतें; पण निरुपाय म्हणून ते तेथें राहिल्यासारखे दिसतात. आपण आपली इस्टेट द्यावयास काढली तर आपली पत्नी कायद्याची मदत घेण्यासहि मागें पुढें पाहणार नाहीं इतकी जाणीव त्यांजपाशीं असल्यामुळेंच वडिलार्जित जमीनजुमला टॉलस्टॉय घराण्यांत अद्यापि राहिला आहे. टूला प्रांताच्या पूर्वेस जी कांहीं मिळकत त्यांच्या स्वतःच्या कमाईची होती, तिजवरचेहि सारे हक्क त्यांनीं सोडले आहेत. त्याच

प्रमाणें पुस्तकांच्या विक्रींत झालेल्या नफ्यापैकीं एक पैसाहि त्यांनीं दुकानदाराकडून घेतलेला नाहीं.

माझा मुक्काम यासनाया येथें सुमारें एक आठवडा होता. तेवढ्या अवधींत शेतांतलें अथवा दुसरें एखादें शारीरिक श्रमाचें काम टॉलस्टॉय यांनीं केलें नाहीं. मध्यंतरीं एका शेतकऱ्याच्या स्त्रीची जमीन नांगरण्यास ते जाणार होते, पण दुसऱ्या कांहीं कामामुळें तो बेत तितकाच राहिला. वास्तविक त्यांच्या शारीरिक स्थितीकडे पाहतां इतक्या श्रमाचीं कामें त्यांजकडून होतील कीं नाहीं, याची मला शंका आहे. या वेळीं तर त्यांची प्रकृति बरीच बिघडली होती. आम्हां साऱ्यांनाच त्यांची मोठी काळजी वाटत होती; पण प्रकृतीच्या अस्वास्थ्याबद्दल त्यांजजवळ कांहीं बोलल्यास ते म्हणत, 'एकेक दिवसानें मी मृत्यूच्या सन्निध जात आहें, याचा मला मोठा आनंद होतो.' गेल्या सालीं गाडीचें चाक पायाला लागून तेवढ्या निमित्तानें त्यांची प्रकृति कित्येक महिने नादुरुस्त झाली होती. यंदाहि त्यांची प्रकृति केव्हांच ठीक नव्हती. तथापि कोणाहि वैद्याची सल्ला त्यांनीं घेतली नाहीं. वैद्य आणि त्यांची कला या दोहोंसंबंधींहि त्यांच्या मनांत पूर्ण तिरस्कार होता. मास्को येथील एका नामांकित वैद्याला त्यांची प्रकृति दाखवावी म्हणून त्यांची पत्नी खटपट करीत होती; पण या गोष्टीचा सुगावा लागतांच एकदम पळ काढून टॉलस्टॉय यांनीं यासनायाचा मुक्काम गांठला. ते सध्यां पूर्ण शाकाहारी बनले आहेत. मांसाच्या कोणत्याहि पदार्थाला ते स्पर्श करीत नाहींत. पण हा शाकाहार अद्यापि त्यांस मानवला नाहीं, असें दिसतें. त्यांची वृत्ति सध्यां पूर्ण संन्यासाकडे वळत आहे, असें दिसतें. गेल्या सालापर्यंत धूम्रपानाचें व्यसन त्यांना होतें. पण दारू आणि मांस याप्रमाणेंच तंबाखूलाहि त्यांनीं आतां पूर्ण बहिष्कार घातला आहे. केवळ चैनीच्या वस्तूंपैकीं त्यांना लागणारी जिन्नस एकच असून ती चहा ही होय. आतां त्यावरहि मागें पुढें बहिष्कार पडणार नाहीं म्हणून कोणीं सांगावें ?

यासनाया येथें टॉलस्टॉय यांच्या कुटुंबाची दिनचर्या पुढील प्रमाणें होती. घरांतील मोलकरणी अगदीं पहांटे उठून प्रथम बागेची झाडलोट करीत. मी पहांटे उठून लिहावयास बसत असें, तेव्हां घरांत अगदीं सामसूम असे. माझ्या खोलींत भिंतीला साध्या फळ्या मारून त्याजवर आपलीं पुस्तकें टॉलस्टॉय यांनीं ठेवलेलीं होतीं. सकाळच्या नवाच्या सुमारास सर्व माणसें चहा घेत. साडेदहाच्या सुमारास न्याहारी होत असे. यानंतर टॉलस्टॉय हे रानांत फिरावयास जात. तेथून

सुमारें साडेबारा वाजतां परत येऊन आणि अल्पसा आहार घेऊन ते लिहावयास अथवा वाचावयास बसत. संध्याकाळीं पांच वाजतां मुख्य जेवण होई आणि नंतर कौंटची स्वारी पुन्हां लांबलचक रपेटीस जाई. रात्रीं सर्व कुटुंब एकत्र जमलें म्हणजे अनेक प्रकारच्या विषयांवर गप्पा गोष्टी चालत. एकंदरीनें टॉलस्टॉय व त्यांचें कुटुंब यांचा जीवनक्रम अगदीं साधा पण फार उदात्त होता, असा अनुभव मला आला.

[ २ ]

रशियन कादंबऱ्यांची गोडी इंग्लंडांतील लोकांस अगदीं अलीकडेच लागत चालली आहे. दहाबारा वर्षांपूर्वी टूरजीनेफच्या दोन उत्कृष्ट कादंबऱ्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि रशियन कादंबरीचें भाषांतर इंग्रजी भाषेंत झालें नव्हतें. ज्या एक दोन चांगल्या गोष्टी लंडनमध्यें प्रथम प्रसिद्ध झाल्या त्यांची चहा व्हावी तशी झाली नाहीं. डोस्कोविस्कीच्या एका कादंबरीचें भाषांतर तर त्याच्या मृत्यूपूर्वी थोडेच दिवस झालें होतें. याशिवाय टॉलस्टॉय यांच्या कोझाक्स या कादंबरीचेंहि इंग्रजी भाषांतर या वेळेसच प्रसिद्ध झालें. बहुधा इतक्याच पुस्तकांनीं रशियन कादंबऱ्यांची मोजदाद संपली.

यानंतर रशियन साहित्याची गोडी इंग्रज लोकांस अधिकाअधिक लागूं लागली. रशियन साहित्याचा प्रसार अमेरिकेंत बराच पूर्वी झाला होता. टूरजीनेफच्या बहुतेक कादंबऱ्या फिलाडेलफिया येथें कित्येक वर्षांपासून मिळूं लागल्या होत्या; पण इंग्लंडांतील लोकांस त्यांची चटक एकदां लागल्यावर मग ती सारखी वाढतच गेली. व्हिक्टर ह्यूगोनंतर कीर्तीची माळ टूरजीनेफच्या गळ्यांत पडली आणि त्याच्या मृत्यूनंतर आतां ती टॉलस्टॉय यांजकडे आहे. शुद्ध कादंबरी या दृष्टीनें पाहतां टॉलस्टॉय यांचीं केवळ तीनच पुस्तकें कादंबरी या नांवास पात्र होतात. याखेरीज त्यांचे सारे लेख लहानशा गोष्टीच्या स्वरूपाचे अथवा धार्मिक विषयावरचे आहेत. कांहीं किरकोळ लेख चरित्रात्मक व कांहीं शिक्षणविषयक आहेत.

या एकंदर यादीपैकीं त्यांनीं लिहिलेल्या धर्मतत्वांवरील लेखांनीं माझें चित्त जितकें वेधलें तितकें दुसऱ्या कोणत्याहि लेखांनीं तें वेधलें नाहीं. टॉलस्टॉय हे उत्कृष्ट कादंबरी लेखक आहेत, यांत शंका नाहीं; पण धर्मतत्वांच्या उद्घाटनांत त्यांच्या बुद्धीचें तेज जितकें चमकतें तितकें इतर लेखांत तें चमकत नाहीं, असा माझा समज आहे. मानवी जीवनाच्या कोड्याचा उलगडा करण्याकरतां त्यांनीं लिहिलेल्या लेखांची उपेक्षा पुष्कळांनीं केली आहे; आणि याच लोकांच्या मनांत

ॲना क्यारेनीनाच्या लेखकाबद्दल पुष्कळ आदर वसत आहे. टॉलस्टॉय यांची योग्यता कादंबरी लेखक म्हणून अधिक कीं तत्वज्ञ म्हणून अधिक हें ठरविण्याचा माझा उद्देश नाहीं. ‘भिन्नरुचिर्हि लोकः’ या न्यायानें याबद्दल मतभेद होण्याचा संभव आहे. पण यासनायाची यात्रा करण्याचें माझ्या मनांत आलें, याचें कारण त्यांच्या कादंबऱ्या नसून त्यांचे धर्मविचार हे होत. ‘माझा कबुलीजबाब’ आणि ‘माझा धर्म’ या दोन अत्युत्कृष्ट पुस्तकांनीं माझें चित्त इतकें वेधलें कीं, त्यांच्या लेखकाची भेट घेतल्यावांचून मला राहवेना. आपल्या स्वतःच्या मनः-स्थितीचें चित्र कौंट यांनीं इतक्या बहारीनें रंगविलें आहे कीं, चालू पिढींत धर्म-विचारांनीं भरलेला असला दुसरा एकहि ग्रंथ निर्माण झाला नाहीं, असें मला वाटतें. टॉलस्टॉय हे अरण्यवासी नसून संसारी आहेत. जगाचा अनुभव त्यांस पुष्कळ आहे. जग खोटें म्हणून उगीच कांहीं तरी ओरडत सुटणाऱ्या बाष्कळ तत्ववेत्त्यांच्या मालिकेंतले ते नव्हत; पण जगांत राहूनहि त्यांची दृष्टि जगापलीकडे जाऊन पोहोंचली आहे. बुद्धिपूर्वक विचार न करतां केवळ धर्म म्हणून बायबलाला चिकटणाऱ्या जुन्या खोडांपैकीं ते नाहींत; तथापि शुद्ध बुद्धिवादी असतांहि ते ख्रिस्ताचे शिष्य आहेत. ते श्रीमंत सरदार घराण्यांतले, शिपाईगडी, कादंबरीकार आणि विद्वन्मुकुटमणि असतांहि अप्रतिकाराचें तत्व शिकवितात, याचें कोणासहि नवल वाटेल. परस्परविरोधी तत्वांचें अशा प्रकारचें संमेलन करूं म्हटल्यानेंहि होणार नाहीं; पण चमत्कार हा कीं टॉलस्टॉय यांच्या ठिकाणीं या साऱ्या वस्तु एकोप्यानें नांदत आहेत. सांप्रत युरोपावर आलेली धर्मग्लानी दूर करण्याचें श्रेय रशियाच घेईल, असा पुष्कळ वर्षांपासून माझा समज आहे; आणि पुष्कळ वेळां तो मी बोलूनहि दाखविला आहे; आणि आतां रशियाच्या मध्यभागीं हा नवा धर्म-गुरु जन्मास आला असून ‘ऐका हो ऐका’ म्हणून आपला धर्मोपदेश जगास सांगत आहे. रशियांतील अर्वाचीन संस्कृतीच्या शिरोभागीं बसविण्यास योग्य जर कोणी रशियन असेल, तर तो कौंट टॉलस्टॉय हेच होत. ख्रिस्ताच्या संदेशाचा अक्षरशः अर्थ त्यांनींच प्रथम केला; आणि उत्तम बुद्धिवादानें तो लोकांच्या गळींहि उतरवला. आतांपर्यंत या संदेशावर ज्या टीका झाल्या, त्यांवर अनेक प्रकारच्या स्वार्थाची छाया पडली होती; आणि सध्यांच्या सोशियालिझमच्या काळांत तर त्याचें स्वरूप अगदींच विकृत झालें होतें. टॉलस्टॉय यांचा एक शिष्य यापूर्वी एकदां मला भेटला होता. हा एक तरुण रशियन असून इंग्लंड देश पाहण्यासाठीं आला होता. ‘माझा धर्म’ या टॉलस्टॉय यांच्या पुस्तकाचें इंग्रजींत भाषांतर याच

तरुणानें लिहिलें होतें. या लेखासंबंधीं मोठ्या उत्सुकतेनें त्याच्याशीं मीं चर्चा केली आहे. अप्रतिकाराच्या तत्वाबद्दल माझी स्वतःची पुरीशी खात्री झाली नसल्या-मुळें ख्रिस्तप्रणीत धर्मांत हें तत्व खरोखरच इतक्या महत्वाचें मानलें आहे कीं काय असें मीं त्याला विचारलें. टॉलस्टॉय यांनीं आपल्या लेखांत या तत्वाला महत्व दिलें आहे, इतकेंच नव्हे, तर ख्रिस्ती धर्माचा पाया हेंच तत्व आहे, असेंहि प्रति-पादन केलें आहे.

त्या तरुण रशियन गृहस्थाला मीं म्हटलें, "अशी कल्पना करा कीं, तुम्ही रस्त्यानें जात असतां, एकादा दारूनें मस्त झालेला नरपशू तुमच्या धाकट्या बहिणीवर जुलूम करूं लागला तर त्याचा प्रतिकार करणें योग्य होईल कीं नाहीं ?"

"फक्त त्याला बोध करण्याचा मात्र अधिकार आपणास आहे. बोलून त्याचें मन वळवावें."

"ठीक आहे; पण तुमचें म्हणणें त्यानें ऐकलें नाहीं, तर तुमच्या बहिणीच्य रक्षणाकरतां तुम्ही त्याला बडवाल कीं नाहीं ?"

यावर त्यानें उलट मला प्रश्न विचारला, तुम्ही तसें कराल काय ? मीं रागानें उत्तर दिलें, "अवश्य. मी त्याला खचीत मारीन. तुम्ही त्याला मारणार नाहीं काय ?"

"नाहीं. मी त्याला हातहि लावणार नाहीं."

त्याच्या या उत्तरानें माझें अगदीं भान जाऊन मीं म्हटलें, "तर मग तुमचीहि योग्यता लाथा खाण्याचीच आहे."

पण माझ्या या बोलण्यानें चिडून न जातां त्यानें आपलेंच म्हणणें कायम ठेवलें. कोणत्याहि प्रसंगीं दुष्टांचा प्रतिकार करावयाचा नाहीं. अशीच ख्रिस्ताची स्पष्ट आज्ञा आहे, हें तो मला पुनःपुन्हां सांगूं लागला. ही आज्ञा जो कोणी पाळीत नाहीं तो ख्रिस्ताचा खरा अनुयायीच नव्हे असेंहि तो प्रतिपादूं लागला. या बाबींत त्याच्याशीं आणखीहि कांहीं बोलावें असें माझ्या मनांत होतें पण माझी इच्छा मनास न आणतां तो तडक चालता झाला. मी माझे स्वतःचे कांहीं लेख त्याजकडे पाठविले. त्यांत ख्रिस्तीधर्मासंबंधीं माझ्या मतांचें प्रतिपादन मीं केलें होतें. हे लेख रवाना झाल्यानंतर थोड्याच दिवसांत त्या तरुणाकडून एक पत्र मला आलें. त्यांत आपणा दोघांचीहि एकवाक्यता आहे, अशा अर्थाचा मजकूर लिहिला होता. या तरुण गृहस्थाच्या चित्तावर टॉलस्टॉय यांच्या मतांचा विलक्षण परिणाम झालेला मला दिसला. अशा उत्साही तरुणाच्या चित्ता वर इतका

आपला पगडा बसविणारा हा गुरु तरी कोण, हें जाणण्याची माझी इच्छा अनावर झाली. टॉलस्टॉय यांचें धर्मसंबधीं मत त्या काळापर्यंत परिपक्व दशेस आलें नसावें, असें मला वाटतें. पूर्वी एका काळीं ते शुद्ध नास्तिक होते, आणि नास्तिकाचे ते आस्तिक झाले; आणि नंतर ख्रिस्ताचे अनुयायी ते सध्या बनले आहेत. अशा स्थितींत त्यांच्या धर्मविचारांची हीच अवस्था शेवटची होय, याची तरी खात्री कोणी द्यावी ?

जुन्या पद्धतीच्या धार्मिक लोकांत टॉलस्टॉय यांस बराच मान असावा, असा माझा समज होता; पण पीटर्सबर्ग येथें आल्यावर तो नाहींसा झाला. जे लोक स्वतःस अगदीं जुन्यांतले जुने म्हणवीत त्यांना तर टॉलस्टॉय यांच्याबद्दल अगदीं तिरस्कार वाटत होता. याहून मध्यम प्रतीचे जुने होते, त्यांना टॉलस्टॉय पूर्वीसारखेच धर्मलंड वाटत होते. निरीश्वरवाद्यांचा प्रश्न सोडून टॉलस्टॉय यांजसारखा अप्रतिम ग्रंथकार ख्रिस्ती धर्माकडे वळला याबद्दल आनंद होण्याऐवजीं हा गृहस्थ धर्माची हेटाळणी करीत आहे, असें म्हणून हा पक्ष टॉलस्टॉय यांजवर नाराज झाला होता. साहित्यभक्त होते, त्यांच्या नाखुषीचें कारण आणखी वेगळेंच होतें. त्यांना हा तत्वांचा काथ्याकूट असह्य वाटत असून त्यांना आणखी एकादा 'ॲना क्यारेनीना' पाहिजे होती, सुंदर कादंबऱ्या लिहिण्याचें सोडून या एरंडाच्या गुऱ्हाळांत टॉलस्टॉय सांपडले म्हणून त्यांना दुःख झालें होतें. असल्या भाकडकथा लिहिणें, हा काळाचा अपव्यय होय असेंच त्यांना वाटत होते. धर्मग्रंथ लिहिण्याचें काम धर्मोपदेशकांचेंच आहे, असा त्यांचा समज असल्यामुळें टॉलस्टॉयसारखा साहित्यलेखक धर्मोपदेशक बनूं शकेल, हेंच त्यांना खरें वाटेना; पण अशा स्थितींतहि जे थोडेबहुत शिष्य टॉलस्टॉय यांना मिळाले होते, ते मात्र त्यांचे कट्टे अनुयायी बनून गेले होते. यांपैकीं कित्येकांनीं आपल्या मालमिळकतीवर पाणी सोडलें होतें. श्रीमंतीला त्यांनीं रजा दिली होती आणि शेतकऱ्यांचा पोषाक व राहणी यांचा स्वीकार त्यांनीं केला होता. यांपैकीं एक तरुण पीटर्सबर्ग येथें मला भेटला असतां मी त्याला म्हटलें, "उद्यां सकाळीं तुम्हाला कोणी ठार मारण्यासाठीं येणार आहे असें समजलें तर तुम्ही काय कराल ?" त्यानें उत्तर दिलें " मी कांहींहि करणार नाहीं. " हा तरुण टॉलस्टॉय यांचा कट्टा भक्त बनला असून त्यांच्या मतांचा प्रसार पीटर्सबर्ग येथें करीत आहे. आगगाड्यांबद्दल टॉलस्टॉय पक्षाच्या मनांत मोठा तिट्कारा आहे. ही गोष्ट त्यानेंच मला प्रथम सांगितली. आगगाड्या हें लोकांना लुबाडण्याचें श्रीमंतांचें एक साधन आहे

असें तो म्हणाला. पीटर्सबर्ग येथें या पक्षाची एक लहानशी संस्था असून पुस्तकांच्या व हस्तपत्रकांच्या द्वारें आपल्या मतांचा प्रसार ती करीत असते. या संस्थेंत सभासदांची संख्या फार मोठी आहे असें नाहीं, पण त्यांनीं दाखविलेला स्वार्थत्यागाचा धडा अत्यंत स्पृहणीय आणि सर्वांनाच अनुकरणीय असा आहे.

अशा प्रकारच्या अनेक गोष्टी घडून या नव्या तत्ववेत्त्याची भेट घेण्याची माझी इच्छा दुणावली. अप्रतिकाराचें तत्व बुद्धिवादाच्या अखेरच्या पायरीपर्यंत टॉलस्टॉय यांनीं पोहोंचविलें होतें; तथापि शुद्ध वादाच्या दृष्टीनें त्यांत एकच खोड मला दिसत होती. बहुधा कोणत्याही प्रसंगीं दुष्टाचा प्रतिकार करावयाचा नाहीं, अशीच खिस्ताची स्पष्ट आज्ञा आहे, असें बुद्धिवादानें सिद्ध करीत असतांहि एकाद्याला तशाच भयंकर प्रसंगीं थोडासा प्रतिकार केल्यास चालेल असें टॉलस्टॉय यांनीं एकेजागीं म्हटलें होतें. उदाहरणार्थ, एकादा दारूबाज एकाद्या लहान मुलाचा प्राण घेऊं लागला, तर शारीरिक बळाच्या प्रतिकारानें त्याचें निवारण करणें आयोग्य नाहीं, असें टॉलस्टॉय यांनीं एके ठिकाणीं म्हटलें होतें. शुद्ध तर्कशास्त्राला संमत अशा दृष्टीनें या साऱ्या लेखांत एकच खोड मला आढळली आणि माझ्या दृष्टीनें ही खोड अशा प्रकारची होती कीं हा एकच अपवाद टॉलस्टॉय यांनीं कबूल केला कीं, बाकीचा त्यांचा लेख तर्कशास्त्राच्या दृष्टीनें कवडीमोल ठरणार. पुढें हा दोष या लेखांत कसा शिरला, याची हकीकत या लेखाचें इंग्रजी भाषांतर करणाऱ्याकडून मला समजली. तो म्हणाला 'मी हें भाषांतर करीत असतां वाटेल तो गुन्हा आपणासमोर निमूटपणें घडूं द्यावयाचा हें तत्व मला कसेंसेंच वाटूं लागलें; तेव्हां हें लहान मुलाचें उदाहरण टॉलस्टॉय यांजसमोर मीं मांडलें. एकादा मनुष्य दारू पिऊन धुंद झाला असतां, त्या नशेच्या भरांत एकाद्या पोराचा प्राण घेण्यास तो उद्युक्त झाला अशी कल्पना करा. हितबुद्धीच्या माझ्या कोणत्याहि गोष्टी न ऐकतां तें घोर कर्म तो करणार, असें निश्चित दिसल्यानंतर मला दोनच मार्ग शिल्लक उरतात. एक जबरीनें त्याचा प्रतिकार करावा अथवा त्याला त्या पोराचा जीव घेऊं द्यावा. त्याची नशा उतरल्यावर या अघोर कृत्याबद्दल त्याला खचित पश्चात्ताप होईल, हें मला ठाऊक आहे; पण त्या वेळीं पश्चात्तापाचा उपयोग काय? कदाचित् तो फांशीं जाईल आणि मूल तर अगोदर मरून गेलेलें आहे. अशा स्थितींत या दोन हत्यांचें पातक माथीं घेण्यापेक्षां हें अघोर कृत्य घडणार नाहीं, इतक्या बेतानें त्याचा शारीरिक प्रतिकार मीं केला, तर तें माझें सत्कृत्य नव्हे काय? असा प्रश्न टॉलस्टॉय यांजपुढें मीं

टाकला. माझा प्रश्न खरोखरच बिनतोड होता आणि कौंट यांनींहि एवढया एका बावतींत आपला हेका सोडून दिला.'

अशा रीतीनें या साऱ्या लेखांत ही एकच गोम शिरून बसली; पण एवढया-मुळें त्यांचा सारा लेख पालथा पडला. कारण एकादा मनुष्य अथवा एखादें राष्ट्र संग्राम करूं इच्छित असतां तो अथवा तें राष्ट्र वेडाच्या भरांत हें कृत्य करीत आहे असें म्हणून त्याचा प्रतिकार करण्यास काय प्रत्यवाय आहे? अप्रतिकाराच्या तुमच्या तटबंदींत एकादी लहानशी फट पडली, तरी पुढें तिचें मोठें भगदाड होऊन तींतून मोठाले हत्तीहि शिरूं लागतील हें उघड आहे. तेव्हां ही लहानशी फट तर्क-शास्त्राच्या कोणत्याआधारानें टॉलस्टॉय यांनीं राहूं दिली, हें खुद्द त्यांनाच मला विचारावयाचें होतें. यासनाया येथें आल्यानंतर लवकरच योग्य संधीचा फायदा घेऊन हा प्रश्न मीं त्यांना विचारला; पण टॉलस्टॉय हेहि कांहीं लेचेपेचे नव्हते. ते म्हणाले, 'होय. माझ्या हातून ही खरोखरच मोठी चूक झाली. एखाद्या दारू-बाजाच्या हातून एखाद्या मुलाला वांचविण्याकरतांहि शरीरबळानें प्रतिकार करणें योग्य नाहीं. हा अपवाद मीं शिरूं दिला, ही मोठी चूक झाली."

कोणत्याहि कामाकरतां शारीरबळाचा उपयोग करून प्रतिकार करणें हें खिस्ती शास्त्राला अगदीं असंमत आणि धर्मविरुद्ध आहे, असें टॉलस्टॉय यांचें निश्चित मत आहे. ते म्हणतात, "दुसऱ्याच्या एखाद्या कृत्याचा अशा रीतीनें निषेध कर-णारे तुम्ही कोण? उत्तमोत्तम घरांत राहून आणि रोज पंचपक्वान्नें झोडून प्रति-काराच्या गोष्टी नुसत्या बोलणेंहि तुम्हांस शोभत नाहीं. ही सारी संपत्ति तुमच्या हातीं कोणत्या रीतीनें आली, हें तर आम्हांला ऐकूंद्या. या मार्गांत मनुष्याचें रक्त कोठें नाहीं काय? मग ज्या मार्गानें तुम्हीं ती मिळविली, त्याच मार्गानें तुम्हां-पासून ती कोणी बुचाडून घेऊं लागला, तर त्याचा प्रतिकार करण्याचा अधिकार तुम्हांस कोठें आहे? याकरितां आधीं तुम्हीं स्वतःच शुद्ध व्हा. बळजबरीच्या साध-नानें जी संपत्ति तुम्हीं आपल्या खिशांत घातली आहे, तिचा त्याग करून प्रथम अत्याचारमुक्त व्हा. साध्या हेलकऱ्याहून जी अधिक संपत्ति तुम्हापाशीं आहे, तिचा त्याग केल्यानंतर या विषयावर बोलण्याचा अधिकार तुम्हांस प्राप्त होईल. वास्तविक पहातां दंडाचा प्रतिकार दंडानें करणें ही कल्पना धर्ममूलक नसून तिचा उगम कोमल मनोविकारापासून झाला आहे. दुर्बळांचें संरक्षण बलवानानें करावें, या दयामूलक कल्पनेपासून दंडाचा प्रतिकार दंडानें करावा ही कल्पना निर्माण झाली; पण खिस्ताची धर्ममूलक कल्पना आणि ही दयामूलक कल्पना या दोहोंत

कोणताहि नित्यसंबंध नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. एकादा अडदांड पशुतुल्य मनुष्य एकाद्या लहान मुलाचा जीव घेत असला, तर लाठीनें त्याला जमीनदोस्त करून आणि अशा रीतीनें मुलाचा प्राण वांचवून अधर्माचें पातक जोडण्यापेक्षां त्या मुलाचा प्राण जाऊं देणें अधिक बरें."

यावरून देहांतशिक्षेबद्दल टॉलस्टॉय यांचें मत काय असावें, याचें अनुमान कोणासहि करतां येईल. ते म्हणतात, "न्याय करणारे तुम्ही कोण? तुम्हांस कोणाचाच न्याय करण्याचा अधिकार नाहीं. एकादा मनुष्य कितीही वाईट असला तरी तोहि मनुष्यच. तो तुमचा बंधु, त्याचा प्राण तुम्ही घेतला, तर बंधुहत्येचें पातक तुम्हांस चिकटणारच. या पातकाला कसलेंहि सोज्वळ नांव तुम्हीं दिलें, तरी खून तो खूनच. आतां तुम्ही कदाचित् असा आक्षेप घ्याल कीं एखाद्या दुष्टाला सिंहावाघासारखी मनुष्याच्या रक्ताची गोडी लागली, तर त्याचा वध करणें इष्टच आहे. हा तुमचा आक्षेप आधीं लक्षांत आणूनच ख्रिस्तानें म्हटलें आहे कीं, ' जो कोणी बंधुहत्या करील त्यालाहि न्यायासनासमोर उभें राहिलें पाहिजे.' अमुक मनुष्य उपद्रवी आहे, असें तुम्ही म्हणतां; पण पुष्कळ सत्पुरुषांबद्दलहि असेच गैरसमजाचे प्रवाद ऐकूं येत नाहींत काय? फार लांब कशाला, खुद्द येशुख्रिस्ताबद्दलहि त्यांच्या बांधवांचा समज असाच होता."

कोणाहि मनुष्याला कोणत्याहि कारणासाठीं देहदंड करणें हें अमानुषपणाचें कृत्य आहे, असें टॉलस्टॉय यांचें स्पष्ट मत आहे. तुम्हाला खरा न्याय देण्याचें सामर्थ्य असेल तरच एखाद्या अपराध्याला तुम्हाला शासनहि करतां येईल. आणि असा चोख न्याय देण्याचें सामर्थ्य ज्याअर्थी कोणाहि मनुष्याला नाहीं, त्याअर्थी अपराधी आणि त्याला शिक्षा सांगणारा न्यायाधीश हे दोन्हीहि एकाच पंक्तींत आहेत. प्रत्येक मनुष्याचा न्याय परमेश्वर करतो, आणि आपल्या कृत्याचा जाब प्रत्येक मनुष्याला फक्त परमेश्वरापुढेंच द्यावयाचा असतो. याकरितां केवळ तोंडी वादविवाद करून एखाद्या मनुष्याला एखाद्या कामापासून परावृत्त करणें, इतकेंच तुमचें कर्तव्य आहे.

कोणत्याहि प्रकारची करवसूली हीसुद्धां टॉलस्टॉय यांच्या मतें अन्याय आहे. कारण करवसूलीकरितां दंडाचा आश्रय करणें भाग आहे. यामुळें असल्या पैशाचा जन्महि अन्यायांतून झालेला आहे, हें उघड आहे.

यावर मीं म्हटलें, " करांच्या अभावीं, दरबार आणि सरकार या संस्थाहि नामशेष होतील."

कौंटनीं एकदम उत्तर दिलें, " अहो, कसला दरबार आणि कसलें सरकार! हे नुसते बागुलबोवा आहेत. यांना कांहीं निश्चित स्वरूपच नाहीं. ' सरकार ' हा कसलासा प्राणी आहे, हें सांगा पाहूं ! हे शेतकरी, हीं खेडीं इत्यादि पदार्थ माझ्या दृष्टीला दिसतात, पण सरकार, राष्ट्र, दरबार, हीं पोकळ नांवें असून यांची उत्पत्ति कांहीं लुटारूनीं प्रामाणिक मनुष्यांना लुबाडण्यासाठीं केली आहे. गरीब मेहनती शेतकऱ्यांना लुटतां यावें आणि शांतताप्रिय लोकांचे गळे कापतां यावेत याकरितांच कर, आणि युद्धें करणाऱ्या या संस्था निर्माण झाल्या आहेत. या शुद्ध भ्रममूलक कल्पनेपासून मनुष्यें मुक्त होतील, तर किती बहार होईल! पहा, आपलीं अनंत दुःखें एकाच क्षणीं विलयाला जातील. या संस्था निर्माण झाल्यापासूनच अनेक दुःखें मनुष्य प्राण्याच्या मागें लागलीं. या खोट्या मूर्तींना सोडून फक्त ख्रिस्ताचीच आराधना करावयाचा निश्चय मनुष्यानें केला, तर या साऱ्या अडचणी आपोआप मिटतील.

उदाहरणार्थः---रशिया आणि पोलंड अथवा इंग्लंड आणि ऐर्लंड यांच्यांतील तटे एकाच क्षणांत नाहींसे होतील. आमच्या रशियाच्या शेजारीं एका जमीनीच्या तुकड्याला पोलंड असें नांव आहे. येथें राहणारे लोक आमच्याहून वेगळी भाषा बोलतात, तिला पोलिश भाषा म्हणतात. आणि एवढ्याच फरकामुळें तुमचे हे बांधव नव्हेत, असें आमच्या लोकांस सरकार भासवितें. आमचे भोळे भाबडे शेतकरी, या सरकारानें दिलेला पोषाक चढवून आणि त्यानेंच दिलेलीं घातक हत्यारें खांद्यावर टाकून आपल्या या बांधवांचा वध करण्यास प्रवृत्त होतात. या सरकारसंस्थेच्या असल्या अमानुष हुकुमापुढें मान वांकवावयाची नाहीं असा निश्चय आमच्या शेतकऱ्यांनीं केला, तर आमच्या पायास नित्य रुपणारा पोलंड या नांवाचा कांटा त्याच क्षणीं नाहींसा होईल. केवळ ख्रिस्ताच्या आज्ञेचा भंग केल्यामुळेंच या अनंत अडचणी आम्ही मनुष्यांनीं आपणावर ओढून घेतल्या आहेत."

कोणत्याहि कारणास्तव हातीं कधींहि शस्त्र धरणाऱ्या पूर्वीच्या क्वेकरपंथाच्या लोकांची आठवण या वेळीं मला झाली. रशियांत सक्तीच्या लष्करी नौकरीचा कायदा आहे. हा कायदा मोडण्याचा यत्न कोणीं केला होता कीं काय ? असा प्रश्न कौंट यांस केला, तेव्हां ते म्हणाले,

" असाहि एखादा इसम कधीं कधीं आढळतो. एके वेळीं माझ्या एका तरुण मित्रावर असा प्रसंग आला; तेव्हां त्यानें सैन्यांत जाण्याचें साफ नाकारलें. भरती

होतांना प्रथम शपथ घ्यावी लागते. अशी शपथ त्याला घ्यावयास सांगितलें, तेव्हां शपथ घेणें ख्रिस्ताच्या आज्ञेविरुद्ध आहे, असें म्हणून त्यानें ती गोष्ट नाकारली. तेव्हां हा वेडा आहे, असें म्हणून सरकारी अधिकाऱ्यांनीं त्याची रवानगी वेड्यांच्या इस्पितळांत केली. या ठिकाणीं असतां पुष्कळसे धर्माधिकारी त्याला भेटावयास येत. तथापि ख्रिस्ताची आज्ञा पुढें करून त्यांचीं तोंडें तो तेव्हांच बंद करी. ख्रिस्ताच्या स्पष्ट आज्ञेविरुद्ध ते बिचारे तरी काय बोलणार? अशा रीतीनें कांहीं महिने लोटल्यावर त्याची रवानगी ओडेसा येथें झाली आणि तेथील तोफखान्यांत त्याची भरती झाली; पण कोणतेंहि लष्करी शिक्षण घेण्याचें त्यानें साफ नाकारलें. तेथून त्याची उचलबांगडी करून सरकारनें त्याला ताशकंद येथें नेलें; पण तेथील अधिकाऱ्याशींहि त्याचीं नित्य भांडणें होऊं लागलीं. नानाप्रकारचे धाक त्यांनीं त्याला घातले पण सारें व्यर्थ. अखेर तेथील तुरुंगांत त्यानें बारा महिने काढले. मग कोणत्याहि उपायानें त्याचें मन वळत नाहीं, असें पाहून त्यांनीं त्याला सोडून दिले. याचेंच उदाहरण दुसऱ्यासहि वळवितां येण्यासारखें आहे. सर्वांनीं हा कित्ता घेतला, तर जगांतल्या लढाया आपोआपच थांबतील. हें मत हळूहळू पसरत गेलें, तर शंभर वर्षांच्या आंत लढाई म्हणजे काय, याचें स्मरणहि लोकांस रहाणार नाहीं. वास्तविक पाहतां खरा ख्रिस्तीच कोणी नाहीं. लष्करांत शिपायाची नौकरी केल्यावर कोणी ख्रिस्ताचा अनुयायी होऊं शकेल काय? ख्रिस्ताचा त्याग केल्यानंतर युरोपांतील लोकांनीं हातीं तरवार घेतली. आतां ही गोष्ट या लोकांच्या आंगवळणीं इतकी पडली आहे कीं या बाबतींत ख्रिस्ताची कांहीं आज्ञा आहे कीं नाहीं, याचेंहि त्यांस स्मरण नाहीं."

सरकार ही संस्था टॉलस्टॉय यांस सर्वथा नाकबूल आहे. ही कोणाचें तरी कांहीं हित करते कीं काय, हें त्यांस समजत नाहीं. सांप्रतची रशियन सरकारची स्थिति पाहतां टॉलस्टॉय यांचें असें मत व्हावें यांत नवल नाहीं. कर गोळा करणें आणि लढाया करणें, या दोन गोष्टींवांचून रशियन सरकारचा संबंध आपल्या प्रजेशीं फारसा येत नाहीं. सरकारसंबंधीं बोलत असतां, ते म्हणाले, "येशु ख्रिस्ताचीं वचनें व्यवहार्य कशीं करतां येतील याचा विचार करीत असतां माझीं हीं मतें बनलीं आहेत. त्यांतून माझा प्रत्यक्ष अनुभवहि तसाच आहे. या खेडयांत आम्ही शेतकरी आपला सारा जन्म घालवितों. उद्यां एकादा मोठा धरणीकंप होऊन त्यांत तुमचें तें मास्को, तें पीटर्सबर्ग आणि त्याबरोबरच सरकार हीं सारीं गडप झालीं, तरी आम्हाला त्याचें काय होय? या साऱ्या गोष्टी घडल्या तर आम्हा

शेतकऱ्यांचें काडीचेंहि नुकसान न होतां, थोडेंबहुत हितच होईल. सरकार आम्हांला मदत म्हणून ज्या ज्या गोष्टी करतें, त्यांनीं आमचा उपद्रव मात्र वाढतो. असलें सरकार नाहींसें झालें, तर त्यांत नफा आहे कीं नुकसान आहे, असल्या अर्थाची एक गोष्ट लिहिण्याचा माझा विचार आहे. अहो, हें सरकार नुसतें निरुपयोगी आहे इतकेंच नव्हे; तर नसते अनर्थ हटकून उत्पन्न करण्याचें तें एक साधन मात्र आहे. "

बोलतां बोलतां शेतांतली पाऊल वाट संपून आम्ही एका मोठ्या राजरस्त्यावर आलों. हा रस्ता टूलावरून कीफकडे जात होता. येथें आल्यावर मीं म्हटलें, हा रस्ता कोणीं केला ?

टॉलस्टॉय यांनीं उत्तर दिलें. "सरकारनें."

"तर मग रस्ते बांधण्यासारखी एकादी तरी चांगली गोष्ट सरकार करतें ना ?"

"होय होय. आपलें अस्तित्व अवश्य आहे, असें लोकांस भासविण्याकरतां अशा गोष्टी त्यास कराव्याच लागतात. पण वास्तविक पाहतां असल्या गोष्टींची जरूर आम्हास आहे, असें नाहीं. हे मोठे रस्ते, या आगगाड्या, हीं शेतकीचीं प्रदर्शनें आणि असल्याच दुसऱ्या शेंकडों गोष्टी सरकार करीत असतें. यांची संवय एकदां आम्हांला झाली, म्हणजे मग त्यांची गरज उत्पन्न होते. मग त्या हव्याशा वाटूं लागतात. पण आगोदर त्यांवांचून आमचें कांहींच नडत नसतें. लोकांना खरी गरज उत्पन्न झाली, म्हणजे कोणाच्याहि मदतीशिवाय या गोष्टी आपल्या आपणच ते करतील. अशा गोष्टींत सुधारणा भरली आहे, या भ्रमामुळेंच सरकार त्या करीत असतें. या योगें मनुष्याचें जीवित अधिक सुखकर होतें, असें वाटणें हा भ्रम आहे. असल्या जड वस्तूंचा केवढाहि मोठा संग्रह तुम्हीं केला, तरी तुमच्या सुखांत एक रतीभरहि भर पडणार नाहीं. मनुष्यांचें जीवित या गोष्टींनीं अधिक सुखकर होईल हा सध्यांच्या काळचा मोठा भ्रम आहे. सर्व जगाला यानें व्यापलें आहे. पण ही गोष्ट सर्वथा अशक्य आहे. मनुष्यांचें जीवित खरोखर सुखकर कशानें होतें ? त्यांना अधिक सदय आणि अधिक प्रेममय केल्यानें होतें. त्यांना तुम्हीं ख्रिस्तासारखे करण्याचा यत्न करा. तुमचें जीवित जितकें अधिक प्रेममय तितकें तें अधिक जिवंत आहे. याखेरीज बाहेरचा देखावा मृगजळासारखा असून त्यांत चिरस्थाई तत्व नाहीं. आजना उद्यां या बाह्य देखाव्याचा नाश अवश्य होईल. आपल्या बांधवांबद्दल प्रेम ही एकच तुमच्या जिवंतपणाची खरी खूण आहे. तुमच्या खऱ्या जिवंतपणाचें लक्षण हें एकच. उद्यां कोणीं एक

कोट रुपये माझ्या हातीं देऊन शेतकऱ्यांच्या कल्याणासाठीं त्यांतून जमीनी विकत घ्यावयास, घरें बांधण्यास आणि दुसऱ्या अनेक सुखसोयींची तरतूद लावण्यास कोणीं मला सांगितलें, तर तीहि गोष्ट एकवेळ मी नाकारीन. पण शेतकऱ्यांची मनोभूमिका केवळ एकच अंशानें सुधारण्याचा उपाय कोणीं माझ्या हातीं दिला तर त्याचा मात्र मी अवश्य स्वीकार करीन. कारण अशी सुधारणा मनःस्थितींत झाल्यामुळें लोकांचें जीवित एका अंशानें तरी खचित अधिक सुखकर होईल. ही गोष्ट कोट रुपयांनीं साधावयाची नाहीं. फार काय, पण कदाचित अशा जड संपत्तीच्या वाढीनें त्यांचीं दुःखें दुणावण्याचाहि संभव आहे." दुष्टाचा प्रतिकार करू नका, ही येशुख्रिस्ताची आज्ञा त्याच्या धर्माच्या मूलाधाराशीं आहे असें टॉलस्टॉय यांचें निश्चित मत आहे. ही एक आज्ञा वजा झाली, कीं सारा ख्रिस्ती, धर्म नाहींसा होईल असें तें म्हणतात. ख्रिस्ताचीं विस्कळित धर्मतत्वें एकसूत्र होण्याचा मूळ पाया हाच. यामुळेंच त्यांना एकतानता प्राप्त झाली आहे. याकरितां सर्व धर्मपंथांची उभारणी याच मूळ पायावर झाली पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. याकरितां मनुष्यानें स्थापिलेलीं न्यायाचीं कोर्टें त्यांच्या दृष्टीनें अधर्ममंदिरें असून त्यांना ख्रिस्ताचा आशीर्वाद कधींहि मिळणार नाहीं. कोणत्याहि कारणास्तव सशस्त्र प्रतिकाराचें तत्व त्यांच्या दृष्टीनें न्याय्य ठरत नाहीं. दुष्टत्व नाहींसें करण्याकरितां शस्त्रानें त्याचा प्रतिकार करणें म्हणजे जगांतील दुष्टत्व वाढविणें होय. याकरतां कोणत्याहि प्रकाराचा प्रतिकार न करणें हेंच प्रत्येक ख्रिस्तानुयायाचें कर्तव्य आहे. ख्रिस्ती म्हणविणारे लोक अशारीतीनें वागतील, तरच जगांत शांतता नांदेल. सशस्त्र प्रतिकारानें जगांतील द्वेष, असूया इत्यादि विकारांची वाढ मात्र होईल आणि दुष्टत्वाचे परिणाम स्वतः निश्चळपणें भोगल्यानें तें ढिलें पडून आपोआपच मृतप्राय होत जाईल. दुष्टत्वाचा प्रतिकार केल्यानें दुसऱ्याला दुष्ट बनविण्यास मदत केल्याचें पाप मात्र आपल्या पदरीं पडतें. यामुळें दुष्टांची संख्या वाढत जाऊन दुष्टत्व कमी होण्याऐवजीं त्याचा प्रसार जगांत अधिक होतो.

यावर कित्येक लोकांकडून एक आक्षेप येण्यासारखा आहे. अप्रतिकाराच्या तत्वांचा स्वीकार करून आपलें सारें शस्त्रागार अशा रीतीनें आम्हीं दुष्टांच्या हातीं दिलें तर आम्हास नामशेष होण्याचा प्रसंग येणार नाहीं काय ? अशा रीतीनें निःशस्त्र होऊन आणि दुःखें भोगून मनुष्यें मरण्यास तयार होतील, अशी तुमची अपेक्षा आहे काय ? या आक्षेपावर कौंट यांनीं पुढील सुंदर उत्तर दिलें.

"आपल्या जीविताच्या प्रवाहाचें समग्र निरीक्षण करून पाहिल्यास ख्रिस्ताची आज्ञा पाळल्यामुळें दुःखें उत्पन्न होतात, असें नाहीं, असें आपणास आढळून येईल. उलटपक्षीं या जगांतील गुतागुतींत आपला मार्ग चुकून आपल्या सात्विक मनःप्रवृत्तीच्या विरुद्ध आपण वर्तन करतों, तेव्हांच दुःखें आपणास गांठतात, असेंच आपणास आढळून येईल. सांप्रत ज्या अनेक प्रकारच्या वेदना मला होत आहेत, त्यांचा उगम माझ्या पूर्वचरितांतच झाला आहे. मीं अनेक प्रकारचे वाईट छंद केले आणि विद्यार्थी दशेला अगदीं अस्वाभाविक अशा रीतीचें माझें वर्तन होतें. माझी वागणूक माझ्या विवेकबुद्धीविरुद्ध होती, तरी ती जगाच्या शिकवणीविरुद्ध नव्हती. मीं जशा रीतीनें वागावें अशी जगाची अपेक्षा होती, तशाच रीतीनें मी वागलों; पण त्याचा परिणाम काय झाला आहे पहा! माझ्या चित्ताला आणि शरीरालाहि अस्वास्थ्य प्राप्त झालें आहे. केवळ जगाच्या नादीं लागल्यामुळेंच माझी अशी अवस्था झाली, असें म्हणणें चुकीचें आहे काय?"

"आपला क्रूस उचल आणि माझ्या मागें ये" अशी ख्रिस्ताची आज्ञा आहे. या वचनाचा अर्थ हाच कीं "तुझ्या कर्मानुरूप ज्या भल्याबुऱ्या स्थितींत तूं असशील ती शांतपणें भोग आणि माझी आज्ञा ऐक," पण त्याची आज्ञा कोणीहि ऐकत नाहीं. परंतु एकाद्या हलकट खुनी मनुष्यानें क्रूस खांद्यावर न घेतां आपलें तोसदान आणि बंदुक खांद्यावर टाकून माझ्या मागें ये, अशी आज्ञा केली, तर ती मनापासून पाळावयास सर्व तयार होतात. ही आज्ञा पाळण्यासाठीं आपल्या कुटुंबाचा त्याग ते करतात. आईबापांस दूर ढकलतात, बायकामुलांस अखेरची सोडचिठ्ठी देतात, आणि विदुषकासारखा पोषाख करून या खुनी माणसाच्या मागें ते जातात. असें करतांना त्यांची उपासमार होत असते, लांबच लांब तंगड्या तोडल्यानें त्यांची दशा केविलवाणी होते. आपला अखेरचा मुक्काम कोठें होणार आहे हेंहि बिचाऱ्यास ठाऊक नसतें. बकऱ्यांचा कळप कसाईखान्याकडे जावा, तसेच हेहि जात असतात. पण हीं बकरीं नसून माणसें असतात. पण आपणांस कोठें हांकून नेत आहेत हें त्यांस पक्कें माहीत असतें. 'कां?' असा प्रश्न त्यांना विचारला तर त्याचा जबाब कोणी देत नाहीं. त्यांची हृदयें निराश आणि शून्य झालेलीं असतात. थंडी, पाऊस, क्षुधा, रोग आणि तोफाबंदुकांच्या गोळ्या, यांच्या सपाट्यांत सांपडून मरण्यासाठीं ते जात असतात. लोक त्यांचा वध करीत असतात; पण असें कां हें मात्र कोणासच ठाऊक नसतें. तुर्क त्यांना जिवंत भाजीत असतो, त्यांना सोलून काढतो, त्यांचीं आंतडीं बाहेर काढतो

पण दुसऱ्या दिवशीं तुतारी वाजलीरे वाजली कीं उरले सुरले लोक असल्या अकाळविकाळ मृत्युमुखाकडे पुन्हां धांव घेतात. असल्या आज्ञा पाळण्यांत कांहीं अडचणी आहेत, असें कोणाच्या मनांत सुद्धां येत नाहीं. त्यांच्या स्वतःच्याच कशाला, पण त्यांच्या आईबापांच्याहि मनांत ही गोष्ट येत नाहीं, इतकेंच नव्हे तर हे हुकूम तूं पाळ, असा आग्रह ते आपल्या मुलांना करीत असतात. असल्या आज्ञा पाळण्यांत कांहीं वाईट नाहीं, एवढेंच नव्हे तर त्या पाळणें शहाणपणा आणि सुनीतीचें लक्षण आहे असें ते समजत असतात."

"अशा प्रकारें जगाच्या आज्ञा पाळण्यापासून आपण सुरक्षित व सुखी होतों असा अनुभव आपणास आला असता तर ख्रिस्ताच्या आज्ञा पाळण्यापासून दुःख होईल, ही गोष्ट आम्हीं कदाचित कबूल केली असती; पण ख्रिस्ताच्या आज्ञांहून जगाच्या आज्ञा अधिक कठीण, अधिक धोक्याच्या आणि अधिक दुःखदायी आहेत, अशीच वस्तुस्थिति आहे."

"ख्रिस्ताच्या आज्ञा पाळण्यासाठीं ज्यांनीं अपार कष्ट सोसले आणि जे शेवटीं मृत्युमुखींहि गेले, त्यांची संख्या तीन लक्ष तीन हजार झाली आहे, असें अनुमान कोणींसें काढलें आहे. पण जगाची आज्ञा पाळण्यासाठीं मृत्युमुखीं गेलेल्या लोकांची मोजदाद कोण करूं शकेल? गेल्या एका शतकांत केवळ युद्धानिमित्त तीन कोट लोक मृत्युमुखीं गेले आहेत."

"केवळ जगाची आज्ञा पाळण्यासाठींच यांनीं ही दशा भोगली. ख्रिस्ताची आज्ञा बाजूला ठेवूनही जगाची आज्ञा ऐकावयाची नाहीं, एवढी निषेधात्मक गोष्ट जरी त्यांनीं केली असती, तरी बिचाऱ्यांचे किती हाल वांचले असते!"

"अप्रतिकाराच्या तत्वांचा स्वीकार केल्यामुळें आपणास देहयज्ञ करावा लागला, तरी त्यांत वावगें तें काय झालें? आत्मयज्ञ हा ख्रिस्ताकडे जाण्याचा एकच रस्ता आहे. याकरितां ख्रिस्ताच्या शिष्यांचा पूर्ण भरंवसा आपल्या गुरूवर असेल तर या एकाच मार्गाचा उपदेश त्यांनीं करणें, हें त्यांना युक्त आहे."

"एकादा ख्रिस्तशिष्य काफर लोकांच्या वस्तींत रहात असतां त्या काफिरांनीं हातीं शस्त्र घेण्याची आज्ञा त्याला केली तर आपल्या जीविताच्या हेतुपूर्तीची उत्तम संधी आपणास प्राप्त झाली आहे, असेंच त्यानें समजलें पाहिजे. आपणास जें सत्य समजलें आहे तें सत्य त्यानें इतरांस समजावून दिलें पाहिजे; आणि असें करण्याचा उत्तम मार्ग म्हटला म्हणजे इतरांच्या पंक्तींतून बाहेर पडून त्यांचा खोटा मार्ग सोडून देणें हाच होय. परमेश्वराची आज्ञा पाळण्यावांचून घरादाराची,

जमीनजुमल्याची अथवा दुसऱ्या कसल्याहि लौकिक वस्तूची अधिक चाड आपणास नाहीं, हें लोकांच्या निदर्शनास त्यानें आणून दिलें पाहिजे. परमेश्वराची आज्ञा उल्लंघन करण्याहून अधिक भयंकर असें दुसरें कांहींच नाहीं, ही गोष्ट लोकांस त्यानें शिकविली पाहिजे."

"याकरितां ज्याला सत्यमार्गाचें ज्ञान प्राप्त झालें आहे, त्यानें त्याचा प्रत्यय इतरांच्या डोळयांसमोर स्पष्ट मांडला पाहिजे. शारीक शिक्षा, कैद, मृत्यु, अशा कोणत्याहि आपत्ति भोगण्यास त्यानें उघड्या डोळयानें तयार असलें पाहिजे. आपणास सत्य मार्ग दिसला आहे ही गोष्ट नुसत्या शब्दांनींच नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीनें त्यानें सिद्ध केली पाहिजे."

विवाहबंधनासंबंधानेंहि टॉलस्टॉय यांचें मत असेंच कडक आणि स्पष्ट आहे. मानवी समाजाचा पाया शुद्ध नसेल तर तो समाज चिरस्थाई होणार नाहीं, हें उघड आहे. आणि विवाहसंबंध हा विषय या पायाशीं अगदीं संलग्न असल्यामुळें तो अत्यंत महत्वाचा आहे. विवाहरज्जु ही अत्यंत पवित्र व अभेद्य वस्तु आहे, असें टॉलस्टॉय यांचें म्हणणें आहे. एक वेळां झालेला विवाहसंबंध कोणत्याहि कारणानें जो तोडतो, तो मोठें पातक करतो. यासंबंधीं ख्रिस्ताची जी आज्ञा आहे, तिचा अर्थ टॉलस्टॉय यांनीं आपल्या मताला अत्यंत अनुरूप असाच केला आहे. यासंबंधीं आजपर्यंत झालेले सर्व अर्थ चुकीचे आहेत असें त्यांचें म्हणणें आहे. विवाहरज्जु एकवार बांधला गेला कीं मग त्यावर शिक्का मोर्तब असलें किंवा नसलें, तरी धर्माच्या दृष्टीनें तो अभेद्यच होय. हा संबंध तोडण्यास कोणासहि अधिकार नाहीं. हा संबंध जो कोणी तोडतो, तो परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध वर्तन करतो.

आपलें हें मत कसें बनलें, याचें वर्णन टॉलस्टॉय यांनीं स्वतःच केलें आहे. ते म्हणतात, माझ्या तरुणपणीं मीं विलक्षण अत्याचारी होतों. माझ्या आयुष्याचीं दहा वर्षें निव्वळ बदफैलीपणांत गेलीं. प्रथम ज्या स्त्रीशीं माझा परिचय झाला, तिचा त्याग मीं केला आणि तेथपासूनच माझ्या चरित्रक्रमास वाईट वळण लागलें. यानंतर अशाच लोकांनीं टाकलेल्या अनेक स्त्रियांचा आयुष्यक्रम माझ्या नजरेस पडला. आणि समाजाची अवनती होण्याचें खरें कारण काय ? हेंहि त्यावेळीं माझ्या लक्षांत आलें. माझी अवनति आणि समाजाची अवनति याचें कारण माझी विषयासक्ति हें नसून विवाहासंबंधाची शिथिलता हेंच आहे, हें माझ्या लक्षांत आलें. विवहबंधनें एकवार ठरलीं कीं मरेपर्यंत तीं कायम राहणें

हा समाजाच्या चिरजीवनाचा पाया आहे. येथें धार्मिक विधि जो होतो, तेवढाच मात्र विवाह, असा माझ्या म्हणण्याचा अर्थ समजूं नये. धर्माचा अथवा कायद्याचा शिक्का नसला तरी, एकवार घडलेला संबंध विधियुक्त लग्नाप्रमाणेंच मरेपर्यंत कायम राहिला पाहिजे.

प्रत्येकानें ब्रह्मचर्य राखलें पाहिजे, असें टॉलस्टॉय याचें म्हणणें नाहीं. आपणाशीं संबंध असलेल्या स्त्रीचा त्याग कोणत्याहि कारणास्तव करणें, ही गोष्ट अस्वाभाविक, दुष्टपणाची आणि अधर्माची आहे.

तुमचें हें मत लोकांस कितपत रुचेल असा प्रश्न टॉलस्टॉय यांस मीं केला. तेव्हां ते म्हणाले, " या मताचें ग्रहण लोकांकडून होईल, असा पक्का भरंवसा मला वाटतो. आमच्या तरुणांत त्याचा फैलाव होत आहे. घटस्फोटाची चाल बंद झाली तर त्याचा प्रसार झपाट्यानें होण्यास पुष्कळ मदत होईल, हें उघड आहे. "

टॉलस्टॉय यांच्या एकंदर विचारसरणींत आणि आयुष्यक्रमांत जो विलक्षण फेरफार घडून आला, त्या साऱ्याच्या मुळाशीं हे वैवाहिक विचारच आहेत, असें आढळून येईल. ते म्हणतात, " बरें आणि वाईट या संबंधींच्या माझ्या साऱ्यां कल्पना या काळानंतर अगदीं पालटत गेल्या. आजपर्यंत जे विचार मला काव्यमय, सुंदर आणि सुधारलेले असे वाटत होते, आणि ज्यांचें वर्णन कवींनीं आणि पंडितांनीं इतकें रसभरित केलें आहे, तेच विचार मला त्याज्य आणि घाणेरडे वाटूं लागले. स्त्रीविषयक विकार ज्या जीवनक्रमानें वाढतात, तो सर्वथा त्याज्य असून ज्याच्या योगानें ते कमी होतात, तो शेतकऱ्याचा जाडाभरडा जीवनक्रम मला अधिक स्पृहणीय वाटूं लागला. श्रीमंतांच्या चैनबाजीच्या अणि आळसाच्या जीवनक्रमाचा मला पुरा वीट आला. विषयलालसा वाढविणारा हा जीवनक्रम मला प्राप्त व्हावा असें चुकून सुद्धां माझ्या मनांत आतां येणार नाहीं. नाटकें, तमाशे, नाच इत्यादि गोष्टींचा नाद पूर्वी मला होता. यांपासून कांहीं नुकसान नसून या सुसंस्कृत करमणुकी होत, असेंहि मला वाटे. पण हीं विषयाग्नी वाढविण्याचीं इंधनें आहेत असा अनुभव मला आल्यामुळें आतां त्यांजकडे पाहण्याची सुद्धां इच्छा मला होणार नाहीं. उत्तान वर्णनाच्या कादंबऱ्या वाचाव्या, नाटकांना जावें आणि अशाच दुसऱ्या गोष्टी करून कसातरी काळ घालवावा, ही गोष्ट माझ्या कल्याणास जशी हानिकारक झाली तशीच इतरांसहि ती हानिकारक होत आहे."

यावरून कौंट यांची वृत्ति निवृत्तिमार्गाकडे कशी वळली, याचा बराच बोध होतो. सांप्रत काळीं वैवाहिक बंधनांसंबंधीं आणि इतर बाबींतहि तरुण मंडळींत जो

अव्यवस्थितपणा दिसून येतो, त्या साऱ्याचें कारण अर्वाचीन शिक्षणपद्धति हें होय, असें टॉलस्टॉय यांचें मत आहे. सांप्रतच्या शिक्षणामुळें मन आणि शरीर या दोहोंसहि शैथिल्य येऊन त्यांचा काटकपणा नाहींसा होतो आणि यामुळें भलत्याच दुरिच्छा बळावतात, असें त्यांचें म्हणणें आहे. आतां अर्वाचीन विद्वानांनीं या गोष्टीला वास्तविक आळा घालावा; पण तसें नकरतां उलट त्यांचें समर्थनच ते करीत असतात.

केवळ विषयलालसेच्या मागें लागल्यामुळें युरोपांतील स्त्रियांचा नैसर्गिकपणा नाहींसा होऊन त्या जागीं कृत्रिमता आली आहे, आणि यामुळें पुरुष अधिक बिघडण्यास त्यांची मदत होत आहे, असें टॉलस्टॉय यांचें मत आहे.

एकंदर शेतकरीवर्गाबद्दल टॉलस्टॉय यांचें मत फार चांगलें आहे, ही गोष्ट खरी; तथापि हा वर्ग असावा तसा नीतिमान नाहीं, ही गोष्टहि ते प्रांजळपणें कबूल करतात. 'पावर ऑफ डार्कनेस' या नांवाच्या आपल्या नाटकांत ही गोष्ट त्यांनीं प्रामुख्यानें दाखविली आहे. वस्तुतः हें नाटक सन्मार्गदर्शक म्हणून लिहिलें असतां कित्येकांनीं तें अश्लील कसें ठरविलें, याजबद्दल त्यांना स्वतःलाच मोठें नवल वाटतें. हें नाटक शेतकरीवर्गासाठीं म्हणून त्यांनीं लिहिलें; पण चमत्कार असा कीं त्याचा एकच प्रयोग रशियांत झाला, आणि तोहि फक्त खुद्द बादशहा आणि दरबारी लोक यांजसमोर झाला. त्याप्रमाणें पारिस येथें जो प्रयोग झाला, त्याच्या प्रेक्षक वर्गांत शेतकरीवर्ग कोठेंच दिसत नव्हता. फ्रेंच कादंबरीकार झोला याच्याशीं पुष्कळ बाबतींत त्यांचा मतभेद आहे, तथापि कादंबरीकार या दृष्टीनें लोकहित अंशतः तरी करणारा तो एकच कादंबरी लेखक आहे, असेंहि टॉलस्टॉय म्हणतात. बाकीचे लेखक आळशी तरुण स्त्रियांची करमणूक करण्याकरतां कांहीं तरी निरर्थक चऱ्हाटें वळतात, असें त्यांचें मत आहे.

२

"तुझ्या जवळील सर्वस्व विकून टाक आणि तें द्रव्य गरीबांस दे अशी ख्रिस्ताची आज्ञा आहे. हल्लीं रशियांत एक जमीनदार पुष्कळशा जमीनीचा मालक असून पुष्कळसे शेतकरी त्याचीं कुळें असतात. आणखी पंचवीस तीस वर्षांत ही सारी स्थिति उलटी होऊन खाजगी मालकीची जमीन हे शब्दहि अर्थशून्य होतील, असें मला वाटतें. इंग्लंड, अमेरिका आणि रशिया, हे देश या कामीं पुढाकार घेतील. या कामाला बीजरूपानें आजच सुरुवात झाली आहे. सर्फची पद्धति माझ्या लहानपणीं होती, तेव्हां ही गुलामगिरी कशी नाहींशी करावी, हाच विचार

मुख्यतः तरुण रशियनांपुढें होता. आतां त्याऐवजीं ही जमिनीची मालकीपद्धति कशी नाहींशी करायाची हा विचार त्या जागीं आला आहे."

एके दिवशीं माझ्याशीं बोलतां बोलतां कौंट यांनीं असे उद्गार काढले होते. अशाच प्रकारचे विचार पूर्वीहि दुसऱ्या एका ठिकाणीं माझ्या कानीं येऊन गेले होते. प्रसिद्ध इंग्रज लेखक ऑबेरॉन हर्बर्ट यालाहि टॉलस्टॉय यांजप्रमाणेंच सध्यांची सरकार ही संस्था, करवसुली, जमीनवांटणी, इत्यादि गोष्टी आवडत नव्हत्या. टॉलस्टॉय यांचीं हींच मतें त्याजपाशीं त्यावेळीं मी बोलून दाखविलीं होतीं आणि टॉलस्टॉय यांनीं वरील शब्द मजपाशीं उच्चारले तेव्हां मला या गत प्रसंगाची आठवण झाल्यावांचून राहिली नाहीं. अशा रीतीनें या दोघांत कांहीं मतांसंबंधीं विलक्षण एकवाक्यता मला आढळली. तरी एका गोष्टीबद्दल या दोघांत मोठा फरक आहे. ख्रिस्ताच्या आज्ञा शब्दशः खऱ्या मानावयाच्या कीं त्यांतील फक्त तात्पर्य घ्यावयाचें, याबद्दल या दोघांत मतभेद आहे. ऑबेरॉन हर्बर्ट, थामस कार्लाइल, जॉन रस्कीन आणि जॉर्ज फाक्स या सर्वांचें मिश्रण करून त्याचा एक पुतळा बनविला म्हणजे, एक कौंट टॉलस्टॉय बनतात.

सर्व जमीन सरकारी म्हणून गणली जावी व तिची मालकी व्यक्तिशः कोणाकडेहि नसावी, असें टॉलस्टॉय यांचें मत आहे. टॉलस्टॉय यांची ही कल्पना शेतकरी मंडळीस कितपत पटते, असा प्रश्न टॉलस्टॉय यांस मीं केला, तेव्हां ते म्हणाले, "येथील आजूबाजूच्या साऱ्या शेतकऱ्यांस ही कल्पना चांगली पसंत पडली आहे आणि आतां तर तिचा प्रसार दूरवरहि होत आहे. गेल्याच आठवड्यांत कांहीं शेतकरी मंडळी या बाबतींत मला प्रश्न विचारण्यासाठीं पन्नास मैलांवरून आली होती. यांच्याशीं बरेंच संभाषण झाल्यावर ती त्यांनाहि पटली, असें मला आढळून आलें. आतां तिचा प्रसार ती शेतकरी मंडळी आणखी करील, अशी माझी खात्री आहे. हेनरी जॉर्ज यांशीं याच बाबींत लंडन येथें माझा जो वादविवाद झाला, त्याची हकीकत टॉलस्टॉय यांस मीं सांगितली. सध्यांच्या जमीनदारांकडून त्यांच्या जमिनी काढल्या तर त्यांजबद्दल त्यांना कांहींच नुकसानभरपाई देण्याचें कारण नाहीं असें जार्ज याचें मत आहे. हें टॉलस्टॉय यांस मीं सांगितलें तेव्हां ते म्हणाले, "केवळ तत्वदृष्ट्या हें मत मला मान्य आहे; तथापि व्यवहारसौकर्याकरितां त्यांची नुकसानभरपाई आरंभीं करावी असें मला वाटतें. कारण हें मत आजच सर्वमान्य होईल असें नाहीं. पुष्कळ चर्चा झाल्यानंतर आणि पुष्कळ लोकांस तें पटल्यानंतर खुद्द जमीनदारासच आपल्या या मालकी

हक्काची लाज वाटूं लागेल, आणि आपण होऊन आपल्या कुळांस ते मालक बनवितील. पण असें होईपर्यंत लोकांस शांत राखण्याकरितां नुकसानभरपाई देणें बरें."

"आतां या बाबींत आणखीहि एक विचार आहे. प्रत्येक गांवाची जमीन मध्यवर्ती सरकारच्या ताब्यांत असण्यापेक्षां ती गांवपंचाइतीच्या मालकीची करावी, हें अधिक बरें. जॉर्ज यांच्याशीं एकाच बाबींत माझा मतभेद आहे. जमिनीवर कर घेणें, जॉर्ज यांस मान्य आहे; पण हें मत मला कधींच मान्य व्हावयाचें नाहीं. कर हा शब्दच मुळीं असूं नये, हा माझा एक निश्चित सिद्धांत आहे."

त्या दिवशीं हिंडत हिंडत आम्ही बरेच लांब गेलों होतों. हवेंत उष्णता नव्हती यामुळें आम्हास चालण्याचे श्रमहि फारसे भासले नाहींत. पुढें एका जागीं शेंसवाशें मजूर आगगाडीचें कांहीं काम करीत होते. त्यांना राहण्यासाठीं आजूबाजूस लहान लहान झोंपड्या बांधल्या होत्या. या झोंपड्यांत निजण्यासाठीं प्रत्येकास एकेक फळीचा तुकडा दिला होता. वर टाकण्यास घोंगडें अथवा चटई यांपैकीं कांहीं नव्हतें; पण नुसतें गवतहि तेथें दिसलें नाहीं. टॉलस्टॉय यांनीं त्यांस गवत पाठविण्याचें कबूल केलें. ही सर्व मंडळी अगदीं मोकळ्या मनाची आणि आनंदी अशी मला दिसली. झोंपड्यांतून बाहेर पडल्यावर आमच्या भाषणाचा ओघ साहजिकपणेंच रशियांतील सामाजिक स्थितीकडे वळला. कौंट म्हणाले, "आम्ही ख्रिस्ताला विसरलों आहों. आणि त्याच्या आज्ञा आम्हीं झुगारून दिल्यामुळें आतां काय परिणाम झाला आहे, पहा. हीं येथें शेंसव्वाशें माणसें दिवसभर खपून ओली कोरडी भाकर मिळवितात. आंथरण्यास त्यांना गवत सुद्धां मिळत नाहीं. जिवापाड मेहनत करणारीं हीं माणसें नुसत्या फळीवर आंग टाकीत असतां तुम्हीं आम्हीं परांच्या गादीवर कसें निजावें, हें तुम्हीच मला सांगा. ख्रिस्ताचा धर्म तुम्ही मनापासून पाळीत असलां, तर तसें करणें तुम्हास शक्यच नव्हतें. अशा स्थितींत ख्रिस्ती हें नांव तरी तुम्हास कसें द्यावें? तुमचा एक बांधव भुकेनें मरत असतां अजीर्ण होईपर्यंत खाण्याचा हक्क तुम्हास कसा पोहोंचतो? ख्रिस्ती हें नांव तुम्हास सार्थ करावयाचें असेल तर आपली सारी संपत्ति आणि सारा जमीनजुमला गरीबांस देऊन टाकण्याचें काम तुम्हीं प्रथम केलें पाहिजे."

टॉलस्टॉय यांच्या कांहीं शिष्यांनीं या मताबरहुकूम वागण्याचें सुरू केलें होतें. यांपैकीं एक तरुण शिष्य लंडन येथें मला भेटला होता. हा गृहस्थ आतां

आपली तरुण पत्नी आणि एक मूल यांसह आपल्या एका शेतावर अगदीं शेतकऱ्याप्रमाणें रहात आहे. तथापि इतक्या त्यागानेंहि टॉलस्टॉय यांचें समाधान होतेंसें दिसत नाहीं. त्यानें आपल्या जमीनी शेतकऱ्यास देऊन टाकिल्या; पण यावर टॉलस्टॉय म्हणतात, " देऊन टाकणें या शब्दानें तुम्ही आपला मालकी हक्क सिद्ध करूं पाहतां. वास्तविक जेथें हक्क नाहीं, तेथें तो स्थापित करणें आणि वर दातृत्वाचा आळ घालणें, हें भयंकर धाष्टर्य नव्हे काय? तुम्हापाशीं येणारा पैसा वस्तुतः तुमच्या हक्काचा नव्हे. मग तो देण्यांत औदार्य कसलें आणि पुण्य कसलें? हा मोठा स्वार्थत्याग झाला असेंहि होत नाहीं. एक दाता आणि एक घेणारा, अशी भेददृष्टीहि ख्रिस्ती मनुष्याला शोभत नाहीं. जो पैसा तुमच्याकडे येतो तो वास्तविक चोरीचा माल असून केवळ यदृच्छेनें—हक्कानें म्हणून नव्हे—तुमच्या हातीं आलेला असतो. पैसा हा स्वभावतःच पापरूप आहे. मग त्याला स्पर्श करून तुम्ही आपले हात कां मळवितां? तुम्हास खरोखर ख्रिस्ती व्हावयाचें असेल तर कोणताच पैसा स्वतःचा म्हणूं नका आणि त्याला स्पर्शहि करूं नका. तुमच्या घरांतलें हें पाप नेण्याची दुर्बुद्धि एकाद्या वाटसराला झाली तर त्याला तसें खुशाल करूं द्या."

संपत्ति मिळविण्याचा मार्ग कोणताहि असला, तथापि संपत्ति ही मूलतःच बळी तो कान पिळी या तत्वावर उत्पन्न झाली असल्यामुळें तिची गणना लूट या सदरांतच करावी लागेल, असें टॉलस्टॉय यांचें म्हणणें आहे. ते म्हणतात, " वकील, वैद्य, अथवा वर्तमानपत्राचे संपादक यांनीं मिळविलेला पैसा चोर अथवा दरवडेखोर यांच्या पैशाहून अधिक प्रामाणिकपणें मिळविलेला असतो, असें तुम्हास वाटतें काय? मला तसें मुळींच वाटत नाहीं. कारण त्याची उत्पत्तिहि जुलुमापासून झालेली असते."

एके दिवशीं त्यांच्याच एका शेतांत आम्ही फिरत असतां ते म्हणाले, " हा जमीनजुमला कोणत्या रीतीनें आमच्या ताब्यांत आला? जुलमानेंच. माझा पणजा क्याथेराईन राणीच्या वेळीं एक मोठा सेनापति होता. ही जमीन त्या राणीनें मुळच्या शेतकरी मालकापासून जबरीनें हिसकावून घेतली आणि माझ्या पणज्यानें केलेल्या सेवेबद्दल ती त्याला बक्षीस दिली. ही सेवा तरी कसली, तर युद्धांत लोकांचे खून करण्याची. आमच्या या मिळकतीचें मूळ अशा प्रकारचें आहे. या पलीकडचा मिळकतीचा भाग माझ्या लेखांचा आहे. आतां येथेंहि जुलूम कसा शिरतो पहा! माझ्या कादंबऱ्या श्रीमंत लोक विकत घेतात. त्यांची

श्रीमंती त्यांना कशी मिळाली? जुलमानें. जगांतील एकंदर संपत्तीची मोजदाद केली, तर ती सर्वांच्या चरितार्थास आवश्यक असावी, त्याहून अधिक नाहीं, असें आपणास दिसून येईल. ‘ जो प्रामाणिकपणें काबाडकष्ट करतो, तो सुंदर घर बांधूं शकत नाहीं, ’ अशा अर्थाचीं एक रशियन म्हण आहे आणि ती सर्वस्वी खरी आहे. प्रामाणिकपणें काम करणाऱ्या मनुष्याला चरितार्थापलीकडे प्राप्ती होत नाहीं. याहून अधिक प्राप्ती ज्याला होते, तो चोरच समजला पाहिजे. जेव्हां एकादा मोठा बंगला, सुंदर बागबगीचा आणि चैनीच्या वस्तूंचा संग्रह तुम्ही पाहतां, तेव्हां ती गरीबांच्या लुटीचीच सृष्टि असते, हें तुम्ही पक्कें ध्यानांत ठेवा. हा दुष्परिणाम इतक्यानेंच थांबत नाहीं तर त्यापासून पुढील अवनतीहि उत्पन्न होत असते; तो चोर आणि त्याचीं मुलें अगदीं आळशी बनून जातात. पोटासाठीं कोणताहि धंदा तीं करावयाचीं नाहींत. आळशी मनुष्याला नाना-प्रकारचीं कुकर्में सुचावीं, यांत नवल नाहीं. पुढें या कुकर्मांना सत्कर्माचें रूप येतें आणि तीं करण्या इतका पैसा त्यांच्यापाशीं नसतो. त्यांच्या मनांत असंतोषाचें बीजारोपण होतें आणि अशा रीतीनें अवनतीची आणि अनर्थाची परंपरा दिवसें दिवस वाढतच जाते. तुम्हाला ख्रिस्ताच्या पावलावर पाऊल ठेवावयाचें असेल, तर या मालमिळकतीला आणि या श्रीमंतीला आधीं रामराम ठोका. आजूबाजूच्या लोकांहून आपणापाशीं अधिक कांहीं राहणार नाहीं, अशी खबरदारी घेतल्यावांचून ख्रिस्ताचें खरें अनुयायित्व तुम्हास कधींच प्राप्त व्हावयाचें नाहीं. ”

“ कोणीहि कांहीं तुमच्याकडे मागण्यास आला तर तें तावडतोब तुम्ही त्याला द्या. तुम्हापाशीं मागणाऱ्या मनुष्याच्या योग्यतेचा विचार करण्याचा अधिकार तुम्हास नाहीं. ”

टॉलस्टॉय हे या कामीं सुद्धां स्वतःच्या मताप्रमाणें वागणारे गृहस्थ आहेत. त्यांनीं केलेला दानधर्म अनाठायीं जाऊं नये म्हणून कौंटेस बाई पुष्कळ खबरदारी घेत असतात. तथापि त्यांच्या खबरदारीचा उपयोग फारसा होत नाहीं. सोंगाडे भिकारी त्यांजकडे पुष्कळ येतात. त्यांत लफंगे, दारुडे आणि अशाच प्रकारच्या लोकांचा पुष्कळ भरणा असतो. मदतीला पात्र अशीं माणसें बहुधा मागें पडतात. अशा रीतीनें संपत्तीचा विनियोग करून असल्या दुर्गुणांना उत्तेजन देण्यांत काय गुप्त तत्व आहे, हें माझ्यातरी लक्षांत येत नाहीं. टॉलस्टॉय यांनीं आपलीं तत्वें पूर्णपणें आचरणांत आणलीं, तर त्यांची इस्टेट व्होडकाबाजांच्या

हातांत पडून तिच्यांतून ॲनेक्यारेनिना अथवा इतर तत्वें निर्माण होण्याऐवजीं दारूबाजांच्या स्त्रियांच्या भांडाराची मात्र उत्पत्ति पुष्कळ होईल.

अशा प्रकारचा प्रश्न मीं उपस्थित केला, तेव्हां कौंट म्हणाले, " निश्चित सत्कृत्य आणि संशयात्मक सत्कृत्य हा सर्व कर्मांतील भेद आपण लक्षांत ठेवला पाहिजे. कोणतेंहि कार्य करतांना त्याचा परिणाम निश्चित चांगला अथवा संशयात्मक चांगला, असा प्रश्न उपस्थित झाल्यास आपण पहिल्याचेंच ग्रहण करावें हा उत्तम पक्ष होय. सृष्टिनियमानुसार माझ्या मानवबांधवांशीं जो माझा स्वाभाविक संबंध असावा, तो कायम राखण्यास जें जें कांहीं करावें लागेल, तें निश्चित सत्कृत्य होय. या दृष्टीनें पाहतां जमिनीची मशागत करून धान्य पिकविणें आणि सामान्य शेतकऱ्यांच्या पद्धतीनें स्वतः वागून व कुटुंबियांस वागवून सर्वांचा बंधुभाव कायम जागृत ठेवणें, हें निश्चित सत्कृत्य झालें हें उघड आहे. मानवी जीविताच्या अंतिम हेतूच्या साफल्याचा हाच मार्ग ख्रिस्तानेंहि दाखविला आहे. याकरितां, हा निश्चित सद्धर्म आहे, हें कबूल केलेंच पाहिजे. उलट पक्षीं माझ्या कादंबरीलेखनापासून कांहीं चांगलें निपजेल कीं नाहीं ही गोष्ट संशयात्मक आहे. कदाचित् पुष्कळसा मूर्खपणाहि त्यांत भरला असण्याचा संभव आहे. त्यांत थोडा अंश चांगलासा असेल, तर पुष्कळ गोष्टी वाईटहि असूं शकतील. त्यांत वाईट किती आणि चांगलें किती हा निवाडा कोणीं करावा? ॲनाक्यारेनिनाच्या वाचनापासून पुष्कळांच्या मनावर चांगला परिणाम झाला, असें तुम्ही म्हणतां; पण त्याहून अधिक हजारों लोकांच्या मनावर वाईट परिणाम झालाच नाहीं असें तुम्ही निश्चयानें म्हणूं शकाल काय? याचें कांहींच उत्तर आपणास देतां येणार नाहीं. मग अशा स्थितींत निश्चयात्मक चांगलें तें मीं करावें कीं संशयात्मक चांगलें तें करावें, याचें उत्तर तुम्हीच द्या. लंडन शहरांत ऐंशी हजार वेश्या आहेत. यांना त्यांच्या पापपंकांतून सोडविण्याची सत्ता उद्यां माझ्या हातीं आली, पण त्याच वेळीं शेतकऱ्याप्रमाणें राहण्याची माझी सवलतहि काढून घेण्यांत आली, अशी कल्पना केली, तर पहिल्या सत्कृत्याचें पुण्य पदरीं पाडून घेण्यास मी कबूल होणार नाहीं. कारण दुसरें कृत्य निश्चित सत्कृत्य आहे आणि पहिलें संशयात्मक आहे."

एके दिवशीं टॉलस्टॉय मला म्हणाले, " माझ्या मनांतून एक कादंबरी लिहावयाची आहे. स्वर्गीय प्रेम स्वप्नवत् कसें आहे, याची फोड या कादंबरींत मला करावयाची आहे. हल्लींच्या लग्नांत स्वर्गीय प्रेम हा शब्द फार बोकाळला आहे,

आणि ही एक टूमच होऊन बसली आहे. या विषयावर एक लेख मीं लिहिला आहे; पण त्याचें स्वरूप एका तत्वविषयक निबंधासारखें शुष्क आहे. वाचकांची चित्तवृत्ति ओढावी आणि त्यांत ग्रथित केलेलीं तत्वें वाचतां वाचतां त्यांच्या मनांत उतरत जावीं, अशी या लेखाची रचना नाहीं. स्वर्गीय प्रेमाच्या नादीं लागून एक गृहस्थ कसा बुद्धिभ्रष्ट झाला, आणि अखेरीस आपल्या पत्नीचा खून त्यानें कशा-रीतीनें केला, हें या कथानकांत मला दाखवावयाचें आहे. वाचकांची चित्त-वृत्ति अगदीं बावरून जावी, असें कथानक मला रचावयाचें आहे. ज्याला स्व-र्गीय प्रेम असें हल्लीं म्हणतात, त्याचें जन्मस्थान तुम्हाला ठाऊक आहे काय ? तें अत्यंत विषयलोलुपता हें होय. ख्रिस्ताचें अखिल मानवजातीवरील प्रेम आणि हें प्रेम यांत कोणत्याहि प्रकारचें साम्य नाहीं. हें प्रेम शुद्ध स्वार्थी आणि मनु-ष्यांतील पशुवृत्तीचें द्योतक आहे. या प्रेमावर उभारलेल्या विवाहाचा शेवट अखे-रीस खुनांत व्हावयाचा यांत कांहीं नवल नाहीं. हें प्रेम म्हणजे खरोखर मनाचा एक रोग होय. असल्या विवाहानें हा रोग बळावत जातो, आणि अखेरीस तो दोन्ही पक्षांस मारक होतो. या प्रेमांत आध्यात्मिक भावना नाहीं, या प्रेमांत दोन जीवात्मे खऱ्या स्नेहरज्जूनें बद्ध झालेले नसतात आणि जीवात्मे स्नेहबद्ध असल्या-शिवाय विवाहबंधन कधींहि सुखाचें होऊं शकणार नाहीं. हल्लींच्या या पाशवी विवाहापेक्षां विवाहाचा दुसरा कोणताहि प्रकार मला अधिक पसंत आहे. चिठ्या टाकून लग्नें ठरविणें यापेक्षां अधिक शहाणपणाचें आहे. आमच्या विवाहपद्धती-इतकी दुष्ट दुसरी एकहि पद्धति या जगांत नाहीं. आणि आमचे लग्नविधि आणि सोहळे यांमुळें आमच्या पशुवृत्तीला अधिक भरती मात्र येते. यामुळें विवाह बंधनाचें पावित्र्य पूर्णपणें नष्ट होण्यास लग्नाच्या दिवशींच आरंभ होतो. अशा प्रकारच्या झालेल्या शंभर लग्नांत एकहि लग्न सुखाचें आणि चिरस्थायी स्नेहाचें होत नाहीं. परस्परांस अगदीं विरुद्ध अशीं दोन तरुण स्त्रीपुरुषें आपापल्या कर्म-चक्रांत परिभ्रमण करीत असतात. विषयसुखाच्या या भोंवऱ्यांत सांपडून तीं परस्परांसन्निद्ध येतात, त्या भोंवऱ्यांत सांपडतात, आणि अखेरीस त्याच्या तळाशीं जातात. विषयसुखाची लालसा इतकाच अल्प स्नेहरज्जू जेथें असतो, तेथला स्नेह महिना दोन महिने किंवा कमाल पक्ष वर्ष दोन वर्षेंच टिकावा, यांत नवल काय ! या वर्षाभराच्या कालानंतर हे दोन प्राणी परस्परांचे द्वेष्टे बनतात, आणि मग जन्मभर तो द्वेष कायम राहतो. आणि मग हा खरा प्रकार लपविण्या-करतां अनेक प्रकारची धडपड त्यांस करावी लागते. हा प्रकार शेजारापाजाऱ्यांस

कळला, तर आपली अब्रू चव्हाट्यावर जाईल एवढयाच भीतीनें आपलें दृश्य बंधन तीं कायम ठेवतात. असें व्हावें हें अगदीं रास्त आहे. काजऱ्याचें बीं पेरून त्याला अंब्याचें फळ यावें अशी अपेक्षा करणें, हा आपलाच वेडेपणा नव्हे काय? तुमचें सध्यांचें स्वर्गीय प्रेम हें अफूसारखें किंवा गांजासारखें मादक आहे. अफूचा अथवा गांजाचा अम्मल आरंभीं विलक्षण मौजेचा असतो; पण थोड्या काळानें ती धुंदी उतरूं लागते आणि मग विलक्षण मरगळ येते. मनुष्याचा स्वभाव असा विलक्षण आहे कीं, या मरगळीची आठवण तो विसरतो, आणि पहिला आनंद मात्र त्याच्या लक्षांत राहतो. यामुळें ही उलट बाजू न पाहतां त्या आनंदाच्या मागें तो पुन्हां धांवत असतो. स्वर्गीय प्रेमानें वद्ध झालेलीं स्त्रीपुरुषें आरंभीं महिना दोन महिने सुखातिशयांत पोहत असतात. पुढें त्यांच्या चित्ताला मरगळ येते. मग परस्परांचा सहवास असुखाचा होऊं लागतो; पण पहिल्या आनंदाची आठवण ताजी असल्यामुळें तो कोठें प्राप्त करून घेतां येईल, या विचारानें तीं दोघेंहि बेहोष होऊन परद्वार करूं लागतात अशा रीतीनें गांवच्या गांव, देशचे देश आणि अखेरीस सारें जग म्हणजे एक प्रचंड कुंटणखानाच वनत आहे. ही वस्तुस्थिति माझ्या बांधवांपुढें उभी करून दाखवून त्यांचे डोळे उघडावे असा प्रयत्न मी करणार आहें. माझ्या डोळयांपुढें हें भेसूर चित्र किती स्पष्टपणें उभें आहे, हें तुम्हास कोणत्या शब्दानें सांगूं? आणि हा भयंकर समंध माझ्या आजूबाजूच्या लोकांच्या दृष्टीस पडत नाहीं, हेंहि मला समजतें आणि यामुळें तर माझ्यावरील जबाबदारी अधिकच वाढते. या साऱ्या अनर्थांनें मूळ कारण एकच, आणि तें हेंच कीं सांप्रतचा ख्रिस्ती धर्म केवळ नांवापुरता उरला असून प्रत्यक्ष कृतींत तो अगदीं नामशेष झाला आहे; पण ही वस्तुस्थिति लवकरच पालटेल, असाहि भरंवसा मला वाटतो.

मीं म्हटलें, 'एवढा भरंवसा मात्र आनंददायक आहे, हें खरें.'

कौंट म्हणाले, "होय. असा भरंवसा मला नसता, तर याच क्षणीं मी गळफांस लावून घेतला असता. परमेश्वराचें राज्य या भूतलावर आणण्यासाठीं डोक्यानें पर्वत फोडावे लागले, तर तेंहि मी करीन. आतां एवढी मोठी क्रांति क्षणार्धांत साधण्याजोगी यक्षिणीची कांडी कोणीं मला दिली, तर ती मात्र मी घेणार नाहीं कारण तसें झालें तर मग माझ्या जोगें कांहींच काम उरणार नाहीं."

[ ४ ]

ख्रिस्ताच्या आज्ञांचा अर्थ शब्दशः करावयाचा कीं त्यांतील तात्पर्य घेऊन परिस्थितीप्रमाणें त्यांत बदल करावयाचा हा मोठा वादाचा प्रश्न आहे. ख्रिस्ताच्या

आज्ञा बुद्धिवादाला पूर्णपणें ग्राह्य असल्यामुळें त्यांचा अधिकार सर्व काळीं आणि सर्वत्र सारखाच मान्य केला पाहिजे असें टॉलस्टॉय यांचें मत आहे. एकाद्या थकल्या भागलेल्या आणि तान्हेल्या प्रवाशाला पाण्याचा झरा ज्या प्रमाणें अत्यंत प्रियकर वाटतो त्याचप्रमाणें संसारचक्रांत परिभ्रमण करून थकलेल्या जीवाला ख्रिस्ताच्या आज्ञा आहेत, असा टॉलस्टॉय यांचा स्वानुभव आहे. आर्त चित्ताला त्यांजपासून समाधान प्राप्त होतें, त्या अर्थी त्याजवर अधिक वादविवाद करणें, इष्ट नाहीं, आणि आवश्यकहि नाहीं, असें टॉलस्टॉय म्हणतात. मानवी स्वभावाच्या उणीवा लक्षांत घेऊन व त्यांच्या अडचणी दूर करून त्याला सन्मार्गाला लावण्याचें कार्य या आज्ञा करतात. मग त्यांच्या खऱ्याखोटेपणाचा वाद कशाला? या आज्ञांचा अर्थ शब्दशः घेऊन त्याप्रमाणें जो कोणी वागेल, त्याला मानवी जीविताच्या कोड्याचा पूर्ण उलगडा होईल, असें त्यांचें म्हणणें आहे. अनेक प्रकारच्या अडचणींच्या आणि काट्याकुट्यांनीं भरलेल्या मार्गांतून जातां जातां हा सत्य मार्ग अखेरीस आपणास कसा सांपडला, याची हकीकत त्यांनीं स्वतःच सांगितली आहे. ते म्हणतातः—

" या संसाररूपी अरण्यांत भटकून भटकून थकल्यानंतर हा मार्ग मला सांपडला. मी अगदीं निराश होण्याचा बेतांत आलों होतों. मानवी जीवनाचा अंतिम हेतु काय आणि मृत्यूचें स्वरूप काय या प्रश्नांनीं मला अगदीं भंडावून सोडलेलें होतें. यांच्या चक्रव्यूहांतून बाहेर पडण्याचा मार्ग मला दिसेना. यामुळें या प्रश्नाचें स्वरूप, असावें त्याहूनहि अधिक भेसूर मला दिसूं लागलें. अशा स्थितींत असतां ख्रिस्ताच्या वचनानीं सन्मार्ग मला दाखविला आणि त्या दिशेनें चालूं लागल्यानंतर सध्यांच्या सुखाच्या आणि शांतीच्या मुक्कामाला मी येऊन पोहोंचलों आहें. "

" तथापि येथें आणखीहि एक मुद्दा लक्षांत ठेवला पाहिजे. ख्रिस्तानें दाखविलेला मार्ग म्हणून जो रस्ता सांप्रतचा ख्रिस्तीपंथ दाखवित आहे, तो मात्र हा नव्हे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. सध्यांच्या पंथांसंबंधीं असें लिहिणें कोणाला मोठें भयंकर वाटेल आणि मलाहि तें भयंकरच वाटतें. पण खरा मार्ग दाखविण्यासाठीं म्हणून निघालेल्या या पंथांनीं तसें करण्या ऐवजीं आपल्या अनुयायांना भलत्याच मार्गाला लावून अधोगतीस नेलें, असें म्हणणें भाग आहे. हे वाटाडे उत्पन्न झाले नसते, आणि त्यांनीं ख्रिस्तांच्या अनुयायांची अशी चूकभूल केली

नसती, तर खिस्ताचे अनुयायी त्याच्या अधिक जवळ खरोखर असते. बरें काय आणि वाईट काय याबद्दल ज्या घोंटाळ्यांत आज ते पडले आहेत, त्यांत ते पडले नसते आणि ते सत्याच्या अधिक जवळ असते. सांप्रत त्यांची बुद्धि तामस बनली आहे, ती अधिक सत्वगुणी झाली असती. खुद्द खिस्ताच्या शिष्यांपासून तों थेट सांप्रतच्या रेम्याडोक्या उपाध्यायापर्यंत सर्वांच्याच माथीं या पातकाचा अंश मी मारतों."

"बायबलाचा मोठा भाष्यकार पॉल यानें या चुकीला आरंभ केला. खिस्ताच्या शब्दावर जो अर्थ त्यानें बसविला तो खिस्ताच्या खऱ्या आशयास सोडून होता. अखेरीस खिस्ती धर्म एवढें नांव शिल्लक राहून अंतर्यामींचा रानटीपणा तसाच कायम राहिला. केवळ बाह्य पोषाखाला मात्र खिस्ती धर्म हें सोज्वल नांव मिळालें. खिस्तानें ज्या आज्ञा दिल्या त्यांचा आशय मनुष्यप्राण्यांनीं सुखांत रहावें असा होता. ज्याप्रमाणें त्याच्या कांहीं आज्ञा विध्यर्थी आहेत त्याचप्रमाणें कांहीं निषेधार्थीहि आहेत; तथापि दोघांचा आशय एकच. मनुष्यानें सुखी रहावें हाच तो आशय. आतां मनुष्यप्राणी सुखी राहण्यास कोणत्या परिस्थितीची आवश्यकता आहे, याचाहि विचार केला पाहिजे."

"सृष्टीपासून मनुष्यप्राणी जितका लांब तितका त्याच्या दुःखाला अवसर अधिक; आणि सृष्टिमातेला तो जितका जवळ, तितका त्याच्या सुखाचा संभव अधिक, हें उघड आहे. याकरितां अशा प्रकारची परिस्थिति निर्माण करणें ही सुखाची परिस्थिति उत्पन्न करण्याच्या कार्यांतली पहिली गोष्ट आहे."

"सांप्रतच्या संसारी मनुष्याकडे पाहिलें असतां आपणांस काय आढळून येतें बरें? जगाच्या व्यवहारांत मनुष्याच्या यशाचें प्रमाण जों जों वाढत जातें, तों तों खऱ्या सुखापासून तो अधिक लांब जाऊं लागतो. संसार सुखमय भासविणाऱ्या चिजांचा संग्रह जों जों अधिक मोठा, तों तों सृष्ट पदार्थांचा परिचय जास्त कमी होऊं लागतो. चंद्र, सूर्य आणि तारे यांचेंहि दर्शन त्याला दुर्मिळ होतें. शेतें आणि अरण्यें त्याच्या नजरेस पडत नाहींत आणि अरण्यांतील पशूंची ओळखहि तो विसरून जातो.

"शारीरिक श्रम हा या बाबींतील दुसरा महत्वाचा मुद्दा होय. स्वतःस आवडणारे अशा प्रकारचे श्रम केले तर त्यामुळें पचनक्रिया चांगली होऊन स्नायूहि सुदृढ होतात. शारीरिक श्रम झाले तर झोंपहि सुखाची येते."

"तिसरी बाब कौटुंबिक स्थिति ही होय. कौटुंबिक बंधनें सुदृढ असतील

तरच सुखाची प्राप्ति होईल. याहि बाबींतील एक अनुभव लक्षात ठेवण्यासारखा आहे, तोहा कीं, जों जों सांपत्तिक स्थिति अधिक उच्च तों तों कौटुंबिक बंधनें अधिक ढिलीं होऊन सुखाला उणेपणा आणीत असतात."

"सामान्य मानवजातीशीं असलेला संबंध अधिक मोकळेपणाचा असणें, हें सुखाचें चवथें कारण होय. हा संबंध नुसता बोलण्यापुरता नसून सहानुकंपादि गुणांचा जिवंतपणा पाहिजे. या सुखमय जीविताचें पर्यवसान स्वाभाविक आणि दुःखरहित मृत्यूंत होणें हें सुखाचें पांचवें कारण आहे. मनुष्याचा समाजांतील दर्जा जों जों अधिक तों तों या कारणपंचकाची उणीव अधिक असा अनुभव आपणांस येतो. सामान्य शेतकऱ्याच्या परिस्थितींतील माणसें जशीं सुदृढ असतात, तशीं उच्च वर्गांतील नसतात असें आपणांस आढळून येतें."

टॉलस्टॉय यांचे लेख इतर देशीं ज्या प्रमाणानें यावयास पाहिजे होते, त्या प्रमाणानें ते आले नाहींत, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. ख्रिस्ताच्या आज्ञांचा शब्दशः अर्थ करूनहि बुद्धिवादाशीं त्यांचा पूर्ण मेळ घालणें, असलें बिकट काम यापूर्वी कोणींहि केलेलें नाहीं. ख्रिस्ताच्या आज्ञांवर ज्या टीका आजपर्यंत झाल्या आहेत, त्या सर्वांचा निषेध करून ही आपली नवी टीका त्यांनीं पुढें आणली आहे. सांप्रतच्या साऱ्या धर्मपंथांविरुद्ध टॉलस्टॉय यांचा कटाक्ष अत्यंत तीव्र आहे. ख्रिस्ताच्या आज्ञांचा विपरीत अर्थ करणारे हे सारे पंथ लयास जातील तो सुदिन असें त्यांचें म्हणणें आहे. ते म्हणतात:

"जगांत हल्लीं अनेक पंथ अस्तित्वांत आले आहेत. सोसियालिझम, कॉम्युनिझम, सर्वांस सारखे हक्क असावेत असें म्हणणारे पंथ, अथवा अर्वाचीन शास्त्रकलांची महती वाढविणारे पंथ हे सारे नष्ट व्हावे, अशासाठीं या धर्मपंथांनीं अनेक शतकें धडपड केली आहे; तथापि या अनेक वादांच्या आगमनानेंच जगाचें पाऊल पुढें पडलें आहे व पडत आहे, हा अनुभव आपणांस येतोच. ख्रिस्ताच्या आज्ञा अंशतः तरी आजपर्यंत जिवंत राहिल्या याचें श्रेय या धर्मपंथांस नसून अर्वाचीन सामाजिक पंथांसच तें दिलें पाहिजे. ख्रिस्ताचा उपदेश नामशेष करावा यासाठीं धर्मपंथांनीं पुष्कळ धडपड केली; पण तिला न जुमानतां तो जिवंत राखण्याचें कार्य अर्वाचीन सामाजिक पंथांनीं अंशतः केलें आहे. धर्मपंथांच्या या कृतीमुळेंच धर्म आणि समाज यांची पूर्ण फारकत झाली असून या पंथांचा जिवंतपणा आतां नांवाचा मात्र उरला आहे."

" परमेश्वरानें जी बुद्धि तुम्हास दिली आहे तिच्या प्रकाशानेंच तुम्ही चाललें पाहिजे, असें टॉलस्टॉय यांचें म्हणणें आहे. ख्रिस्त हा स्वतः पक्का बुद्धिवादी असून बुद्धीच्या प्रकाशाला सोडून चाला, असा उपदेश त्यानें कधींहि केलेला नाहीं असें त्यांचें मत आहे.

टॉलस्टॉय यांची ही टीका सर्वांनाच मान्य होईल असें नाहीं; तथापि तिची दिशा अगदीं नवीन आहे आणि तिच्यांतील मथितार्थ सांप्रतच्या काळाला अत्यंत अनुकूल आहे, यांत शंका नाहीं. ख्रिस्ताचें अंतयाम जसें खरोखर होतें, तसें तें अर्वाचीन वाचकांपुढें उभें करण्याचें कार्य या टीकेनें होतें, याबद्दल संशय नाहीं. मग तिच्यांत कांहीं उणीवा असल्या अथवा कांहीं शब्दांचे अर्थ चुकीचे असले, तरी त्याबद्दल मोठासा विषाद मानण्याचें कारण आपणांस नाहीं."

प्रख्यात इंग्रज ग्रंथकार मॅथ्यु अरनोल्ड मृत्यु पावल्याचें ऐकून टॉलस्टॉय यांस फारच वाईट वाटलें व माझ्याशीं बोलतांना दोन तीन प्रसंगीं तें त्यांनीं व्यक्तहि केलें. मॅथ्यु अरनोल्ड आणि टॉलस्टॉय यांची खाजगी मैत्री होती असें नाहीं, किंबहुना त्यांची परस्पर ओळखहि नव्हती. तथापि अरनोल्डबद्दलच्या उल्लेखांत माझा मित्र असे शब्द त्यांनीं दोनतीनदां वापरले. याचा वास्तविक अर्थ इतकाच कीं ख्रिस्तानें सांगितलेल्या वचनासंबंधीं पुष्कळ अंशीं दोघांची एकवाक्यता आहे. या बाबींत ज्याशीं टॉलस्टॉय यांचें मतैक्य होतें त्या सर्वांसच ते आपले मित्र म्हणतात; आणि अरनोल्डच्या मृत्यूबद्दल त्यांना इतकें दुःख झालें, याचेंहि कारण हेंच.

परमेश्वराचें व्यक्तिविशिष्ट रूप अरनोल्ड यांस मान्य नाहीं. सर्वव्यापी आणि सर्वांचें नियमन करणारा इतकीच परमेश्वराची व्याख्या अरनोल्ड यानें केली आहे. ख्रिस्ताची व्याख्या याहून भिन्न स्वरूपाची दिसते. त्याचा परमेश्वर व्यक्तिविशिष्ट असून तो आपल्या प्रार्थनेस हांक देतो, असा ख्रिस्ताचा समज त्याच्या चरित्रावरून उघड दिसतो; आणि कौंट टॉलस्टॉय हे स्वतः पक्के ख्रिस्तानुयायी म्हणवीत असतांहि अरनोल्डची व्याख्या मान्य करतात, ही खरोखर मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. प्रार्थनेच्या योगानें अथवा दुसऱ्या कोणत्याहि उपायानें परमेश्वराशीं एकचित्त होतां येईल कीं नाहीं, याचीच त्यांस शंका असावी, असें दिसतें. त्यांची परमेश्वरविषयक कल्पना पाहिली तर त्याचें स्वरूप सृष्टिविषयक नियमाहून भिन्न दिसत नाहीं. म्हणजे हें स्वरूप गुरुत्वाकर्षणासारख्या एकाद्या सृष्टिनियमाच्याच स्वरूपाचें आहे, इतकेंच ते म्हणतात. आणि अशा स्थितींतहि ' मी प्रार्थना करतों,' असेहि शब्द ते वारंवार उच्चारतात. एके वेळीं तर ते मला स्पष्ट

म्हणाले, 'परमेश्वराचें राज्य पृथ्वीवर व्हावें यासाठीं मी नित्य प्रार्थना करतों.' याजसंबंधीं अनेक प्रकारें मीं त्यांस प्रश्न केले. अखेरीस ते थोडक्यांत इतकेंच म्हणाले, "गणिताचें एखादें उदाहरण सोडविण्यास मदत करा, अशी प्रार्थना माझ्या मुलानें मजजवळ केली, तर त्याला प्रत्यक्ष मदत न करतां त्याच्या बुद्धीलाच जागृत करण्याचा यत्न मी करीन. मनुष्याच्या प्रार्थनेला ओ देण्याची परमेश्वराची रीत अशीच आहे."

परमेश्वरानें मनुष्याला जें ज्ञान प्रत्यक्ष सांगितलें तेंच बायबलांत असल्यामुळें तो ग्रंथ प्रत्यक्ष ईश्वरप्रणीत आहे, असें म्हणण्यांत येतें. तेव्हां या बाबींत टॉलस्टॉय यांचें म्हणणें काय असावें, याचा खुलासा वरील मजकुरावरून होण्यासारखा आहे. ख्रिस्ताचीं वचनें टॉलस्टॉय यांस सर्वांशीं मान्य आहेत हें खरें; तथापि तेवढयावरून ईश्वरविषयक ज्ञान फक्त बायबलांतच आहे, हें म्हणणें मात्र त्यांना मान्य नाहीं. परमेश्वर बुद्धींत प्रकाशतो आणि तिच्या द्वारें आपली इच्छा प्रकट करतो, हें अर्नोल्डचें मत त्यांस मान्य आहे. याकरतां कोणत्याहि स्थळीं आणि कोणत्याहि काळीं कोणाच्याहि बुद्धीच्या द्वारें तो प्रकाशत नाहीं, असें कां म्हणावें? असा त्यांचा प्रश्न आहे. अशा प्रकारें ज्या अनेक उच्च विचारांचा लाभ आपणास झाला आहे, त्यांत उच्चतम विचार ख्रिस्ताचे आहेत, आणि परमेश्वराची इच्छा काय आहे, हें तुम्हांस जाणावयाचें असेल, तर ख्रिस्ताच्या वचनावरून हा बोध तुम्हांस होईल, असें ते म्हणतात. येशुख्रिस्त प्रत्येकाचा मार्गदर्शक असतो हें कित्येकांचें मत टॉलस्टॉय यांस मुळींच मान्य नाहीं. ते म्हणतात, "येशु ख्रिस्ताच्या स्पष्ट आज्ञा कोणीहि पूर्णपणें पाळीत नाहीं. याकरतां तो तुमचा वाटाड्या होऊं शकेल, ही गोष्ट शक्यच नाहीं."

मॅथ्यु अर्नोल्डवरून बोलतां बोलतां मध्यंतरीं अनेक विषय निघून अखेरीस आम्ही मुक्तिफौजेच्या कार्यापर्यंत येऊन थडकलों. या मंडळीच्या कार्याकडे टॉलस्टॉय यांचें बरेंच लक्ष असल्याचें मला दिसून आलें. मुक्तिफौजेचें एक वर्तमानपत्र यासनाया येथें नियमानें येत असे. यापैकीं एक अंक टॉलस्टॉय यांनीं अथपासून इतीपर्यंत वाचून पाहिला. आणि या विषयाची चर्चा करतांना ते म्हणाले, 'या मंडळीचें मुख्य उद्दिष्ट कार्य काय, हें जाणण्यासाठीं हा अंक अत्यंत काळजीपूर्वक मीं वाचला; पण त्यांत विशेष अशी कोणतीच गोष्ट मला आढळून आली नाहीं. प्रायश्चित्तासंबंधीं त्यांत केलेली चर्चा, मनुष्याचा पापी स्वभाव, आणि पश्चात्ताप न पावलेल्या माणसांस अखेर होणारी शिक्षा, असल्या भाकड

कथांशिवाय महत्वाचा विषय, त्यांत कोणताच नव्हता. याखेरीज स्वतःच्या नुसत्या उदरपोषणासाठीं कां होईना, हे लोक लोकांकडे भिक्षा मागतात, ही गोष्टहि मला नापसंत आहे. यापेक्षां स्वभावतः प्राप्त झालेलीं कर्में नम्रपणें करून जगांत सद्भावनांचा प्रसार त्यांनीं केला असता तर तें अधिक बरें झालें असतें. आपल्या भाकरीसाठीं लोकांस नाडावें, ही गोष्ट मला अगदीं नापसंत आहे. आतां एक गोष्ट मात्र स्तुति करण्यासारखी आहे, हें मीं आनंदानें कबूल करतों. या मंडळीचा स्वार्थत्याग मोठा आणि उत्साहहि फार दांडगा आहे. त्याचप्रमाणें कोणत्याहि राजकीय विषयांत ही मंडळी लुडबुडत नाहीं, अथवा दुसऱ्या ऐहिक विचारांसहि आपल्या चित्तांत ती थारा देत नाहीं, हें खरोखरच फार चांगलें. आणि यामुळेंच तिच्याबद्दल माझ्या चित्तांत प्रेम उत्पन्न होतें; तथापि तिच्या कार्यांत मुख्यतः पारलौकिक गोष्टींचाच भरणा असतो, हेंहि मला बरें वाटत नाहीं. असें करण्याऐवजीं हेंच जग सुधारून परमेश्वराचें राज्य याच जगांत आणि याच काळीं आणण्याचा यत्न तिनें कां करूं नये? असें करण्यांत दृश्य फळप्राप्ति कदाचित थोडी होईल; पण ती अल्प प्राप्तीहि नुसत्या भावी आशेपेक्षां अधिक महत्वाची नाहीं काय?

ख्रिस्तीधर्मांतील अनेक पंथांपैकीं क्वेकरपंथासंबंधीं टॉलस्टॉय यांच्या मनांत थोडीबहुत आदरबुद्धि आहे, आणि या पंथाचीं पुष्कळ मतें टॉलस्टॉय यांच्या मताशीं जुळतीं असल्यामुळें तसें होणें रास्तहि आहे. आतां क्वेकरपंथास खाजगी मालमिळकतीवरील हक्क मान्य आहे, इतकाच महत्वाचा फरक टॉलस्टॉय यांच्या आणि या मतांत आहे. अनेक पंथांत जे वादग्रस्त प्रश्न आहेत, आणि ज्यांवर मोठालीं रणें माजतात, त्यांची चर्चा टॉलस्टॉय बहुतकरून करीत नाहींत. आपणांतील वादग्रस्त मुद्यांकडे लक्ष देण्यापेक्षां सर्वांस संमत असलेले मुद्दे कोणते, हें शोधून काढणें सर्वांच्याच हिताचें आहे, असें त्यांचें मत आहे. असें त्यांचें मत असल्यामुळेंच माझ्या एका लहानशा पुस्तकांतील प्रस्तावनेंत प्रकट झालेलें माझें मत त्यास पसंत पडलें; 'सध्यांचा ख्रिस्तीधर्म सुधारावयाचा असेल, तर त्यांत शुद्ध नास्तिकांचाहि समावेश झाला पाहिजे. कारण स्वतःस नास्तिक समजणारे पुष्कळ लोकहि ख्रिस्ताचे खरे अनुयायी असतात' असें मत त्यांत मीं प्रकट केलें होतें.

कोणाहि लेखकाचीं व आपलीं मतें कितपत जुळतीं आहेत, हें पाहण्याकडे टॉलस्टॉय यांचा विशेष कल असतो. आपणाशीं न जुळणाऱ्या मतांवर वादवि-

वाद माजवीत न बसतां जुळत्या मतांचाच विचार करून आपली विचारसरणी पक्की करणें, अधिक बरें, असें त्यांचें म्हणणें आहे. यामुळें बायबलांतील कांहीं मतांवर जे कडाक्याचे वादविवाद होतात, त्यांत पडण्याची त्यांची इच्छा नाहीं. ते म्हणतात, " परमेश्वराकडे पोहोंचण्याचे मार्ग अनेक असले म्हणून काय झालें ? अतींद्रिय मार्गानें जाण्यासाठीं मी धडपडत असतों आणि दुसरा एखादा शेतकऱ्याच्या अडाणी मार्गानें त्याजकडे धांव घेत असतो. एखादा साध्या भोळ्या भक्तीच्या मार्गानें जात असतो. ज्याची मनोवृत्ति मुलासारखी साधी असेल, त्याला तो मार्ग उपयोगीं पडेल. आणि माझी बुद्धि जागृत झाली असल्यामुळें तोच मार्ग अत्यत अडचणीचा होऊन बसेल. हे सारे मार्ग चाकांच्या आऱ्यांसारखे आहेत. चाकाच्या धावेंतील निरनिराळया बिंदूंवरून ते निघत असले, तरी अखेरीस मधल्या आंसांत ते सर्व एकत्र होतात. मग केवळ आरंभींच असलेल्या फरकासंबंधीं इतके वादविवाद कां करावेत ? "

पाप म्हणजे काय? आणि पापाचें स्वरूप काय ? यासंबधीं टॉलस्टॉय यांची व्याख्या पूर्वींच्या व्याख्येहून बरीच निराळी आहे. जाणूनबुजून परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध वागणें, हें त्यांच्या मतें पाप होय. यामुळेंच जुलूम हेंहि अर्थातच पाप आहे. त्याचप्रमाणें शारीरिक जुलमापासून प्राप्त झालेल्या फळांत भागीदार होणें, हेंहि पाप होय. चोर आणि चोरीचा माल घेणारा हे त्यांच्या मतानें सारखेच पापी होत. सांप्रतच्या काळीं मालमत्तेची वांटणी केवळ मनगटाच्या जोरावर होत असल्यामुळें आपला सारा जन्म पापमय स्थितींत जातो. आपल्या आजुबाजूला पापविरहित असें एकहि स्थळ नाहीं. ख्रिस्ताची आज्ञा पाळून या पापमय प्रदेशांतून बाहेर पडण्यासाठीं आपण नित्य धडपड केली पाहिजे. तथापि पापाचें अस्तित्व सत्यत्वानें नसून त्याचें स्वरूप निषेधात्मक आहे, असें ते म्हणतात. आद्यपिता आदाम, यानें केलेलें पाप व त्यामुळें सध्या मनुष्यजातीची झालेली आध्यात्मिक अवनति, या मताचा स्वीकार टॉलस्टॉय मुळींच करीत नाहींत. तथापि मनुष्याच्या बुद्धींत असे एक चमत्कारिक तत्व आहे कीं त्यामुळें तिची प्रवृत्ति चांगल्यापेक्षां वाईटाकडे लवकर होते, असेंहि ते म्हणतात. सत्य किंवा असत्य यांपैकीं कोणतातरी मार्ग स्वीकारण्याचा प्रसंग मनुष्याला आला म्हणजे सत्यापेक्षां असत्य मार्गच तो अधिक लवकर पसंत करतो आणि यामुळेंच त्याचे पाय पापमय संसारांत अधिक गुरफटतात. मनुष्यानें केलेल्या पापाबद्दल अनेक प्रकारचे दंड परमेश्वर त्याला करतो, हें मतहि टॉल-

स्टॉय यांस पसंत नाहीं. ते म्हणतात, "परमेश्वर आणि शिक्षा या वस्तू स्वभावतःच विरोधी आहेत. त्यांचा वास एकत्र असणें त्रिकालांतहि शक्य नाहीं. परमेश्वर म्हणजे अनिर्वचनीय प्रेमस्वरूप होय. मग या स्वरूपांत पापाच्या दंडाचा वास कसा असणार? दंडासंबंधींच्या सर्व कल्पना आणि परमेश्वरविषयक कल्पना या मूलतःच परस्परविरोधी असल्यामुळें त्यांचा एकत्र उच्चार करणेंहि चुकीचें आहे."

त्या दिवशीं उकाडा पुष्कळ होत होता आणि आम्हीहि चालत चालत पुष्कळ लांब आलों होतों. चालून चालून टॉलस्टॉय यांस थकवा आल्यामुळें हा विषय इतकाच अर्धवट राहिला.

ख्रिस्त हा परमेश्वराचा अवतार होता कीं नाहीं, हाहि एक मोठा वादग्रस्त प्रश्न आहे. ख्रिस्त हाहि सामान्य माणसांसारखाच होता, असें टॉलस्टॉय यांचें मत आहे. त्याचें कुमारीपासून जन्म पावणें आणि त्याचें पुनरुत्थान या गोष्टी टॉलस्टॉय यांस थोतांडाच्या वाटतात. इतरांप्रमाणेंच त्याचा जन्म झाला, इतरांप्रमाणेंच त्यानें बरीं वाईट कामेंहि केलीं आणि इतरांप्रमाणेंच तो मरून गेला, असें त्यांचें मत आहे. मनुष्याच्या परमेश्वरविषयक कल्पना जसजशा अधिक शुद्ध होत जातील, तसतशा या शुष्क दंतकथा आणि कल्पित गोष्टी नाश पावतील, असें ते म्हणतात.

आत्मा अमर आहे. या मतावर टॉलस्टॉय यांचा विश्वास नाहीं, असा पुष्कळांचा समज आहे; पण ही मोठी चूक आहे. या विषयासंबंधीं आम्हा दोघांमध्यें पुष्कळ वेळां संभाषणें झालीं, त्यावरून आत्म्याच्या अमरत्वासंबधीं टॉलस्टॉय यांचें मत निश्चित आहे, ही गोष्ट अनेक वेळां मला दिसून आली.

आत्म्याला पूर्वी अस्तित्व होतें आणि यापुढेंहि तें राहील, असेंच त्यांचें म्हणणें आहे. मृत्यूनंतर प्रत्येक आत्म्याचें व्यक्तित्व शिल्लक राहील, असेंहि त्यांचें मत आहे. 'मी आहें' या जाणिवेचा अर्थ काय? या प्रश्नाला टॉलस्टॉय उत्तर देतात, "जाणीव म्हणजे जड शरीराची जाणीव नव्हे. ती जड शरीराशीं संलग्न झालेली नाहीं. त्याचप्रमाणें माझ्या अस्तित्वाची जाणीव विचाराशींहि जोडलेली नाहीं. एका दोऱ्यांत अनेक मणी ओंवावेत त्याचप्रमाणें या आत्मरूपी दोऱ्यावर अनेक प्रकारच्या जाणिवांचे मणी बांधलेले आहेत. आत्म्याचा देहाशीं संबंध नाहीं. देह गेला तरी वेगळेपणानें मी राहूं शकेन. मानवी जीवित हें एकाद्या शंकूसारखें असून त्याच्या मुळाशीं जन्म आणि अखेरीस मृत्यु आहे. बिंदुरूप जन्मापासून जीवात्म्याच्या अस्तित्वाचा प्रवाह रुंदावत जातो. हा प्रवाह शुद्ध प्रेमरूप आहे.

दुसऱ्या कोणत्याहि दुष्ट वस्तूनें मलीन न झालेला जो सात्विक प्रेमाचा प्रवाह तेंच खरें जीवित आणि तेंच परमेश्वराचें स्वरूप. यावर मीं प्रश्न केला, "पण कित्येक जीवात्मे अधिक उदार न होतां दिवसेंदिवस अधिक निरुंद आणि क्षुद्रहि होत जातात, असेंहि आपणास आढळून येतें. मग अशांची वाट काय ?"

कौंट यांनीं उत्तर दिलें, " या प्रश्नाचें उत्तर मला देतां येत नाहीं. कारण असल्या प्रकारच्या लोकांच्या मृत्यूच्या वेळीं त्यांच्या निःस्नेह मनोभूमिकेंत कसल्या प्रकारचे बदल घडत असतील हें जाणणें माझ्या शक्तीबाहेरचें आहे. कदाचित् नव्या परिस्थितींत नव्या जिविताची प्राप्ती त्यांस होत असेल, आणि आपली मनोवृत्ति सुधारून मानवी जीविताचें अंतिम साधण्याची सवड त्यांस कदाचित् पुन्हां मिळत असेल."

"अलीकडे माझ्या मनांत पारलौकिक विचार एकसारखे घोळत असतात. मीं कितीहि धडपड केली तरी माझ्या मनांतून ते जात नाहींत. मृत्यु समीप येत आहे, ही आठवण मी केव्हां विसरलों तर त्याबद्दल मला फार दुःख होतें. परलोकाबद्दल मनुष्यांच्या मनांत अवास्तव कल्पना भरल्या आहेत. त्या नाहींशा करतां आल्या आणि त्या ऐवजीं वस्तुस्थितीची माहिती त्यांस करून देतां आली, तर या जगांत राहण्याची इच्छा कोणीहि करणार नाहीं. या जगांतून बाहेर जाण्यासाठीं माझें मन एकसारखें तळमळत आहे. वास्तविक पाहतां माझी ही तळमळसुद्धां चुकीची आहे. मनुष्याच्या आंगीं धीर पाहिजे. तथापि मला मृत्यु लवकरच येईल या विचारानें होणारें सुख दिवसें दिवस इतकें वाढत जात आहे कीं, त्याच्या मगरमिठींतून सुटण्यासाठीं मला मोठीच धडपड करावी लागते."

या विषयासंबंधीं टॉलस्टॉय यांनीं अगदीं अलीकडे जे आपले परिपक्व विचार नमूद केले आहेत, ते खरोखर मोठे मनन करण्यासारखे आहेत. आत्मा अमर आहे, या गोष्टीवर टॉलस्टॉय यांचा विश्वास नाहीं, असा समज बहुधा सर्वत्र पसरलेला आहे. ॲनाटोन लेरॉयबोलो या नांवाच्या एका फ्रेंच पंडितानें पॅरिस येथील एका प्रसिद्ध मासिकांत टॉलस्टॉय आणि रशियांतील धार्मिक चळवळ या विषयावर एक बराच मोठा निबंध लिहिला आहे. त्यांत तो म्हणतो, 'मृत्यूनंतरहि आत्मा जिवंत असतो, या गोष्टीवर टॉलस्टॉय यांचा मुळींच विश्वास नाहीं. टॉलस्टॉय ख्रिस्ताचे अनुयायी होण्याचा यत्न करीत असतांहि ते पक्के शून्यवादी आहेत; आणि खऱ्या ख्रिस्ती धर्मालाहि आत्म्याची चिरजीविता मान्य नाहीं, असेंहि त्यांचें म्हणणें आहे. आपला स्वार्थी जीवनक्रम विसरून जा असाच ख्रि-

स्ताचा उपदेश असून आत्मा व्यक्तिविशिष्टत्वानें कायमचा असतो, हें म्हणणें ख्रिस्तालाहि मान्य नव्हतें असें ते म्हणतात. मृत्यूनंतर देह पुन्हां उठला, हें म्हणणें जसें खुळेपणाचें आहे, त्याचप्रमाणें मृत्यूनंतर आत्मा जीवंत राहतो, हें म्हणणेंहि तितकेंच वेडेपणाचें आहे, असें त्यांचें मत आहे."

यावरून चांगल्या पंडित मंडळींतहि टॉलस्टॉय यांच्या धर्ममताबद्दल भलतेच ग्रह आहेत हें उघड दिसतें. पूर्वी एका काळीं अशा प्रकारचें मत त्यांनीं कदाचित उच्चारून दाखविलें असलें तरी सांप्रत त्यांत पूर्ण बदल झाला आहे, यांत शंका नाहीं. टॉलस्टॉय यांच्या धर्ममतांत आरंभापासून आतांपर्यंत बऱ्याच वेळां मतांतर झाल्याचें दिसतें, ही गोष्ट खरी आहे. आणि यावरूनच धर्माच्या बाबतींत अद्यापिहि त्यांचीं मतें अगदीं पक्कीं झालेलीं नसावी, असेंहि म्हणण्यास जागा आहे. फार काय पण ही गोष्ट खुद्द टॉलस्टॉय यांसहि मान्य आहे. अगदीं आरंभीं ते निरीश्वरवादी होते आणि दहा वर्षांच्या अवधींत ते अक्षरशः ख्रिस्तानुयायी बनले. केवळ दहा वर्षांत ज्याच्या बुद्धीनें एवढा मोठा प्रवास केला, ती बुद्धि आतां थकून जाऊन स्वस्थ बसली असेल, असें कां म्हणावें ? तिची प्रगति अद्यापिहि चालू असेल.

ख्रिस्त हा कुमारीच्या पोटीं जन्मला आणि त्यानें अनेक चमत्कार केले, या गोष्टीवर जुन्या पंथाच्या ख्रिस्ती लोकांचा पूर्ण विश्वास आहे. टॉलस्टॉय यांस, या गोष्टी मुळींच खऱ्या वाटत नाहींत. यामुळें या जुन्या पंथाच्या लोकांचा रोष टॉलस्टॉय यांजवर पुष्कळ आहे. आणि कित्येक लोकतर एवढ्यामुळेंच त्यांचे शत्रु बनले आहेत. पण शुद्ध धर्मतत्वांच्या दृष्टीनें या गोष्टींना विशेष महत्व नाहीं, हें उघड आहे. याकरतां, ख्रिस्तीधर्माचीं खरीं तत्वें काय आहेत, हें ज्यास पाहणें असेल त्यांनीं टॉलस्टाय यांचें ग्रंथ अवश्य वाचावेत. ख्रिस्त हा परमेश्वराचा अवतार होता, हें जुनें मत टॉलस्टॉय यांस मान्य नसलें, तथापि ख्रिस्ताच्या आज्ञा प्रत्येक मनुष्याला पूर्ण आदरणीय आहेत, या जुन्या मताशीं त्यांचे पूर्ण मतैक्य आहे. जुन्या मताशीं त्यांचा विरोध असला, तर तो क्षुल्लक बाबीपुरता आहे. मुख्य तत्व दोघांसहि सारखेंच मान्य असल्यामुळें यांत नव्याजुन्याचें भांडण उपस्थित होण्याचें कांहींच कारण नाहीं.

या दृष्टीनें विचार करतां टॉलस्टॉय हे ख्रिस्ताला सामान्य मनुष्य समजत असले, तरी पण सांप्रतच्या बोलक्या ख्रिस्तानुयायांस ख्रिस्ताकडे जाणारा खरा रस्ता दाखविण्याचें पुण्य टॉलस्टॉय यांनीं संपादन केलें आहे, हें कोणाहि विचारवतास कबूल करावें लागेल.

[ ५ ]

टॉलस्टॉय यांच्या मतांत आणि वर्तणुकींत उत्क्रांति कशी होत गेली, याचें सविस्तर वर्णन त्यांनीं स्वतःच अनेक लेखांच्या द्वारें केलें आहे. या वाढींत विशेषतः आपल्या बुद्धीच्या वाढीची हकीकत त्यांनीं दिली आहे. स्वतःच्या बाह्य संसाराची हकीकत या इतिहासांत नाहीं. उत्क्रांतीचीं रूपांतरें होत गेलीं, त्या प्रत्येक रूपांतराच्या वेळीं आपली सांसारिक स्थिति काय होती याचा बुद्धिपुरःसर उल्लेख त्यांनीं कोठेंहि केलेला नाहीं. त्यांनीं लिहिलेला हा इतिहास जड संसाराचा नसून सूक्ष्म संसाराचा आहे. मनुष्याच्या जीविताचें स्वरूप काय, आणि त्याचा अंतिम हेतु काय ह्या प्रश्नांचा विचार अनेक वर्षे ते करीत होते. या प्रश्नाचें समग्र उत्तर अमुक एका प्रसंगीं मिळालें असें नसून कित्येक वर्षांच्या विचारांच्या उत्क्रांतींत तें मिळत गेलें. कोणत्याहि विषयाचा अभ्यास सुरू केला म्हणजे त्यांत पारंगतता मिळविण्याकरतां वाटेल ती मेहनत पडली तरी करावी, असा त्यांचा स्वभाव होता. ख्रिस्तचरिताचें आणि ख्रिस्तवचनांचें खरें रहस्य मूळांतून समजावें या हेतूनें चाळीशी उलटून गेली असतांहि ग्रीक भाषेच्या अभ्यासास त्यांनीं सुरुवात केली. ग्रीक भाषेंत बरेंच प्राविण्य मिळविल्यानंतर ख्रिस्ती पवित्र शास्त्राचा अभ्यास ते करूं लागले. तथापि बराच काळ लोटेपर्यंत त्यांची मनीषा तृप्त झाली नाहीं. दीर्घकाळ अंधारांत चांचपडल्यानंतर एका लहानशा जंगीच्या द्वारें प्रकाशाचा अल्प किरण आपणास दिसूं लागला, असें वर्णन त्यांनीं स्वतःच केलें आहे. ही फट सांपडल्यानंतर आपल्या साऱ्या शक्तीचा मारा त्यांनीं तेथें सुरू केला. अखेरीस परमेश्वराकडे जाण्याला अगदीं जवळचा रस्ता कोणास हवा असेल तर ख्रिस्ताच्या शब्दांत तो सांपडेल, असा अनुभव त्यांस आला. या उत्क्रांतिमार्गांत एका विशिष्ट परिस्थितीमुळें बरीच मदत मिळून टॉलस्टॉय यांचें मन या नव्या रस्त्याकडे मोठ्या झपाट्यानें वळलें. रशियांत एका शिरगणतीच्या वर्षीं ही गोष्ट घडून आली. या वेळीं टॉलस्टॉय यांच्या विचारसरणीस अगदीं नवें वळण मिळून त्यांची पूर्वींची सारी दिशाच बदलली. विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांकडे शिरगणतीचें काम देण्याचा परिपाठ रशियांत आहे. या प्रसंगीं कौंट यांचा सर्वांत वडील मुलगा मास्को विद्यालयांत अभ्यास करीत होता. इतर सहाध्यायांबरोबर एका भागाच्या शिरगणतीचें काम त्याजकडे आलें. या कामानिमित्त तो फिरावयास निघाला म्हणजे कौंटहि त्याजबरोबर जात. अशा रीतीनें शहरांतील अगदीं हलक्या वस्तीचा भाग त्यांच्या नजरेंत आला.

अखेरीस भिकारवाडा म्हणून जो मास्कोचा प्रसिद्ध भाग आहे, त्यांतहि फिरून तेथील सारी परिस्थिति त्यांनीं स्वतः अवलोकन केली. या काळापर्यंत त्यांच्या बुद्धीची झालेली वाढ केवळ एकांगी होती. प्रत्यक्षापेक्षां परोक्षाचा विचारच तिनें अधिक केला होता. प्रत्यक्ष संसार न पाहतां परोक्ष सिद्धांताकडे, ती वळली होती. पण ही वस्तुस्थिति पाहिल्यानंतर तिच्या या गतींत एकदम बदल होऊन ती अगदीं निराळ्या मार्गाला लागली.

या कंगालपुऱ्यांत टॉलस्टॉय यांच्या नजरेस जे देखावे पडले, त्यामुळें त्यांची चित्तवृत्ति अगदीं बावरून गेली. त्यांच्या वयाच्या या काळापर्यंत त्यांचे दिवस मोठ्या सुखाचे गेले होते, कोणत्याहि प्रकारची काळजी त्यांच्या मागें नव्हती. त्यांची रहाणी, मोठ्या थाटामाटाची आणि श्रीमंतीची होती. मनुष्याला होणाऱ्या सामान्य इच्छा त्यांच्या ठिकाणीं अगोदरच तृप्त झाल्या होत्या. पुष्कळ संपत्ति, चांगली कीर्ति, सुदृढ शरीरप्रकृति आणि सुशील संतती अशा सर्व वस्तूंची जोड त्यांस मिळाल्यामुळें कसलीहि उणीव म्हणून त्यांस भासत नव्हती; पण या कंगाल-पुऱ्याच्या दर्शनाबरोबर सुखासीनतेचा हा सारा मनु एकदम पालटून नव्या युगाला सुरवात झाली. अठरा विश्वे दारिद्र्य म्हणजे काय हें ज्याला स्वप्नांतहि कधीं दिसलें नाहीं, त्याला त्याच्या विक्राळ स्वरूपाचा अनुभव एकदम आला. जीवंतपणींच नरकलोक जणूं काय त्यांस दिसला. अशा स्थितींत टॉलस्टॉय यांजसारख्या सहृदय मनुष्याची चित्तवृत्ति बावरली असल्यास त्यांत नवल नाहीं. आपले लक्षावधी बांधव पोट बांधून बसले असतां आपण नित्यशः पंच पक्वान्नांचें भोजन करावें, ही गोष्ट त्यांच्या काळजाला झोंबली. सर्वसंगपरित्याग करून आपणहि त्यांज-सारखेंच आकिंचन व्हावें, अशी दृढ इच्छा त्यांच्या ठिकाणीं उद्भवली; आणि या मार्गांत आड येणाऱ्या स्वतःच्या कुटुंबाचाहि राग त्यांस आला. कुटुंबांतील सारी मंडळी अगदीं एकोप्यानें विरुद्ध नसती, तर घरदार, जमीन जुमला इत्यादि सर्व संपत्तीवर त्यांनीं खचित पाणी सोडलें असतें.

अशा स्थितींत काय करावें आणि आत्मोद्धार कसा करून घ्यावा याचा कांहीं मार्ग त्यांस सुचेना. तेव्हां चित्ताला शांति प्राप्त व्हावी म्हणून जुन्या धर्ममार्गाची कांस त्यांनीं धरली. ते ईश्वराराधनेंत दीर्घकाळ निमग्न राहूं लागले आणि खिस्ती देवळांत होणाऱ्या सर्व सार्वजनिक प्रार्थनेस ते हजर राहूं लागले. अशा रीतीनें कांहीं काळ गेला तरी त्यांच्या चित्तास शांति मिळेना. आपल्या चित्तास शांति देण्याचें सामर्थ्य या जुन्या पंथाच्या ठिकाणीं नाहीं, एवढी मात्र त्यांची खात्री

पटली. तेव्हां देवळांत प्रार्थनेस जाण्याचें सोडून बायबलाचा अभ्यास ते स्वतःच करूं लागले. या मार्गांत सूटेफ नांवाच्या एका शेतकऱ्याचें साहाय्य त्यांस पुष्कळ झालें. याचें घर नोव्होग्राड नांवाच्या गांवीं होतें. मुलाचा जन्म झाल्याबरोबर त्याच्या पातकाचें क्षालन करून त्याला दीक्षा देण्याचा एक विधी ख्रिस्ती लोकांत आहे. सूटेफ याला इ. स. १८७६ सालीं एक मुलगा झाला, तेव्हां हा विधी करण्याचें त्यानें नाकारलें. स्वतःच्या पापांचा पूर्ण पश्चात्ताप होऊन मनःशुद्धि होईपर्यंत ख्रिस्ताचा अनुयायी होण्यास कोणीहि मनुष्य पात्र होत नाहीं, असें सुटेफचें मत होतें. तेव्हां ज्या विधीचें महत्व मुलाला कळत नाहीं, तो विधी त्याच्यासाठीं आपण करणें मूर्खपणाचें आहे, असें तो म्हणूं लागला. त्याच्या ग्रामोपाध्यायानें त्याजवर मोठें काहूर उठवून या प्रकरणाची सारी हकीकत रशियांतील सनातनधर्मरक्षक सभेकडे कळविली आणि अखेरीस सुटेफ याजवर न्यायासनापुढें काम चालू झालें. या गोष्टीमुळें त्याच्याबद्दल सर्वत्र चर्चा होऊन त्याचें नांव साऱ्या रशियांत गाजूं लागलें. अर्थातच टॉलस्टॉय यांच्याहि कानीं ही सारी हकीकत गेली.

सुटेफ हा पूर्वीं सर्फ होता आणि नंतर नव्या कायद्याप्रमाणें या गुलामगिरींतून त्याची मुक्तता होऊन त्याला लहानसें शेतहि मिळालें. पीटर्सबर्ग येथें तो पाथरवटाचें काम करीत होता. स्वतःला बायबल वाचतां यावें, याच हेतूनें तो प्रथम वाचावयास शिकला. व्यापार करणें, अथवा पैशाचा दुसरा कोणताहि व्यवसाय करणें ख्रिस्ताला मान्य नाहीं, अशी स्वतःची खात्री करून घेऊन त्यानें सर्व धंदे सोडले. पिटर्सबर्ग येथें जी मलमत्ता त्यानें संपादन केली होती, ती त्यानें गोरगरीबांस वांटून टाकली. आपल्या कर्जदारांस त्यानें ऋणमुक्त केलें आणि राजधानी सोडून आपल्या खेड्यांतील शेतावर तो येऊन राहिला. इतकें झालें तरी जुन्या धर्मपंथापासून तो अगदींच पराङ्मुख झाला नव्हता; पण खेड्यांतील ग्रामोपाध्यायाच्या वर्तणुकीमुळें जुन्या पंथावरून त्याचें मन अगदीं उडालें. एके वेळीं कांहीं धार्मिक बाबीसंबंधीं खुलासा करून घेण्याच्या हेतूनें उपाध्येबोवांकडे तो आला असतां ते म्हणाले, "का रे गाढवा, कशाला आलास ? या काठीनें तुला पवित्र करूं काय ?" तथापि उपाध्येबोवांच्या शिव्यागाळीकडे लक्ष न देतां सूटेफ यानें आपली शंका त्यांस विचारली. त्यावर त्यांनीं उत्तर दिलें, "तूं असले प्रश्न विचारण्याइतका धर्मलंड निपजणार आहेस, हें बाप्तिस्म्याच्या वेळीं मला कळतें तर तुला मीं कायमचीच जलसमाधी दिली असती." इतकें झाल्यावर सुटेफ तेथून

उठून आला. असल्या भिक्षुकवर्गाशीं कोणताहि संबंध यापुढें ठेवावयाचा नाहीं, असा निश्चय करून स्वतःच्या चित्ताला पवित्र वाटेल, त्याच मार्गानें ईश्वराच्या भजनपूजनांत आपला काळ घालवूं लागला. हळूहळू त्याला कांहीं सहाध्यायी व शिष्य मिळूं लागले. त्यांजपुढें बायबलाचा पाठ वाचून त्याचा अर्थ त्यांस तो सांगूं लागला. परमेश्वर हा अनिर्वचनीय प्रेमस्वरूप असून सर्वांचा पिता असल्यानें सर्व परस्परांचे बांधव आहेत, अशा प्रकारचा उपदेश तो करू लागला. हें मत आरंभीं कबूल केल्यावर युद्ध, व्याजबट्टा, व्यापार आणि पैशाची इतर देवघेव या सर्व बाबी बहिष्कारांत काढाव्या लागणें ओघासच आलें. परस्परांतील बंधुभाव नष्ट होऊन तेथें शत्रुत्व उत्पन्न होण्यास मूळ कारणें हींच आहेत, असें तो म्हणूं लागला. परस्परांनीं परस्परांस मदत करावयाचा प्रसंग आला तर त्यांत पैशाचा संबंध येऊं न देतां ही मदत शारीरिक श्रमाच्या मोबदल्यानें करावी, असा उपदेश तो करूं लागला. आपल्या घरादाराचीं कुलुपें त्यानें फोडून टाकलीं आणि अडसर जाळून त्यांची त्यानें राख केली. आपल्या घराला आणि आपल्या कोठाराला सुटेफ कुलुपें घालीत नाहीं, ही बातमी शेजारच्या खेडवळांना समजली, तेव्हां त्याचें सर्व धान्य चोरून नेण्याच्या हेतूनें कांहीं शेतकरी त्याच्या कोठाराजवळ जमा झाले. बहुतेक सारीं पोतीं त्यांनीं लांबविलीं. अखेरचें पोतें ते उचलणार, इतक्यांत सुटेफ तेथें दत्त म्हणून उभा राहिला. त्याला पाहतांच शेतकरी भिऊन पळूं लागले. तेव्हां त्यांना हांक मारून सुटेफ म्हणाला, “गडेहो, तुमच्या घरांत भाकर नसली, तर हें उरलेलें पोतेंहि घेऊन जा.” सुटेफचे हे शब्द ऐकून त्या शेतकऱ्यांस कृतकर्माचा पश्चाताप झाला. आणि दुसऱ्या दिवशीं सकाळींच त्यांनीं सर्व धान्य परत आणून दिलें. जमीनीचा कर मागण्याकरतां गांवचा अधिकारी सुटेफकडे आला, तेव्हां सुटेफ म्हणाला, “या पैशाचा उपयोग कसा होणार, हें मला अगोदर समजलें पाहिजे. त्याचा उपयोग युद्धाची सामग्री तयार करण्याकडे होणार असेल, तर छदामसुद्धां मी देणार नाहीं.”

बायबलाच्या अभ्यासाच्या बाबींत सुटेफ हा टॉलस्टॉय यांचा गुरु होय. टॉलस्टॉय यांनीं केलेलें बायबलाचें तात्विक विवेचन म्हणजे सुटेफच्या शेतकरी विवेचनाचें अधिक उच्च भाषेंत भाषांतरच होय. बायबलाच्या अर्थाची मूळ कल्पना सुटेफ याची असून तिला सुंदर वस्त्राभरणांनीं आणि अलंकारांनीं सुशोभित करून ती चित्ताकर्षक करणें, ही कला मात्र टॉलस्टॉय यांची आहे. बायबलाच्या अर्थासं-

बंधीं सामान्य रशियन शेतकऱ्यास बाह्य जगांतून कांहीं शिकण्यासारखें नसून तें मर्म त्यांनीं अगोदरच ओळखलें आहे, असें टॉलस्टॉय यांचें म्हणणें आहे.

सैबेरियांतील एका शेतकऱ्यानें एक लहानसा धर्मविषयक लेख लिहिला होता. तो तयार करण्याच्या कामीं कोणाचीहि मदत त्यानें घेतली नव्हती. टॉलस्टॉय यांस हा लेख फारच आवडला होता आणि रशियन शेतकऱ्यांची धर्मबुद्धी किती जागृत आहे, हें दाखविण्यासाठीं या लेखाचा ते उपयोगहि करीत. युरोपांतील इतर देशांपेक्षां रशियन शेतकरी अधिक आडमुठा दिसतो, याचें कारण त्याची बुद्धिमत्ता कमी प्रतीची आहे, असें नसून तिचें तेज फांकण्यास इतर देशांत जसा अवसर आहे, तसा तो रशियांत नाहीं, असें टॉलस्टॉय म्हणतात.

कांहीं तरी शारीरिक श्रम करून प्रत्येकानें आपली भाकरी मिळवावी हें टॉलस्टॉय यांच्या पंथाचें एक मुख्य तत्व आहे. आणि या बाबतींत सुटेफशीं त्यांचें मतैक्य आहे. सामान्य जनसमूहाशीं ज्याला मिसळून रहावयाचें असेल, त्याला शारीरिक काम करण्यावांचून गत्यंतर नाहीं. जो मनुष्य कोणतेहि शारीरिक श्रम न करतां केवळ बुद्धीच्या श्रमावर आपला व्यवहार चालवितो, तो सामान्यजनसमूहापासून आपोआपच वेगळा पडत जातो. अशा रीतीनें अशीं माणसें बरींच झालीं म्हणजे त्यांचा एक वेगळाच वर्ग निर्माण होत जातो, आणि मग हे दोन वर्ग परस्परांपासून अधिकाधिक लांब होत जातात. समाजांतील वैषम्याची सुरुवात अशा रीतीनें होते. बुद्धिमान् वर्ग स्वतःकडे श्रेष्ठत्व घेतो, आणि इतरांस तुच्छ समजूं लागतो. कालांतरानें या वर्गीकरणांत आणखी पोटवर्ग निर्माण होऊन समाजांत तितकी एकी आणखी नाहींशी होते. ही सर्व अनर्थपरंपरा टाळण्याकरतां प्रत्येकानें प्रत्येक दिवशीं कांहीं तरी उद्योग स्वहस्तें करावा, असें टॉलस्टॉय यांचें म्हणणें आहे. जमीन नांगरणें, कुंपणें घालणें, झाडें लावणें, जोडे शिवणें, हीं व अशींच दुसरीं कामें हींच खरीं लोकोपयोगी कार्यें होत. कारण त्यामुळें समाजाची संघटना कायम रहात असते. मनुष्यांचे परस्परांशीं जे स्वाभाविक संबंध आहेत, ते कायम राखण्याचें कार्य असलीं कामें करीत असतात.

आतां बौद्धिक श्रम म्हणून ज्यांना म्हणतात, त्यांचें स्वरूप काय आहे, याचाहि विचार केला पाहिजे. एकादे रावसाहेब, आपल्या ऑफिसांत बसून कागदावर सह्या खरडीत असतात, त्या वेळीं राज्य चालविण्याचें मोठें उपयुक्त कार्य आपण करीत आहों, अशी त्यांची कल्पना असते; पण हा किती भ्रम आहे ! 'सरकार' हा शब्दच अगदीं भ्रामक आणि अर्थशून्य आहे. सह्या करणारीं हीं माणसें खरीं

असतात. तीं खरोखर जीवंत माणसें असतात, त्यांच्या हातांतील लेखणी खरी असते, आणि कागदहि खरे असतात, हें सारें मला कबूल आहे; कांहीं तरी काम ते करीत असतात, हें खरें. तसेंच आपला काळ कांहीं उपयुक्त कार्यांत आपण घालवीत आहों, असें त्यांस मनापासून वाटतें हेंहि खरें; आणि लोकांनाहि तसेंच वाटावें अशी त्यांची इच्छा असते, हेंहि खोटें नाहीं; पण इतक्या स्थितींतहि सरकार ही कल्पना अथवा संस्था मृगजलवत् आहे, असें मला निश्चितपणें वाटतें. असल्या प्रकारच्या 'सरकारावर' आपलें वजन घालून युद्धें बंद करतां येतील, असें वाटणें हें अगदीं चुकीचें आहे. जगांत शांतता नांदावयाची असेल, आणि अनेक दुःखांचें समूळ उच्चाटन करावयाचें असेल, तर कोणत्याहि कारणासाठीं कोणत्याहि प्रकारच्या दंडुकेगिरींत कोणीहि सामील व्हावयाचें नाहीं, असा निश्चय प्रत्येकानें केला पाहिजे."

सरकार ही संस्था मृगजलवत् आहे, या कौंटच्या मतांतील आशय माझ्या लक्षांत चांगलासा केव्हांच आला नाहीं. नेपोलियन, बिस्मार्क इत्यादि राजकीय पुरुषांसंबंधीं टॉलस्टॉय यांच्या मनांत विलक्षण तुच्छताबुद्धि होती. हे सारे पुरूष काजव्या प्रमाणें क्षणमात्र लुकलुकणारे असून त्यांच्या कृतींनीं इतिहासाचा ओघ पालटत नाहीं, असें त्यांचें मत आहे. एका क्षणीं लोक त्यांना देवाऱ्यांत बसवितात, आणि दुसऱ्याच क्षणीं ते त्यांना झुगारूनहि देतात. कसल्याहि प्रकारची राजशासनसंस्था टॉलस्टॉय यांस पसंत पडत नाहीं. एकसत्ताक राज्यपद्धति त्यांना जितकी त्याज्य वाटते, तितकीच पार्लेमेंटरी पद्धतहि त्याज्य वाटते.

राष्ट्राराष्ट्रांत कुरबूर सुरू होऊन अगदीं निर्वाणीचा प्रसंग आला, तरी त्यावेळींहि आपण कसल्याच प्रकारची मदत सरकारास न करतां त्याची अगदीं उपेक्षा करावी, असें त्यांचें म्हणणें आहे.

कार्लाईल याचेंहि मत अशाच प्रकारचें आहे. राजशासनपद्धति दिवसेंदिवस बिघडत गेली, तरी तिकडे लक्षसुद्धां देऊं नको, असा उपदेश कार्लाईल यानें मरणापूर्वी दोनच वर्षे मला केला होता. ही हकीकत मीं टॉलस्टॉय यांस सांगितली, तेव्हां टॉलस्टॉय म्हणाले, "बरोबर, अगदीं बरोबर. हा उपदेश अगदीं योग्य आहे. ख्रिस्ताच्या हुकुमाविरुद्ध उत्पन्न झालेल्या या संस्थांना आपल्या मरणानेंच मरूं द्यावें हें बरें. या संस्था आतां उतरत्या पंथास लागल्या आहेत, आणि कालांतरानें त्या आपोआपच नामशेष होतील."

टॉलस्टॉय आणि कार्लाईल या दोघांचीं मतें आरंभीं अगदीं परस्परविरुद्ध असतांहि त्या दोघांच्या मतांचें पर्यवसान अशा रीतीनें एकाच ठिकाणीं झालेलें पाहून मला मोठें नवल वाटलें.

सामान्य लोकांस त्यांच्या चालू मार्गानें बिनहरकत जाऊं दिलें तर थोड्याच दिवसांत एकंदर समाजाची घडी इतकी बिघडून जाईल कीं, हे लोक स्वतःच एकदा नियंत्रण करणारा राजा हवा, असें म्हणूं लागतील असें कार्लाईलचें म्हणणें आहे. सांप्रतच्या लोकसत्तावादाला आळा घालूं नये, हें कार्लाईलचें मत यामुळेंच होय. उलटपक्षीं टॉलस्टॉय यांच्या मतें सांप्रतची राज्यपद्धति नष्ट झाली, आणि सामान्य लोकसत्ता प्रबळ झाली, तर सांप्रतच्या राजशासनपद्धतीखालीं अनुभवानें शहाणी झालेली जनता युद्धें टाकून देऊन शांततेनें नांदूं लागेल. अशा रीतीनें लोकसत्तेच्या मार्गांत ढवळाढवळ करूं नये या मतांत या दोन तत्त्ववेत्त्यांची एकवाक्यता असली, तरी अंतिम परिणामाबद्दल ते दोघे परस्परांस विरुद्ध आहेत.

" कोणत्याहि प्रकारची खाजगी मालमत्ता अथवा धर्म आणि व्यवहार या बाबींत आंखीव सत्ता असूं नये, असें टॉलस्टॉय यांचें स्पष्ट मत आहे. एके प्रसंगीं ते मला म्हणाले, " मालमत्ता, रेंखीव धर्मसंस्था अथवा राजशासन या साऱ्या संस्था दंडाच्या जोरावर स्थापलेल्या आहेत. यांना तुम्ही मान्यता दिली तर तुमचें भविष्य मला खडतर दिसतें. दंडुकेगिरी ही दीर्घकाळ टिकणारी नाहीं. केव्हांना केव्हां तिचा अंत अवश्य आहे. कारण ती स्थिति अस्वाभाविक आहे. गुलामगिरी आणि इतर अस्वाभाविक रानटी संस्था ज्याप्रमाणें संपुष्टांत आल्या, त्याचप्रमाणें दंडुकेगिरीचा नाशहि अवश्य होईल. मनुष्याच्या मनाची संकुचित स्थिति ही त्याच्या रानटीपणाचें द्योतक आहे. ज्या मानानें हा संकुचितपणा अथवा स्वार्थ अधिक त्या मानानें तो मनुष्य अधिक रानटी होय. अनेक प्रकारचा रानटीपणा मानवजातीनें ज्याप्रमाणें टाकून दिला आहे, त्याचप्रमाणें हें माझें कुटुंब अथवा हें माझें राष्ट्र या संकुचित कल्पनांचाहि त्याग तिनें केला पाहिजे. प्रेम आणि सहानुकंपा या कोमल भावना शिकविण्याची पहिली शाळा कुटुंब ही आहे, असें कांहीं लोक म्हणतात. मनुष्यसमाजाच्या एकंदर संघटनेचा प्रारंभ कुटुंबाच्या संघटनेंत होतो, असेंहि कित्येकांचें मत आहे; पण हीं मतें सर्वथा चुकीचीं आहेत, असें मी स्वानुभवानें सांगतों. मनुष्याला स्वार्थबुद्धि शिकविणारी पहिली शाळा कुटुंब हीच आहे. लोकांच्या मुलांपेक्षां स्वतःच्याच मुलाबद्दल अधिक

काळजी मीं कां वहावी ? पलीकडच्या शेतकऱ्याचीं मुलें आणि माझीं स्वतःचीं मुलें मला सारखींच असावींत. मनुष्यप्राणी—मग तो कोठेंहि जन्मलेला असो आम्हास सारखाच प्रिय असला पाहिजे, असा ख्रिस्ताचा कायदा आहे."

याच धोरणावर देशाभिमान हीसुद्धां असद्भावना आहे, असें टॉलस्टॉय म्हणतात. त्याचप्रमाणें हा कुलीन अथवा हा हीन कुलांतला, असल्या प्रकारचे भेदहि त्यांना मान्य नाहींत. असा भेद जे लोक मानतात, ते ख्रिस्ताचे अनुयायी म्हणविण्यास नालायक आहेत, असें त्यांचें मत आहे. चिनी लोकांना येऊं देऊं नये म्हणून अमेरिकन लोकांनीं केलेल्या अकांडतांडवाबद्दल ते म्हणाले, "चिनी लोकांनीं अमेरिकेंत कां येऊं नये ? तुमच्या एकाद्या भावाची कातडी पिंवळी असली अथवा त्याला चिनी हें नांव असलें, तरी तो तुमचा भाऊच नव्हे काय ? मग जो भेद ख्रिस्तानें केला नाहीं तो तुम्ही कां उपस्थित करतां ?"

ऐरलंडसंबंधीं प्रश्न निघाला असतां, त्याचीहि वासलात कौंट यांनीं अशीच तडकाफडकी लावली. हातीं तरवार घेऊन ऐरलंडांतील बांधवांचा खून आपण करणार नाहीं, अशी शपथ इंग्रजांनी वाहिली म्हणजे ऐरलंडचा तंटा ताबडतोब मिटेल. सरकार नांवाच्या काल्पनिक संस्थेनें मनुष्यांना भुरळ घातली आहे, आणि त्या भुरळीच्या अमलाखालीं असलेलीं माणसें, परस्परांचे गळे कापून ख्रिस्ताच्या घरीं अपराधी ठरतात. हल्लींच्या साऱ्या शासनसंस्थांचा मूळ पाया खून हाच आहे."

"याला खून म्हणूं नये तर काय म्हणावें ? दुसऱ्या सुंदर नांवाखालीं हें घोर कर्म लपविण्याचा यत्न आम्ही करीत असतों. कोणाचीहि वध करूं नको, ही ख्रिस्ताची आज्ञा आहे; पण सरकार म्हणतें, अमक्या अमक्याला तूं खुशाल ठार कर. तुझ्या त्या कृत्याला खून न म्हणतां त्याला कर्तव्य असें नांव आम्ही देऊं. 'कर्तव्य' हा शब्दच माझ्या कानांना तापलेल्या तेलासारखा लागतो. सर्व जातीच्या गुन्ह्यांना सोंवळें करण्यासाठीं त्याचा उपयोग होतो. फांशीं देणारा मांग आपल्या एका बांधवाचा खून करतो आणि त्याचें अंतःकरण त्याला टोंचूं लागलेंच तर तें माझें 'कर्तव्य' असें म्हणून तो त्याला गप्प बसवितो. लष्करी शिपायी आपल्या शेजाऱ्याचा जीव घेतो आणि म्हणतो, मीं माझें कर्तव्य केलें, मीं हुकूम पाळला. वास्तविक पाहतां या जगांत मनुष्याचें कर्तव्य एकच. परमेश्वराचा हुकूम पळणें, हेंच त्याचें कर्तव्य. ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी उघडी असतांहि तुम्ही सारे लोक डोळेझांक कशी करतां याचेंच मला नवल वाटतें. खरोखर तुमच्या डोक्यांत भ्रम असल्याशिवाय असली चूक तुमच्या हातून कधींच घडली नसती. मी कॉकेशस

प्रांतीं लष्कराबरोबर असतां माझा एक जोडीदर तेथें होता, तो तेथेंच मरण पावला. हा गृहस्थ वेडा होता; पण तो मरेपर्यंत ही कल्पना आम्हांस नव्हती. तो मेल्यानंतर त्याची रोजनिशी आम्हास पहावयास मिळाली, तेव्हां तो वेडा होता ही गोष्ट आम्हांस कळली. त्याच्या रोजनिशींत कांहीं मजकूर अगदीं सुसंगत लिहिलेला असे, पण लिहितां लिहितां मध्येंच ग्रप-ट्रप असा एकादा अर्थशून्य शब्द लिहून त्यापुढें असाच कांहीं तरी अर्थशून्य मजकूर तो लिही. तुम्ही माणसेंहि याच गृहस्थाच्या तोडीचीं आहां, असें मला वाटतें. कांहीं काळपर्यंत तुम्ही शुद्धीवर बोलतां; पण त्या गृहस्थाच्या 'ग्रप' सारखे 'सरकार' 'स्टेट' 'डेरेदाखल' असले शब्द तुमच्या कानीं पडल्याबरोबर तुमची बुद्धि तुम्हाला सोडून जाते आणि मग तुम्ही वेड्यासारखे बरळूं लागतां.

वधाची शिक्षा पुष्कळ रशियन लोकांप्रमाणें टॉलस्टॉय यांनाहि मान्य नाहीं. या बाबींत त्यांचें मत इतकें निश्चित आहे कीं, या गोष्टीबद्दल ते बोलूं लागले, तर त्यांचें माथें अगदीं भडकून जातें. या बाबींत खुद्द बादशहांनाहि त्यांनीं एक पत्र लिहिलें होतें. केव्हांहि कोणाला फांशीची शिक्षा झाल्याचें त्यांनीं ऐकलें म्हणजे त्यांना मरणप्राय दुःख होतें. आमच्या इंग्लंडांत वर्षाकांठीं पांचपंचवीस माणसें फासांवर लटकत असल्यामुळें टॉलस्टॉय यांच्या चित्ताची या स्थितीची कल्पना आम्हा इंग्रज लोकांस नीटशी व्हावयाची नाहीं. अहिंसा हा टॉलस्टॉय यांचा धर्मच होऊन बसला आहे. या बाबींत बुद्धाच्या उपदेशाच्या जवळ जवळ ते पोहोंचले आहेत. त्यांनीं मांसान्न अगदीं वर्ज केलें आहे. एके वेळीं ते मला म्हणाले 'एक खाटीक एक डुकर कापीत असतां' त्याची आरोळी एका शेतकऱ्यानें ऐकली. तो शेतकरी मला म्हणाला, 'तें ओरडणें थेट माणसासारखें होतें.' खरोखर त्या खाटकाला या पापाचा जाब परमेश्वराजवळ द्यावा लागेल.

जन्मठेपेच्या शिक्षेपेक्षां एकदमः मृत्यु येणें बरें नव्हे काय? असा प्रश्न मीं त्यांना केला, तेव्हां ते मला म्हणाले, "साऱ्याच शिक्षा रद्द कराव्यात, असें माझें मत आहे."

टॉलस्टॉय हे विलक्षण मोकळया वृत्तीचे आहेत. त्यांची वागणूक अत्यंत साधी आणि मोकळेपणाची आहे. होतां होईतों कोणाच्याहि दोषांकडे लक्ष द्यावयाचें नाहीं, असा त्यांचा बाणा आहे, आणि त्याप्रमाणें वागण्यासाठीं ते पुष्कळ यत्न करीत असतात. हा त्यांचा यत्न अनेक वेळां निष्फळ होतो आणि आपल्या

या मनोदौर्बल्याबद्दल त्यांना फार दुःखहि होतें. या बाबींत सेंचरी नामक मासिकांतील त्यांचा पुढील उतारा मनन करण्यासारखा आहे.

"लोक मला म्हणतात, कीं तुम्ही उपदेश करतां तो फार चांगला असतो; पण तुमच्या स्वतःच्या वागणुकीचें काय? लोकांचा हा प्रश्न अगदीं स्वाभाविक आहे, आणि तो त्यांनीं विचारला कीं माझ्या तोंडाला कुलुप पडतें. त्याला उत्तर म्हणून मला इतकेंच सांगतां येईल कीं मी खरोखर कोणाला कांहीं उपदेश करीत नाहीं. मी खरा उपदेष्टा नाहीं; कारण कृतीच्या द्वारें केलेला उपदेश तोच खरा उपदेश होय; आणि माझी कृति वाईट आहे, हें मला ठाऊक आहे. याकरतां मी जें कांहीं बडबडतों, तें उपदेश म्हणून नसून मानवी जीवनाचा अंतिम हेतु काय, हें शोधण्याचा तो एक यत्न होय. येशू ख्रिस्ताचा उपदेश हीच मानवी जीविताची खरी किल्ली आहे, असें तुम्हांस वाटत असेल, तर त्याप्रमाणेंच तुम्ही कां वागत नाहीं? असें लोक मला विचारतात. त्याला उत्तर हेंच कीं या बाबतींत मी सर्वस्वी अपराधी आहें. तथापि माझ्या पूर्वआयुष्यांतील जीवनक्रम आणि सांप्रतचा जीवनक्रम हे तुम्हीं ताडून पाहिले, तर ख्रिस्ताची आज्ञा पाळण्याचा यत्न मी करीत आहें, असें तुम्हाला दिसून येईल. त्याचा एक लक्षांश भागहि माझ्या आचरणांत येत नाहीं हें खरें, पण त्याचें कारण माझें मनोदौर्बल्य होय. माझी इच्छा असतांहि त्याप्रमाणें वागण्याचें धैर्य मला नाहीं, आणि याबद्दल मी सर्वस्वी दोषी आहें. या करतां तुम्हाला जेव्हां दोष द्यावयाचा असेल, तेव्हां तो मला स्वतांला द्या. माझ्या अपराधाबद्दल माझ्या मतांवर तुटून पडूं नका. दारू पिऊन रस्त्यानें चालणाऱ्या मनुष्याचे पाय लटपटूं लागले, तर तो दोष रस्त्याचा नसून त्या दारुड्याचा आहे. हाच न्याय मलाहि लागू आहे. माझा मार्ग चुकीचा असेल तर दुसरा खरा रस्ता मला दाखवा. मी अडखळत असेन तर सरळ चालण्यास मला मदत करा; आणि हें तुमच्यानें होत नसेल तर स्वतःच्या भलत्याच मार्गाकडे मला ओढूं नका. तुम्ही पिशाचयोनीपैकीं नव्हे. तुम्हीहि माझ्याच सारखीं माणसें आहां, आणि माझ्याच प्रमाणें घरीं सुरक्षित पोहोंचण्याची तुमचीहि इच्छा आहे. कुमार्गाला लागून दलदलींत पडावें अशी माझी इच्छा नाहीं आणि तुमचीहि नाहीं. असें आहे, त्याअर्थीं आपण दोघेहि संवगडीच आहों. खरा रस्ता आपण सारेच चुकलेले आहों आणि तो सांपडण्यासाठीं मी जिवापाड मेहनत करीत असतां माझें पाऊल अडखळतें तेव्हां माझ्यावर दया न करतां आणि मजबद्दल सहानुकंपा न बाळगतां आपणाबरोबर हाहि खाड्यांत पडत आहे, असें म्हणून

मोठा विजय संपादन केल्याप्रमाणें तुम्ही आरोळ्या मारीत सुटतां, हें पाहून माझा जीव तिळतिळ तुटतो आणि मी अगदीं हताश होऊन जातों. "

रशियांत दारूबाजी बंद व्हावी अशी टॉलस्टॉय यांची फार इच्छा आहे. त्यांनीं एक मद्यपाननिषेधक संस्था स्थापिली असून तिचे सुमारें एक हजार सभासद आहेत. कसल्याहि जातीच्या मद्याला ते स्वतः स्पर्श करीत नाहींत. या बाबींत रशियांतील धर्माधिकारी वर्ग अगदीं तटस्थ आहे. मद्यपाननिषेधासारख्या गोष्टी करणें, हें आपल्या ठराविक कार्यक्रमाबाहेरचें आहे, असें त्यांना वाटतें. डॉ. अलेक्झीएफ यांनीं या बाबतींत बरेंच मोठें कार्य करण्यास आरंभ केला आहे. धर्माधिकाऱ्यांची मदत आपणास मिळावी म्हणून मास्को येथील मुख्य अधिकाऱ्याकडे त्यांनीं खटपट केली होती, पण हें काम आपल्या ठराविक कार्याबाहेरचें आहे, असें म्हणून अलेक्झीएफ यांस मदत करण्याचें त्यांनीं साफ नाकारलें. एके दिवशीं संध्याकाळीं आम्ही बरेच फिरावयास गेलों होतों. तेव्हां अनेक विषयांवर आम्हा उभयतांत चर्चा झाली. गरीबांची झोंपडी कशा प्रकारची असावी याजबद्दल बराच विचार टॉलस्टॉय यांच्या मनांत या वेळीं चालला होता. आम्ही घरीं परत आलों तेव्हां एक तरुण विद्यार्थी कौंटच्या भेटीस आल्याचें समजलें. शारीरिक श्रमाबद्दल वेतन घेणें चांगलें कीं नाहीं, याबद्दल या विद्यार्थ्याशीं टॉलस्टॉय यांची बरीच भवतोनभवती झाली. कोणत्याहि शारीरिक श्रमाचा मोबदला घेणें हें पातक आहे, असें टॉलस्टॉय याचें मत आहे. आणि ॲडम स्मिथचें अर्थशास्त्र अगदीं खोटें आहे, असें ते वारंवार म्हणत होते. ही गोष्ट अगदीं उघड आहे असें ते पुनः पुन्हा म्हणत होते, तरी त्यांच्या मताच्या सत्यतेबद्दल आमची खात्री झाली नाहीं.

यासनाया येथें माझा एक आठवडा मोठ्या सुखाचा गेला. हवा अगदीं उत्तम आणि आकाश निरभ्र असल्यामुळें सकाळ संध्याकाळ आम्ही पुष्कळ भटकत असूं. कुरण आणि शेतलागवडीची जमीन यांच्यांत कुंपण घालण्याचा परिपाठ रशियांत नसल्यामुळें पुष्कळ वेळां कुरणांतील जनावरें शेतांतहि घुसतात. प्रत्येक गांवाला सर्व गांवाच्या मालकीचें मिळून एक कुरण असून गांवांतील सर्व जनावरें तेथेंच चरावयास सोडलीं जातात. एकाद्या उंचवट्याच्या जाग्यावरून कुरणाचा हा देखावा मोठा गमतीचा दिसतो. दुपारच्या वेळीं जनावरें रवंथ करीत बसलीं म्हणजे नाना रंगांच्या ठिपक्यांचा एकादा प्रचंड गालीचाच पसरला आहे तीं काय असा भास होतो. शेतकीच्या चांगल्या जनावरांची पैदास करण्याकडे

टॉलस्टॉय यांचें लक्ष एके वेळीं लागलें होतें आणि त्या दिशेनें त्यांनीं बराच प्रयत्नहि केला होता. तथापि शेतकीच्या प्रदर्शनाविरुद्ध त्यांचें मत होतें. असल्या प्रकारच्या तमाशांत खरे शेतकरी फारसे लक्ष घालीत नसल्यामुळें हा सारा खर्च फुकट जातो, असें त्यांचें म्हणणें आहे.

रशियांतील समाजरचनेंत यात्रेकरू लोक जी एक मोठी कामगिरी बजावीत असतात, तिची कल्पना पश्चिम यूरोपांतील लोकांस व्हावयाची नाहीं. जगांतील हकीकती इकडून तिकडे पोहोंचविण्याचें काम अद्यापिहि याच लोकांकडे रशियांत आहे. तो गांवोगांव हिंडत असतो, अनेक गोष्टी डोळयानें पहात असतो आणि आपल्या चित्तांत त्या सांठवीत असतो. यात्रेच्या ठिकाणीं अनेक यात्रेकरू परस्परांस भेटतात आणि आपला सर्व संग्रह परस्परांजवळ रिकामा करीत असतात. अशा रीतीनें एकाद्या गांवीं एकादी माशी शिंकली तरी ती बातमी रशियाच्या दुसऱ्या टोंकापर्यंत जात असते. अशा रीतीनें पश्चिम युरोपांतील वर्तमानपत्रांचें काम हें यात्रेकरू करीत असतात. हे सारे यात्रेकरू बहुधा मोठे भाविक असतात. अशीच एक यात्रेकरू बाई मीं पाहिली होती. ती प्रार्थना करूं लागली म्हणजे तिच्या चेहऱ्यावर हर्षातिरेकाचा जो ठसा उठे तो कोणाच्याहि स्मरणांतून जाण्यासारखा नव्हता. पश्चिम युरोपांत पुष्कळ चित्रकारांचीं नामांकित धार्मिक चित्रें मीं पाहिलीं आणि हर्षातिशयाची भावना त्यांनीं फार चांगल्या रीतीनें चित्रित केली आहे हेंहि खरें; तथापि त्या स्त्रीच्या चेहऱ्यावर जो भाव मला आढळला, त्याची बरोबरी या चित्रकारांस कधींच करतां यावयाची नाहीं, अशी माझी खात्री झाली. रशियांत असतां ज्या अनेक बहारीच्या गोष्टी मीं पाहिल्या त्या सर्वांत त्या स्त्रीच्या चेहऱ्यावरील भावना माझ्या चित्तांत अगदीं अक्षय्य राहील.

निसर्गाच्या रमणीय लीलेंत टॉलस्टॉय आपलें आयुष्य नित्य कंठीत असतात. विवाहानंतर पहिलीं वीस वर्षें आपलें घर सोडून ते कोठेंहि गेले नाहींत आणि त्यानंतरहि बाहेर कोठें जाण्याचा प्रसंग आला तर त्यांना फार वाईट वाटे. आजूबाजूच्या रानावनांत हिंडून आणि प्राचीन व अर्वाचीन ग्रंथकारांच्या संगतींत राहून जो आनंद त्यांना होतो, त्याचा अल्पांशानेंहि अनुभव मोठाल्या शहरांत त्यांस येत नाहीं. टॉलस्टॉय यांचे लेख अमेरिकेंत बरेच प्रसिद्धीस आले आहेत. या मानानें इंग्लंडांतील लोकांस त्यांचा फारसा परिचय नाहीं. इंग्लंडापेक्षां अमेरिकेंतच त्यांच्या ग्रंथांचीं भाषांतरें अधिक लवकर झालीं आणि तेथें त्यांना वाचकहि पुष्कळ मिळाले. त्यांस अमेरिकेंतून जितकीं पत्रें येतात त्यामानानें इंग्लं-

डांतून फारच कमी येतात. त्यांत परस्परांच्या प्रेमविनिमयाचा भागहि आहे. अमेरिकेंतील नामांकित ग्रंथकारांचीं पुस्तकें त्यांनीं वाचलीं आहेत व त्यांजबद्दल त्यांच्या मनांत प्रेमहि आहे. इंग्रज ग्रंथकारांपैकीं बऱ्याचशा अर्वाचीन लेखकांचीं नांवेंहि त्यांस माहीत नाहींत. वाल्टर बेझंटसारख्या प्रसिद्ध कादंबरीकाराचें नांवसुद्धां त्यांनां ठाऊक नसावें याचें मला मोठें नवल वाटलें. श्रीमंतांनीं आपली एकलकोंडी रहाणी सोडून आणि गरीबांत मिसळून साध्या राहणीनें रहावें, असें वाल्टर बेझंट याचेंहि मत होतें. हल्लीं श्रीमंतांस कांहीं दयेचें कृत्य करावयाचें झालें, तरी ती गोष्ट एखाद्या प्रतिनीधीच्या द्वारें ते करतात. आपल्या धर्मादायाचा पैसा कोणाच्या पदरीं पडतो, व त्याची व्यवस्था खरोखर पुढें कशी होते, हें दात्यांना ठाऊकहि नसतें. स्वर्गाचें राज्य ख्रिस्तानें एखाद्या देवदूताला लांच भरून आणि आपला प्रतिनिधी करून मिळविलें नाहीं. मग अशा गोष्टी ख्रिस्ती म्हणविणाऱ्या श्रीमंतांनीं तरी कशा कराव्या ? अशा प्रकारचें वाल्टर बेझंट याचें मत असल्याचें मी टॉलस्टॉय यांस सांगितलें. तेव्हां ते म्हणाले, " हें म्हणणें अक्षरशः खरें आहे. ज्यांना मदत करण्याची आपली इच्छा असेल, त्यांच्यांत जाऊन आणि त्यांच्यासारखे होऊन ती आपण त्यांस केली पाहिजे. स्वर्गांत उभे राहून तेथून मदतीचा तुकडा खालीं भिरकावणें आपणास अश्लाघ्य आहे. गरीब झाले तरी ते आपले बांधवच आहेत; मग त्यांच्या सारखे होऊन त्यांच्यांत मिसळणें, हें आपलें कर्तव्य नव्हे काय ? किंबहुना आपण ख्रिस्ताच्या वचनाला खरा मान किती देतों, हें याच कसोटीनें ठरतें. ख्रिस्ताच्या आज्ञा तंतोतंत पाळून जे लोक तदनुसार आपलें वर्तन ठेवतात, तेच खरोखर ख्रिस्ती होत; आणि इतर लोक तोंडानें स्वतःस ख्रिस्ती म्हणवून आचरणानें ख्रिस्ताचा द्वेष मात्र करतात. ख्रिस्ताची आज्ञा जे पाळीत नाहींत त्यांना ख्रिस्ती म्हणवून घेण्याचाहि अधिकार नाहीं. "

दया आणि परस्पर प्रेम हींच ख्रिस्ती धर्माचीं प्रधान तत्वें होत. आणि याच पायावर मुख्यतः ख्रिस्तीधर्माची उभारणी झाली आहे. इंग्रजी ग्रंथकारांत डिकन्स त्यांना फार प्रिय आहे. एकंदर ग्रंथकारांत ठाकरे, डिकन्स, ट्रॉलॉप हे ग्रंथकार त्यांस आवडतात.

इंग्रजी ग्रंथकारांविषयीं आम्ही बोलत असतां टॉलस्टॉय मध्येंच एकदम म्हणाले मुद्रण कलेचा उपयोग जितका करून घ्यावयास पाहिजे होता, तितका आम्हीं करून घेतलेला नाहीं. आणा दोन आणे किंमतींत साऱ्या जगांतील उत्कृष्ट साहित्य तयार करावें, असा विचार कित्येक वर्षांपासून माझ्या मनांत घोळत आहे. पुस्तक

अगदीं थोड्या किंमतींत काढलें तर आमच्या रशियांत त्याचा विलक्षण खप होतो, असा अनुभव मला आला. अशा प्रकारच्या कांहीं लहान चोपड्यांची विक्री तीन वर्षांत ऐशीं लक्षांपर्यंत झाली. किंमत बेताची असली म्हणजे साहित्याचा प्रसार जर एवढया मोठ्या प्रमाणावर करतां येतो, तर साऱ्या जगांतील उत्तमोत्तम विचार-रत्नांचा संग्रह अगदीं सामान्य शेतकऱ्यांसहि करतां येईल, अशी तजवीज आम्हीं कां करूं नये ? "

" हें काम फक्त रशियापुरतेंच करावयाचें, असा आपला विचार आहे काय ? "

" छे छे. यांत एकट्या रशियाचाच समावेश होत नसून जगांतील सारेच देश यांत येतात. कदाचित् ही माझी सारी स्वप्नसृष्टिहि असेल; पण प्रत्येकीं आणा-दोन आणे किंमतीचे लहान लहान ग्रंथ फ्रेंच, जर्मन, इंग्लिश आणि रशियन इतक्या भाषांत प्रसिद्ध करण्यास अशक्य नाहीं, असें मला वाटतें. खरोखर अशा-प्रकारची खटपट करणें, हें एक मोठें धर्मकृत्य आहे, असें मी समजतों. मनाची उत्पत्ति अनंतांतून झाली आहे आणि अनंत हेंच परमेश्वराचें स्वरूप आहे. या मनावर विवेकबुद्धीचा जो विचाररूप ठसा उमटतो तोच ग्रंथद्वारा मनुष्यजातीला प्राप्त होत असतो. मनःपटावर घडणारें हें कार्य एकाद्या विशिष्ट देशांत होतें आणि दुसऱ्या कोठें होत नाहीं, असें नाहीं. याकरतां अत्युत्कृष्ट विचाररत्नाचा जन्म जगांत कोठेंहि झाला असला, तरी त्याचा संग्रह करणें आपणास योग्य आहे. "

अशा रीतीनें होणाऱ्या संग्रहांत बहुधा अर्वाचीन ग्रंथांचाच समावेश टॉलस्टॉय यांनीं केला होता. ग्रीक भांडारापैकीं फक्त पांच सात पुस्तकेंच त्यांनीं निवडलीं होतीं. यांत प्रवासवृत्त आणि इतिहास यांचा समावेश त्यांनीं मुळींच केला नव्हता. लॅटिन साहित्य तर बहुधा सारेंच वगळलें होतें. चिनी ग्रंथांत तीन ग्रंथ त्यांनीं पसंत केले होते. त्याच प्रमाणें बौद्ध धर्माचा सारांश थोडक्यांत येईल, असें एक पुस्तक ते स्वतःच तयार करीत होते. या यादींत कांहीं नांवें मींहि सुचविलीं.

इंग्रजी ग्रंथसंपत्तीपैकीं शेक्स्पीयरचीं तीन नाटकें त्यांनीं पसंत केलीं होतीं. याशिवाय मिल्टन, बनियन, बेकन, बर्क, पार्कर, अरनोल्ड, डिकन्स, स्कॉट, आणि जार्ज इलियट यांतूनहि बरीचशी निवड त्यांनीं केली.

अशा रीतीनें बराच वेळ या विषयासंबंधानें आमचें संभाषण झालें. यांतील कांहीं ग्रंथ साररूपानें सांगतां येणें जवळ जवळ अशक्य आहे, असें मला वाटतें. तथापि टॉलस्टॉय यांजसारख्या सहृदय महापंडितानें हें काम हातीं घेतल्यामुळे यांत नांव ठेवण्यास जागा राहणार नाहीं, अशी माझी खात्री आहे.

एवढया पर्वतप्राय उद्योगाकडे सारें लक्ष वेधलें असतांहि बटाट्याच्या शेतांत बेणणी करण्याचें काम टॉलस्टॉय यांस सुचतें कसें आणि रुचतें कसें, याचें मला मोठें नवल वाटतें. जी प्रचंड कार्यकारी शक्ति जगाच्या हिताकडे लागावयाची तिचा कांहीं तरी अंश असल्या क्षुद्र कार्याकडे खर्च होतो, असें मनांत येऊन मला फार वाईटहि वाटलें. बटाटे खणण्याचें काम एकादा सोम्या गोम्या टॉलस्टॉय यांजपेक्षां किती तरी अधिक चांगल्या रीतीनें करील. जगाची नीतिमत्ता सुधारून त्याचें पाऊल पुढें पडावें, यासाठीं करावा लागणारा उद्योग अधिक उपयुक्त, आणि अधिक उच्च नाहीं काय ? टॉलस्टॉय आतां वृद्ध होत चालले आहेत आणि शारीरिक श्रमांचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर घडत असल्याचें स्पष्ट दिसत आहे. जगाचें बरें करण्याकरतां आणि ख्रिस्ताचा संदेश त्याला पावता करण्याकरतां तरी आपल्या प्रकृतीची अधिक काळजी घ्या अशी विनंति हात जोडून मीं त्यांना केली; तेव्हां ते म्हणाले,

"छे छे! असल्या भलत्याच मोहांत मला पाडूं नका. ख्रिस्ताचा संदेश जगाला पोहोंचतें करण्याचें काम मजकडे आहे, असें वाटणें हा खोटा अहंकार आहे. यानें मला एकदां पछाडलें कीं तो मला नरकाच्या द्वारापर्यंत नेल्याशिवाय राहणार नाहीं. असल्या कीर्तीचा मोह म्हणजे सैतानानें दाखविलेलें आमिष होय. माझें पहिलें कर्तव्य ख्रिस्ताच्या आज्ञेप्रमाणें स्वतः आचरण करणें हें होय. तसा उपदेश लोकांना करणें, हें एक कर्तव्य असेल अथवा नसेल, पण स्वतःच्या शरीरानें काबाडकष्ट करणें, हें मात्र माझें निश्चित कर्तव्य आहे." यानंतर कांहीं राजकीय बाबींवर आमचा थोडासा संवाद झाला. अखेरीस मी त्यांना म्हटलें, तुम्ही म्हणाल तें करण्यास झार बादशहा उद्यां कबूल झाले, तर आपण कोणत्या गोष्टी करण्यास सांगाल ?" माझा प्रश्न ऐकून कौंट बराच वेळ स्तब्ध राहिले. मग माझ्याकडे पाहून म्हणाले, "असा अद्भुत प्रसंग उत्पन्न होईल, अशी कल्पना करावयाचीच असेल, तर मी या तीन गोष्टी सांगेन—

१ सर्व जमीन राष्ट्राच्या मालकीची करा;

२ सर्वांस पूर्ण धर्मस्वातंत्र्य द्या; आणि—

३ लेखनावरील मुस्कटदाबी पूर्ण नाहींशी करा.

एवढें तुम्हीं केलें म्हणजे बाकीचें सारें आपोआप होईलच."

संपूर्ण.